म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. २२०

REFBK-0003863

॥ बलमुपास्व ॥

मधुमंदार माला.

पुष्प ३ रें, व ४ थें.

# नीत्शे व त्याचें तत्त्वज्ञान.

लेखकः—

गोपाळ शिवराम जोगळेकर,

बी. ए., एलएल्. बी., अमरावती.

REFBK-0003863

संपादकः—

हरिहर वामन देशपांडे,

वाङ्मयविशारद.

श्री

# संपादकाचें मनोगत.

रबराची लवचिकता प्रसिद्ध आहे. परंतु तेंहि अधिक ताणलें असतां तुटल्याविना रहात नाहीं. आमच्या वर्गणीदारांच्या सहनशीलतेला रबराची उपमा दिल्यास तिचा उपमर्दच केल्यासारखें होणार आहे. आमच्याकडून झालेल्या अनन्यसाधारण दिरंगाईबद्दल माफीची याचना करणेंहि फारच धाष्टर्याचें होणार आहे.

मागील उन्हाळ्यानंतर हनुमान व्यायाम प्रसारक मंडळावर दैवी प्रकोप गुदरून मंडळाची इमारत पडली. त्यावर आपत्ति-निवारणनिधि जमविण्यासाठीं हातचीं सर्व कामें सोडून आह्मांसहि आमच्या अल्प शक्तीप्रमाणें मदत करावी लागली. नंतर अखिल भारतीय हिंदुमहासभेचें तांतडीचें बोलाविणें आल्यावरून महासभेच्या वतीनें मागील सबंध वर्ष उत्तर हिंदुस्थानांत प्रचार करण्यांत घालवावें लागलें.

मंडळानें आपलें स्वतःचें मुद्रणयंत्र घेतल्यानंतर तरी तांतडीनें वाचकांस मालेचें ३ व ४ थें पुष्प सादर करतां येईल अशी अपेक्षा होती. परंतु मुद्रणयंत्रासाठीं भवन बांधण्यांत आणि तदनंतर विद्युद्यंत्र सुरू करण्यांत अनेक अडचणी येत गेल्यानें मुद्रणालयाचे व्यवस्थापक श्री. तु. मा. पाटील यांची कळकळीची इच्छा असतांहि प्रस्तुत पुस्तक लवकर निघूं शकलें नाहीं. अखेरीस होतां होतां मंडळाची सर्व आपत्ति निवारण झाल्यानंतर आणि

मुद्रणालयाच्या कामाची स्थिरस्थावर झाल्यानंतर सांप्रत मालेचें हें ३ व ४ थें जोड पुष्प एक दीड वर्षाच्या उशीरानें वाचकांच्या सेवेशीं सादर करण्यांत येत आहे.

सांप्रत पुस्तकाच्या विषयासंबंधीं ग्रंथ कर्ते आमचे मित्र श्री. गो. शि. जोगळेकर यांनीं आपल्या हृद्गतांत योग्य तें सर्व सांगितलेंच आहे. तथापि येथें इतकें सांगणें अवश्य आहे कीं राष्ट्रीयबल संवर्धनाच्या दृष्टीनें नीत्शे हा एक जबरदस्त लेखक होऊन गेला. बलोपासनेवरील त्याचे बरेच विचार भारतीय मनोवृत्तीस मिळते जुळते असल्यानें विचारगंगेच्या पश्चिमेकडे वाहणाऱ्या या प्रवाहाचें स्वरूपहि महाराष्ट्रीय वाचकांपुढें ठेवणें अगत्याचें वाटल्या वरूनच या ग्रंथाची निवड केली आहे.

मालेच्या विनंतीस मान देऊन श्री. जोगळेकर यांनीं वेळांत वेळ काढून पुस्तक लिहून दिलें आणि सरस्वती मुद्रणालयाचे व्यवस्थापक श्री. तु. मा. पाटील यांनीं आपुलकीच्या भावनेनें अनेक आपत्तींना तोंड देत अखेरीस उत्तम रीतीनें पुस्तक छापून दिलें याबद्दल उभयतांचे आभार मानणें जरूर आहे. त्याचप्रमाणें पुस्तकाची शुद्ध व उत्तम प्रत आपल्या सुवाच्य हस्ताक्षरानें करून दिल्याबद्दल हनुमान व्या. मंदिरांतील बालचरशिक्षक श्री. मु. ना. कागलकर यांचें व मुद्रितें काळजीपूर्वक तपासून पुस्तकाच्या प्रारंभापासून तो अखेरपर्यंत वेळोवेळीं लागणारें सर्व प्रकारचे सहाय्य करण्याबद्दल श्री. कृष्णराव जोग यांचेहि तितकेच आभार मानणें जरूर आहे.

जरी वाचकांना दोन रुपयांत वर्षाचीं पांच पुष्पें देण्याचें आह्मी अभिवचन दिलें होतें तरी पुष्पें २ रें व ३-४ थें हीं संकल्पापेक्षां मोठीं निघाल्यानें व तत्प्रीत्यर्थ खर्चेहि अधिक आल्यानें नियमाप्रमाणें पाऊणपट किंमतीच्या हिशेबानें एकूण चारहि पुष्पें मिळून २॥. रु. ची पुस्तकें एकूण १॥|= रु. किंमतीस देत आहोंत. व |. टपाल हशीलाचे धरतां मालेस एकूण २८= खर्च पडलेला आहे. हा पहिलाच उपक्रम असल्यानें हा ८= चा तोटा मालेस सहन करावा लागला. अर्थात यापुढें प्रसिद्ध होणारें मालेचें पांचवें पुष्प ‘ उपनिषत्प्रवेशिका ’ वर्गणीदारांना व्ही. पी. नें पाठविण्यांत येईल हें सांगणें नकोच.

मागील दोन्ही पुष्पांप्रमाणेंच सहृदय वाचक याहि जोड् पुष्पाचें सानंद स्वागत करतील अशी आशा बाळगून वाचकांची रजा घेतों.

**हरिहर वामन देशपांडे**
संपादक.

**टीप**:—कळविण्यास परमानंद वाटतो कीं, आमचे सहकारी मित्र श्री. लक्ष्मणराव कोकर्डेकर हे पाश्चात्य व्यायाम संघटनेचें व पद्धतीचें निरीक्षण व अध्ययन करण्याकरितां गत जूलै मासीं मंडळातर्फे जर्मनीस रवाना झाले आहेत. प्रस्तुत कार्यार्थ निधि जमविणें इ. व्यवसाया करितां मागिल पुष्पांपासूनच मालेशीं असलेला आपला संबंध त्यांनीं तात्पुरता स्थगित केला. परंतु जर्मनीहून परत आल्यानंतर फिरून त्यांच्या नवसंपादित ज्ञानाचा लाभ मालेच्या वाचकांस मिळेल यांत शंका नाहीं. **संपादक.**

युद्धानेंच मनुष्या आलें श्रेष्ठत्व या जगामाजी ।
न दिसे एकहि वस्तू युद्धानेंहि असाध्य आहे जी ॥

# लेखकाचें हृद्गत.

लेखकाचे सन्मान्य सहाध्यायी व उमरावतीचे सुप्रसिद्ध नागरिक डॉ. शिवाजीराव पटवर्धन ह्यांनीं श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडाळाच्या मधुमंदार मालेसाठीं पुस्तक लिहून देण्याची प्रस्तुत लेखकास विनंति केली व ती लेखकानें आज्ञा समजून मान्य केली. कोणतें पुस्तक लिहावें याची वाटाघाट करतांना सुप्रसिद्ध इंग्रज ग्रंथकार **मॅग्झीमिलीयन ए. मग्ग** यानें नीत्शेवर लिहिलेल्या पुस्तकाचें मराठींत सार द्यावें असें डॉ. पटवर्धन यांनीं सुचविलें व मूळ इंग्रजी ग्रंथ व नीत्शेवर लिहिले गेलेले इतर इंग्रजी ग्रंथ वाचण्यासाठीं लेखकास त्यांनीं आणून दिले.

सदर ग्रंथ मराठींत आणण्याचे कामीं मजकडून दिरंगाई होत आहे असें दिसून आल्यावरून मी मराठींत मजकूर सांगावा व कोणातरी लेखकानें तो उतरून घ्यावा अशी व्यवस्था करण्यांत आली. डॉ. पटवर्धन यांच्या जवळ तरुण व उत्साही कार्यकर्त्यांचा जो संग्रह आहे त्यांतील निवडक लेखकांस त्यांनीं मजकूर उतरून घेण्यासाठीं माझ्या मदतीस दिलें. त्यांनीं दिलेल्या लेखकांपैकीं रा० **तुळशीराम मारुतीराव पाटील** व रा० **मु. ना. कागलकर** यांचा उल्लेख विशेष प्रामुख्यानें केला पाहिजे. मजकूर उतरून घेण्याच्या कामीं व शुद्ध प्रत लिहिण्याच्या कामीं त्यांची मदत नसती तर पुस्तक प्रसिद्ध होण्यास अधिक विलंब लागला असता.

प्रस्तुत पुस्तकांत माझ्या पदरचें असें कांहींच नाहीं ह्मटलें तरी चालेल. सर्व पुस्तक मि० **मग्ग** यांच्या पुस्तकास धरून लिहिलेलें आहे. मात्र हें पुस्तक **मग्गच्या** पुस्तकाचें भाषांतर आहे कीं रूपांतर आहे हें माझें मलाच सांगतां येत नाहीं. नीत्शेचा परिचय वाचकांस व्हावा याच इच्छेनें हें पुस्तक लिहिलेलें आहे; ह्मणून शब्दशः भाषांतर न देतां केव्हां केव्हां मला रूपांतर करावें लागलें; एवढेंच नव्हे तर कधीं कधीं पदरचाच मजकूर घालावा लागला. ह्या पुस्तकांत जर कांहीं गुण आढळले तर त्याचें श्रेय मूळ ग्रंथकार मि. मग्ग व त्या पुस्तकाची निवड करून देणारे डॉ. पटवर्धन ह्यांस आहे. पुस्तकांत दोष आहेत याची जाणीव मला आहे; व त्या दोषांबद्दल मात्र मी जबाबदार आहें.

मूळ पुस्तकांत परभाषेंतलि बरेच शब्द आहेत. त्यांचे बिनचूक उच्चार काय याचें मला ज्ञान नसल्यामुळें उच्चारांसाठीं डॉ. पंजाबराव देशमुख, एम्. ए., डी. फिल्., बार-ॲट-लॉ, यांजकडे मला धांव घ्यावी लागली. जर्मन शब्दांचे उच्चार त्यांनीं सांगितल्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

**वऱ्हाडशाळापत्रक व सहकारी विदर्भ** या दोनहीं मासिकांचें संपादकत्व सुटल्यावर वाङ्मयसेवा करण्याचा योग इतक्यांतच येईल असें मला मुळींच वाटलें नव्हतें. डॉ. पटवर्धन यांच्यामुळें हा योग आला ह्याबद्दल मी डॉक्टर साहेबांचा फार ऋणी आहें असें नमूद करून हें ह्मत पुरें करतों.

सर्वांचा नम्र,
**गोपाळ शिवराम जोगळेकर.**

# सामान्य अनुक्रमणिका.

## भाग पहिला.


पृष्ठ.

प्रकरण पहिलें.

विषय प्रवेश. १--६

प्रकरण दुसरें.

नीत्शेचें चरित्र. ६--५५


## भाग दुसरा.


प्रकरण पहिलें.

चांगलें व दुष्ट यांचे पलीकडे.

(बियाँड गुड अँड इव्हल.) ५५--९५

प्रकरण दुसरें.

ख्रिस्ती धर्माचें थोथांड

( दी अँटी ख्राइस्ट.) ९६--११८

प्रकरण तिसरें.

माणुकीच्या पलीकडे

( सुपरमन्.) ११९--१७४

# विषयवार सूचि.

## भाग पहिला.


| | | | | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|
| प्रकरण पहिलें.— | विषयप्रवेश. | .... | | १—६ |
| प्रकरण दुसरें.— | नीत्शेचें चरित्र. | .... | | ६—५४ |
| | नांव, पूर्वज. | .... | .... | ६ |
| | जन्म. | .... | .... | ७ |
| | बालपण. | .... | .... | ८ |
| | शाळेंत. | .... | .... | १० |
| | विश्वविद्यालयांत | .... | .... | १३ |
| | लष्करी शिक्षण. | .... | .... | १५ |
| | पुढील अभ्यास. | .... | .... | १६ |
| | बॅले येथें प्रोफेसर. | .... | .... | १७ |
| | युद्ध. | .... | .... | २० |
| | दी बर्थ ऑफ् ट्रॅजेडी. | .... | .... | २१ |
| | थॉटस् आउट ऑफ् सीझन. | | .... | २४ |
| | वॅग्नेनरशीं बेबनाव. | .... | .... | २६ |
| | ह्यूमन, ऑल टू ह्यूमन | .... | .... | २९ |
| | दी डॉन् ऑफ दी डे. | .... | .... | ३४ |
| | दी जॉयफुल विस्डम. | .... | .... | ३६ |
| | झंझावाताचें नृत्यगीत. | .... | .... | ३६ |
| | दस स्पेक झरथुष्ट्र. | .... | .... | ३८ |
| | बियाँड गुड अँड ईव्हल | .... | .... | ४३ |

पृष्ठ.
दी वुइल टु पॉवर. .... .... ४५
जीनिऑलजी ऑफ् मॉरल्स. .... ४६
त्याचे शेवटचे ग्रंथ. .... .... ४९
शेवट. .... .... ५२

## भाग दुसरा.

प्रकरण पहिलें.— चांगले व दुष्ट यांचे पलीकडे. ....
(बियाँड गुड अँड ईव्हल.) ५५--९५
तत्त्व. .... .... ५५
चांगलें व दुष्ट यांच्या व्याख्या. .... ५८
निर्गुण जग. .... .... ५९
सापेक्षता. .... .... ६०
उपयुक्ततावादाचा उगम व
समाज-विषयक नीतीचा इतिहास .... ६२
इच्छेचें स्वातंत्र्य. .... .... ७१
दया. .... .... ७५
बलोपासना. .... .... ७८
धनी व गुलाम. .... .... ८४
भावी नीति. .... .... ८९
युद्ध. .... .... ९१
प्रकरण दुसरें.— ख्रिस्ती धर्माचें थोथांड अथवा
दी अँटी ख्राइस्ट. .... ९६--११८
तत्त्वें. .... .... ९६
ख्रिस्ती धर्म विरुद्ध निसर्गाची निवड. ९७

पृष्ठ.
ख्रिस्ती धर्माचें मूळ. .... .... १०२
जीवाचें अमरत्व. .... .... १०३
पाप. .... .... १०४
ख्रिस्ती धर्माचा इतिहासावर परिणाम. १०५
सेंट पॉल. .... .... १०७
ख्रिस्ती धर्म व मानवी प्रेम. .... १११
ख्रिस्ती धर्म व कला. .... .... ११२
ईश्वर. .... .... ११४
नीतीचा निर्णय. .... .... ११६

प्रकरण तिसरें.— माणुसकीच्या पलीकडे अथवा सुपरमॅन्. .... ११८-१७४

तत्त्वें. .... .... ११८
जीवित ह्मणजे काय? .... .... १३०
चक्रनेमिक्रम. .... .... १३१
ध्येयाची आवश्यकता. .... .... १३७
अतिमानुषतेच्या कल्पनेंतील फेरबदल. १३९
अतिमानुषतेच्या कल्पनेचें धार्मिक महत्त्व. १४२
सुप्रजाजननशास्त्र. .... .... १४९
विवाह. .... .... १५४
विवाहासाठीं सूचना .... .... १५९
संयुक्त युरोप. .... .... १६२
शिक्षण. .... .... १६६
उच्च मनुष्य. .... .... १६७

नं. 220

# भाग पहिला.

## प्रकरण पहिलें.

ग्रं. क्र. ३८६३

### विषयप्रवेश.

तत्वज्ञानी या शब्दाच्या शास्त्रीय अर्थाकडेच केवळ दृष्टी दिल्यास नित्शे हा तत्वज्ञानी नव्हता असेंच म्हणावें लागेल. जगावर सत्ता चालविणारा व नियमन करणारा तोच खरा तत्त्वज्ञानी अशी 'तत्त्वज्ञानी या शब्दाची नीत्शेनें व्याख्या केलेली आहे. त्याच्या मतें सेनापती जसा सैनिकावर हुकमत चालवितो; व न्यायान्यायाचा निवाडा करितो, त्याप्रमाणें खऱ्या तत्त्वज्ञान्याची वर्तणूक असते. खरा तत्त्वज्ञानी काळाशीं सदैव झुंजत असतो. तत्त्वज्ञान्याची नीत्शेने केलेली ही व्याख्या मान्य केली तर नित्शे हा तत्त्वज्ञानी होता असेंच म्हटलें पाहिजे.

लहानपणासूनच काव्याकडे व कलांकडे नीत्शेचा कल असे. नीत्शेनें भाषाशास्त्राचें बारकाईनें अध्ययन केलें होतें. त्याची लिखाणें तत्त्वज्ञानाप्रमाणें सौंदर्याचे दृष्टीनेंही श्रेष्ठ दर्जाचीं असत. त्याच्या ग्रंथांतून—विशेषतः 'झरथुस्ट्र असें म्हणतो' या ग्रंथामध्यें कित्येक ठिकाणीं अतिशय सुंदर व मनाला थक्क करून सोडणारे काव्यमय

उतारे आहेत. मनमोहक भाषासरणी आणि अत्यंत बारकाईनें श्लेष काढून शब्द वापरण्याची पद्धती एवढे दोन गुण घेतले तरी नीत्शेचें नांव अजरामर होईल. एकंदरींत नीत्शे हा कवि असून तत्त्वज्ञानी होता.

वयाच्या चौतिसाव्या वर्षीं नीत्शेनें शब्दशास्त्राच्या अभ्यासाकडे पाठ फिरविली व जगांत घडणाऱ्या घडामोडींकडे आपली दृष्टी वळविली. याचें कारण असें कीं, कटु अनुभवानें त्याचें भ्रमपटल नाहींसें झालें होतें. भाषाशास्त्राचा अध्यापक (प्रोफेसर) या नात्यानें त्याला प्रत्यहीं कराव्या लागणाऱ्या कंठाळी कर्तव्यामुळें तो कंटाळून गेला होता. शब्दशास्त्राचा किचकट कीस काढण्याचा त्याला अगदीं वीट आला होता. वनस्पती व प्राणी यांच्या जीवनाचा अभ्यास करून त्यांचें रहस्य उलगडणारें शास्त्र ह्मणजे **फीजिऑलजी** अथवा इंद्रियविज्ञान—शास्त्र हें शास्त्र होय. नीत्शेनें याच शास्त्राचा पुढें जन्मभर अभ्यास केला. तेव्हांपासून नीत्शेनें पुढें जे ग्रंथ लिहिले त्यांत वाङ्मयविशारदाची साहित्यप्रवीणता व प्राणिशास्त्रवेत्त्याचा आशावादीपणा यांचा सुंदर मिलाफ झालेला दिसतो.

नीत्शेनें केवळ पुस्तकी अभ्यासच केलेला होता, व्यावहारिक अनुभवाची त्याला जोड नव्हती ही गोष्ट खरी आहे. शास्त्रीयदृष्ट्या बोलावयाचें ह्मणजे प्राणिशास्त्रांत नीत्शे हा नवशिका विद्यार्थी होता. परंतु असाधारण आशावादीपणा व मनुष्यप्राण्याच्या भवितव्यतेविषयीं उदात्त श्रद्धा या गुणांमुळें उपरिनिर्दिष्ट दोष झांकून गेला. **युजेनिक्स** अथवा सुप्रजाजननशास्त्र या शास्त्राचा मूळ प्रणेता **सर फ्रॅन्सीस गॉल्टन** हा होय. Superman चें ह्मणजे अतिमानुषतेचें आगमन

जाहीर करणाऱ्या नीत्शेनें श्रद्धा व आशावादीपणा या दोन गुणांत **सर फ्रॅन्सीस गॉल्टन** यांच्यावरही ताण केली आहे. **युजेनिक्सच्या** मार्गावरील संकटें दूर करण्याचें काम नीत्शेनें केलें.

कोणत्या सिद्धांताविषयीं त्याचा विचार सुरू असे व त्यावर त्याचीं सामान्यमतें काय असत याची कल्पना त्यानें काढलेले कांहीं सिद्धांत पुढें दिलेले आहेत त्यांवरून होईल.

(१) हें जग निर्गुण आहे. त्याला ध्येय अथवा हेतू नाहीं. मनाला आल्हादित करणारा हा एक चमत्कार आहे व तो चक्रनेमिक्रमानें सतत होत रहाणारच.

(२) आजवर मनुष्य जातीलाही कांहीं ध्येय नव्हतें. तथापि स्वतःच मनुष्य जातीनें आपलें ध्येय नक्की ठरवून घेणें कला-विकासाच्या दृष्टीनें फायद्याचें असून असें केल्यानें मनुष्याची शक्ति वाढेल. मनुष्य जातीपेक्षां अधिक उच्च व अधिक श्रेष्ठ प्राणी म्हणजे **सुपरमन** अथवा अतिमानुष होय. अतिमानुष होणें हेंच मनुष्य-जातीचें ध्येय असावें. **मनुष्यजातीला अधिक श्रेष्ठ बनवून अतिमानुष करण्याची ही उदात्त कल्पना म्हणजेच बलोपासनेचें रहस्य होय.**

(३) अतिमानुषतेच्या मार्गांत अडथळे आणणारीं व मनुष्याला अतिमानुष बनण्यास विलंब लावणारीं जीं नीतीचीं, राजकारणाचीं अथवा धर्माचीं तात्विक बंधनें असतील तीं तोडून टाकिलीं पाहिजेत. **बलवान व प्रभुत्वसंपन्न लोकांनीं घालून दिलेले नीति-नियमच जीविताच्या खऱ्या ध्येयाशीं सुसंगत असतात.**

(४) सर्व धर्मांपेक्षां **गुलामी मनोवृत्ति बनविणारा ख्रिस्ती-धर्म हा जीविताचा अतिशय दुष्ट शत्रू आहे.** निसर्गाचे निवडीची ख्रिस्तीधर्म धूळधाण करतो. मनुष्य प्राण्याला अधोगतीच्या खोल गर्तेंत ढकलणारा ख्रिस्तीधर्म हा मनुष्य जातीवरील कधींही नाहींसा न होणारा कलंक आहे.

(५) अतिमानुष प्राणी येणार हें नक्की असलें तरी ती फार दूरची भविष्यकालीन गोष्ट आहे. **ह्मणून तूर्त आपलें ध्येय मनुष्य जातीची बनावट सुधारणें व श्रेष्ठ प्रतीची** मनुष्यजात निर्माण करणें हें असावें. मात्र हा श्रेष्ठ प्राणी ह्मणजे अंतिम ध्येय नव्हे; पुढें जी अतिमानुष जात येणार आहे त्याच्या दरम्यानच्या काळांतली मधली पायरी ह्मणून ही श्रेष्ठ मनुष्यजात समजावी. उन्नतीच्या मार्गानें श्रेष्ठ माणसाच्या पदवीला पोंचण्यासाठीं पुढील गोष्टी ताबड-तोब अमलांत आणिल्या पाहिजेत:—

**१ आपले विवाहविषयक नियम सुप्रजाजननशास्त्राकडे लक्ष पुरवून बदलले पाहिजेत. २ तरुणांना योग्य शिक्षण दिलें पाहिजे. ३ सबंध युरोप एकछत्री केलें पाहिजे आणि ४ ख्रिस्तीधर्म समूळ नष्ट केला पाहिजे.**

या लहानशा पुस्तकांत नीत्शेच्या तत्वज्ञानाचा तपशील सविस्तर देणें शक्य नाहीं. कांहीं महत्वाचे मुद्देच दाखवून स्वस्थ बसावें लागेल. याहून अधिक माहिती पाहिजे असल्यास नीत्शेचे ग्रंथच वाचावेत अशी आमची शिफारस आहे. नीत्शेच्या सर्व पुस्तकांचीं इंग्रजींत सुंदर भाषांतरें झालेलीं आहेत. डॉ. लेव्ही यांनीं अठरा विभागांत नीत्शेच्या ग्रंथांचीं भाषांतरें प्रसिद्ध केलेलीं आहेत.

नीत्शेची प्रकृति नेहमीं बिघडत असे ह्मणून त्याला मधूनमधून त्रुटित लेखच लिहितां येत. (१) दी बर्थ ऑफ ट्रॅजेडी, (२) थॉट्स् आउट ऑफ सीझन् (३) दस् स्पेक झरथुस्ट्र (४) दी जिनिऑलजी ऑफ मॉरल्स् (५) दी केस ऑफ वॅगनर (६) दी अँटीक्राईस्ट व (७) एक्सीहोमो एवढेच ग्रंथ ह्मणजे त्याच्या लिखणांपैकीं जवळ जवळ निम्मे भाग—एवढेच काय ते सुसंगत पुस्तकें ह्मणतां येण्याजोगे ग्रंथ आहेत. त्याच्या इतर ग्रंथांतून जवळ जवळ चार हजार सुभाषितें, पुष्कळसे निबंध, व्याख्यानें व विचारतरंग, इतस्ततः पसरलेले आहेत. त्यामुळें नीत्शेच्या तत्वज्ञानावर सुसंबद्ध ग्रंथ लिहिण्याचें काम प्रायः अशक्य झालेलें आहे. नीत्शेची काव्यप्रिय प्रवृत्ति व तेरड्याप्रमाणें तीन दिवसांत तेरा रंग करणारी चंचल मनोवृत्ति, यांमुळें एका ठिकाणीं तो जें लिहितो त्याच्या अजिबात विरुद्ध दुसऱ्या ठिकाणीं त्यानेंच लिहिलेलें सांपडतें. तथापि नीत्शेचा संदेश काय आहे तें स्थूलमानानें कळविण्याचा प्रयत्न या पुस्तकांत केलेला आहे.

नीत्शेचा सर्व जन्म एकलकोंडेपणांत गेला. त्याला काबाडकष्टाचीं कामें कधींही करावीं लागलीं नाहींत. गरीब व दलित यांचें जीवित व अंतःकरण समजून घेण्याची संधि त्याला मिळाली नाहीं. त्यांतच त्याची शरीर प्रकृति चांगली नसे. शिवाय तो अस्सल लढवय्या होता. तत्कालीन् परिस्थिती विरुद्ध त्यानें अखंड झुंज चालविली होती. त्यामुळें रस्ते साफसूफ करणाऱ्या विनीवाल्या सैनिकाप्रमाणें काम करणें त्याच्या हातून घडत नसे. अस्सल योध्याप्रमाणें एकदम घोडदौड करून हल्ला चढविणें त्यास अधिक पसंत पडे.

"कस्य त्वं वा कुत आयातः" ह्मणजे तूं कोठून आलास कोणीकडे चालला आहेस व कां? हें गूढ त्याला उकलतां आलें नाहीं. तथापि त्यानें अतिमानुषतेचें उच्च व उत्तेजक ध्येय आपणांपुढें ठेविलें यांत कांहीं संशय नाहीं.

---

# प्रकरण दुसरें.

## नीत्शेचें चरित्र.

**नांवः**—झेक भाषेमध्यें, निझ्की असें एक विशेषण आहे. त्याचा अर्थ नम्र किंवा दीन असा आहे. पोकार्नी या विशेषणाचा अर्थही तोच आहे. जर्मनींतल्या पुष्कळ लोकांना पोकॉर्नी ह्मणतात. ज्यांचे पूर्वज गुलाम होते त्यांना निझ्की असें नांव पुष्कळ ठिकाणीं दिलेलें दिसतें. निझ्की, निश्चकी, निश्चके, नीत्शे, हीं सर्व नांवें स्थलकालमानानुसार अपभ्रंश होऊन निझ्की या शब्दापासूनच झालेलीं रूपें आहेत.

**पूर्वजः**—आपला जन्म उच्च घराण्यांत झालेला आहे अशी नीत्शेची समजूत असे. धार्मिक समजुतीमुळें पोलंडमधून ज्या सरदार नीझ्कींना पळ काढावा लागला ते आपले पूर्वज आहेत असें नीत्शे ह्मणे. लहानपणीं त्यानें ही दंतकथा ऐकली व मरेपर्यंत ही कल्पना त्यानें उराशीं घट्ट बाळगून ठेविली होती. या दंतकथेचा उल्लेख प्रस्तुत चरित्रनायक व त्याची बहीण यांनीं आपल्या लेखांतून केलेला

आहे. "सरदार नीत्शेनें केव्हांही खोटें बोलतां कामा नये," असें मोठ्या गर्वानें नीत्शे ह्मणाल्याचें सांगतात. नीत्शेचा स्वभाव गर्विष्ठ व एकांडा बनविण्यास ही सरदारी कल्पना बरीच कारणीभूत झालेली आहे. अंधश्रद्धेनें ग्रहण केलेली नीत्शेची ही आवडती दंतकथा वस्तुस्थितीला धरून आहे कीं सोडून आहे, याविषयीं निर्विवाद निकाल देण्याजोगा पुरावा कोणींच पुढें आणलेला नाहीं. तथापि नीत्शे हा लोकशाहीचा कट्टा दुस्मान, सरदारी सत्तेचा हट्टी पुरस्कर्ता व गुलामी वृत्ति विरुद्ध सर्व प्रकारें हल्ला करणारा लढवय्या वीर, असून त्याचें आडनांव 'नम्र माणूस' किंवा 'दास' या अर्थाचें असावें हा योगायोग विलक्षण आहे, यांत शंका नाहीं. तसेंच 'धी अँटी ख्राईस्ट' हें पुस्तक लिहून मनुष्य जातीवरील भयंकर कलंक ह्मणून ख्रिस्तीधर्माची अतोनात निंदा करणाऱ्या नीत्शेचा जन्म पिढीजात पाद्र्याच्या—भिक्षुकाच्या—घराण्यांत झालेला असावा हाही विलक्षण योगायोग होय.

**जन्मः**—फ्रेड्रीक नीत्शेचा जन्म रोकेन गांवीं १५ आक्टोबर सन १८४४ इसवीं रोजीं झाला. प्रशियन प्रांतांतील सॅक्सनीमधील रोकेन या लहानशा खेडेगांवांत नीत्शेचा बाप **कार्ल्लुडविश** नीत्शे हा भिक्षुकी करीत असे. कार्ल्लुडविश हा पिढीजाद भिक्षुक असून त्याचें लग्नही १० आक्टोबर १८४३ रोजीं पिढीजाद भिक्षुक घराण्यांतली मुलगी **फ्रॅन्झिस्का ओएलर** इजशीं झालें. प्रस्तुत चरित्रनायक फ्रेड्रिक नीत्शे हा या जोडप्याचा पहिला मुलगा होय. याशिवाय त्यांना एक मुलगा व एक मुलगी अशीं दोन अपत्यें झालीं. पैकीं धाकटा मुलगा दोन वर्षांचा असतांनाच वारला. मुलीचें नांव

इलिझाबेथ हें होतें. प्रस्तुत चरित्र नायकाच्या मृत्यूनंतर ती बरीच वर्षें जिवंत होती. आपल्या भावाच्या चरित्रांतील गोष्टी मोठ्या आस्थेवाइकपणानें ही सांगे. त्याच्या तत्वज्ञानाविषयीं मात्र आपला मतभेद आहे हें वारंवार सांगण्यास ती विसरत नसे !

**बालपण:**—फ्रेड्रिक चार वर्षांचा असतांना त्याचा बाप जिन्याच्या पायऱ्यांवरून घसरून पडल्यामुळें त्याच्या मेंदूस धक्का बसला. या अपघातानंतर त्यास वेड लागल्यासारखें झालें. या अपघातामुळें ह्मणा, किंवा पुढें होणारी गोष्ट अपघातामुळें अधिक लवकर घडून आली ह्मणा, पण एवढी गोष्ट खरी कीं, तेव्हांपासून तो भ्रमिष्ट झाला. या स्थितींत एक वर्षभर खिचपत पडल्यावर तो मरण पावला. या दुःखदायक गोष्टीचा ठसा लहानग्या फ्रेड्रिकवर कायमचा उमटला. रोकेन हें गांव नॉंबूर्गजवळ आहे. पति मरण पावल्यावर फ्रेड्रिक नीत्शेची आई नॉंबूर्ग येथें १८५० सालीं आपल्या नातलगांकडे राहण्यास गेली. त्याकाळीं नॉंबूर्ग हें शहर मध्ययुगीन संस्कृतीच्या अवशेषांनीं व्याप्त होतें. तेथें अद्याप अनुदार रूढींचेंच प्राबल्य होतें; आणि कायदेपंडित, दरबारी, अधिकारी, भिक्षुक वर्ग व जुनाट मताचे पुरस्कर्ते यांच्याच हातीं सर्व सत्ता असे.

वयाच्या मानानें लहानगा फ्रेड्रिक फारच पोक्त व गंभीर असे. जुन्या संस्कृतीचें हें भारदस्त शहर फ्रेड्रिकला आवडलें. आपणही भिक्षुक होऊन जन्मभर धर्मकार्य करावें असें त्यावेळचें त्याचें ध्येय होतें. या ध्येयानुसार त्याची वृत्ति असल्यामुळें त्याच्या बरोबरीचे शाळेंतील सोबती त्याला भटजीबोवा ह्मणत. एके दिवशीं पाऊस फार पडत होता; व मुलगा शाळेंतून केव्हां येतो इकडे त्याच्या

आईचे डोळे लागून राहिले होते. अखेरीस कोंपऱ्यावरून फ्रेड्रिक येतांना दिसला. त्याच्याजवळ छत्री नव्हती व ओव्हरकोटही नव्हता; आणि पाऊस तर मुसळधार पडत होता. तथापि फ्रेड्रिक हा एखाद्या वृद्ध तपस्व्याच्या ऐटीनें शांतपणें अंगावर पाऊस घेत सावकाश घराकडे येत होता. घरीं आल्यावर आई थोडीशी रागावली व "इतका पाऊस पडत होता तर झटपट धांवत कां आला नाहींस?" असें ती त्याला विचारूं लागली. या प्रश्नानें फ्रेड्रिक अगदीं चकित झाला; आणि त्यानें शांतपणानें उत्तर दिलें, "चालतांना धावूं नये" असें आमचे मास्तर शिकवतात ना!"

फ्रेड्रिकला त्याचे बरोबरीचे कांहीं सोबती होते तरी पण त्याचा बहुतेक वेळ आई, वहीण, आजी व दोन मावशा यांच्या सहवासांत जाई. स्त्रियांच्या सहवासाचा परिणाम फ्रेडिकवर आजन्म टिकण्याजोगा झाला. मनाचा कोंवळेपणा, आत्मनिरीक्षणाची संवय आणि काव्य व गायन यांची आवड, हे गुण त्यानें ह्या स्त्रियांपासून उचलले.

विद्यार्थी ह्मणून त्याची वागणूक मोठी नमुनेदार असे. परंतु वयाच्या मानानें त्याच्या बुद्धीची वाढ मात्र विलक्षण झालेली होती. दहा वर्षें वयाचा असतांनाच त्यानें धर्मपर व नीतिपर कविता रचण्याचा खटाटोप केला. वयाच्या बाराव्या वर्षीं तर त्यानें कित्येक नाटकें व कादंबऱ्या खरडल्या. घरांत कोणाचाही वाढदिवस असला कीं, लहानगा फ्रेड्रिक त्या प्रसंगाला उचित अशी एखादी कविता नजर करावयाचाच. गाण्याची आवड तर त्याच्या मनांत यापूर्वीच पक्की झाली होती.

**शाळेंत:**—रोकेन गांवीं असतांना नीत्शेचा बाप व त्या खेडेगांवचा एक तात्या पंतोजी हे त्याचे शिक्षक होते. नॉबूर्गला प्राथमिक शाळेंत एक वर्षभर त्यानें शिक्षण घेतलें. नंतर कित्येक वर्षें तो एका खासगी शाळेंत शिकत असे. पुढें १८५४ सालीं नॉबूर्गच्या ग्रामरस्कूलमध्यें त्याचा प्रवेश झाला.

कार्ल् लुड्विश नीत्शेला ह्मणजे चरित्रनायकाचे बापाला पॅस्टरची जागा प्रशियाचा राजा किंग वुइल्यम याच्या मार्फत मिळाली होती. अर्थात् थोरा मोठ्या लोकांत नीत्शेच्या आईची ओळख होती. १८५८ सालीं **फोर्ता** येथील प्राचीन व प्रसिद्ध लांदेस्शूल ह्मणजे शेतकी शाळेमध्यें शिक्षण घेण्यासाठीं सहा वर्षें टिकणारी शिष्यवृत्ति तिच्या वशिल्यानें फेड्रिकला मिळाली.

नॉबूर्गच्या ग्रॉमरस्कूलमध्यें विद्यार्थ्यांची रहाण्याची सोय नसे. **फोर्ता** येथील विद्यालयास जोडून वसतिगृह होतें. जुन्या संस्कृतीचा अभ्यास हा तेथील अभ्यासक्रमांतील मुख्य भाग असे; व एकंदर शिस्त फार कडक असे. या शाळांतून बाहेर पडलेल्या पुष्कळ विद्यार्थ्यांनीं जर्मनींत पुढें नांव कमावलेलें आहे. सुप्रसिद्ध कवी **नोफालीस,** भाषाशास्त्रप्रवीण **हेगेल** व महान् तत्ववेत्ता व देशभक्त **फिस्टे** या विभूतींचें शिक्षण याच शाळेंत झालें होतें.

इ. स. १८५८ सालीं नीत्शेचा या विद्यालयांत प्रवेश झाला. त्यावेळीं त्याचें वय १४ वर्षांचें होतें. इतके दिवस घरीं बायकांच्या संगतींत राहिलेल्या नीत्शेला कॉलेजच्या वसतिगृहांतील बदललेलें वातावरण पहिल्या प्रथम एकदम मानवलें नाहीं. तेथील ती शिरत

व कधींही न बदलणारा कंटाळी कार्यक्रम हीं त्याला बिलकूल आवडलीं नाहींत. वसतिगृहांतील इतर विद्यार्थ्यांशीं तो मिसळत नसे; व फारसा बाहेरही पडत नसे. आठवड्यांतून एकदां आईला व बहिणीला भेटण्यासाठीं या कोंडवाड्यांतून तो बाहेर पडे.

येथें विद्यार्थ्यांना काम फार पडे. अभ्यासक्रमाच्या कंटाळवाण्या कचाट्यांतून सोडविणारे आणि मनाला हुशारी व प्रसन्नता आणणारे खेळही तेथें नसत. मधून मधून विद्यार्थ्यांना बाहेर फिरण्यासाठीं नेत. केव्हां केव्हां पोहण्यासही घेऊन जात. एवढाच काय तो ठराविक कार्यक्रमांत बदल होई. शाळेचें एकंदर ध्येय पढिक विद्वान तयार करणें हेंच होतें.

विद्यार्थ्यांना दौऱ्यावर घेऊन जात तेव्हां देखील शिस्तीचें ओझें हलकें होत नसे. रोजच्या अभ्यासानें नीत्शे कंटाळून जाई. अशा वेळीं कांहीं तरी लिहून तो आपल्या मनाचा भार हलका करी. त्यानें एक प्रकारची रोजनिशी ठेविली होती. आपण काय पाहिलें त्याचें वर्णन, आपले विचार, व आपल्या आकांक्षा या रोजनिशींत तो लिहून ठेवीत असे. तरुणपणचीं त्याचीं हीं लिखाणें फार मनोरंजक आहेत. आत्मपरीक्षण व आत्मचिंतन ह्यांकडे नीत्शेची किती प्रवृत्ति होती हें त्यावेळच्या त्याच्या लिखाणांवरून दिसून येतें. त्यावेळीं त्याचें वय अवघें १४ वर्षांचें होतें. अशा वयांत आपल्या कवितायुगाच्या तीन स्थित्यंतरांविषयीं मोठ्या पोक्तपणाचा आविर्भाव आणून त्यानें लिहिलें आहे. त्याच्या त्या वेळच्या लिखाणांवरून हा मुलगा अकालीं वृद्ध झालेला असावा असा भास होतो. या पोक्तपणांतूनच त्याचा पोरकटपणाही कधीं कधीं डोकावतो. जुन्या रूढीच्या बंधनांतून

कटाळून बाहेर पडत असल्याचीं लक्षणें दाखविणारे कांहीं उतारे अत्यंत महत्वाचे आहेत. त्यांवरून या भावी तत्ववेत्याचीं मतें हळू हळू कशीं बदलत चाललीं होतीं हें दिसून येतें. त्यावेळचे त्याचे आवडते ग्रंथकार ह्मटले ह्मणजे **शिलर, होएल्डरलिन् व बायरन्** हे होत. यांचे ग्रंथ तो मोठ्या आवडीनें वाची. या ग्रंथकारांच्या लेखांचा परिणाम नीत्शेच्या कोंवळ्या मनावर झा[illegible] चरित्रनायकाचे वापाला जुनाट रूढीच्या बंधनांत त्याचें मन आज[illegible] याच्या [illegible]. ह्या ग्रंथांचे वाचनानें कांहीं काल तो संशयाचे भोंवऱ्यांत सांपडला. परंतु हळू हळू रूढी सोडून पलीकडचें तीर गांठण्याचा त्यानें निश्चय केला. अखेरीस हजारों वर्षांच्या रूढीच्या पंकांतून त्यानें आपली आयुष्यनौका संशयाचे अफाट दर्यांत हांकल्ली. मात्र योग्य नावि- काच्या अभावीं त्याचें तारूं इतस्ततः भटकूं लागलें.

सुटीच्या दिवसांतील नीत्शेचा काळ मोठ्या मजेंत जाई. नॉंबूर्ग येथें अगर इतर ठिकाणीं आपल्या नातेवाईकांकडे किंवा परिचितांकडे तो जाऊन राहत असे. जीना, ड्रेसडेन व हार्झ पर्वत या ठिकाणीं फिरून त्यानें पुष्कळ मजा केली. या प्राचीन विद्या- लयांतील त्याचें अखेरचें वर्ष फार सुखाचें गेलें. अखेरच्या वर्गांत असल्यामुळें शिस्तीचीं बंधनें थोडीं ढिलीं झालीं होतीं, व सरावानें, असलेल्या बंधनांनाही तो फारसा जुमानीनासा झाला होता. कधीं कधीं तो एखाद्या प्रोफेसराच्या पंगतीस जेवावयास जाई, तर केव्हां केव्हां मित्रमंडळींत बसून पियानो वाजवून तो करमणूक करी. तो व त्याचे सहकारी मित्र यांनीं मिळून जर्मेनिया या नांवाची एक वाङ्मयचर्चा करणारी संस्था काढली होती.

धर्मग्रंथ, जर्मन व लॅटिन यांवर नीत्शेचें बरेंच प्रभुत्व असे. ग्रीक भाषेंतही त्याची प्रगति बरी होती. पण त्याचा गणितविषय मात्र कच्चा असे, असें त्याच्या शाळा सोडण्याच्या दाखल्यांत लिहिलें आहे. इ. स. १८६४ च्या सप्टेंबर महिन्यांत **फोर्ता** येथील विद्यालयांतून तो बाहेर पडला आणि त्याचा मित्र **डॉयसेन** ह्यासह तो **बॉनच्या** [illegible] शिकून सो[illegible]च्च शिक्षण घेण्यासाठीं गेला.

**विश्ववि[illegible]:**—जर्मन विश्वविद्यालयांतील विद्यार्थ्यांचें आयुष्य फारच स्वतंत्र व आनंदमय असतें. या मजेच्या काळाची आठवण केव्हांही बुजत नाहीं. वार्धक्याच्या वेळींतर या सुखाच्या काळाची आठवण फारच आल्हादकारक असते. गडबड व दंगाधोपा करून आनंदानें कालक्रमणा करणाऱ्या विद्यार्थ्यांत नीत्शे लवकरच मिसळून गेला. खावें, प्यावें, चैन करावी, असाच त्याचा कार्यक्रम होऊन गेला. तथापि शाळामास्तर होणें व भिक्षुक होऊन धर्मप्रसार करणें, या विषयींच्या त्याच्या कल्पना अजून मावळल्या नव्हत्या. संध्याकाळीं दारू प्यावी व रस्त्यांत पाचकळपणा करींत हिंडावें या गोष्टींचा त्यास लवकरच कंटाळा आला. आपल्या आवडत्या विषयांचा अभ्यास करावा व फावल्यावेळीं गाऊन आपली सात्विक करमणूक करावी असा क्रम त्यानें ठेविला. पहिले सहा महिने त्यानें भाषाशास्त्र व धर्मशास्त्र यांचा अभ्यास केला. पुढें धर्मशास्त्राचा अभ्यास सोडून भाषाशास्त्राचा अभ्यास त्यानें जोरानें चालविला.

गायनाचा नाद असल्यामुळें त्याच्या बरोबरीच्या विद्यार्थ्यांनीं नीत्शेला **सर ग्लक** अथवा **गंधर्व** असें टोपण नांव दिलें होतें. फ्रँकोनिया नांवाचा त्यांचा एक क्लब होता, या क्लबांत तो गात असे.

शेजारच्या **कोलोन** शहरीं गायनाचे मोठमोठे जलसे होत. नीत्शेला हे प्रसंग ह्मणजे मोठ्या उत्सवांसारखे वाटत.

याच सुमारास ख्रिस्तीधर्मावरील त्याचा विश्वास हळूहळू डळमळूं लागला. सन १८६५ च्या ईस्टरच्या सुटींत तो घरीं गेला. तेव्हां वहिवाटीप्रमाणें लॉर्डस टेबलकडे जाण्याचें नीत्शेनें साफ नाकारलें. लहानग्या नीत्शेच्या या बाटगेपणाच्या वर्तनामुळें धार्मिक वृत्तीच्या त्याच्या ह्मातान्या आईला केवढा धक्का बसला असेल याची वाचकांनींच कल्पना करावी! नीत्शेचा हा धर्मलंडपणा पाहून त्याच्या वहिणीलाहि फार वाईट वाटलें. या विषयावर वहिणीला त्यानें जें पत्र लिहिलें आहे त्यांत नीत्शेनें पुढील उद्गार काढले आहेत, "आत्म्याची शांति व सौख्य यांचीच केवळ तुला चाड असेल तर तूं खुशाल श्रद्धाळू हो; पण सत्याची पर्वा असेल तर श्रद्धा बाजूला ठेवून संशोधनच केलें पाहिजे!"

हिंवाळ्यांत बॉनचें विश्वविद्यालय सोडून नीत्शेनें लायप्झिक विश्वविद्यालयांत प्रवेश केला. बॉनमधील विद्यार्थ्यांशीं त्याचें जमेनासें झालें होतें. त्यांतच त्याचा आवडता प्रोफेसर **रित्शल** हाही बॉन सोडून **लायप्झिक** येथील विश्वविद्यालयांत गेला. त्यामुळें नीत्शेनेंही लायप्झिग येथील विश्वविद्यालयाची वाट धरली. येथें त्यानें प्राचीन भाषांचा दोन वर्षे अभ्यास केला. **कर्शस, राशेर, तिशेंडॉर्फ** व **रित्शल** या विद्वान प्रोफेसरांचीं व्याख्यानें त्यानें काळजीपूर्वक ऐकिलीं. या सर्व प्रोफेसरांत **रित्शलचें** प्रेम हुशार पण वहकलेल्या नीत्शेवर विशेष होतें. लायप्झिग येथें असतांना नीत्शेनें **शोपेन हॉयरचे** लेख वाचले. या तत्ववेत्त्याच्या लेखांनीं नीत्शेच्या विचारांत

क्रांति झाली. विशेषतः "धी वर्ल्ड ॲज वुईल ॲंड ॲज आयडिया" या **शोपेनहॉयरच्या** ग्रंथानें ख्रिस्तीधर्मावर नीत्शेची जी मोडकी तोडकी श्रद्धा होती ती अजिबात नष्ट करून टाकली. नीत्शेनें पुढें जे ग्रंथ लिहिले त्या सर्वांवर **शोपेनहॉयरच्या** मतांचीं छाप पडलेली दिसून येते.

लायप्झिक येथें असतांना नीत्शेचें दिवस आनंदात चालले होते. प्रेमळ मित्र व आवडते प्रोफेसर्स् यांच्या सहवासांत त्याचा काळ सुखानें जाई. मधून मधून तो नाटकें पाही. कधीं कधीं तो लहान सफरी करी. एकंदरींत त्याचीं हीं दोन वर्षें मोठीं सुखाचीं गेलीं.

**लष्करी शिक्षण:**—फोर्ता येथें असतांनाच नीत्शेचे डोळे बिघडण्यास सुरवात झाली होती. १८६७ सालापर्यंत त्याचे डोळे बरेच अधू झाले होते. तथापि एक वर्षपर्यंत लष्करी शिक्षण घेतलेंच पाहिजे हा जर्मनींतील कायदा त्यास चुकवतां आला नाहीं. लष्करी शिक्षणाची त्याला मनापासून आवडही नव्हती. तथापि प्रशियन सैन्याला सैन्यभरतीची आवश्यकता होती व नेहमीं ज्यांना साधारणतः माफी मिळे अशांनाही सक्तीच्या लष्करी शिक्षणाकरितां खेंचण्यांत आलें. ह्या तरुण विद्यार्थ्यावर सक्तीच्या लष्करी शिक्षणाचें जोखड येऊन पडल्यावर त्यानें तें कसें तरी सांभाळलें; मात्र शक्य तितकें मनापासून हें शिक्षण घेण्यास त्यानें आरंभ केला. कांहीं दिवस नॉंबूर्ग येथील फील्ड आर्टिलरीच्या चौथ्या पलटणींत त्यानें नोकरी केली व तो चांगला सैनिक झाला. घोड्यावर बसण्यांत नीत्शे इतका पटाईत त्या पलटणींत कोणीही नव्हता. या गोष्टीचा

मनापासून त्यास अभिमान वाटे. चढाईचें धोरण, हट्टी स्वभाव, युद्धाची आवड आणि उच्च कुलाची घमेंड हे गुण त्याच्या लेखांत दिसून येतात. लष्करी शिक्षण घेतांना त्याला आलेले अनुभव व नीत्शे घराण्याच्या कुलीनत्वाविषयीं प्रचलित असलेली दंतकथा हींच या गुणांचीं कारणें होत.

कांहीं महिने लष्करी शिक्षण घेतल्यावर त्याला एक अपघात झाला व या अपघातामुळें लष्करी नोकरींतून त्याची सुटका झाली. घोड्यावर बसत असतांना तो पडला व त्याचें हाड मोडलें. त्यावर शस्त्रक्रियेचे उपचार करावे लागले. तो लवकरच बरा झाला. तरी त्याला वर्ष अखेरपर्यंत नॉंबूर्गलाच रहावें लागलें. मात्र लष्करी शिक्षणाचा त्याच्या पाठीमागचा लकडा कांहींसा कमी झाला. सक्तीच्या लष्करी शिक्षणांतून तो सुटला असें नव्हे. परंतु लष्करी कवायतीं-मधील अधिक दगदगीचीं कामें म्हणजे लांब लांब घोडदौड करणें, किंवा डोंगर टेंकड्या वगैरे तुडवीत लष्करी हालचाली शिकणें, अशीं कामें त्याला करावीं लागलीं नाहींत. येथें त्याला जो वेळ सांपडे त्या वेळांत तो आपल्या आवडत्या विषयांचा अभ्यास करी. वर्ष संपल्यावर सक्तीच्या लष्करी शिक्षणाची त्याची मुदत भरली. त्यावेळीं त्याला 'गर्व्हीव सैन्याचा लेफ्टनंट' हा हुद्दा मिळाला.

**पुढील अभ्यासः**—यानंतर लायप्झिक येथें परत येऊन त्यानें भाषाशास्त्राचा अभ्यास कसून सुरू केला. हुशारी व अभ्यासाची आवड या गुणांनीं त्यानें आपले शिक्षक **प्रो. रित्शल** यांचें मन अधिकच आकर्षून घेतलें. फोर्ता येथें असतांनाच प्राचीन विद्या व कला या विषयांची गोडी त्याला लागली होती. **रित्शलनें** ग्रीक संस्कृतीविषयीं

त्याच्या मनांत अत्यंत आवड निर्माण केली. सर्वच बाबतींत तज्ञ होण्याचा त्याचा हव्यास **रित्शल**मुळेंच कमी झाला. त्यामुळें 'एक धड ना भाराभर चिंध्या' होण्याचा अनवस्था प्रसंग टळला. **रित्शलच्या** वजनामुळेंच कोणत्या तरी एकाच विषयांत पारंगत होणें हें ध्येय नित्शेनें कांहीं काळपर्यंत तरी पाळलें. **रित्शलचें** वजन व प्राचीन ग्रीक संस्कृतीचें प्रेम या दोन गोष्टींशिवाय नीत्शेच्या चारित्र्यावर परिणाम करणाऱ्या सांगण्यासारख्या आणखी दोन व्यक्ति आहेत. त्या ह्मणजे **शोपेनहॉयर** व **वॅग्नर** ह्या होत. पैकीं **शोपेन-हॉयरचा** उल्लेख पूर्वींच आला आहे. **वॅग्नर** हा सुप्रसिद्ध गवई व कवि होता. गायनाची नीत्शेला पहिल्यापासूनच आवड होती. **वॅग्नरच्या** गाननैपुण्याशीं याच वेळीं नीत्शेचा परिचय झाला; व पुढें लवकरच खुद्द **वॅग्नरशीं** त्याची ओळख झाली. या सुप्रसिद्ध कवीनें तरुण नीत्शेचें मन पूर्णपणें आकर्षून घेतलें.

**बॅले येथें प्रोफेसरः**—बॅले युनिव्हर्सिटींतील प्राचीन भाषा-शास्त्रकोविदाची जागा या सुमारास रिकामी झाली. या जागेवर कोणाची नेमणूक करावी याविषयीं युनिव्हर्सिटीच्या अधिकाऱ्यांनीं रित्शलचा सल्ला घेतला. रित्शलनें नीत्शेची शिफारस केली. सिनेटला त्यानें जें पत्र लिहिलें आहे त्यांत नीत्शेचा बराच गौरव करून तो लिहितो; "नीत्शे मोठा कर्तबगार माणूस आहे. तो मनांत आणील तें करील." यावेळीं नीत्शेचें वय अवघें २४ वर्षांचें होतें. आपल्याला प्रोफेसर नेमलें हें पाहून खुद्द नीत्शेलाही आश्चर्य वाटलें. त्याला अद्यापि डॉक्टरची पदवी मिळालेली नव्हती. तथापि बॅले येथें नीत्शेची प्रोफेसर ह्मणून नेमणूक झाल्यावर आपल्या बरोबरीच्या

माणसाची परीक्षा घेण्यांत काय अर्थ आहे असें वाटून लायप्झिक येथील तत्वज्ञानाच्या परीक्षकांनीं नीत्शेची परीक्षा न घेतां, नीत्शेनें भाषाशास्त्रांवर पूर्वींच जे निबंध लिहिले व जें कार्य केलें त्याबद्दल डॉक्टरची पदवी त्याला दिली. अशा रीतीनें नीत्शे प्रोफेसर झाला; व ता. २८ मे १८६९ रोजीं 'होमर व प्राचीन भाषाशास्त्र' या विषयावर प्रो. नीत्शेचें पहिलें व्याख्यान झालें. सुरवातीला त्याचें वेतन सालीना १२० पौंड असे. हें वेतन बेताबातांचेंच असे. ह्याशिवाय नीत्शेला त्याची आत्या **रोझाली** हिच्याकडून थोडी मिळकत मिळाली होती. तसेंच त्याचा एक चुलता इंग्लडांत जाऊन गबर झाला होता. त्यानें नीत्शे कुळांतील सर्वांनाच देणग्या दिल्या. त्याबरोबर आपल्या चरित्रनायकालाही देणगी मिळाली होती.

ह्या युनिव्हर्सिटींत कामाचा बोजा नीत्शेला फारसा पडत नसे. युनिव्हर्सिटी लहानशीच होती; व त्यांतही भाषाशास्त्राचा अभ्यास करणारे फक्त आठ विद्यार्थी होते. या विद्यार्थ्यांना नीत्शे शिकवी. शिवाय बॅले येथील मुख्य सरकारी शाळेंतील वरच्या वर्गांतील विद्यार्थ्यांना ग्रीक भाषा शिकवण्याचें काम नीत्शेला करावें लागे.

नीत्शेचें विद्यार्थ्यांशीं नीट पटे. तो सोपीं पुस्तकें पसंत करीत नसे. कठीण क्रमिक पुस्तकें तो लावी. त्याची शिकविण्याची पद्धत थोडक्यांत वर्णन करावयाची ह्मणजे विस्तृत कमी पण खोली खूप अशी होती. खूप पसारा घालून वरवर शिक्षण देणें त्यास पसंत नसे. थोडें झालें तरी चालेल, मात्र तें पूर्ण झालें पाहिजे; असें त्याचें मत असे. सामान्य बुद्धीच्या विद्यार्थ्यांकडे तो फारसें लक्ष

देत नसे. पण तैल बुद्धीचा विद्यार्थी आढळला कीं, त्याचेवर खूप मेहनत घेऊन तो त्याला शिकवी. बॅले येथील लोक कुढ्या मनाचे असत. ते नीत्शेशीं फारसे मिसळत नसत. यामुळें प्रथम नीत्शेला एकलकोंड्यासारखें झालें.

पुढें लवकरच ह्मणजे सन १८६९ च्या आगष्ट महिन्यांत नीत्शेची वॅग्नरशीं गांठ पडली. नीत्शेनें त्या सुमारास आपल्या एका मित्राला पत्र लिहिलें आहे; त्यांत तो ह्मणतो " शोपेनहॉयरनें 'दी जीनियस' ह्मणून वर्णन केलेल्या काल्पनिक महात्म्याशीं पूर्णपणें ज्याचे गुण जुळतात अशी व्यक्ति मला प्रत्यक्ष आढळली आहे. हृदय थरारून सोडणाऱ्या जिवंत तत्वज्ञानाचा **वॅग्नर** हा मूर्तिमंत अवतार आहे. अत्यंत उच्च ध्येय, सखोल आणि स्फूर्तिदायक भूतदया, परम पवित्र व उदात्त आचरण या सद्‌गुणांचें वॅग्नेर केवळ निवासस्थान आहे. त्याच्या जवळ असलों ह्मणजे मी भूलोकीं नसून देवलोकीं आहे असा मला भास होतो." १८६९ सालीं ज्या वॅग्नरची नीत्शेनें एवढी स्तुति केली त्याच वॅग्नरला १८८८ सालीं मनसोक्त शिव्या देऊन "विषारी साप" "अधोगतीस नेणारा नीच" वगैरे शब्दांनीं नीत्शेनें वॅग्नरचें वर्णन केलेलें आहे.

लायप्झिक येथें विद्यार्थी असतांनाच वॅग्नरशीं नीत्शेचा परिचय झाला होता. त्यावेळीं संधि येईल तेव्हां पुन्हां भेटा असें वॅग्नरनें त्यास सांगितलेलें होतें. **ट्रिब्शेन** या गांवीं वॅग्नर रहात असे. तो तेथें एक मोठें थोरलें नाटक लिहीत होता. प्रोफेसर ह्मणून नेमणूक झाल्यावर एक महिन्याच्या आंतच नीत्शे वॅग्नरला भेटला. आपल्या इकडे रा. फाळक्यांनीं ज्याप्रमाणें एक अगडबंब नाटक लिहिलें

आहे तशा तऱ्हेचें नाटक लिहिण्याचा वॅग्नरचा बेत होता. बेलाच्या पानाला ज्याप्रमाणें तीन दळें असतात तरी तीं तिन्ही मिळून एकच पान होतें त्याप्रमाणें तीन आपआपल्यापरी स्वतंत्र नाटकें परंतु तिन्ही मिळून होणारें एकच महानाटक व्हावें, अशा तऱ्हेचें ट्रॅय-लजी अथवा आपल्याला समजेल अशा भाषेंत बोलावयाचें ह्मणजे बिल्वदळी नाटक वॅग्नर यावेळीं रचीत होता. राष्ट्रीय नाटकगृहा-चीहि त्याची एक अशीच अगडबंब कल्पना होती. या कल्पनांची टर उडविणारेही अर्थात् पुष्कळ होते. नीत्शेची वॅग्नरशीं मैत्री जडल्यावर वॅग्नरची बाजू घेऊन भांडणारा एक खंदा वीर वॅग्नरला मिळाला. तरुण नीत्शेवर वॅग्नरचें याकाळीं अतोनात वजन होतें. नीत्शेच्या विचारांवरही वॅग्नरच्या मतांची छाप पडलेली होती. सुटीच्या दिवशीं त्रिब्शेन येथें वॅग्नरच्या घरीं जाऊन नीत्शे आपला काळ मोठ्या सुखानें घालवी. १८६९ सालच्या अखेरीस वॅग्नरच्या घरा-ण्याशीं नीत्शेची इतकी दोस्ती झालेली होती कीं, नाताळांत मुलांना व इतरांना खाऊ आणि भेटी विकत घेण्याची कामगिरी वॅग्नरची बायको कॉसीमा हिनें नीत्शेवर सोंपविली.

**युद्ध:**—सन १८७० च्या जुलई महिन्यांत जर्मनी व फ्रान्स यांमध्यें लढाई सुरू झाली. स्विस प्रोफेसर झाल्यानंतर नीत्शे हा स्विस् प्रजाजन झाला होता. तथापि त्यानें शुश्रूषक या नात्यानें रणक्षेत्रावर जाण्याची अधिकाऱ्यांकडे परवानगी मागितली. राष्ट्राच्या संकुचित ध्येयांचा जो पुढें कट्टा दुस्मान झाला त्या नीत्शेनें अशा प्रकारें रणक्षेत्रावर जावें हें एक महदाश्चर्यच होय. परवानगी मिळाल्यावर त्यानें जो नवीन पेशा पतकरला होता त्याचें त्यानें शिक्षण

घेतलें आणि तो युद्धभूमीवर गेला. त्याला ज्या कामगिऱ्या येथें देण्यांत आल्या त्या त्यानें यशस्वी रीतीनें पार पाडल्या. जखमी शिपायांना घेऊन जर्मनींत जात असतांना त्याला आमांशानें गांठलें; आणि त्यामुळें त्याची युद्धविषयक कामगिरी संपुष्टांत आली. लढाईवर असतांना तेथील भयावह देखाव्यांचा त्याच्यावर चिरकालीन परिणाम झाला. इतका कीं, लढाईविषयीं बोलण्याचा प्रसंग तो होतां होईल तों टाळीत असे. त्याचा आमांश कांहींसा बरा झाल्यावर **बॅले** येथें जाऊन तो आपल्या कामगिरीवर पुन्हां रुजू झाला. पूर्णपणें बरा होईपर्यंत धीर न धरतां त्यानें कामावर रुजू होण्याची जी घाई केली तीबद्दल त्याला चांगलेंच प्रायश्चित्त मिळालें. तो पुन्हां आजारी पडला. डोळे दुखणें, अपचन, व झोंप न येणें या विकारांनीं त्याला गांठलें. यामुळें त्याला दोन महिने रजा घ्यावी लागली. विश्रांतीसाठीं तो **ल्युगानो** येथें जाऊन राहिला. दोन महिन्यांनीं त्याची प्रकृति सुधारली.

**दी बर्थ ऑफ ट्रॅजेडी**:—याच सुमारास 'दी बर्थ ऑफ ट्रॅजेडी' ह्मणजे 'करुण कहाणी' या नांवाचें त्याचें पहिलें पुस्तक पुरें झालें. पहिल्या प्रथम हें पुस्तक छापण्यास कोणी प्रकाशकच मिळेना. अखेरीस मोठ्या खटपटीनें सन १८७१ च्या अखेरीस तें छापून बाहेर पडलें. हें पुस्तक त्यानें वॅग्नरला अर्पण केलें होतें. या पुस्तकाचा थोडक्यांत गोषवारा पुढील प्रमाणें आहे. 'जग आणि जीवित यांचें समर्थन सौंदर्यपूर्ण चमत्कार याच नात्यानें केलें पाहिजे. मनुष्याला कार्यक्षम होण्यासाठीं मायेच्या भ्रमपटलाची आवश्यकता आहे; व हें भ्रमपटल कलेमुळें निर्माण होतें. जीविताचा अबाढ्यपणा

व वैयर्थ्य यांसंबंधीं खरें ज्ञान प्राप्त झालें तर कर्तृत्व नष्ट होतें' साक्रेटीसाच्या पूर्वींची व नंतरची ग्रीक संस्कृति नीत्शेला पसंत नव्हती. पूर्वींची संस्कृति भव्य, कठोर व मजबूत असली तरी असंभाव्य कल्पित गोष्टींनीं ती बुजबुजलेली आहे; आणि नंतरची संस्कृति अधार्मिक, नसत्या शंकाकुशंका काढणारी, हृदयविहीन व दुबळी आहे असें नीत्शेचें मत होतें. साक्रेटिसाच्या पूर्वींची संस्कृति जशी होती तशीच जवळ जवळ हल्लींची (नीत्शेच्या वेळची) संस्कृति आहे व यांतून सुटका करून घेणें असेल तर दृष्टि अंतर्मुख करून विश्वाची उत्पत्ति, स्थिति व लय, यांचा बोध करणाऱ्या वॅग्नरच्या मताप्रमाणें आचरण केलें पाहिजे, असें नीत्शेनें प्रतिपादिलें आहे. नीत्शेचा कोणताही ग्रंथ सुसंबद्ध व एकसूत्री नाहीं. तथापि त्यांतल्या त्यांत जे सुसंघटित ग्रंथ आहेत त्यांत 'दी बर्थ ऑफ ट्रॅजेडी' चा समावेश होईल. नीत्शेचा अभ्यास करूं इच्छिणाऱ्यांनीं प्रथम हें पुस्तक, अथवा 'दी थॉटस् औट ऑफ सीझन' हें पुस्तक वाचावें. 'दस स्पेक झॅरथुस्ट्र' किंवा त्याचीं असंख्य सुभाषितें हीं प्रथम हातीं घेऊं नयेत.

वॅग्नर व त्याची बायको यांना हें पुस्तक अतिशय आवडलें हें सांगणें नकोच. पण जनतेनें या पुस्तकाकडे ढुंकूनही पाहिलें नाहीं. या पुस्तकावर टीका करण्यासाठीं कोणाही वर्तमानपत्रानें आपली जागा खर्चीं घातली नाहीं. नीत्शेच्या बरोबरीचे प्रोफेसर व भाषाशास्त्रविशारद यांनीं हें पुस्तक वाचून नाकें मुरडलीं. 'हें पुस्तक ह्मणजे निव्वळ बेअकलीपणाचें प्रदर्शन आहे' असें बॉनच्या एका प्रोफेसरानें आपल्या विद्यार्थ्यांस सांगण्यास कमी केलें

नाहीं. दुसऱ्या एका भाषाशास्त्रकोविदानें ह्या पुस्तकावर एक चोपडें लिहून त्यांत नीत्शेला भरपूर शिव्या दिल्या. ऱ्होड नांवाचा नीत्शेचा एक पुराणा दोस्त होता. त्यानें या चोपड्याला उत्तर देण्याचा प्रयत्न केला. तथापि पुस्तकप्रकाशनापासून कीर्तीचा लाभ होण्याऐवजीं दुष्कीर्ति मात्र दरवळून राहिलेली पाहून नीत्शेचें मन विटून गेलें. ह्या दुष्कीर्तीचा परिणाम त्याच्या धंद्यावरही झाला. भाषाशास्त्राचा अभ्यास करण्यास बॅले येथें जाऊं नये असा सल्ला विद्यार्थ्यांस मिळूं लागला. यामुळें नीत्शेचें मन अधिकच खट्टू झालें. यांतच आणखी एका दुःखद गोष्टीची भर पडली. बेराइथ येथें वॅग्नेरच्या कल्पनें प्रमाणें प्रचंड राष्ट्रीय नाटकगृह बांधण्याचें काम सुरु झाल्यामुळें वॅग्नेर बेराइथ येथें राहण्यास गेला. ह्यावेळीं भाषाशास्त्रकोविद अशी नीत्शेची जी जुनी कीर्ति होती ती त्याला कामीं पडली. **ग्राइफ्सवॉल्ड** व **डोरपाट** येथील विश्वविद्यालयांनीं त्याला नोकरी देऊं केली. (मग त्या ठिकाणच्या अधिकाऱ्यांच्या वाचनांत दी बर्थ ऑफ ट्रॅजेडी हें पुस्तक आलें होतें कीं नाहीं हें न कळे!) नीत्शेनें ह्या दोन्ही नोकऱ्या नाकारल्या. नीत्शे आपल्यालाच चिकटून राहीला, ह्मणून संतुष्ट होऊन बॅले युनिव्हर्सिटीच्या सिनेटनें त्याचा पगार वाढवून १६८ पौंड ११ शि. केला. या दिवसांत नीत्शे राक्षसासारखें अहर्निश काम करीत असे. नोकरीचें काम सांभाळून त्यानें जाहीर व्याख्यानें देण्याचा व भाषाशास्त्रावर अनेक निबंध लिहिण्याचा क्रम अव्याहत सुरू ठेविला. 'आपल्या शिक्षणविषयक संस्थांचें भवितव्य' या विषयावर त्यानें १८७२ सालीं अनेक बोधप्रद व्याख्यानें दिलीं. जनतेला जें उथळ प्राथमिक शिक्षण

देण्यांत येई त्याविरुद्ध तो बोले. भाषाशास्त्रकोविदांचा विशेष वर्ग निर्माण करणें व्यर्थ आहे असें तो ह्मणे. संस्कृति वाढविणारें शिक्षण व आयुष्यांत यशस्वी कसें व्हावें याचें व्यावहारिक शिक्षण, असे शिक्षणाचे दोन प्रकार आहेत असें त्याचें ह्मणणें असे. पैकीं, व्यावहारिक शिक्षणावर त्याची फारशी मदार नसे. संस्कृति वाढविणारें शिक्षण त्याला पसंत असे. आज्ञाधारकपणा हें संस्कृतीचें मूळ आहे असें त्याचें मत होतें. 'सुसंस्कृत होणें हेंच मनुष्यमात्राचें ध्येय असलें पाहिजे व हें ध्येय प्राप्त होण्यासाठीं भाषेच्या कंटकमय मार्गावरूनच चालत गेलें पाहिजे. याला दुसरी तिसरी आडवाट उपयोगी नाहीं. भाषेचा कंटकमयमार्ग ह्मणजे प्राचीन भाषाशास्त्रांचें केवळ संशोधन मात्र नव्हे. मातृभाषा उत्तम प्रकारें अवगत झाली ह्मणजे पुरे' असें तो ह्मणतो.

**'थॉटस आउट ऑफ सीझन'**:—सन १८७३ ते ७६ या सालांत नीत्शेनें एकापाठीमागून एक असे चार मोठाले निबंध प्रसिद्ध केले व या निबंधास थॉटस आऊट ऑफ् सीझन असें नांव दिलें. **डेव्हीड स्ट्रॉझ** या नांवाची त्यावेळीं एक लोकप्रिय व्यक्ति होती. लढाईनंतर विजयामुळें जर्मन लोकांनां जी गर्वाची धुंदी चढली होती त्यावर व त्याबरोबरच डेव्हीड स्ट्रॉझ याचेवर नीत्शेनें या निबंधांचे द्वारें जोराचा हल्ला केला आहे. आपण सर्वस्वी पूर्णतेला पोहोंचलेले आहोंत; आतां आपणास करण्यासारखें कांहीं राहिलेलें नाहीं, अशा प्रकारची समाधानवृत्ति जर्मनींत त्यावेळीं बोकाळली होती. या समाधानाच्या वृत्तीवर नीत्शेनें हल्ला चढविला. त्याच्या दुसऱ्या निबंधाचें नांव

'दी यूस अँड अब्यूस ऑफ् हिस्टरी' ह्मणजे 'इतिहासाचा सदुपयोग व दुरुपयोग' असें होतें. इतिहासाचा अभ्यास हेंच ध्येय बनवूं पाहणाऱ्या समकालीन इतिहासभक्तांवर या निबंधांत नीत्शेनें जोरदार ताशेरा उडविला आहे. इतिहासाचा उपयोग पुढचें आयुष्य चांगल्या रीतीनें घालविण्याचा मार्ग दाखविणारा वाटाड्या एवढाच समजला पाहिजे. परंतु या व्यावहारिक उपयोगापलीकडे जाऊन इतिहासाची मूर्तिपूजा करणें ह्मणजे स्वतःचा अधःपात करून घेणें आहे. आपल्या ऐतिहासिक दृष्टीचा बेगुमानपणें जेथें तेथें उपयोग करण्यानें भविष्य काळाचा पाया उखडून जातो. कारण असली तीक्ष्ण ऐतिहासिक दृष्टि भ्रमपटल नष्ट करून टाकते; व प्रचलित वस्तूंस पुढें जिवंत राहण्यासाठीं ज्या वातावरणाची आवश्यकता आहे तें भ्रमपटलाचें वातावरणच नाहीसें होतें, अशा अर्थाचें नीत्शेनें प्रतिपादन केलें आहे. तिसऱ्या निबंधाचें नांव, 'शोपेनहॉयरची शिक्षक या नात्यानें योग्यता' या अर्थाचें आहे. शोपेनहॉयर हाच काय तो खरा तत्ववेत्ता व भावी पिढीचा आदर्श अशा अर्थाची या निबंधांत नीत्शेनें शोपेनहॉयरची अतोनात स्तुति केली आहे. त्याच्या शेवटच्या निबंधाचें नांव 'बेरुथ येथील रिचर्ड वॅग्नर' असें आहे. 'बेरूथ येथें अवाढव्य राष्ट्रीय नाटकगृह बांधण्याचा वॅग्नरनें जो खटाटोप चालविलेला होता, त्यावरून कलेचें विश्वव्यापी स्वरूप व्यक्त होतें; एवढेंच नव्हे तर या साहसानें प्रत्यक्ष कलेचाच वॅग्नरनें शोध लाविला' असें नीत्शेनें लिहिलें आहे. 'गटे खेरीज कोणत्याही जर्मन लेखकांत मनमोकळी, सहृदय व सोज्वळ जर्मनभाषा दिसून येत नाहीं. या दुगुणांत वॅग्नरनें गटेवरही

वरताण केली आहे. मागील युगांत अथवा आजपर्यंत झालेल्या प्रसिद्ध पुरुषांत वॅग्नर इतका प्रसिद्ध पुरुष जन्मालाच आला नाहीं.' अशा अर्थाची वॅग्नेरची भरमसाट स्तुति नीत्शेनें या लेखांत केली आहे. तत्कालीन जर्मन लोकांस ज्या गोष्टींचा अभिमान वाटत असे त्या गोष्टींवर निकराचा हल्ला चढवून त्यांतील दोष त्यानें उघडकीस आणले; आणि ह्मणून या निबंधांस 'थॉटस् आउट ऑफ् सीझन' अथवा अप्रिय विचार किंवा बेसूर गाणें अशा अर्थाचें त्यानें नांव दिलें. या निबंधांची भाषा फारच जहाल व कडू आहे. अर्थात्च नीत्शेला पहिल्यानेंच जे पुष्कळ शत्रू होते त्यांत या निबंधांनीं आणखी चांगलीच भर घातली; आणि पुस्तक प्रकाशकाला पैशाच्या दृष्टीनें व ग्रंथकाराला कीर्तीच्या दृष्टीनें भोंपळया एवढें पूज्य प्राप्त झालें!

**वॅग्नेरशीं बेबनाव:**—बेराइथ मधील रिचर्ड वॅग्नेर हें पुस्तक ह्मणजे वॅग्नेरला वाहिलेलें अखेरचें पुष्प होय. या दोन मित्रांत मतभेदाची फूट पडली होती, व ती दिवसेंदिवस वाढत जात होती. बेराइथ येथील नाटकगृहाचें साहस यशस्वी व्हावें ह्मणून नीत्शेनें लेखनद्वारा व द्रव्यद्वारा शक्य ती मदत केली यांत कांहीं शंका नाहीं, परंतु वॅग्नेरभोंवतीं स्तुतिपाठ ह्मणत फिरणारा नीत्शे हा एक त्याचा अनुचर आहे, त्याला स्वतंत्र अस्तित्व नाहीं, असें लोक आपणाला समजतात अशी नीत्शेची कल्पना होती. या समजुतीमुळें दोघांमधील ही फूट वाढत चालली. अद्यापि त्यांनीं परस्परांस ही गोष्ट कळूं दिली नव्हती; तरी पण त्या दोहोंतील अंतर अधिकअधिक होत चाललें होतें ही गोष्ट निःसंशय आहे. केव्हां केव्हां नीत्शेला हस्तकाप्रमाणें वागवून त्याचा उपयोग वॅग्नेरनें करून घेतला ही गोष्ट

खरी आहे. परंतु यांत विशेष असें कांहीं नाहीं. आपल्या उपयोगी पडण्यासारखा कोणीही भेटल्यास त्याचा तेवढाच उपयोग करून घ्यावयाचा ही जनरीतच आहे. कोणचा बुद्धिमान मनुष्य असें करीत नाहीं? पण वॅग्नेरचें नीत्शेवर प्रेमहि तसेंच होतें हें विसरतां कामा नये. त्याच्या खासगी गोष्टींची बारकाईनें काळजी घेऊन त्याला योग्य आणि इमानेंइतबारें वॅग्नेरनें सल्ला दिला. 'प्रथम लग्न कर आणि नंतर प्रवास कर' असा उपदेश वॅग्नेर नीत्शेला करीत असे. हा उपदेश जर नीत्शेनें मानला असता तर नीत्शेचें चरित्र, न जाणों, हल्लींहून अधिक उज्वल झालें असतें.

१८७५ च्या नाताळानंतर नीत्शेची प्रकृति पुन्हां बिघडली. पण थोडी हवापालट केल्यावर ती सुधारली. १८७६ च्या एप्रिल महिन्यांत नीत्शेच्या आयुष्यांत एक दुःखदायक गोष्ट घडून आली. एका मोहक डच तरुणीवर नीत्शेचें मन गेलें. प्रेमविव्हल होऊन नीत्शेनें तिला मागणी घातली. तिचें मन पूर्वींच दुसऱ्यावर बसलें असल्यामुळें तिनें नीत्शेची मागणी झिडकारिली. या नकारामुळें त्याच्या मनाला मोठाच धक्का बसला व तो अगदीं उद्विग्न झाला.

'थॉटस् आउट ऑफ् सीझन' चा चवथा भाग प्रसिद्ध झाल्यानंतर १२ जुलै १८७६ रोजीं नीत्शेला वॅग्नेरनें आभारप्रदर्शक पत्र लिहिलें त्यांत नीत्शेच्या ग्रंथांची स्तुति करून त्याला बेराइथ येथें भेटण्यासाठीं बोलाविलें होतें. हें पत्र ह्मणजे नीत्शेला वॅग्नेरनें लिहिलेलें अखेरचें पत्र होय. यानंतर लवकरच वॅग्नेरच्या नव्या खेळाचा पहिला प्रयोग रंगभूमीवर झाला. या प्रयोगाला नीत्शे हजर राहिला. हा प्रयोग चांगला यशस्वी झाला. प्रेक्षकांनीं नाटकगृह

चिकार भरलें होतें. पुष्कळ बडे लोक प्रयोगाला हजर राहिले होते. खुद्द बादशहा, मोठमोठे सरदार, दरकदार, जमीनदार, सावकार व अनेक प्रख्यात लेखक नाटकगृहांत हजर असलेले पाहून वॅग्नेरचें मन उडून गेलें. या प्रसंगाचा वॅग्नेर हा अर्थातच नायक होता; व राजे महाराजे सुद्धां त्याला कौतुकानें अतोनात मान देत होते. हा प्रकार पाहून नीत्शे गोंधळून गेला. त्रिब्शेन येथें राहणारा आपला गरीब आणि ममताळू मित्र वॅग्नेर कोणीकडे, व येथें सरदार दरकदारांचे मुजरे घेणारा आणि देवांप्रमाणें सर्वांकडून पूजा घेणारा हा बलिष्ट, तेजस्वी वॅग्नेर कोणीकडे, असें त्याला झालें. शिवाय त्याच्या मनांत वॅग्नेरच्या गाननैपुण्याविषयीं, त्याच्या खेळांविषयीं, व प्रेक्षकांविषयीं जें मनोमय चित्र होतें त्या चित्राचे मानानें प्रत्यक्ष प्रकार वेगळाच दिसून आला. या सर्व गोष्टींमुळें नीत्शेचें मन अगदीं खिन्न झालें आणि विमनस्क स्थितींत बेराइथहून तो परतला.

यानंतर त्याची मनःस्थिति पार पालटून गेली. स्वप्नसृष्टींत विहार करीत आकाशांत भराऱ्या मारणें त्यानें सोडून दिलें; आणि डोकें शांत ठेवून व्यावहारिक तऱ्हेनें विचार करणें त्यानें सुरू केलें. **अधिदैवतवाद व कला** यांवरील त्याचा विश्वास उडाला. शास्त्र व संशोधन ह्यांवर त्याची श्रद्धा बसली. तो पूर्वीं कल्पना सृष्टींत कवी प्रमाणें वावरून तत्ववेत्त्याचा आव आणीत असे. यापुढे तो खरा तत्ववेत्ता झाला. मात्र विषय मांडण्याची कवीची शैली त्यानें सोडली नाहीं. तो तत्वज्ञानविषयक लेख लिही, पण ते इतरांप्रमाणें रुक्ष व दुर्बोध नसून कवीच्या काव्याप्रमाणें सुखदायक व आल्हाददायक असत.

लवकरच त्याची पुनः एकवार प्रकृति बिघडली; व त्याला एक वर्षाची रजा घ्यावी लागली. रजा घेऊन दोन मित्रांसह तो नेपल्स येथें रहाण्यास गेला. या दोन मित्रांत रे नांवाचा एक गृहस्थ होता. त्यानें इंग्रज तत्ववेत्त्यांच्या तत्वज्ञानाकडे नीत्शेचा कल वळविला. हे तिघेही गृहस्थ नेपल्स येथें **मिस् मेझन बग** इच्या घरीं उतरले होते. ही बाई स्वतः ग्रंथकर्त्री होती; व समाजांत तिला बराच मान असे. येथें सहा महिने सुखांत काळ घालविल्यावर बरा होऊन नीत्शे बॅले येथें परत गेला व आपल्या कामावर रुजू झाला.

**'ह्यूमन, ऑल टू ह्यूमन'**:—नीत्शेचें लेखनाचें काम सुरूच होतें. परंतु त्याची प्रकृति दिवसें दिवस खालावत चालली असल्यामुळें, सुसंबद्ध मोठा ग्रंथ लिहिणें त्याला अशक्य झालें. यापुढें आपले विचार कळविण्याचें साधन ह्मणजे छोटे छोटे विचार जसे येतील तसे टिपून ठेवणें हें होय असें त्यानें ठरविलें. व विचारतरंग अथवा सुभाषितें ज्यांस ह्मणतां येईल अशा तऱ्हेचे फुटकळ विचार तो लिहूं लागला. सुभाषितांची पर्वताच्या शिखराशीं तो तुलना करी. 'पर्वतावर चढण्याचा सर्वांत कमी लांबीचा मार्ग ह्मणजे एका शिखरावरून दुसऱ्या शिखरावर असे भराभर पाय टाकीत जाणें हा होय. परंतु असें करण्यास आपणास खूपच लांब, उंच व मोठे पाय असले पाहिजेत!' असें तो ह्मणे.

तो एकटा लांब फिरावयास जाई तेव्हां त्याला जे विचार सुचत ते तो कसेबसे टिपून ठेवीत असे. नंतर मोठ्या मेहनतीनें व चिकाटीनें हीं टांचणें दुरुस्त करून तो छापी. परंतु हीं विचाररत्नें

नीट साफसूफ करून व सूत्रबद्ध करून त्यांच्या मोहक हार बनविणें प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें त्याला अशक्य झालें होतें.

**'धी डॉन ऑफ् धी डे'** अथवा प्रभातकाल या नांवाचें त्यानें एक पुस्तक लिहिलें आहे. त्यांत नीत्शे ह्मणतो, "हें पुस्तक एकदम सबंध वाचण्यासाठीं किंवा मोठयानें वाचण्यासाठीं लिहिलेलें नाहीं. चालतांना किंवा प्रवास करतांना मधूनमधून चाळण्यासाठीं हें पुस्तक लिहिलेलें आहे. तें घ्यावें, थोडेसें वाचावें आणि ठेवून द्यावें." **'ह्यूमन ऑल टू ह्यूमन'** या पुस्तकाचे दोन भाग आणि **'दी डॉन ऑफ दी डे'** व **'दी जॉयफूल विसडम्'** ह्या नीत्शेच्या ग्रंथांस हें ह्मणणें अक्षरशः लागू पडतें.

इ. स. १८७८ च्या मे महिन्यांत 'ह्यूमन, ऑल टू ह्यूमन' चा पहिला भाग प्रसिद्ध झाला. ह्या भागांत सुमारें ६०० सुभाषितें आहेत. पूर्वी नीत्शेनें जीं मतें प्रसिद्ध केलीं त्यांच्या विरुद्ध या पुस्तकांत कित्येक ठिकाणीं विधानें आहेत. वॅग्नर व त्याचे अनुयायी यांनीं या पुस्तकाकडे प्रायः दुर्लक्ष केलें. कांहींनीं तर याच्या विरुद्ध अभिप्राय दिले. पूर्वीचा नीत्शे आतां बदलून गेल्याचे पुष्कळ पुरावे ह्या पुस्तकांत आहेत. पूर्वीं तो साक्रेटीसची निंदा करीत असे; आतां त्यानें त्याची स्तुति केली आहे. 'सरळ तत्वज्ञानाच्या कसोटीला घामून उतरलेलीं लहान लहान सत्यें हीं कला व वेदान्त यांचे कालांत सांपडलेल्या, तात्पुरत्या आनंद देणाऱ्या, व अखेरीस चुक्यांच्या खड्ड्यांत पोंचविणाऱ्या आभासमय सत्यांपेक्षां हजारपट बरीं' असें त्यानें लिहिलें आहे. नीत्शे आतां निश्चयवादी बनला. इच्छेचें स्वातंत्र्य आतां त्याला मान्य नाहींसें झालें. या सुभाषितांतील कांहीं

भाग स्टीवन्सनकृत **आर्ट ऑफ रायटिंग** ह्मणजे लेखनकला, अथवा सर फिलीप सिडने कृत 'ए डिफेन्स ऑफ पोएट्रि' ह्मणजे कवितेची कैफियत या ग्रंथांच्या तोडीचा आहे. पहिल्या भागाचें नांव 'कला-विशारद व ग्रंथकार यांच्या आत्म्याविषयीं' असें आहे. या भागा-वरून नीत्शेची विज्ञानशास्त्रविषयक प्रगति व मानसशास्त्राचा सूक्ष्म अभ्यास यांची कल्पना होते. 'ह्यूमन ऑल टू ह्यूमन' याचा दुसरा भाग व 'जॉयफुल विसडम' या ग्रंथांतही लेख व लेखक या विष-यावर अशींच सुंदर सुभाषितें आहेत. आतां नीत्शेचीं मतें हळू हळू स्थिर होत चाललेलीं होतीं. तत्वज्ञानाविषयींच्या त्याच्या पहिल्या कल्पना पालटूं लागल्या. स्वतःचें स्वतंत्र तत्वज्ञान त्यानें तयार केलें. शोपेनहॉयर व वॅग्नर यांच्या मतांच्या पकडींतून तो सुटला. १८७९।८० या सालांत 'ह्यूमन ऑल टू ह्यूमन' ह्या ग्रंथाच्या दुसऱ्या खंडाचे दोन विभाग प्रसिद्ध झाले. या ग्रंथास खुद्द नीत्शेनेंच 'क्रांतीची परमावधि' असें ह्मटलेलें आहे. या दुसऱ्या भागामध्यें सुमारें ७०० सुभाषितें आहेत. ह्या भागांतही सॉक्रेटिसाची छाप नीत्शेवर पडलेली दिसते. बायबलपेक्षांही सॉक्रेटिसचा मेमोरॅबिलिया भविष्यकालीन लोकांना अधिक मूल्यवान वाटेल असें यांत नीत्शेनें भाकित केलें आहे. बंधनाच्या भोंवऱ्यांत अडकून पडलेल्या लोकांसाठीं हें पुस्तक लिहिलेलें नाहीं. आरबी भाषेंतील सुंदर गोष्टींत जादूच्या सतरंजीची एक नवलकथा आहे. या सतरंजीवर बसलें ह्मणजे मनुष्याला हवेंतून वाटेल तिकडे आकाशांतून संचार करितां येत असे. हें पुस्तक जादूच्या सतरंजी प्रमाणें आहे. जादूच्या सतरंजीवर बसल्यानंतर मनुष्य ज्याप्रमाणें भरकन उंच जाऊन दऱ्याखोरीं,

उंच टेंकड्या, पर्वत वगैरेंवरून आकाशमार्गें भराभर संचार करून येतो, त्याप्रमाणें हें पुस्तक वाचकांस मानवी विचारांची नीचता व उच्चता सुलभ रीतीनें दाखवितें; व या जादूच्या सतरंजीचा कर्णधार किंवा नावाडी ह्मणजे आपला प्रस्तुत चारित्रनायक नीत्शे या प्रवासांत वाचकांस नाजुक विनोदानें रिझवीत असतो; आणि सहज हंसत हंसत ह्मणतो; "आपल्या मतासाठीं आपल्या जीवाला आग लावून घेऊं नये. कारण आपलीं मतेंच बरोबर व पक्कीं आहेत अशी कोणाचीच खात्री असूं शकत नाहीं. परंतु मतें असणें व तीं वेळोवेळीं बदलणें हा मात्र मनुष्य मात्राचा हक्क आहे. हा हक्क राखण्यासाठीं जीवाची राखरांगोळी झाली तरी चालेल पण झगडलें पाहिजे!"

डोळे दुखणें, पोटशूळ व डोकें दुखणें हे तीन रोग नीत्शेच्या पाठीस लागले होते. ते त्यास स्वस्त बसूं देत नसत. अखेरीस त्याची प्रकृति अजिबात ढांसळली. त्यामुळें १८७९ सालीं त्याला प्रोफेसरच्या जागेचा राजीनामा द्यावा लागला. नोकरीवर असतांना त्याने केलेल्या कार्याचा सीनेटनें गौरव केला; व त्याला सुरवातीच्या पगारा इतकें पेन्शन दिलें. हवा पालटण्यासाठीं तो सेंट मारित्स या गांवीं जाऊन राहिला. तेथें त्याची प्रकृति थोडी बहुत सुधारली. व त्यानें 'ह्यूमन, ऑल टू ह्यूमन' या ग्रंथाचा दुसरा भाग तयार करण्यास सुरवात केली. परंतु हें काम त्यास फार दिवस करतां आलें नाहीं. नानाळच्या सुमारास त्याच्या वेदना असह्य झाल्या; आणि मृत्यूकाळ समीप आला असें त्यास वाटूं लागलें. तरी तो या वेदना सहन करीत कसा बसा काळ कंठीत होता. १८८० च्या

वसंत ऋतूमध्यें तो व्हेनिस शहरीं गेला. उत्तम हवेसाठीं प्रसिद्ध असलेल्या या जगद्विख्यात शहरांत राहिल्यानें त्याच्या प्रकृतीवर चांगला परिणाम झाला. यानंतर इटाली, एंगाडाईन व जर्मनी या देशांत तो अस्वस्थ मनानें एकटा फिरत असे. त्याचा पुष्कळ काळ इटालींतजाई. एंगाडाईन वरहि त्याचें फार प्रेम असे. कधीं प्रकृतीसाठीं, कधीं मित्र मिळविण्यासाठीं, तर कधीं एकांतवासासाठीं, किंवा सत्यशोधण्यासाठीं इतस्ततः भटकत राहण्याचा क्रम त्यानें कित्येक वर्षे पुढें चालविलेला होता. एकाच ठिकाणीं तो फार वेळ राहत नसे. व्हेनिस, जिनोआ, नाईस व एंगाडाईन मधील सिल्समरी या ठिकाणीं मात्र तो जरा अधिक वेळ राही. तो अतिशय काटकसरीनें रहात असे. अगदीं साधें अन्न खाई; आणि तेंहि स्पिरिट लँपवर स्वतःच तयार करी. कधीं कधीं संध्याकाळीं त्याची डोकेंदुखी अतिशय असह्य होई. त्यावेळीं घरांत दिवाही न लावतां तो खाटेवर पडे. त्याच्या शेजाऱ्यांना वाटे कीं, नीत्शे फार गरीब माणूस आहे; दिवे लावण्यापुरतेही पैसे त्याचेजवळ नाहींत. अशा समजुतीनें एकादा शेजारी त्याला दिवा देऊं करी. दिवा न लावण्याचें कारण माझें डोकें अतिशय दुखत आहे. असें नीत्शे जीव तोडून सांगे, तरी शेजऱ्यांचें समाधान होत नसे. ते त्याला ‘अवलिया’ ह्मणत. सकाळीं समुद्र किनाऱ्यावर अथवा डोंगरावर तो एकटा फिरावयास जाई; व किती तरी वेळ फिरतच राही. सूर्याचा ताप फार होऊं लागल्यावर सरड्याप्रमाणें जमिनीवर पडून तो विश्रांति घेई! स्वप्नसृष्टींत अगर विचाराच्या तंद्रींत गुंग होऊन कित्येक घटका उन्हांतच पेंगत बसे! स्मरणवही हाच काय तो त्याचा खरा मित्र होता. व तो मात्र त्याच्याजवळ सदैव असे.

**दी डॉन ऑफ् दी डे:**—सन १८८१ मध्यें 'दी डॉन ऑफ् दी डे' अथवा 'प्रभातकाळ' या नांवाचा त्यांचा ग्रंथ पुरा झाला. त्याचा पूर्वीचा ग्रंथ संक्रमणावस्थेंतील होता. त्यावेळीं त्याची विचारक्रांति पुरी झाली नव्हती. आतां मात्र नीत्शेचें—त्याचें स्वतःचें—तत्वज्ञान उदित झालें हें ह्या ग्रंथावरून स्पष्ट दिसूं लागलें. ह्या ग्रंथांतही विविध विषयांवरील त्याचे विचारतरंग संग्रहित केलेले आहेत. त्यांवरून मनुष्यस्वभावाचें त्यानें किती सूक्ष्म रीतीनें निरीक्षण केलेलें होतें हें दिसतें. ख्रिस्ती धर्माविषयीं त्याचें मन प्रतिकूल होत चालल्याचेही पुरावे ह्यांत भरपूर सांपडतात. 'ईश्वर सर्व सत्य जाणतो; पण असें असूनही मनुष्यप्राण्याला सत्य शोधण्यासाठीं तो यातना भोगावयास लावतो; आणि या यातना तो आनंदानें पाहत रहातो, असें जर मानलें तर ईश्वर मोठा दुष्ट प्राणी आहे असें समजलें पाहिजे!' असें त्यानें ह्या पुस्तकांत म्हटलें आहे. जडवादी इंग्रज तत्ववेत्त्यांकडे रे मुळें नीत्शेची प्रवृत्ति होत चालली होती हें पूर्वीं सांगितलेंच आहे. आधिभौतिक जडवादाकडील ही प्रवृत्ति त्याच्या पूर्वीच्या पुस्तकांत अंधुकशी दिसत होती. ती आतां 'प्रभातकाल' ह्या पुस्तकांत अधिक स्पष्टपणें दिसूं लागली. 'नवीन ध्येयाच्या इमारतीसाठीं आरोग्यशास्त्र व वैद्यकशास्त्र यांच्या मधूनच आपणाला पायाचे धोंडे शोधून काढले पाहिजेत' असें या पुस्तकांत म्हटलें आहे. यावरून सुप्रजाजननशास्त्राकडे आतां नीत्शेचें मन झुकूं लागलें हें स्पष्ट होतें.

स्पेन्सरविषयीं नीत्शेला फारसा आदर वाटत नव्हता. तो **एंपीडॉकल्स, हेराक्लिटस व गटे** यांच्या प्रमाणें विश्वाकडे सरळ

दृष्टीनें पाही. विश्वाच्या उभारणीमध्यें कांहीं हेतु अथवा ध्येय विधात्याच्या माथीं निकटविण्याचा यत्न करीत नसे. सिल्समेरीच्या भव्य आणि उत्तुंग शिखरांवर बसून विचार करीत असतां त्याला इतिहासाच्या पुनरावृत्तीची कल्पना सुचली. प्रत्येक गोष्ट जशीच्या तशीच पुन्हां पुन्हां घडते असें त्याला वाटूं लागलें. 'आज जी गोष्ट घडली तीच गोष्ट हुबेहुब पुन: केव्हां तरी घडेल; आज जो दिवस उगवला तोच पुन्हा केव्हां तरी उगवेल; आज जें पुस्तक मी लिहीत आहें तेंच पुस्तक भविष्यकालांत पुन्हां केव्हां कोणी तरी लिहील, किंवा कोणी तरी कशाला, प्रत्यक्ष मचि लिहीन; व आजचाच वाचक भविष्यकाळीं तेंच पुस्तक पुन्हां वाचील.' अशा प्रकारें अगदीं एकच गोष्ट सर्वस्वी त्याच परिस्थितींत पुन्हां घडेल असें त्याला वाटे. आपल्याला हा मोठा विलक्षण शोध लागला असें वाटून नीत्शेचें मन अगदीं उल्हसित झालें. वास्तविक ही कल्पना ह्मणजे अगदीं नवीन शोध होतां असें मानण्याचें मुळींच कारण नाहीं. चक्रनेमिक्रमाची कल्पना अगदीं मनुष्यजातीच्या आरंभातइतकी जुनी आहे; व ही कल्पना पूर्णपणें विचार होऊन पुष्कळ तत्ववत्त्योंनीं टाकाऊ ह्मणून ठरविलेली आहे. पुन्हां पुन्हां हुबेहुब तीच गोष्ट घडून इतिहासाची पुनरावृत्ति व्हावयाची असेल तर हें जग चालू राहण्यांत तरी काय अर्थ आहे? आज ज्या स्थितींत जग आहे त्याच स्थितींत पुन्हां भविष्यकाळीं यावयाचें असेल तर अनंत वर्षें कालावधि लोटण्याचा शीण सोसण्यांत कोणता अर्थ आहे? त्यापेक्षां सुरुंग लावून पृथ्वीला आजच नष्ट केलेली बरी! तथापि चक्रनेमिक्रमाच्या कल्पनेनें त्यावेळीं नीत्शेला मात्र पूर्णपणें घेरलें. नीत्शेच्या विचारांची ही जी ओढाताण चाललेली

होती त्याचें खरें कारण त्यानें वेगवेगळ्या मतांच्या तत्त्ववेत्यांचे जे ग्रंथ वाचले त्याचा हा परिणाम होय! परस्परविरोधी मतप्रवर्तकांच्या कचाट्यांत सांपडल्यामुळें एकदां ह्या बाजूला, तर एकदां त्या बाजूला, असें नीत्शेचें मन स्वाभाविकपणेंच हेलकावे खात होतें.

**'दी जॉयफुल विस्डम'**:—इतिहासाच्या पुनरावृत्तीची त्याच्या मनांत जी चमत्कारिक कल्पना रुजत चालली होती तिजमुळें त्याचें मन उद्विग्न होऊं लागलें. परंतु पुन्हां एकवार हें भ्रमपट दूर झालें; **कार्मेन** नांवाच्या सुंदर नाटकांतील गाणीं गाऊन त्याचें मन उल्हसित झालें; आणि दृष्टि निवळली. सन १८८२ सालीं "दी जॉयफुल विस्डम" या नांवाचें पुस्तक लिहून जगावर खरोखर त्यानें मोठे उपकार करून ठेवले. ह्या पुस्तकांतही त्याचे विचारतरंगच संग्रहित केलेले आहेत. हे विचार इतके जोरदार, स्फूर्तिदायक व मनुष्याला उच्च वातावरणांत नेऊन सोडणारे आहेत कीं, ते प्रत्यक्ष वाचल्याशिवाय वर्णन करून त्यांची कल्पना करतां येणार नाहीं. त्यांत एक कविता आहे. तिचा वेडावांकडा मराठी तर्जुमा पुढें दिला आहे. त्यावरून वाचकांस थोडीशी कल्पना होईल.

## झंझावाताचें नृत्यगीत.

**नाच नाच रे नाच गड्या। जग तुच्छ लेखुनी नाच ॥**
**नाच नाच रे नाच गड्या तूं. ॥ धृ० ॥**
**मेघांच्या राशी तुडवुनियां।**
**बेछूटपणें थै थै नाचत।**
**दुष्ट काळजी नष्ट करुनियां।**
**लीलेनें स्वर्गाला झाडित।**
**तुफान वारा मला गमतसे। जगीं एक मम मित्र खरा ॥**

खास सहोदर मम तूं असशी ।
दैवें जुळविली जोडी खाशी ।
दोघांच्याही नशिबीं एकच ।
ह्मणुनि पडली गांठ बरी ॥ नाच नाच रे० ॥

२

कडे टेंकडया डोंगरमाथा ।
तशा जलधिच्या प्रचंड लाटा ।
प्रतिदिनिं अभिनव क्रीडास्थानें ।
शोध-शोधुनि नाच गड्या ॥ नाच नाच रे० ॥
ज्ञान हाच आनंद आमुचा ।
खेळ हाच सौंगडी प्रेमाचा ।
वेड ध्यास कीं कौशल्याचा ।
सत्य एक आनंद जगतिं या ॥
इतर सर्व जग झूट ॥ नाच नाच रे० ॥

३

दुःखाच्या सुरकुत्या मुखावरि ।
चिंतेच्या ज्या छाया त्यावरि ।
झाडुनि फेंकुनि देई सत्वरि ।
आनंदाचें राज्य भूवरी ॥ नाच नाच रे० ॥
सुतकी मुख मिरवीति जगतीं ।
झंझावात न त्यांच्यासाठीं ।
वदनें ज्यांचीं सदैव फुलती ।
आनंदचि जगतीं विखरीती ॥
झंझवाता, त्यांच्यासाठीं ।
नाच नाच रे नाच गड्या । जग तुच्छ लेखुनी नाच ॥

हें पुस्तक मोठें आनंददायक आहे. नीत्शेच्या कलेचा तो एक सुंदर मासला आहे. चक्रनेमिक्रमाची मन खचविणारी कल्पना जाऊन त्या ऐवजीं अतिमानुषतेची स्फूर्तिदायक व आल्हादजनक कल्पना त्याच्या मनांत उदय पावलेली स्पष्ट दिसते. याच पुस्तकांत झॅरथुष्ट्राचा उल्लेख पहिल्यानें केलेला दिसतो.

**'दस स्पेक झॅरथुस्ट्रा'** :—१८८२ सालामध्यें नीत्शेला सिसिली बेटांत प्रवास करण्याची लहर आली. वसंत ऋतु मेसिनांत घालविण्याचा त्याचा बेत होता. परंतु थोड्याश्या निमित्तानें त्याची लहर फिरली. मिस मेसन बग इनें 'रोमला यावें' असें त्यास लिहिलें. नीत्शेनें सिसिलीस जाण्याचा बेत रहित केला; व मिस मेसन बग इच्या निमंत्रणास मान देऊन रोमचा रस्ता धरिला.

नीत्शेची बुद्धिमत्ता पाहून या बाईचें मातेप्रमाणें नीत्शेवर प्रेम जडलें होतें. रोमला बोलावून कोणा तरी योग्य तरुणीशीं त्याचें लग्न जमवून द्यावें असा तिचा बेत होता. खुद्द नीत्शेनें एका पत्रांत असें लिहिलें होतें, "मजविषयीं, अत्यंत विश्वासांतली ह्मणून मी तुह्माला एक गोष्ट सांगतों. मला उत्तम स्त्रीच्या सहवासाची आवश्यकता आहे." या लिहिण्यावरून नीत्शेसाठीं एखादी वधू ती पहात होती. **लू सालोमी** या नांवाची एक वीस वर्षें वयाची सुंदर तरुणी तिनें हुडकून काढली. या तरुणीशीं नीत्शेचें लग्न लागल्यास या भटकणाऱ्या तत्ववेत्याला चांगली प्रेमळ जोडीदारीण मिळेल असें मिस मेसन बग इला वाटलें. नीत्शे तेथें आल्यावर या तरुणीशीं त्याचा परिचय करून देण्यांत आला. पहिल्याच भेटीला नीत्शेचें भोळें मन तिच्यावर बसलें. कांहीं दिवसांनीं त्यानें तिला मागणी घातली.

या मुलीनें नीत्शेची मागणी नाकारली. यानंतर कांहीं दिवस त्यांची मैत्री कायम राहिली. पण पुढें एकाएकीं ही मैत्री तुटली. असें अकस्मात कां झालें तें कळत नाहीं. ल्ड् सालोमी व नीत्शेची बहीण नीत्शेच्या पाठीमागून जिवंत होतीं. तरी या दुःखदायक गोष्टीच्या पाठीमागें असलेले धागेदोरे त्या मोकळेपणानें सांगत नसत. परंतु जनरीतीप्रमाणें जें व्हावयाचें तें झालें असें मानण्यास हरकत नाहीं. या प्रकारामुळें नीत्शेला बायको मिळावयाची ती तर मिळाली नाहींच परंतु **री** नांवाचा त्याचा जो उत्तम मित्र होता त्याची मैत्रीही नष्ट झाली. विश्वासघात करून **री** नेंच ह्या कामीं बिब्बा घातला व आपणास फसविलें अशी नीत्शेची समजूत झाली !

या प्रकारामुळें नीत्शे पूर्वीपेक्षांही जगाच्या पाठीवर उघडा पडला. उद्विग्न मनानें त्यानें पुन्हा भटकण्यास सुरवात केली. यापुढें झरथुष्ट्रासंबंधीं तो जें पुस्तक लिहीत होता त्यावर त्याचें सर्व प्रेम केंद्रीभूत झालें. 'दस स्पेक झरथुष्ट्र' ही एक सुंदर स्वप्नसृष्टि असून नीत्शेच्या कौशल्याचें उत्तम प्रदर्शन त्यांत आहे. चक्रनेमिक्रमाची कल्पना असमाधानकारक ह्मणून त्यानें सोडून दिली. मनुष्यप्राण्यासाठीं उच्चध्येय ह्मणून त्यानें अतिमानुषतेची कल्पना काढली. तो ह्मणतो, "अतिमानुष ह्मणजे काय हें मी तुह्मास शिकवितों. मनुष्यप्राणी ही उन्नतीच्या मार्गांतील केवळ एक पायरी आहे. ही पायरी आपण ओलांडली पाहिजे व मनुष्याच्याहि वरचढ पिढी निर्माण केली पाहिजे. असें करण्यासाठीं आपण आजवर कोणचे प्रयत्न केले ? मनुष्याखेरीज इतर जे प्राणी आहेत त्या प्रत्येकानें आपल्याहून पुढची पिढी अधिक श्रेष्ठ होईल अशी व्यवस्था केली.

पण स्वतःला शहाणा समजणारा मनुष्यप्राणी मात्र जुनेपणाला चिकटून पाठिशाटीचें धोरण स्वीकारतो व मनुष्यपणाला चिकटून राहतो हें ठीक नव्हे. मनुष्यपणा सोडून आपण वरच्या पायरीवर चढलें पाहिजे. आपण अतिमानुष झालें पाहिजे. अतिमानुष होणें यांतच मानवी जन्माचें सार्थक आहे. बंधूंनो! आपल्या मनाशीं निश्चय करा. अतिमानुष बनून भूमातेवर जन्म घेतल्याचें सार्थक करा. मी तुह्माला निश्चयानें सांगतों. तुह्मीं अतिमानुष बननूच भूमातेचें ऋण फेडलें पाहिजे. पृथ्वीच्या पलीकडील जगाविषयीं आशा दाखवून दिशाभूल करणाऱ्या लोकांवर विश्वास ठेवूं नका. ह्याच पृथ्वीवर राहून अतिमानुष व्हा. बंधूंनो! उठा! जागे व्हा! मनुष्यपणाच्या पुढील पायरी गांठा व भूमातेचें ऋण फेडा." अशा स्फूर्तिदायक संदेशानें पुस्तकाला सुरवात झालेली आहे.

श्रोतृसमूहाला झरथुष्ट्र नांवाचा कल्पित महात्मा व्याख्यान रूपानें ज्ञान सांगत आहे, अशी कल्पना करून झरथुष्ट्राच्या तोंडीं यांत व्याख्यानें घातलेलीं आहेत. व्याख्यानांना एकसूत्रीपणा आणण्यासाठीं गोष्टीचें ओबडधोबड कथानक देऊन त्यांत ही व्याख्यानमाला गुंफिली आहे. प्रख्यात इराणी साधु झोरोस्टर याचें नांव या पुस्तकांतील नायकास देण्याचें कारण खरें पाहिलें असतां लहरीशिवाय दुसरें कांहींच नव्हतें. परंतु केवळ लहरीमुळें हें नांव मीं दिलें असें कबूल न करतां असें नांव मी मुद्दामच दिलें व त्यांत माझे विशेष हेतु होते, अशा तऱ्हेचा आव तो पुढें आणीत असे. या पुस्तकाच्या प्रथमार्धांत अतिमानुषतेची कल्पना प्रामुख्यानें गोंविली आहे. उत्तरार्धांत मात्र चक्रनेमिक्रमाची कल्पना घुसली आहे.

ही कल्पना या पुस्तकांत यावी हें दुर्दैव होय. ती नसती तर सुप्रजाजननशास्त्राचें हें पुस्तक आद्यगीत होऊन बसलें असतें. नीत्शेनें आपल्या आत्मचरित्रांत 'ह्या पुस्तकांत चक्रनेमिक्रमाचीच कल्पना मला पुढें करावयाची होती' असें ह्मटलें आहे. 'जुने व नवे मार्ग' या नांवाच्या भागांत अतिमानुषतेच्या उत्तुंग कल्पनाशिखरांवरून नीत्शे भराऱ्या मारीत असलेला दृष्टीस पडतो. परंतु या उच्च वातावरणांतून घसरून तो पुन्हां चक्रनेमिक्रमाच्या खड्ड्यांत येऊन पडतो हें दैवदुर्विलसित होय! वास्तविक अतिमानुषतेची कल्पना व चक्रनेमिक्रमाची कल्पना ह्या दोन अत्यंत परस्परविरोधी कल्पना होत. आणि ह्या विरोधाच्या भोंवऱ्यांत सांपडून नीत्शे गिरक्या खात असलेला पाहून कींव येते. खुद्द नीत्शेलाही या विरोधाची जाणीव होती. आणि ह्मणूनच ह्या दोन्ही कल्पना कशा तरी जुळवून आणण्याची खटपट करण्यासाठीं नीत्शेनें कथानक रचून त्यांत ग्रंथ गोंवण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

या पुस्तकाचे चार भाग आहेत. ते १८८३ व ८४ सालीं एकामागून एक लिहून प्रसिद्ध करण्यांत आले. हा ग्रंथ खाजगी आठवणींनीं व लोकविलक्षण अनुभवांनीं भरलेला आहे. हा ग्रंथ फारसा लोकप्रिय झाला नाहीं. अर्थात पुस्तकाचा खप फारसा झाला नाहीं. यामुळें ४ था भाग नीत्शेला आपल्या खर्चानें स्वतःपुरता छापून घ्यावा लागला. आपल्या मित्रांनां पाठविण्यासाठीं त्यानें ह्या भागाच्या अवघ्या ४० प्रती काढून घेतल्या. परंतु ४० प्रती पाठविण्याला त्याच्या जवळ ४० मित्रही नव्हते. मित्र ह्मणण्यासारख्या लोकांचें स्मरण करकरून त्यानें कशींबशीं ७ नांवें शोधून

काढली. आणि या सातजणांकडे त्यानें एक एक प्रत पाठविली ! 'अत्यंत खोल विचारांनीं भरलेला ग्रंथ, मजजवळ असलेल्या ज्ञानभांडारापैकीं अत्यंत अमूल्य हिरा, मनुष्यजातीवर उपकार करण्यासाठीं प्रसाद ह्मणून मी हा जनतेस अर्पण केला.' अशा उद्गारांनीं ज्या पुस्तकाचा पुढें खुद्द नीत्शेनें गर्वानें उल्लेख करावा त्या पुस्तकाची अशी दशा झाली ! कोणाही वृत्तपत्रानें ह्या पुस्तकाचें परीक्षण केलें नाहीं; कीं कोणीही टीकाकारानें या पुस्तकावर टीका खरडण्यासाठीं टांक उचलला नाहीं !

त्याच्या उत्साही वाचकांपैकीं एखादा कधींकाळीं ह्या एकांतवासांत येऊन पडलेल्या तत्त्ववेत्त्याला भेटे. **हैन्रिश, फॉन श्टाइन, पॉल लॅन्स्की** व आणखी कांहीं लोक त्याला येऊन भेटले. असे लोक येत; भेटत व निघून जात; आणि त्याला विसरून आपल्या नेहमीच्या व्यवसायांत मग्न होत ! एकांतवासांत पडलेला आमचा तत्त्ववेत्ता खरे मित्र व चेले यांसाठीं भुकेलेल्या माणसाप्रमाणें तळमळत पडलेला होता त्याकडे कोणाचें लक्ष जात नसे. योगायोगानें ज्यांच्याशीं त्याची मैत्री होई, अथवा जे त्याच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करून त्याचे चेले होऊं इच्छीत त्यांनां राखून लोकसंग्रह करण्याची कला नीत्शेला मुळींच माहित नव्हती. पुढें पुढें तर त्याला असें वाटुं लागलें कीं, अतिमानुष पिढी जशी भविष्यकाळीं जन्माला यावयाची आहे, तद्वतच माझ्याशीं मैत्री करण्याच्या लायकीचे श्रेष्ठ मानव जातीचे लोक भविष्यकाळीं जन्माला यावयाचे आहेत !

**'बियाँड गुड् अँड इव्हल':**—इकडे नवीन पुस्तकांचे आराखडे आंखण्याची त्याची खटपट प्रत्यहीं सुरू होतीच. सुचलेल्या कल्पना टिपून कित्येक स्मरणवह्या भरून गेल्या. आपलें सर्व तत्त्वज्ञान संकलित करून एक प्रचंड ग्रंथ तयार करावा असा त्याचा बेत होता. परंतु ही गोष्ट घडली नाहीं. भावी तत्त्वज्ञानाची प्रस्तावना ह्मणून आपल्या स्मरणवहींतील विचारतरंगांची साफसफाई व छाटाछाट करून त्यानें **बियाँड गुड् अँड इव्हल** अथवा 'बऱ्या वाइटाचे टापूपलीकडे,' या नांवाचें पुस्तक लिहिलें. हें पुस्तक प्रसिद्ध करण्यास कोणीही प्रकाशक तयार होईना. कारण लोकांना असल्या पुस्तकांची जरुरच नव्हती. अखेरीस स्वतःच्या खर्चानें त्यानें हें पुस्तक छापविण्याचें ठरविलें; व १८८६ सालीं तें प्रसिद्ध केलें. 'दी जॉयफुल विस्डम' या पुस्तकाशीं याचें बरेंच साम्य आहे. या पुस्तकांत सुमारें ३०० सुभाषितें आहेत. तेजस्वी, सूक्ष्म पण भरकटलेले विचार या पुस्तकांत फार आहेत. ग्रंथकारानें ह्मटल्याप्रमाणें हें पुस्तक स्वतंत्र-पूर्ण स्वतंत्र-अगदीं बंधनापलीकडील-द्वंद्वातीत लोकांसाठीं लिहिलेलें आहे. या पुस्तकांत तत्त्ववेत्ते व पंडित यांच्यावर खूप ताशेरे झाडलेले आहेत. सुभाषितांच्या शेवटल्या विभागाचें नांव 'व्हॉट इज नोबल ?' अथवा 'खरी उच्चता ह्मणजे काय ?' असें आहे. हा भाग खरोखरीच उत्साहजनक आहे. राष्ट्रीयत्वाविषयीं त्याची कल्पना फार चित्ताकर्षक आहे. सबंध युरोपखंड एकछत्री करून युनायटेड् युरोप बनविण्याची कल्पना या ग्रंथांत आहे. युरोपांतील प्रत्येक राष्ट्रासंबंधीं त्यानें आपलें मत प्रदर्शित केलें आहे. इंग्रज लोकांना त्यानें खूपच शिव्या दिल्या

आहेत. नीच प्रकारच्या मानवजातींचा मासला, कळप करून रहाणारे जंगली प्राणी, सदसद्विवेकबुद्धीचा नसता डामडौल दाखविणारे जगाच्या प्रगतीला अडथळा करणारे, अशा विशेषणांनीं त्यानें इंग्रजांची पूजा केली आहे. 'शेक्सपिअर' ह्मणजे स्पॅनिश, मूर, व सॅक्सन यांच्या गुणावगुणांची हास्यास्पद आणि चीड आणणारी खिचडी आहे, असें त्यानें ह्मटलें आहे. **कार्लाइलला** 'मठ्ठ डोक्याचा' असा शेरा त्यानें मारला आहे. 'दारुडे, जिवाची चंगळ करणारे, खुशालचेंडू, नवीन कल्पना चोरून सर्व लोकांना सवंग करणें हाच या लोकांचा शोध व एवढेंच यांचें कार्य' असें त्यानें इंग्रजांविषयीं ह्मटलें आहे.

पुस्तकांत फार शिव्या असल्या तरी नीत्शे खाजगी तऱ्हेनें फार सभ्य व मनमिळाऊ होता. सिल्समारी येथें एकांतवासांत रहात असतां त्याला वेळोवेळीं जे भेटण्यास जात ते सर्व अशीच कबुली देतात. एकदां एक नाजूक प्रकृतीची इंग्रज स्त्री भेटावयास गेली असतां त्याला ह्मणाली, 'तुह्मी लेखक आहां असें मी ऐकतें. मला तुमचे ग्रंथ वाचावयास द्या.' ही स्त्री कॅथॉलिक पंथाची आहे असें माहित असून नीत्शेनें तिला शांतपणानें सांगितलें, "माझें पुस्तक वाचावें अशी तुमची इच्छा आहे, ती ठीक आहे. परंतु तुह्मी माझें पुस्तक वाचूं नये असें मला वाटतें. मीं जें लिहिलें तें जर खरें असेल तर, बाई! तुमच्या सारख्या दुबळ्या स्त्रीला जिवंत रहाण्याचाच मुळीं हक्क नाहीं." अशा सडेतोड भाषणांमुळें नीत्शेला भेटावयास आलेले लोक त्याचे खरें मित्र होणें शक्यच नव्हतें. त्याच्या नशिबीं एकच गोष्ट लिहिलेली होती; आणि ती ह्मणजे एकांतवास, भयंकर एकलकोंडेपणा!

**दी वुइल टु पॉवर**:--एक सुसंघटित मोठा ग्रंथ लिहिण्याची त्याची खटपट अजून सुरूच होती. या ग्रंथाचें नांव ‘ दी वुइल टु पॉवर ’ किंवा **बलोपासना** असें ठेवण्याचें त्यानें ठरविलें होतें. १८८६ च्या हिंवाळ्यांत त्यानें नाईस येथें असतांना ‘ दी बर्थ ऑफ ट्रॅजेडी, ’ ‘ डॉन ऑफ डे, ’ व ‘ जॉयफुल वुइस्डम ’ या पुस्तकांची दुसरी आवृत्ति तयार केली. त्यांना ज्या प्रस्तावना लिहिल्या आहेत त्यांवरून नीत्शेची विचारपरिणति कशी होत चालली होती हें दिसून येतें.

१८८७ च्या आरंभीं एका स्त्रीशीं नीत्शेचा परिचय झाला. ह्या स्त्रीविषयीं फारच थोडी माहिती उपलब्ध आहे. तिचें पूर्ण नांवही माहित नाहीं. या स्त्रीबरोबर तो सॅनरेमो व मॉंटेकार्लो येथें जाऊन फेरफटका करून आला एवढी गोष्ट नक्की आहे. याच सुमारास त्याची तब्यत पुन्हां बिघडली व स्वित्झरलंड मध्यें असतांना कार येथें डॉक्टरांचें औषध घेत त्याला रहावें लागलें. आजारी असतानांही महाग्रंथाच्या कल्पनेनें त्याला सोडलें नाहीं. या ग्रंथाचे भाग कसे पाडावे, त्यांना नांवें काय द्यावीं, या संबंधीची त्याची योजना सुरूच होती. परंतु हा महाग्रंथ लिहिणें त्याच्या नशिबीं नव्हतें. प्रकृतीची अस्वस्थता व आणखी इतर कारणें यांमुळें आपले हातून आतां हा ग्रंथ होत नाहीं अशी जाणीव खुद्द नीत्शेलाही झाली आणि ह्मणून आपले विचारतरंग निरनिराळ्या पुस्तकरूपानें त्यानें प्रसिद्ध केले. ‘ बियॉंड गुड ॲंड इव्हल ’ हें पुस्तक व त्याच्या नंतरचीं त्याचीं सर्व पुस्तकें हीं अशाच प्रकारें प्रसिद्ध झालीं आहेत. त्याचें आत्मचरित्र व दी केस

ऑफ वॅग्नेर हीं मात्र स्वतंत्र पुस्तकें आहेत. नीत्शेच्या मृत्यूनंतर त्याचें अप्रकाशित वाङ्मय ह्मणून जे लेख प्रसिद्ध झाले त्यांतच त्याचा महाग्रंथ ' दी वुईल टु पॉवर ' यासाठीं त्यानें जमविलेली सामग्री आहे. तिची इंग्रजींत जी आवृत्ति प्रसिद्ध झालेली आहे तिचे दोन भाग असून पृष्ठसंख्या आठशेंहून अधिक आहे. ते वाचले असतां हा महाग्रंथ नीत्शेच्या हातून पुरा झाला नाहीं, याबद्दल अतोनात वाईट वाटतें. अस्तित्वासाठीं धडपड अथवा जीवनार्थ कलह हें जीवनरहस्य नसून बलोपासना हेंच जीवनरहस्य आहे असें सिद्ध करण्यासाठीं नीत्शे हें पुस्तक लिहीत होता. सोशियालिझम अथवा लोकसत्तावाद ह्मणून ज्याला ह्मणण्यांत येतें त्याच्या विरुद्ध नीत्शेनें या पुस्तकांत लिहिलें आहे. ' लोकसत्ता हें एक थोथांड आहे. अत्यंत मट्ठ डोक्यांचीं व हलकट माणसें या लोकसत्तावादामुळें सर्वांवर जुलूम करतील ' असें नीत्शेचें मत आहे. ख्रिस्ती धर्माचें खंडण या ग्रंथांत नीत्शेनें केलें आहे. जॉन स्टुअर्ट मिल याला ठोंब्या व स्पेन्सरच्या तत्त्वज्ञानाला वाणसवद्याचें तत्त्वज्ञान ठरवून नीत्शेनें इंग्रज तत्त्ववेत्त्यांना खूप अहेर केले आहेत. अतिमानुष बनविण्याचा मार्ग सुगम करण्यासाठीं हें पुस्तक लिहिलें आहे असें नीत्शे ह्मणतो. ' शास्त्रीयदृष्ट्या बलोपासनेच्या तत्त्वाचें परीक्षण,' ' राज्य व समाज ' यामधील सुप्रजाजननशास्त्रावरचे लेख, व ' दर्जाचा दर्जा, ' यामधील कांहीं उतारे अत्यंत वाचनीय आहेत.

**जीनिऑलॉजी ऑफ मॉरलसः**—नीत्शेनें ' बियॉंड गुड् अँड इव्हल ' या नांवाचें जें पुस्तक लिहिलें आहे त्यावर एका

खिस् लेखकानें बरीच टीका करून हें पुस्तक अराजकतेचा फैलाव करणारें आहे असा अभिप्राय दिला. या टीकांना उत्तर देण्यासाठीं नीत्शेनें तीन निबंध लिहिले व १८८७ सालांत 'दी जिनिऑलजी ऑफ मॉरल्स' 'ह्मणजे नीतीची पूर्वपीठिका' या नांवाखालीं पुस्तकरूपानें प्रसिद्ध केले. अमुक एक गोष्ट चांगली कीं वाईट हें मनुष्यानें कोणत्या परिस्थितींत ठरविलें व मुळांत कोणतीहि गोष्ट चांगली अथवा वाईट असूं शकते कीं काय, या प्रश्नांचा ऊहापोह या पुस्तकांत केला आहे. एकादी गोष्ट केल्यानें गुन्हा आहे असें समजलें जातें. गुन्हा, दुर्बुद्धि, व शिक्षा, या कल्पनांचा उगम व विकास, आणि सदसद्विवेकबुद्धीच्या कल्पना, कशा उत्पन्न झाल्या व त्यांत बदल कसकसा होत गेला या बदलची मार्मिक चर्चा या पुस्तकांत आहे. तसेंच वॅग्नेरवरही नीत्शेनें खूप तोंडसुख घेतलेलें आहे. **सिल्समारी** येथें असतांना नीत्शेनें या पुस्तकाची प्रस्तावना लिहिली. तींत त्यानें स्वतःविषयीं ज्या दर्पोक्ति काढलेल्या आहेत त्यांवरून असें वाटतें कीं, नीत्शेची मनःस्थिति डळमळीत होऊं लागली होती. १८८७च्या आक्टोबर महिन्यांत तो नाईस येथें राहण्यास गेला. येथें सांगण्यासारख्या अशा दोन गोष्टी घाडल्या. **एर्विनहोद** या नांवाचा त्याचा एक जुना मित्र होता. नीत्शेला तारतम्य नसल्यामुळें व त्याचा स्वभाव लाजरीच्या झाडाप्रमाणें फाजील कोंवळा असल्यामुळें यःकश्चित् कारणांवरून या पुराण्या दोस्ताशीं त्याचें कायमचें भांडण झालें. हा त्याचा जसा तोटा झाला तसाच त्याचा येथें एक फायदाहि झाला. सुप्रसिद्ध डॅनिश लेखक जॉर्ज ब्रँडीज व फ्रेंच इतिहासकार टेन हे सहानुभूति दाखविणारे दोन नवे वाचक त्याला लाभले.

या वर्षीच्या हिवाळ्यांत त्यानें ' बुईल टु पॉवर ' या ग्रंथाची जमवाजमव चालविली. परंतु या पुस्तकांत त्यानें जे हजारों प्रश्न उपस्थित केले होते त्यांचीं समाधानकारक उत्तरें त्यास सांपडेनात; व त्यामुळें या ग्रंथाचें पाऊल पुढें पडेना. त्यांतच एकलकोंडेपणाचा त्यास वीट आला होता. कोणातरी सोबत्याचा सहवास असावा असें त्यास फार वाटे. किंबहुना लग्न करण्याचीही त्याला इच्छा होऊं लागली होती. वॅग्नेरला जशी कॉसिमा नांवाची बायको होती तशी सुशील पत्नी आपल्याला लाभल्यास आपण फार सुखी होऊं, आपली कर्तबगारी वाढेल व पुढें दिसणाऱ्या भयानक परिस्थितींतून आपली सुटका होईल, असें त्याचे मनानें घेतलें. तथापि लग्नाचा योग कांहीं जुळून येईना. त्याची प्रकृति दिवसेंदिवस खालावत चालली. तो चिडचिड करूं लागला. लेखांत देखील समतोल वृत्ति न रहातां चिडखोरपणा दिसूं लागला. १८८८ च्या एप्रिलमध्यें टयूरिन येथें असतांना ' नीत्शेचें तत्त्वज्ञान ' या विषयावर मी व्याख्यानें देणार आहें, असें जॉर्ज ब्रँडिजचें त्याला पत्र आलें; त्यावेळीं नीत्शेला मोठें समाधान वाटलें. आपलें लिहिणें फुकट जात नाहीं, आपले लेख वाचून त्यावर विचार करणारे लोक दुनियेंत आहेत, हें पाहून निराशेच्या अंधकारमय मनःस्थितींत आशेचे किरण त्याला दिसूं लागले. या वेळीं नीत्शेनें मनुस्मृतीचा अभ्यास चालविला होता. हें पुस्तक त्याला फार आवडलें. बायबलपेक्षां हें पुस्तक फारच श्रेष्ठ आहे असें तो ह्मणे.

परंतु ' वुइल टु पॉवर ' अथवा ' बलोपासना ' या नांवाचा ग्रंथ तयार करण्याची त्याची जी खटपट सुरू होती तीवर मात्र

मनुस्मृतीच्या वाचनानें विरजण पडलें. त्यानें जो विषय घेतला होता तो फार अफाट होता. येवढ्या अफाट विषयावर सांगोपांग लिहिण्यापुरतें आपलें ज्ञान नाहीं याची जाणीव मनुस्मृतीच्या वाचनानें त्यास झाली आणि बलोपासनेवर महाग्रंथ लिहिण्याचें त्यानें सोडून दिलें ! ही विधायक कामगिरी आपले हातून होत नाहीं अशी खात्री पटल्यावर नीत्शेनें विघातक कामगिरी हातीं घेतली; आणि तदनुसार लहान लहान पुस्तकें लिहून प्रसिद्ध केलीं.

**त्याचे शेवटचे ग्रंथः**—झोंप नाहींशी होणें हें माथें फिरण्याचें पूर्वचिन्ह होय. कित्येक वर्षें मादक पदार्थ घेऊन नीत्शे झोंप आणीत असे. सन १८८८ मध्यें त्याचें डोकें हळूहळू भ्रमूं लागलें आणि विचारशक्ति कमी झाली. अशाच मनस्थितींत असतांना मिस मेसन बग बाईस लिहिलेल्या पत्रांत नीत्शेनें स्वतःविषयीं पुढील उद्गार काढलेले आहेत. “ झरथुष्ट्रावर पुस्तक लिहून मी मनुष्य जातीला उपकृत करून ठेवलेलें आहे. या पुस्तकाइतकें सखोल आणि उत्कृष्ट पुस्तक दुनियेंत नाहीं. संबंध युरोपांत माझ्या इतका स्वतंत्र विचाराचा दुसरा माणूसच नाहीं. संबंध जर्मनींत मीच काय तो एकटा लेखक आहें. ” रिचर्ड वॅग्नेरची देवाप्रमाणें ज्यानें पूजा केली आहे, त्या रिचर्ड वॅग्नेर विरुद्ध वाटेल तशा खोट्या गोष्टी लिहिण्यास व निरर्गल प्रलाप काढण्यास आतां त्यानें सुरवात केली. वॅग्नेरला त्यानें कसल्या बीभत्स शिव्या दिल्या याविषयीं उल्लेख पूर्वी आलेलाच आहे. ‘ दी केस ऑफ वॅग्नेर ’ हें वॅग्नेरवर शिव्यांची लाखोली वहाणारें पुस्तक त्यानें सन १८८८ त लिहून प्रसिद्ध केलें. या नंतर ‘ दी ट्वायलाईट

ऑफ दि आयडॉल्स' ह्मणजे "मूर्तींचा संधिप्रकाश' या नांवाचें चोपडें घाईघाईनें लिहून त्यानें प्रसिद्ध केलें. आत्मप्रौढी व आनंदातिशयाचा उद्रेक हीं वेड लागण्याचीं पूर्वचिन्हें आहेत. आतां नीत्शे हा बदनामी व शिवराळपणा याची जणूं खाणच झाला. आणि सर्वांवर शिव्यांचा वर्षाव करण्यास त्यानें सुरुवात केली. अर्थात् इंग्लंड, इंग्रज लोक, व इंग्लंडांतील कार्लाइल सारखे लेखक, यांच्या वांट्यास सर्वांत अधिक शिव्या आल्या.

पुन्हां एकदां 'वुइल टु पॉवर' हा ग्रंथ रचण्याची नीत्शेनें खटपट केली. त्यानें प्रकरणांचीं नवीन नांवें ठेवलीं; आणि या महाग्रंथाचा पहिला भाग एक महिन्याच्या आंतच रचून लिहून काढला. ह्या भागाला त्यानें 'अँटी खाइस्ट' असें नांव दिलेलें आहे. रचनेच्या दृष्टीनें पाहिलें असतां याच्या पूर्वींच्या दोनही पुस्तकांपेक्षां हें पुस्तक वरच्या दर्जाचें आहे. ख्रिस्ती धर्मावर नीत्शे तुटून पडला असला पाहिजे ही गोष्ट पुस्तकाच्या नांवावरूनच वाचकांच्या लक्षांत येईल. जगांतील कोणत्याही धर्माला थोथांडाची आवश्यकता असते ही गोष्ट मान्य करून नीत्शे ह्मणतो, 'सर्व धर्मांत ख्रिस्ती धर्म अतिशय वाईट आणि घातुक आहे. कारण या धर्मांतील थोथांडें मानवी प्रगतीला अडथळा करणारीं व मानवी जीवित धोक्यांत आणणारीं आहेत. ख्रिस्ती धर्म हा जगांतील अत्यंत घाणेरडी गोष्ट, दिशाभूल करणारें प्रचंड खूळ, व सूडाची बुद्धि उत्पन्न करणारें घाणेरडें बीज आहे' असे नीत्शे ह्मणतो. सप्टेंबर महिन्यांत नीत्शे टयूरीन शहरीं रहाण्यास गेला. गेल्या दहा वर्षांत नीत्शेचीं कित्येक पुस्तकें प्रसिद्ध झालीं पण त्याची

कोणी वास्तपुस्त केली नाहीं. परंतु 'दी केस ऑफ वॅग्नेर' हें पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर त्याच्यावर कांहीं वर्तमानपत्रकर्त्यांनीं अभिप्राय दिले. अर्थातच् आतां वॅग्नेरवर तोंडसुख घेणारा नीत्शे पूर्वी वॅग्नेरचा भक्त होता ही गोष्ट नमूद करण्यास टकिाकार विसरले नाहींतच. अनुकूल प्रतिकूल कसें कां होईना, वर्तमानपत्रें आपल्या पुस्तकाविषयीं लिहूं लागलीं हें पाहून नीत्शेला आनंद झाला. ह्याच सुमारास जॉर्ज ब्रँडिस याच्या मार्फत त्याला ष्ट्रिंडबर्ग नांवाचा स्वीडनमधील आणखी एक चेला मिळाला. झालें. त्याचे तीन चेले तयार झाले. पॅरिसचा टेन्, स्वीडनचा ष्ट्रिंडबर्ग आणि डेन्मार्कचा ब्रँडिस ! आणखी काय पाहिजे ? आपल्या कीर्तीचा सूर्य उगवला असें त्यास वाटूं लागलें. परंतु इतक्या उशिरां कीर्तीचा उदय होऊन काय उपयोग ? त्याची वृत्ति हल्लीं ठिकाणावर नसे. या वेळेला त्यानें जीं पत्रें लिहिलीं आहेत त्यांवरून नीत्शेला पुढील प्रकार समजून चुकलेला होता, असें दिसतें. यानंतर 'एक्सीहोमो' या नांवाचें एक पुस्तक त्याचे हातून बाहेर पडलें. हें पुस्तक ह्मणजे एक प्रकारचें त्याचें आत्मचरित्रच होय. दोन तीन आठवड्यांत धांदलीनें लिहून हें पुरें केलेलें आहे. हें पुस्तक नीत्शेच्या मनःस्थितीचें चित्र या दृष्टीनें वाचनीय आहे. पण वाचतांना नीत्शेची कींव येऊन मन खिन्न होतें. यांतील कांहीं प्रकरणांचीं नांवें पुढील प्रमाणें आहेतः—'मी इतका शहाणा कां आहे ?' 'मी अति बुद्धिमान असण्याचीं कारणें' 'मी अत्यंत उत्तम ग्रंथ कां लिहूं शकतों ?' हाइन व मी हेच काय ते जर्मन भाषेचे श्रेष्ठ कारागीर जन्मास आले असें ही यांत ह्मटलेलें आहे. 'हल्लींच्या

काळांत कोणाही एकट्या माणसाला जी गोष्ट करतां येणार नाहीं अशा तऱ्हेच्या कित्येक अव्वल दर्जाच्या गोष्टी मी केल्या. मी अनेक अचाट गोष्टी केल्या. आजकालच्या काळांत माणसाला अशा प्रकारच्या गोष्टी करतां येत नाहींत. माझें पुस्तक विकत घेणें प्रत्येक माणसाचें कर्तव्य आहे. माझें पुस्तक हातीं न घेणारे लोक ' गाढवाला गुळाची चव काय ' ही म्हण सिद्ध करतात. त्यामुळें माझ्या पुस्तकाची किंमत कमी ठरत नाहीं. तर या लोकांची लायकी मात्र दिसते. मानसशास्त्र माझ्यापूर्वी मुळीं अस्तित्वांतच नव्हतें. या शास्त्राला मीं जन्म दिला. ' अशा तऱ्हेचे दर्पोद्गार या आत्मचरित्रांत नीत्शेनें काढलेले आहेत.

**शेवटः**—या वृत्तीचा कळस इ. स. १८८९ च्या आरंभीं झाला. नीत्शे पिशाच्चवृत्तीचा बनला. मुक्ताची विदेह स्थिती पाश्चात्यांस अपरिचित असल्यामुळें नीत्शेच्या पिशाच्चवृत्तीचें रहस्य त्यानां कळत नाहीं. त्यामुळें पाश्चात्य लोक नीत्शेला वेड लागलें असें समजले. तो एकसारखा बडबडत राही. मोठमोठ्यानें बोले. व्यवहाराला तो पारखा झाला. कवडी किंमतीच्या वस्तूला तो कित्येक रुपये देऊं लागला. ' मी सुप्रसिद्ध खुनी आहें. मीं इटलीचा राजा आहे. मी प्रत्यक्ष परमेश्वर आहें. ' अशा तऱ्हेचें विचुक भाषण तो करी. तो रस्त्यांत फिरे, बडबडे, आणि लोकांना म्हणे, " लोकहो; सुखानें नांदा ! मी खुद्द परमेश्वर आहें. मीं हें विश्व निर्माण केलें. " या सर्व प्रकारामुळें नीत्शेला वेड लागलें अशी त्याच्या इष्टमित्रांची खात्री झाली. प्रोफेसर ओव्हरबेक या नांवाचा त्याचा एक जुना मित्र होता. तो टयूरिन गांवीं नीत्शेला भेटावयास

गेला. नीत्शेला वेड लागलें अशी त्याची खात्री झाली. आणि त्यानें बेल येथें आणून वेड्यांच्या एका खासगी इस्पितळांत त्याला टाकलें. नंतर नीत्शेच्या वृद्ध आईनें तेथून काढून कांहीं दिवस जेना येथील डॉ. बिन्सवँगेर यांच्या इस्पितळांत उपचारार्थ ठेविलें. १८९० सालीं या संस्थेंतून काढून नीत्शेला तिनें आपल्या ताब्यांत घेतलें व त्याच्यासह ती नॉंबुर्ग येथें राहण्यास गेली.

नीत्शेची अशी वृत्ति बनण्याचें कारण काय याचा पाश्चात्यांना नीट उलगडा होत नाहीं. मादक पदार्थाचें नीत्शे नित्य सेवन करी. यामुळें कदाचित असें घडलें असेल असें ते ह्मणतात. तो अवसानाच्या बाहेर कामें करी. शिवाय त्याला मनाचा विलक्षण ताप सहन करावा लागत असे. जिकडे तिकडे त्याला निराशेनें ठोकरा दिल्या. एकांतवासांत त्याला सबंध जन्म काढावा लागला. शिवाय लष्करी शिक्षण घेतांना त्याला झालेला अपघात, लढाईवर असतांना त्याला झालेला आजार, दृष्टि अधु असल्यामुळें भोगावा लागणारा त्रास, आणि मादक पदार्थ, यांचा सर्वांचा परिणाम होऊन त्याची अशी स्थिती झाली असें पाश्चात्यांचें मत आहे. आह्मीं पूर्वी ह्मटल्याप्रमाणें आमच्याकडील कित्येक लोक नीत्शेला वेड लागलें असें म्हणण्यास तयार होणार नाहींत. जगांतील आपलें कर्तव्य, ईश्वरानें आपणांस नेमून दिलेलें काम, आपण पूर्णपणें केल्याची जाणीव झाल्यामुळें व शेष आयुष्य कंठणें भाग असल्यामुळें अशा पूर्ण ज्ञानी मनुष्याला विदेहस्थितींत कधीं कधीं पिशाच्चवृत्ति पत्करावी लागते, अशी आपल्याकडील लोकांची भावना आहे. अशा विदेह स्थितींत नीत्शे सुमारें १० वर्षे होता. तो २५ आगस्ट सन

१९०० इसवी रोजीं वायमर येथें न्युमोनियानें वारला. त्याच्या पूर्वीच दोन वर्षें नीत्शेच्या वृद्ध आईनें डोळे मिटले होते. अशा रीतीनें जगाला वळण लावण्याच्या महात्वाकांक्षेनें मनुष्य जातीसाठीं ध्येय निर्माण करणें व या ध्येयाला पोहोंचण्यासाठीं मार्ग आंखून देणें या खटपटींत सबंध आयुष्य वेंचणाऱ्या सत्पुरुषाचा अंत झाला !

नीत्शेच्या लेखांनीं त्यावेळीं जरी सर्वांचें मन आकर्षण करून घेतलें नाहीं तरी पुढें नीत्शेची किंमत जगास कळली. नीत्शे हा मनास योग्य व खरें वाटेल तें निर्भीडपणें बोलून दाखविणारा अत्यंत स्पष्टवक्ता सत्पुरुष होता याबद्दल हल्लीं लोकांची खात्री पटत चाललेली आहे. त्याच्या पुस्तकांत मनुष्यजातीला सन्मार्ग दाखविण्याचे प्रयत्न त्यानें अत्यंत प्रामाणिकपणें केलेले आहेत. नीत्शेचें एक स्वतंत्र तत्त्वज्ञान होतें, यांत आतां दुमत नाहीं. त्याच्या अफाट बुद्धिसागरांत अनेक विचाररत्नें प्रयत्नानें शोध करणारास मिळूं शकतील. त्याला इतके विचार सुचत कीं, प्रत्येकावर व्यवस्थित निबंध अथवा पुस्तक लिहिणें अशक्यप्राय होतें; व त्यानें देखील पुढें अशा तऱ्हेचीं 'प्रस्तावना-उपक्रम-उपसंहार' वगैरे रूढींचीं बंधनें सोडून सुचतील तसे विचार लिहून विचारतरंगच प्रसिद्ध करण्याची पद्धती सुरू केली. या तरंगांत अनेक अमूल्य तत्त्वें व गाढ प्रमेयें समाविष्ट झालेलीं आहेत. नीत्शेच्या चरित्राविषयीं व ग्रंथांविषयीं सामान्य माहिती आतां पर्यंत दिलेली आहे. यानंतरच्या पुढील भागांत त्याच्या कांहीं सुप्रसिद्ध ग्रंथांची रूपरेषा, मांडणी व विचारपरंपरा यांची थोडक्यांत माहिती देण्याचा विचार आहे. तीवरून नीत्शेच्या तत्त्वज्ञानाची माहिती स्थूलमानानें वाचकांस होईल अशी उमेद आहे.

# भाग दुसरा.

## प्रकरण पहिलें.

### चांगलें व दुष्ट यांचे पलीकडे. (बियाँड गुड अँड इव्हल.)

तथः—वॅग्नेरशीं मतभेद झाल्यानंतर नीत्शेचें भ्रमपटल दूर झालें. त्यानें शब्दांकडे पाहण्याचें सोडून दिलें आणि वस्तुस्थितीकडे लक्ष देण्यास सुरवात केली. भाषाशास्त्राचा अभ्यास सोडून अधिक पूर्णावस्थेला पोहोंचलेल्या शास्त्रांकडे-विशेषत: शारीरशास्त्राकडे—त्याचें मन लागलें. एकाद्या इमानदार मित्राप्रमाणें हें शास्त्र त्याला अखेर पर्यंत चिटकून राहिलें. शारीरशास्त्र व तत्संबंधींचे इतर विषय यांचें आपलें ज्ञान तुटपुंज्या स्वरूपाचें आहे, असें खुद्द नीत्शे मोकळ्या मनानें कबूल करी. व्हिएन्ना, पॅरिस किंवा म्युनिच शहरीं जाऊन दहा वर्षे रहावें व या शास्त्रांचा बारकाईनें अभ्यास करावा अशी नीत्शेची फार इच्छा होती. तथापि हें त्याला साधलें नाहीं. प्राचीन भाषांचा अभ्यास, ग्रीक संस्कृतीची माहिती, आणि निरंकुश भराऱ्या मारण्याची कवीची शक्ती, यांच्या जोरावर प्राणिशास्त्र व सुप्रजाजननशास्त्र यांच्या बाबतींत त्यानें पुष्कळच कामगिरी करून ठेवली यांत कांहीं शंका नाहीं. या शास्त्रांच्या विरुद्ध असलेले दुराग्रहाचे अडथळे त्यानें दूर केले; आणि भविष्यकालीन शास्त्रवेत्त्यांचा मार्ग सुगम केला.

परिस्थितीचा परिणाम होतो व संस्कृति आनुवंशिक असते असें लामार्कप्रमाणें नित्शेचें मत होतें. समाजशास्त्र व धर्मशास्त्र यांची उभारणी प्राणिशास्त्राला धरून केली पाहिजे, आणि दुबळे व संस्कृतिहीन नष्ट झाले पाहिजेत, या बाबतींत नीत्शेचें मत स्पेन्सरशीं जुळे. प्राणिशास्त्रावरून अनुकरणाची कल्पना त्यानें उचलली, आणि ती नीतिशास्त्रांत घुसडली. शत्रूच्या दृष्टीस पडूं नये ह्मणून ज्या प्रमाणें जनावरें आपल्या आजुबाजूच्या वस्तूंचा रंग पेहेरतात त्याचप्रमाणें मनुष्यप्राणीहि करतो असें त्याचें मत होतें. रानांत राहणारे प्राणी ते ज्या रानांत राहात असतील त्या रानाच्या रंगाचे बहुधा असतात. बेडूक चिखलाचा रंग धारण करून साप, कांसव वगैरे आपल्या शत्रूंपासून स्वतःचा बचाव करून घेतो. परिस्थितीच्या रंगांत आपला रंग मिसळून दिल्यामुळें शत्रूंचें लक्ष आपणावर सहसा जात नाहीं. त्यामुळें शत्रूपासून बचाव होण्यास आपणास मदत होते. जगांत वागतांना शत्रूंची वंचना करण्याकरितां इतर प्राण्यांची ही युक्ति मनुष्य उचलतो. आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांचीं अथवा आपणांस ज्या समाजांत वावरावें लागतें त्या समाजाचीं नीतिविषयक मतें मनुष्य मुकाट्यानें मान्य करतो, किंवा अमान्य असलीं तरी लोकक्षोभ होऊं नये ह्मणून अमान्य असल्याचा बोभाटा करीत नाहीं. स्वतःच्या बुद्धीला जरी एकादें नीतितत्त्व पटत नसलें तरी त्याच्या विरुद्ध ओरड करण्याचें धाडस मनुष्य करीत नाहीं. कारण त्यामुळें शत्रू उत्पन्न होतील अशी त्यास भीति असते; ह्मणून आपल्या बरोबरीच्या लोकांच्या सुरांत सूर मिसळून देणें त्याला फायद्याचें

वाटतें. पुढें इमरसन, स्नायडर, व रॉल्फ यांचीं पुस्तकें वाचून परिस्थितीच्या दडपणाविषयींचीं नीत्शेचीं मतें बदललीं आणि बलोपासना, बलवान होण्याची प्रबळ इच्छा, आपण वाढावें, आपला विस्तार व्हावा, **दुसऱ्याचेंही आपण बळकवावें** ही इच्छा, हेंच जगाच्या विकासाचें आद्य कारण आहे असें नीत्शेचें मत झालें. मनुष्यांमधील कर्तृत्वाच्या कमजास्त प्रमाणानुसार मनुष्यजातीचे दोन विभाग नीत्शे पाडीत असे. एक धनी व दुसरा गुलाम.

विकासाला विपुलता व भरभराट यांची ह्मणजे 'शांति, पुष्टि व तुष्टि' यांची आवश्यकता आहे असें नीत्शेचें जें मत झालें तें रॉल्फच्या ग्रंथाच्या वाचनानें होय. जीवनकलह ह्मणजे जगण्याची धडपड हें विकासाचें आद्य कारण नसून बलवान होण्याची इच्छा अथवा बलोपासना हेंच विकासाचें खरें कारण आहे, असें नीत्शेचें मत होतें. विकासाच्या रहस्याविषयीं याप्रमाणें **डार्विनशीं** नीत्शेचा मतभेद असला तरी लढाई अथवा धडपड या विषयीं डार्विनशीं त्याचें मतैक्य होतें. मात्र आयुष्याच्या अखेरीस इतर सर्वांवर जसे त्यानें हल्ले चढविले त्याचप्रमाणें त्यानें डार्विनच्या मतांचाही खरपूस समाचार घेतला. प्राणिशास्त्रदृष्ट्या व समाजदृष्टया युद्ध आणि धडपड हीं आवश्यक आहेत, असें नीत्शेचें मत होतें. एक जात दुसरी विरुद्ध आणि एकाच जातींतील प्राणी एकमेकांविरुद्ध वर्चस्वासाठीं सदैव लढत असतात. आपले शरीरांतील निरनिराळे अवयव, आपले विचार आणि भावना, यांचें देखील वर्चस्वासाठीं एकमेकांशीं अखंड युद्ध सुरू असतें, असें तो ह्मणतो.

**चांगलें व दुष्ट यांच्या व्याख्या**:—नीत्शेनें आपल्या पुस्तकास चांगलें व वाईट याच्या पलीकडे असें नांव दिलेलें नाहीं; तर 'चांगलें व दुष्ट यांच्या पलीकडे' असें नांव दिलेलें आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. शक्ति मिळविण्याची लालसा, प्रबळ होण्याची इच्छा, व प्रत्यक्ष बल, ज्याच्या योगानें वाढतें तें सर्व चांगलें; आणि दुबळेपणा, हेवा अथवा सूडाची भावना या पासून उत्पन्न होणारें तें सर्व दुष्ट, अशा अर्थानें चांगले व दुष्ट हे शब्द नीत्शेनें वापरलेले आहेत. 'चांगलें व वाईट' असें न ह्मणतां 'चांगलें व दुष्ट' ह्मणण्यांत नीत्शेचा विशिष्ट हेतू दिसून येतो. कधीं कधीं मात्र नीत्शेनें वाईट व दुष्ट हे शब्द समानार्थानें वापरलेले आहेत. तथापि या दोन शब्दांचा होतां होईल तों वेगळेगळ्या अर्थानें उपयोग करण्याचा त्याचा हेतु स्पष्ट दिसतो. कोणतेंहि तत्त्व जीवनाला संवर्धक आहे कीं विघातक आहे हें पाहूनच नीतितत्त्वांची किंमत ठरविली पाहिजे. शारीरशास्त्रविषयक परिस्थितीच्या दृष्टीनें गुणावगुणांकडे पाहिलें पाहिजे. नीतिशास्त्राला नीत्शे प्राणिशास्त्राची कसोटी लावून पाही. आत्मचरित्रांत अन्न कसें असावें या विषयीं लिहिण्यांत त्यानें कित्येक रकाने खर्च केले आहेत हें याचें प्रत्यंतर होय.

दुर्गुण व चैन यांमुळें जाती अथवा लोक नष्ट पावतात असें नीतिशास्त्राचें मत आहे. नीत्शेचें मत याहून निराळें आहे. जेव्हां राष्ट्राचा अधःपात होत असतो अथवा शारीरशास्त्रदृष्ट्या लोक खालावत असतात तेव्हां दुर्गुण व चैन यांची वाढ होणें हें स्वाभाविक आहे. दुर्गुण व चैन हीं राष्ट्राच्या अधःपाताचीं कारणें

नसून बलवान व कर्तृत्ववान लोकांचा अभाव हें खरें कारण होय. म्हणून ख्यालीखुशाली कमी झाली असतां राष्ट्रीय अधःपात थांबेल असें म्हणणें योग्य नाहीं. ख्यालीखुशाली हें कारण नसून कार्य आहे. **ख्यालीखुशाली ज्या कारणामुळें वाढते तें कारण म्हणजे कमकुवतपणा होय. राष्ट्रीय अधःपात थांबवावयाचा असेल तर कमकुवतपणा नष्ट करून बलवान व कर्तबगार पिढी तयार केली पाहिजे.** तात्पर्य, नीत्शेचें मत नीतिशास्त्राच्या विरुद्ध आहे असें नव्हें, परंतु ज्याला नीतिशास्त्र कारण समजतें तें कारण नसून कार्य आहे असें ठरवून, खरें कारण कोणतें तें नीत्शेनें दाखवून दिलेलें आहे.

**निर्गुण जगः**—' जग आणि जीवन ' यांच्या अस्तित्वाचें समर्थन, मनोरम भूचमत्कार याच दृष्टीनें केलें पाहिजे. जग हें मुळांत चांगलेंही नाहीं व वाईटही नाहीं. चांगलें व वाईट हे शब्द माणसाच्याच दृष्टीनें काय ते महत्वाचे आहेत. पाण्याला ज्या प्रमाणें रंग नाहीं किंवा आकार नाहीं त्याप्रमाणें मूळतः जगांत कांहीं चांगलें नाहीं आणि वाईटही नाहीं. मूळ हेतु अथवा कृति रंगरूपविहीन असतात. चांगल्या अथवा वाईटाचा रंग वा बेरंग त्यांच्यावर नसतो. कोणत्याहि गोष्टींत नीति वा अनीति नसते; फक्त नीतिशास्त्रदृष्ट्या त्या गोष्टीची आपण पारख करतों. वास्तविक नीतीच्या कसोटीचें मूळ नीतिशास्त्राचे टप्याचे बाहेरचें आहे. जीवनकलह आणि बलवान व लायक यांचे निसर्गदत्त अधिकार, यांविषयींच्या त्यांच्या भ्रामक कल्पनेमुळें डार्विन व त्याच्या नंतरचे अर्वाचीन नीतिशास्त्रवेत्ते नीतिनियम घालून सिद्ध करण्यास भितात. प्रत्यक्ष

व्यावहारिक नियम घालून द्या असें ह्मटलें तर आपला मूळ प्रश्न बाजूला टाकून ते निराळीच नीतिनियमांची योजना तयार करतात. वास्तविक खरा प्रश्न हा कीं, ' या विश्वाविषयीं तुमची काय कल्पना आहे ? ' व्यावहारिक नीतिनियम घालून देतांना याच प्रश्नाकडे दृष्टि ठेविली पाहिजे. परंतु या दोन गोष्टींची सांगड त्यांना घालतां येणें शक्य नाहीं. ' कारण ते भ्याड आहेत, ' असें नीत्शे ह्मणतो.

**सापेक्षता:**—नीत्शे सापेक्षतावादी होता. त्याच्या मतें मनुष्याच्या भौगोलिक व ऐतिहासिक परिस्थितीवर नीतितत्त्वें अवलंबून असतात. कालाबरोबर नीतिअनीतीच्या कल्पनाही बदलत असतात. जुन्या काळीं हेव्याची गणना सद्गुणांत होत असे. इरिस नांवाच्या असूया देवतेची कल्पना हें याचें दर्शक होय ! आशेची गणना ग्रीक लोक दुर्गुणांत करीत असत. आशा ही आंधळी व चकव्या प्रमाणें फसविणारी आहे, असें ते मानीत. हल्लीं आशा हा सद्गुण आहे असें आपण समजतों. ज्यू लोकांची रागाची कल्पना आपल्या पेक्षां भिन्न होती. रागाला ते पूज्य मानून सद्गुणांत गणीत. कांहीं लोक ज्याला चांगलें मानीत त्यालाच दुसरे लोक तिरस्करणीय समजत. चांगल्या व वाइटाच्या कल्पना मनुष्य प्राण्यानें आपण होऊन निर्माण केल्या. मुळांत एखादी गोष्ट चांगली अथवा वाईट नसते. स्वत:चें आसन स्थिर रहावें या साठीं अमुक गोष्ट चांगली व अमुक गोष्ट वाईट असें माणसानें ठरविलें. चांगलेपणा अथवा वाईटपणा सतत टिकणारा नव्हे. तो तात्पुरता आहे. पूर्वी जी गोष्ट वाईट होती तीच गोष्ट

आज आवश्यक झाली तर आपण चांगली ह्मणूं. नीतिविषयक व धार्मिक कल्पना आणि भावना यांचें पृथक्करण केलें पाहिजे, असें नीत्शे ह्मणे. या कल्पना आणि भावना कशा व कोणत्या परिस्थितींत निर्माण झाल्या याचा पत्ता लावण्यास संशोधकांची प्रचंड सेना पाहिजे. नाजूक भावनांची किंमत व त्यांतील भेद यांची उत्पत्ति, स्थिति, वाढ आणि लय यांचा विचार करणारानें भरपूर सामग्री जमवून व विस्तृत निरीक्षण करून नीट वर्गवारी केली पाहिजे असें तो ह्मणे. हल्लीं जीं नीतितत्त्वें प्रचलित आहेत त्यांच्या पैकीं कांहीं पुनः पुनः उत्पन्न होणारीं व कांहीं बहुतेक सर्वांस मान्य असणारीं अशीं जीं असतील त्यांची कल्पना स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, व त्यांवरून नीतितत्वांच्या नमुन्याचे सिद्धांताची पूर्वतयारी केली पाहिजे असें त्याचें मत होतें.

कवि व तत्ववेत्ता यांचे गुण नीत्शेच्या अंगीं होते, तथापि शास्त्रीय संशोधकांची सहनशीलता त्याच्या अंगीं कमी असल्यामुळें अशा तऱ्हेचें ऐतिहासिक व तुलनात्मक संशोधन करून भावी संशोधकासाठीं निदान सामग्री तरी तयार करून ठेवण्याचें काम त्याचे हातून झालें नाहीं. खुद्द त्याचे जवळ बेताचीच सामग्री होती, आणि त्याचें या बाबतींतील ज्ञानही संकुचित होतें. तरी स्वस्थ न बसतां विघातक आणि विधायक अशी दोन्ही प्रकारची कामगिरी त्यानें सुरू केली. प्रचलित नीतितत्त्वांवर टीकास्त्रें फेंकून त्यानें आपली विघातक शक्ति दाखविली; आणि आपल्या मतें अधिक चांगल्या नीतिनियमांची जंत्री करून विधायक कामगिरी करण्याचा त्यानें प्रयत्न केला.

**उपयुक्ततावादाचा उगम आणि समाजविषयक नीतीचा इतिहासः**—प्रचलित नीतितत्त्वें समाज कायम रहावा या दृष्टीनें बसविलेलीं आहेत असें त्याचें मत होतें. रूढि अथवा कायदा यांचा परंपरागत मार्ग न सोडील तो नीतिमान, सद्गुणी व सच्छील समजला जातो. या नीतीच्या बुडाशीं काय आहे हें पाहिलें तर असें दिसून येईल कीं, तोटा अथवा इजा यांचें भय, अगर उपयुक्तता व फायदा यांची आशा, या दृष्टीनें नीतितत्त्वें ठरविलेलीं आहेत. परंपरागत मार्ग सोडून जाणाऱ्या धाडशी माणसाला सर्व प्रकारें भेडसावण्यांत येतें. रूढी जसजशी जुनी होत जावी तसतसा तिजविषयींचा पूज्यभाव वाढत जातो. अगदीं जुन्या रूढीविषयीं चर्चा अथवा टीका करणें सुद्धां पाप आहे असें पुष्कळ लोक समजतात! मनुष्य प्राणी समाज अथवा कळप करून रहातो. अर्थात आपल्या समाजाच्या अथवा कळपाच्या नफानुकसानींकडे लक्ष देऊन व गरजांकडे पाहून कोणतीहि गोष्ट नीतिमान अथवा अनीतिमान ठरविली जाते. आपल्या समाजाचे आपण एक घटक आहोंत ही जाणीव नीतिशास्त्र, व्यक्तीला करून देतें. जी परिस्थिति एका समाजाला पोषक होते तीच परिस्थिति दुसऱ्या समाजाला घातुक होऊं शकते. ह्मणूनच भिन्न भिन्न व क्वचित् प्रसंगीं परस्परविरोधी अशीं नीतितत्त्वें निरनिराळ्या समाजांत प्रचलित असलेलीं दिसतात. व्यक्तिमात्रांत कळप करून रहाण्याची जी उपजत बुद्धि आहे तीमुळेंच नीतितत्त्वें उगम पावतात. कळप करून रहाण्याची आवड अहंकारापेक्षांही जुनी आहे. सद्बुद्धि मनुष्याला समाजांत ओढीत असते, आणि

असद्बुद्धि त्याला अहंकाराकडे अथवा व्यक्तिमाहात्म्याकडे खेंचीत असते. भीति ही नीतितत्त्वांची जननी आहे. उच्च व स्वतंत्र भावना, समाजापासून तुटून अलग रहाण्याची इच्छा, आणि प्रबळ विचारशक्ति, हीं भयंकर व अनिष्ट गणलीं जातात. समाजापेक्षां एकाद्या व्यक्तीला अधिक उच्च करणारी आणि त्यामुळें आसपासच्या लोकांत भय उत्पन्न करणारी प्रत्येक गोष्ट दुष्ट अथवा निंद्य समजली जाते. सहनशील, अहंकारविहीन, व लवचिक वृत्ति नीतिदृष्ट्या उत्कृष्ट व सन्माननीय गणली जाते. युरोपांतील लोकांची कळपनीति अशा प्रकारची आहे! ही सर्व नीति समाजस्वास्थ्याच्या दृष्टीनें आंखलेली आहे. आतां ह्या नीतीचें समाजस्वास्थ्य हें ध्येय साधल्यावर त्या नीतितत्त्वांची छाननी करणें आवश्यक आहे. ह्या नीतिशिवाय व ह्या नीति नंतर जीं निरनिराळीं नीतितत्त्वें उगम पावलीं त्यानंतर आतांतरी या सर्वांहूनहि अधिक उच्च तत्त्व असणें शक्य आहे एवढें कबूल करण्याची तयारी झाली पाहिजे.

समाजांतील सत्यनिष्ठेच्या कल्पना कशा आहेत, पहा! तुह्मीं लोकांस सहज ओळखतां आलें पाहिजे. तुमचा स्वभाव तुह्मीं स्पष्ट व असंदिग्ध खुणांनीं दर्शविला पाहिजे. तुह्मी आपले विचार व वर्तणूक छपवितां कामा नये. तुह्मी वेळोवेळीं बदलतां कामा नये. तात्पर्य मनुष्यानें असें वागलें पाहिजे कीं, त्यामुळें दुसऱ्यांची फसवणूक वा दिशाभूल होऊं नये. सत्यनिष्ठेचा हा जो आग्रह त्याच्या बुडाशीं काय हेतु आहे हें आपण पाहूं या! व्यक्तीची स्पष्ट ओळख व स्वास्थ्य राखण्यासाठींच सत्यनिष्ठेचे अशा तऱ्हेचे

उपदेश करण्यांत येतात. भल्या मनुष्याच्या संगतीनें लोकांस स्वास्थ्य व समता या सुखदायक गोष्टींचा लाभ होतो. ह्मणून मनुष्यानें भलेपणानें वागावें असें आपण ह्मणतों. निःस्वार्थीपणाचीं आपण स्तुतिस्तोत्रें गातों. कां, तर, इतर सगळे निःस्वार्थी राहिले तर आपला त्या पासून फायदा होतो. खरोखर आपण निःस्वार्थी असतों कां ? आपण खरे निःस्वार्थी असूं तर निःस्वार्थीपणाला आपण सद्गुणांत गणून हा सद्गुण इतरांवर खात्रीनें लादणार नाहीं. स्वार्थ साधण्याची इच्छा ही एक शक्ति आहे. पण ही शक्ति इतर लोकांत असल्यास ती पासून आपल्याला अपाय होईल, या स्वार्थी बुद्धीनें आपण निःस्वार्थीपणाचें ढोंग पसरवितों. वास्तविक दुसऱ्यानें स्वार्थ साधला तर त्याचें तरी कल्याण होईल ना, या विचारानें आपण सुखी होत नाहीं. उलट आपल्याला असें वाटतें कीं याचा स्वार्थ साधला तर याची स्वार्थबुद्धि वाढेल आणि ती त्याची बुद्धि आपला नाश करील. माझें नुकसान झालें तरी हरकत नाहीं पण तुमची स्वार्थबुद्धि कायम ठेवा असा उपदेश आपण करीत नाहीं. उलट इतरांच्या स्वार्थबुद्धीनें आपल्याला तोशीस लागेल या भीतीनें आपण निःस्वार्थीपणाचाच उपदेश त्याच्या माथीं मारूं लागतों; म्हणजे सर्वांनीं निःस्वार्थी व्हावें आणि आपल्याला धक्का बसूं नये ही स्वार्थी बुद्धि आपले पोटांत असते.

नीतितत्त्वांचा उगम होण्यापूर्वींच्या कालांत परिणामावरून एखाद्या कृतीची नीतींत अगर अनीतींत गणना होत असे. गेल्या दहा हजार वर्षांपासून नीतितत्त्वांचा उगम झाला असें ह्मणण्यास

नाहीं. या काळांत परिणामाकडे नजर न देतां हेतूकडे लक्ष देऊन नीतिअनीति ठरविण्यांत येऊं लागली. ही गोष्ट स्पष्ट करण्यासाठीं आपण एखादें उदाहरण घेऊं या. मनुष्याचा खून करणें ही गोष्ट पूर्वीं अनीतीची समजत. खुनामुळें मनुष्य मरतो या परिणामाकडे लक्ष देऊन खुनाला अनीतिमान ठरविण्यांत आलें. नीतितत्त्वांचा उदय झाल्यानंतर परिणामाकडे लक्ष न देतां हेतूकडे नजर पुरविण्यास सुरुवात झाली. ज्याचा खून करावयाचा त्याचें कल्याण होण्यासाठीं जर खून असेल अथवा एकाचा खून केल्यानें अनेक जीव जर बचावत असतील तर खून करणें अनीतिमान नाहीं असें मानण्यांत येऊं लागलें. याच दृष्टीनें पाश्चात्य लोकांत आणि पौर्वात्य नीतिशास्त्रविषयक ग्रंथांतसुद्धां जगाच्या कल्याणासाठीं खून करणें कांहीं कांहीं प्रसंगीं क्षम्य किंबहुना कांहीं प्रसंगीं अवश्य कर्तव्य म्हणून गणलें गेल्याचें दिसून येतें. परिणामाऐवजीं हेतूकडे नजर पुरविणें ही जुन्या विचारपरंपरेची निःसंशय सुधारणा होय. नीतिअनीति ठरविण्याचा पूर्वीचा दृष्टिकोण बदलला हें यावरून स्पष्ट होतें. परंतु या सुधारणेंबरोबरच या तऱ्हेमध्यें एक वाईट गोष्ट घुसलेली आहे, हें विसरतां कामा नये. आत्मज्ञानाचा पहिला प्रयत्न या दृष्टीनें ही सुधारणा अत्यंत महत्वाची आहे. तथापि तींतही एक नवीन अंधश्रद्धा-अर्थ लावण्याची विलक्षण संकुचीत दृष्टि हा दोष आलेला आहे. कोणत्याहि कृतीचें मूळ तिच्या हेतूंतून उत्पन्न झालें असें आतां मानण्यांत येतें. हेतु जर शुद्ध असेल तर त्या हेतूमुळें केलेली गोष्ट नीतिची ठरते. ह्मणजे हेतूची जी किंमत त्या किंमतीवर कृत्याची नैतिक किंमत

ठरविण्यांत येते. आतां या नीतीच्या बंधनापलीकडे जाण्याचा काळ आला आहे असें नीत्शे ह्मणतो. या काळांतील आह्मां लोकांस असें वाटतें कीं, खरोखरी कृत्याची किंमत हेतु वरून न ठरवितां निर्हेतुकतेवरून ठरविली पाहिजे. हेतुपुरःसर केलेल्या गोष्टींची किंमत कमी ठरविली पाहिजे व निर्हेतुक कृत्याची किंमत अधिक समजली पाहिजे. या बाबतींतील नीत्शेचे विचार भगवद्गीतेंतील निष्काम कर्मयोगाशी कांहींअंशीं जुळतात असा भास होतो. नीत्शे ह्मणतो हेतु हा प्राण्याच्या कातडीसारखा आहे. कातडी कांहीं गोष्टी दाखविते हें खरें; पण ती जितक्या गोष्टी दाखविते त्यापेक्षां कितीतरी अधिक गोष्टी लपविते ! ह्या कातडीच्या आंत ज्या लपलेल्या गोष्टी आहेत तिकडे लक्ष दिल्याशिवाय कोणत्याहि प्राण्याचें सर्वांगीण ज्ञान झालें असें आपणांस ह्मणतां येणार नाहीं. त्या प्रमाणेंच हेतूचा वरचा कातडीसारखा दर्शनी भागच केवळ लक्षांत घेऊन उपयोगी नाहीं. त्याच्या आंतील लपलेल्या भागांचाही पत्ता लाविला पाहिजे. आज पर्यंतची नीति ह्मणजे हेतुप्रधान नीति होय. ज्योतिःशास्त्र किंवा किमया या प्रमाणें प्रचलित नीति ही केवळ अपूर्ण, अपरिपक्व व पूर्वग्रहदूषित आहे. खऱ्या भावी नीतिशास्त्राची ही केवळ प्रस्तावना समजण्यास हरकत नाहीं. ही प्रस्तावना उर्फ प्रचलित नीति ओलांडून आपण खऱ्या नीतितत्वांचा शोध केला पाहिजे. नाटकी भाषेंत नीत्शेचें ह्मणणें सांगावयाचें ह्मणजे असे ह्मणतां येईल कीं, जुनी नीति ही केवळ दासी असून भावी नीति ही नाटकांतील राणी उर्फ नायिका आहे. आपण जुनी नीति व भावी नीति ह्या दोन्हींच्या

संधिकालांत आहोंत. जुन्या नीतीचा दर्जा नाटकांतील दासीचा असून भावी नीति ही नायिका आहे. आतां या दोन्ही नीतींच्या उंबरठ्यावर उभें असतांना आपण जुन्या नीतिवरील दृष्टि सोडून नवीन नीतीच्या आगमनाची तयारी केली पाहिजे. जुन्या ह्मणजे प्रचलित नीतीला कवटाळून वसगें ह्मणजे नायिकेकडे दुर्लक्ष करून दासीवरच नजर स्थिर करण्या सारखें आहे.

नीति व सक्ति हीं भावंडें होत. नीतिबंधनें कांहीं काळ दुःख टाळण्यासाठीं मनुष्य सक्तीनें स्वतःवर लादून घेतो. आपखुषीनें पत्करलेलीं हीं बंधनें कांहीं काळानें रूढींत पर्यवसित होतात. पुढें रूढींत पर्यवसान झाल्यावंर सक्तीचें स्वरूप जाऊन मनुष्य स्वखुषीनें या बंधनांत आपली मान अडकवून घेतो. मनुष्य या बंधनांस मुकाट्यानें मान वांकवूं लागल्यानंतर कांहीं काळानें हीं बंधनें इतकीं दृढमूल होतात कीं संस्कारामुळें जवळ जवळ उपजत बुद्धींत त्यांचें पर्यवसान होतें. उपजत बुद्धीपर्यंत बंधनांनीं मजल मारल्यावर हीं बंधनेंच सुखमय आहेत असें मनुष्याला वाटूं लागतें. अशा प्रकारें बंधनांनीं पक्का जखडल्यानंतर बंधन ह्मणजेच सद्गुण असें मनुष्य ह्मणूं लागतो! या बंधनांच्या चक्रांत सांपडल्यानंतर वास्तविक मनुष्यांची कृत्यें स्वतंत्र नसतात. अशा परतंत्र स्थितींत केलेल्या कृत्यांबद्दल पश्चात्तापाची भाषा बोलणें वेडगळपणाचें होय. कृतिस्वातंत्र्य संपुष्टांत आल्यावर मतस्वातंत्र्यहेंहि एक सुख स्वप्नच होय! माझ्या कृत्याबद्दल वास्तविक जर मी जबाबदार नाहीं तर त्या कृत्यांचा मला पश्चात्ताप तरी कां व्हावा? परतंत्रपणें कृत्य करूनही त्याचा पश्चात्ताप करणें ह्मणजे भ्याडपणा

आहे. असल्या पश्चात्तापाचा फायदा काय ? कोणत्याही कृत्याचा आपल्याला पश्चात्ताप झाला किंवा आपण कृतापराधाबद्दल क्षमा मिळविली तरी झालेली गोष्ट त्यानें निस्तरत नाहीं. यावर पूर्वीचे लोक पुढील प्रमाणें उत्तर देत: ‘ सदसद्विवेक बुद्धि ज्या कृत्याचा निषेध करते तें कृत्य आह्मी निंद्य मानतों ’ पण या उत्तरांतही फारसा अर्थ नाहीं. कसें तें पहा. एखाद्या कृत्याला सदसद्विवेकबुद्धि निषिद्ध कां मानते ? याचा विचार केला तर असें दिसून येईल कीं, वास्तविक सदसद्विवेकबुद्धीला कांहीं उपजत ज्ञान आहे अशांतला प्रकार नाहीं. जी गोष्ट पुष्कळ काळपर्यंत रूढीनें निषिद्ध मानिली ती गोष्ट संस्कारामुळें सदसद्विवेक बुद्धीला निषिद्ध वाटते. खुद्द सदसद्विवेकबुद्धि एखाद्या कृत्याची किंमत ठरवीत नाहीं. रूढीनें त्या कृत्याची कोणती किंमत ठरविली आहे एवढेंच सदसद्विवेकबुद्धि आपणास सांगते. पहिल्या प्रथम ज्यानें एखादें कृत्य निंद्य ठरविलें त्यावेळीं तें सदसद्विवेकबुद्धीच्या आज्ञेनुसारच ठरविलें अशांतला भाग नाहीं. कोणत्याहि कृत्याच्या परिणामाविषयीं ज्ञान अथवा पूर्वग्रह यांच्यामुळें सदसद्विवेक-बुद्धीला एकादी गोष्ट विहित वा निषिद्ध वाटते. एखाद्या चितार्‍याला ज्याप्रमाणें आपण काढलेलें चित्र पाहून आनंद व्हावा त्याचप्रमाणें अंतःस्वास्थ्य व सत्परिणाम होण्याची इच्छा यांवर सदसद्विवेक बुद्धीचा शिक्का अवलंबून असतो. परंतु सदसद्विवेकबुद्धीनें एकादी गोष्ट चांगली ठरविली ह्मणजे ती चांगलीच असते अशांतला प्रकार नाहीं, किंवा एकादी गोष्ट निषिद्ध ठरविली ह्मणजे ती वाईटच असते असें मानण्याचें कारण

नाहीं. खरोखरी आपल्या कृतींच्या बरेवाईटपणाचा निवाडा देण्याजोगें आपण ज्ञानी नसतों. **आपली सदसद्विवेकबुद्धीच मुळीं रूढीच्या कर्दमांत रुतलेली असते. तिनें दिलेले निकाल पूर्ण सत्य व स्वतंत्र असतील असें सांगतां येणार नाहीं.** चितार्‍यानें आपण काढलेल्या चित्राकडे पाहून आनंद मानणें काय व आपल्या कृतीला आपल्याच सदसद्विवेकबुद्धीनें चांगुलपणाचा शेरा देणें काय, दोन्हीहीं सारखींच; त्यावरून सिद्ध असें कांहींच होत नाहीं. आमच्या सद्सद्विवेकबुद्धीला पटतें तें योग्य व पटत नाहीं तें अयोग्य असें ह्मणून सद्सद्विवेक-बुद्धीचा टेंभा मिरविण्यांत अर्थ नाहीं हें यावरून दिसून येईल.

•

पापीपणा ही मनुष्यांत वास करणारी एखादी गोष्ट आहे असें नाहीं. एखाद्या गोष्टीचा आपण नीतिअनीतीच्या मोजमापानें जो अर्थ लावतों त्यावर अथवा शारिरशास्त्रदृष्ट्या असुखदायी गोष्टींवर मनुष्याचा पापीपणा अवलंबून आहे. मी पापी किंवा अपराधी आहें असें मला प्रामाणिकपणें वाटलें तरी सुद्धां वास्तविक मी तसाच असेन असें नक्की ह्मणतां येणार नाहीं. माझी प्रकृति उत्तम आहे असें जरी मला प्रामाणिकपणें वाटत असलें तरी ती खरोखरीच निकोप असेल असें ज्याप्रमाणें ह्मणतां येणार नाहीं, त्याचप्रमाणें मी पापी अथवा अपराधी आहें असें मला मनापासून वाटत असलें तरी तें वाटणें वस्तुस्थितीला सोडूनही कदाचित असूं शकेल ! अशा प्रकारें नीतिमूलक सदसद्विवेकबुद्धीवर नीत्शेनें घाव घातले. बहुतेक मनुष्यें स्वतःच्या बुद्धीनें कोणत्याहि कृत्याचा बरेवाईटपणा

ठरवीत नाहींत याबद्दल नीत्शेला फार वाईट वाटे. 'ही गोष्ट चांगली व ही गोष्ट वाईट, हें बहुतेक लोक नीतिअनीतिच्या जुन्या व खोडसाळ मापांनीं ठरवितात. ही केवढ्या शरमेची गोष्ट आहे ? हीं मापें खोटीं आहेत असें त्यांच्या पदरांत घालून दिलें तरी असल्या खोडसाळ मापानीं नीतिअनीति मोजण्याची त्यांस खंती वाटत नाहीं ही मोठ्या शरमेची गोष्ट आहे. एखाद्या गोष्टीची साधकबाधक प्रमाणानें स्वतःच्या स्वतंत्र बुद्धीनें चर्चा करून किंमत ठरविण्याऐवजीं अंधश्रद्धेनें त्याची ठरलेली योग्यता मुकाट्यानें मान्य करतात. व कृति करण्यापूर्वी व नंतर देखील साधकबाधक प्रमाणांकडे क्षणभर नजर देण्याची सुद्धां तसदी घेत नाहींत ही किती लाजिरवाणी गोष्ट आहे ? असल्या ह्या घोटाळ्यांत राहून सुसंगत आणि विसंगत गोष्टींच्या धांगडधिंग्यांत, जीविताच्या विलक्षण संशयग्रस्त व संधिग्ध जाळ्यांत सांपडून शंका काढावयाची नाहीं, प्रश्न विचारावयाचे नाहींत, चर्चा करण्यापासून होणारा आनंद घ्यावयाचा नाहीं, चर्चा करण्याची इच्छाहि करावयाची नाहीं, अथवा शंकाकुशंका काढणाराचें कौतुक तर राहोच, निदान द्वेष तरी कां होईना,-तोहि करावयाचा नाहीं उलट त्याचें हंसें करून सोडून द्यावयाचें, याची मला फार चीड येते ! ' असें नीत्शे ह्मणतो. स्वतः शंकाकुशंका न काढतांना घाण्याच्या बैलाप्रमाणें बंधनाच्या जोखडाखालीं आपली मान देऊन आपल्या गुलामी वृत्तीचें अधम प्रदर्शन करावयाचें आणि 'कां व कसें' यांची चिकित्सा करणाऱ्याच्या धाडसाचा गौरव न करतां उलट त्याची हेटाळणी करावयाची या गोष्टीची नीत्शेला अतिशय चीड येई.

**इच्छेचें स्वातंत्र्य:**—अर्वाचीन लोकांचा आळस व उदासीनपणा इकडे लक्ष दिल्यास त्यांच्यावरील नीत्शेचा हा जोरदार हल्ला पाहून कौतुक वाटतें. पण त्यावरून इच्छेचें स्वातंत्र्य नीत्शेला कबूल आहे असें कोणास वाटल्यास तें मात्र खरें नाहीं. त्याच्यामतें कोणीही आपल्या स्वभावाबद्दल अथवा कृतीबद्दल जबाबदार नाहीं. बऱ्यावाइटाचा निवाडा करणें म्हणजे अन्याय करणें आहे. एखाद्यानें स्वतःविषयीं देखील मत देणें अन्यायाचें आहे. नीत्शे ह्मणतो, 'वादळ सुटून गारपीट होते व आपण भिजतों त्यावेळीं आपणाला इजा होत नाहीं कीं काय ? पण म्हणून, आपण वादळाला अथवा निसर्गाला अनीतिमान समजत नाहीं. मग जे आपणाला इजा करतात ते अनीतिमान असा आपण त्यांचेवर कां शिक्का मारतों ?' काहीं लोक याचें असें उत्तर देतात कीं, जे आपणाला इजा करतात ते स्वेच्छेनें हेतुपुरःसर इजा करतात म्हणून आम्ही त्यांनां दोष देतों; आणि निसर्गाचे खेळ टळणें शक्य नसल्यामुळें निसर्गास आम्ही दोष देत नाहीं. या उत्तरांत इच्छेच्या स्वातंत्र्याचा भेद काढलेला आहे. परंतु यांतही फारसा राम नाहीं. आवश्यकताच असेल तर,—उदाहरणार्थ आत्मसंरक्षणासाठीं—हेतुपुरःसर इजा केली तरी कोणतेंही नीतितत्व या कृत्याला निषिद्ध मानीत नाहीं. तथापि आपण खुनी माणसाला सोडून देतों कां ? खून करणाऱ्या माणसाच्या दृष्टीनें व त्याच्या बुद्धिमत्तेप्रमाणें त्याला जें उपयुक्त दिसलें तेंच त्यानें केलें, या सबबीवर खुनाच्या गुन्ह्याची माफी त्यास आपण करीत नाहीं. यावरून बुद्धीच्या स्वातंत्र्याचा जो भेद काढण्यांत येतो त्यांत विशेष अर्थ नाहीं हें दिसून येईल.

शिवाय आणखीहि पुष्कळ गोष्टी विचारांत घेण्यासारख्या आहेत. आपलें सामान्य निरीक्षण पूर्ण नसतें. या तुटपुंज्या निरीक्षणशक्तीला अनेक चमत्कारांचा समूहसुद्धां एकच असल्याचा भास होतो. या चमत्कारसमूहाला आपण एक गोष्ट ठरवितों. ही आपली पहिली चूक. दोन निरनिराळ्या गोष्टी आपणास दिसल्यास त्या दोहोंस सांधविणारा कांहीं धागा आपणांस दिसत नाहीं ह्मणून एकमेकांपासून भिन्न अशा त्या तुटक गोष्टी आहेत, त्यांच्या मध्यें कांहीं नाहीं, निव्वळ पोकळी आहे; असें आपण समजतों. खरोखर पाहिलें तर आपलीं सर्व कृत्यें ओढयाच्या प्रवाहाप्रमाणें आहेत. एक कृत्य मध्यें पोकळी, पुन्दां एक कृत्य, पुन्हां पोकळी, अशा तऱ्हेची अलग अलग परंपरा नाहीं. आपल्या कृत्यांचे उगम संस्कृतीच्या अंधुक भूतकालांत व परिस्थितीच्या रहस्यमय वर्तमानकलांत लुप्त झालेले असतात. एकजिनसी, अविभक्त, व अविभाज्य प्रवाहाच्या कल्पनेशीं इच्छेच्या स्वातंत्र्यावरील विश्वास सुसंगत नाहीं. इच्छेचें स्वातंत्र्य मानण्यास प्रत्येक कृत्य अलग व अविभाज्य आहे हें गृहीत धरावें लागतें. प्रेरणा व जिज्ञासा यांच्या बाबतींत परमाणूप्रमाणें प्रत्येक कृत्य एक स्वतंत्र व अविभाज्य अणू आहे. नीत्शे ह्मणतो, आपली भाषा कोती असून लवचिक नाहीं त्यामुळें गोष्टींतील बारीक भेद भाषेच्याद्वारां आपणांस कळण्याचें बंद होतें. आणि गोष्टींची चिकित्सा व भेद न कळल्यामुळें त्या वास्तविक असतात त्यापेक्षां अधिक साध्या व सरळ आपणांस दिसतात. इच्छेच्या स्वातंत्र्याचा बोलबाला व वकिली करण्याचें भाषा हें कायमचें साधन आहे. भाषेच्या कोतेपणामुळें अथवा ताठरपणामुळें

भाषेच्या द्वारा जरी आपणास गोष्टींचे भेद कळले नाहींत तरी ज्यांला भाषेचें बंधन नाहीं त्या विचारांच्या व बुद्धिमत्तेच्या जोरावर आपण ह्या भेदांचें पृथःक्करण केलें पाहिजे.

जीवनाची विशिष्ट रीत कायम रहाण्यासाठीं प्रत्येक तत्त्वज्ञानानें बऱ्या-वाईटाच्या किंमती ठरविल्या आहेत. अधिक स्पष्ट शब्दांत सांगावयाचें ह्मणजे शारीरशास्त्रदृष्टया आवश्यक गोष्टींचा विचार करून त्या अनुरोधानें कृत्यांची किंमत ठरविण्यांत येते. ज्या कृत्यानें मानवांचें स्वास्थ्य बिघडेल तें कृत्य वाईट; व ज्या कृत्यानें हें स्वास्थ्य वाढेल तें कृत्य चांगलें; बऱ्या वाइटाची हल्लींची कसोटी अशी आहे.

मनुष्य ही एक अविभाज्य वस्तु आहे. पण तत्त्वज्ञानाचे दृष्टीनें मनुष्य स्वतःला विभाज्य मानतो. मनुष्य इच्छा करतो ह्मणजे काय करतो ? तर आपणांतच असणाऱ्या कोणाला तरी तो आज्ञा करतो. त्याच्यांतच असणारा हा जो कोणी तो त्याची आज्ञा मानतो, किंवा मानील असा त्याला भरंवसा असतो. आज्ञा करतांना मनुष्याला एक प्रकारच्या आनंदमय स्थितीचा अनुभव येतो. या स्थितीचें पृथःक्करण करणें कठीण आहे. या स्थितीसच इच्छास्वातंत्र्य म्हणतात. मनुष्यानें आपल्या आंत असणाऱ्या इतरांस आज्ञा केली व त्याप्रमाणें आंतील अवयवांनीं ती आज्ञा पाळली ह्मणजे आज्ञा पाळल्याबद्दल आज्ञा करणाऱ्याला स्वाभाविकच आनंद होतो. मनुष्याच्या शरीरांतील जो कोणी आज्ञा करणारा तो राजा व ही आज्ञा मान्य करणारे त्याचे सेवक. आज्ञा करणारा जो राजा त्याला आत्मा असें म्हणतात, व आज्ञा पाळणारे सेवकांस **अंडरसोल्स** अथवा

उपात्मे, किंवा **अंडरवुइल्स्** म्हणजे उपेच्छा असें आपण म्हणू. खरें पाहूं गेलें तर आपलें शरीर हें एकच अविभाज्य वस्तु नाहीं. त्यांत अनेक जीव मिळून एकत्र झालेली एक मोठी सामाजिक संस्था आहे; आणि या संस्थेचे आपण राजे या भावनेनें आपणांस आनंद होतो. आपल्या सैनिकांमार्फत ऊर्फ आपल्या शरीरांत वास करणाऱ्या सेवकांमार्फत आपल्या हुकमतीनें आपण जेव्हां मोठालीं कामें करून घेतों तेव्हां आपल्याला आनंद होतो हें स्वाभाविक आहे. ज्याप्रमाणें एखाद्या राज्यांत राज्यकर्ते व प्रजाजन यांचा बेमालूम मिलाफ झालेला असतो व राज्याची प्रगति अथवा यश तीच आपली प्रगति अथवा यश असें राज्यकर्तावर्ग मानतो, त्याचप्रमाणें आपल्या शरीराचेंही होतें. आपल्या शरीरांतील सैनिक व सेनानी यांचा एकजीव झाल्यासारखा असतो. त्यामुळें एकमेकांच्या प्रगतीस ते मदत करतात; आणि त्यापासून सुसंघटित व सुखी राज्याप्रमाणें आपण समाधानाचा उपभोग घेत असतों. शरीरांतील अज्ञात भाग-ज्यास आपण 'अहम्' या संज्ञेनें संबोधितों तो भाग-म्हणजे आपल्यांतील राज्यकर्त्यांचा वर्ग होय! आपलें शरीर ही एक संस्था असून आपण तिचे राज्यकर्ते आहों या भावनेनें मनुष्य आपणाला इच्छास्वातंत्र्य आहे असें समजतो आणि स्वतःच्या कृत्यांची व त्यांच्या परिणामांची संपूर्ण जबाबदारी मनुष्य स्वखुषीनें आपणावर घेतो. 'कर्ता करविता मी आहें' अशा गर्विष्ठ समजुतीनें आपल्या कृत्यांची जबाबदारी आपण स्वशिरावर घेतों. आणि ईश्वर, जग, पूर्वज, योगायोग, समाज वगैरे आपल्या कृत्यांबद्दल खरोखरी अनेक प्रकारें जबाबदार असलेल्या

गोष्टी, एकदम जबाबदारींतून सुटून जातात. अशा प्रकारें ईश्वरवाद्यांनीं मनुष्यास स्वतःच्या कृत्याबद्दल मोठ्या सफाईनें जबाबदार बनविलें आहे. इच्छास्वातंत्र्य मनुष्याच्या माथीं मारून ईश्वरवाद्यांनीं स्वकृत्याबद्दल मनुष्यास जबाबदार धरिलें व त्याला ईश्वरवाद्यांवर अवलंबून रहावयास लाविलें आहे. अशा प्रकारें मनुष्यास त्यानीं परावलंबी बनविलें आहे. खरें पाहूं गेलें असतां अशी जबाबदारी मनुष्यावर येण्याचें कारण नाहीं. आपलें अस्तित्व तरी आपले हातीं कोठें आहे? आपली घटना आपल्या इच्छेप्रमाणें होते काय? आपल्या भोंवतालची जी परिस्थिति आहे ती आपण निर्माण केली काय? किंवा आपल्या इच्छेप्रमाणें बनते काय? ह्या परिस्थितीच्या ज्या भागांत आपण पडतों तें तरी आपल्या इच्छेनें होतें काय? या सर्व प्रश्नांचें उत्तर नकारार्थी द्यावें लागेल. इतक्या गोष्टी जर आपल्या हातीं नाहींत तर आपल्याला इच्छास्वातंत्र्य आहे असें ह्मणतां येणार नाहीं. वरील सर्व गोष्टींचा परिणाम आपल्या इच्छेवर होतो. त्यामुळें आपली इच्छा सर्वस्वी स्वतंत्र नसून परावलंबी आहे असेंच मानावें लागतें.

**दयाः**—सामान्यतः दया ही सद्गुणांत गणण्यांत येते. परंतु नीत्शे दयावृत्तीचा कट्टा द्वेष्टा दिसतो. दयावृत्तीमुळें जीविताच्या विकासाला अतिशय मोठा अडथळा होतो असें तो ह्मणतो. झाडावरील बांडगुळें ज्या प्रमाणें झाडाला फारच विघातक होतात त्याचप्रमाणें मनुष्याच्या मनावर दयेचा विपरीत परिणाम घडतो. आपल्या मनांतील भावनांवर दया अवलंबून असते. दया हें दुबळेपणाचें लक्षण आहे. दुसऱ्याचें दुःख पाहून आपणांत

दयेचा प्रादुर्भाव होतो. यावरून दया ही स्पर्शजन्य रोगासारखी आहे असें नीत्शे ह्मणतो. दयेमुळें मनुष्याच्या शक्तीचा क्षय होतो. ज्या वेळेला आपणाला फार दया येते त्यावेळीं आपली सर्व शक्ति विगलित होते. आपल्या भावनांची शक्ति खचविणारी दया ही एक राक्षसी आहे. उमेद वाढविणाऱ्या शक्तिवर्धक विकारांस दया मारून टाकते, मनुष्याचा धीर खचविते, व एकंदरींत मनुष्याच्या प्रगतीला दया विरोध करिते. जगाच्या प्रगतीला कांहीं गोष्टी पोषक व कांहीं गोष्टी विघातक असतात. पोषक गोष्टींची वाढ झाली पाहिजे व विघातक गोष्टीं नाहींशा करून टाकल्या पाहिजेत. असें केलें तरच प्रगति झपाट्यानें होईल. हें उघड आहे. विघातक गोष्टी नष्ट झाल्या पाहिजेत हें मान्य केल्यावर कर्तव्य म्हणून त्यांनां नाहींसें करण्याची जबाबदारी आपणांवर येते. प्रगतीस अडथळा करणारे जिवंत प्राणी व वस्तु नष्ट करणें कर्तव्य आहे; या कर्तव्यापासून मनुष्याला दया मागें खेंचते. जें वास्तविक मेलें पाहिजे त्याला दया वांचविते. यामुळें दयेचा परिणाम मनुष्याच्या प्रगतीवर अत्यंत वाईट होतो. नष्ट करण्याजोग्या वस्तूंचें जीवित वाढवून जगाच्या दुःखांत दया भर टाकिते. **दया ही अधःपाताची प्रमुख दूती होय** असें नीत्शे म्हणतो. दयेच्या कारणांची उपपत्ति नीत्शेनें मार्मिक तऱ्हेनें लाविली आहे. तो म्हणतो दुबळेपणा व भ्याडपणा यांमुळें दया उत्पन्न होते. जगांतील मोठमोठ्या दानधर्म करणाऱ्यांच्या दानधर्माचें मूळ भ्याडपणांत असतें. **जगांतील खरा मोठा दाता जर कोणी असेल, तर भ्याडपणा हा होय.** स्वतःवर ज्यांचा ताबा नसतो

व आत्मसंयमन हीच खरी नीतिमत्ता असें ज्यांना वाटत नाहीं असे लोक दयेचे गोडवे गाऊं लागतात; आणि चांगुलपणा, भूतदया, परोपकारबुद्धि वगैरे गोष्टी,—कीं ज्यांचा नीतिमत्तेशीं बिलकुल संबंध नाहीं,—अशांच्या नादीं लागतात. दयाळू अंतःकरण असून हातून दानधर्म घडणें हीच नीतिमत्ता असें त्यांना वाटूं लागतें. अगदीं लहान सहान गोष्टींतहि कोणाच्या आधीन न होतां स्वतःच्या इच्छेप्रमाणें जितेंद्रिय होऊन व्यवहार करणारास दयेची आवश्यकता नाहीं. पण हें ज्यास साधत नाहीं त्यास आपले दुबळेपणाची जाणीव होते; व दुबळेपणामुळें त्यांच्या सद्गुणांत जी उणीव त्यांना भासते ती दयेमुळें भरून काढावी अशा स्वाभाविक विचारानें ते दयेचा अवलंब करितात.

दया हें खिस्ती धर्माचें एक प्रधान अंग आहे असें ह्मणण्यांत येते. या समजुतीमुळेंच कनवाळूपणानें, निःस्वार्थी बुद्धीनें, परोपकाराच्या विचारानें, सामाजिक कर्तव्यें चांगल्या प्रकारें पार पाडणारा मनुष्यच काय तो नीतिमान असें युरोपांत मानतात. वास्तविक खिस्तीधर्म भरभराटीचे वेळीं अत्यंत स्वार्थी होता. खिस्तीधर्माचें ध्येय वैयक्तिक चिरंतन मुक्ति हें होय. आणि या एकच महत्त्वाच्या ध्येयाशिवाय दुसऱ्या कशाचीही खिस्ती माणसाला जरूरी नाहीं आतां खिस्ती धर्माचीं मतें हळू हळू मागें पडत चाललेलीं आहेत. हीं मतें मान्य नसणारे लोक दिवसेंदिवस वाढत आहेत. अशा वेळीं मनुष्य जातीचें कल्याण या सबबीवर समाधान मानून घेण्याची प्रवृत्ति वाढत आहे. फ्रान्स देशांतील क्रांतीपासून इंग्लंडांत **जॉन स्टुअर्ट मिल** सारखे,

जर्मनींत **शापेनहॉयरसारखे** तत्ववेत्ते व इतरत्र समाजसत्तावादी लोक यांनीं सहानुभूति व दया हीं तत्त्वें प्रचारांत आणिलीं. आपण दुसऱ्यास उपयोगी पडावें, सर्वांवर दया करावी, असें हे लोक प्रतिपादूं लागले. अशा प्रकारें उपयुक्ततावाद उत्पन्न झाला; आणि दयेचें घोडें पुढें दामटण्यांत आलें. नीति ह्मणजे काय व तिचे घटक कोणते या विषयींचें संपूर्ण ज्ञान आपणास झालें, असें मानण्याचा अट्टाहास या लोकांनीं कां करावा हें, नीत्शे ह्मणतो, मला कळत नाहीं. दयेलाच नीतिमत्ता कां समजावें ? **वास्तविक दुबळ्यांनां जगण्याचा हक्क नाहीं. त्यांनीं मेलेंच पाहिजे.** भूतदयेचें हें पहिलें तत्त्व आहे. जर दुबळे स्वखुषीनें मरत असतील तर आपण त्यांस मरण्यास मदत केली पाहिजे; आणि स्वखुषीनें मरत नसतील तर आपण त्यांस मारलें पाहिजे. खरी भूतदया हीच आहे. या कामीं अडथळा करणें पाप आहे. ज्याला आपण दया समजतों, ती या कामीं अडथळा करते. ही दया इतर कोणत्याहि दुर्गुणापेक्षां अधिक नुकसानकारक आहे. दयेहून वाईट जगांत दुसरें काय आहे ? ख्रिस्तीधर्म दयेचा उपदेश करतो; दुबळ्यांना जिवंत ठेवून तो मनुष्याच्या प्रगतीस अडथळा करतो. ह्मणूनच **मानवी प्रगतीच्या मानगुटीस बसलेलें अत्यंत दुष्ट भूत जर कोणी असेल तर तें ख्रिस्ती धर्म होय.**

**बलोपासना**:—या प्रमाणें जुन्या तत्त्वांना जमीनदोस्त करण्याची विघातक कामगिरी नीत्शेनें पार पाडिली. आतां त्याच्या विधायक कामगिरीकडे आपण वळूं. बलोपासना, आणि गुलाम व धनी मनोवृत्ति, या त्याच्या दोन प्रमुख कल्पना होत.

जगण्याची इच्छा मनुष्याच्या विकासाचें आद्य कारण नसून आपला विस्तार व्हावा, आपण वाढावें, आक्रमण करावें, शक्य तितकें आपण काबीज करावें, आपली ताकद वाढावी, ही इच्छा किंवा थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे **प्रबळ होण्याची जोरदार इच्छा अथवा बलोपासना हेंच प्राण्याच्या विकासाचें आदि कारण आहे,** असें मत प्रस्थापित करण्याचा नीत्शेनें प्रयत्न केला.

या पुस्तकांत (म्हणजे आमच्या मराठी पुस्तकांत) ठिकठिकाणीं विकास हा शब्द वापरलेला आहे. ज्याला पूर्वीं उत्क्रांति म्हणत अथवा ज्याला इंग्रजींत इव्होल्यूशन् म्हणतात त्या अर्थानें विकास हा शब्द ह्या पुस्तकांत वापरलेला आहे. इव्होल्यूशनचें भाषांतर उत्क्रांति या शब्दानें पूर्वीं करीत परंतु गीतारहस्यामध्यें **लो. टिळकांनीं** उत्क्रांति हें इव्होल्यूशनचें भाषांतर आपणांस पसंत नसल्याचें लिहिलें आहे; त्याचीं कारणेंहि त्यांनीं त्या पुस्तकांत दिलेलीं आहेत; व इव्होल्यूशनला विकास हा पर्याय शब्द लोकमान्यांनीं योजलेला आहे. प्रस्तुत लेखकास लोकमान्यांनीं दिलेलीं कारणें मान्य असल्यामुळें त्यानेंही इव्होल्यूशनचें भाषांतर विकास या शब्दानें केलेलें आहे. विकास या शब्दाविषयीं एवढा खुलासा करून आपण धनी व गुलाम या नीत्शेच्या दुसऱ्या कल्पनेकडे वळूं.

या बाबतींतील नीत्शेचीं मतें सांगण्यापूर्वीं वाचकांस आणखी एक गोष्ट सांगणें आवश्यक आहे. ती ही कीं या बाबतींतील नीत्शेचें तत्त्वज्ञान वरच्या वर्गासाठीं लिहिलेलें आहे. त्यानें जीं विघातक मतें प्रतिपादिलीं तीं देखील फक्त वरच्या वर्गासाठीं

लागू आहेत. कनिष्ठ वर्गास लागू नाहींत. इंग्रजींत ज्यांना क्लासेस म्हणतात त्यांस येथें वरचे वर्ग अथवा वरिष्ठ वर्ग म्हटलेलें आहे; व मासेस या इंग्रजी शब्दाचें भाषांतर कनिष्ठ वर्ग या शब्दांनीं केलेलें आहे. आजचीं जीं नीतितत्वें आहेत त्यांत कनिष्ठ वर्गासाठीं बदल करण्याचें कारण नाहीं, असें नीत्शे म्हणतो. तीं वेडीवांकडीं असलीं तरी कनिष्ठ वर्गास पुरेशीं आहेत; व हीं तत्त्वें त्यांच्या जीवनाचा आधार असल्यामुळें तीं एकदम काढून घेण्यांत फायदा नाहीं. नवीन व उच्च बंधनें उच्च वर्गासाठींच निर्माण केलीं पाहिजेत. कनिष्ठ वर्गास आहेत तींच बंधनें ठेवावींत; कारण तीं नाहींशीं केल्यास नवीन उच्च नीति ग्रहण करण्यास कनिष्ठ वर्ग असमर्थ असल्यामुळें जुनेंही जाईल व नवीनहि पचणार नाहीं; आणि अनवस्था प्रसंग उत्पन्न होईल. सबब नीत्शे फक्त वरिष्ठ वर्गासाठींच आपलीं तत्वें सांगतो. असें नीत्शेच्या भक्त व अनुयायांचें म्हणणें आहे.

मनुष्यांत दोन वेगवेगळ्या प्रकारचे प्राणी आढळतात असें नीत्शे म्हणतो. एक धनीवृत्तीचा व एक गुलामवृत्तीचा. परंतु बलवान होण्याची इच्छा हीं या दोन्हींतही आढळते. गुलाम देखील आपण धनी व्हावें अशी इच्छा करतो. **मनुष्यच काय परंतु कोणतीहि सजीव वस्तु बलोपासना करीत असते.** मनुष्याच्या मनावर स्वार होऊन त्याला सतत धडपड करावयास लावणारी शक्ति कोणती? आवश्यकता अथवा वासना नव्हे; तर बलवान होण्याचा हव्यास हीच ती शक्ति होय. मनुष्याला इतर सर्व कांहीं असलें तरी तो तृप्त होत नाहीं. उत्तम शरीर प्रकृति,

मुबलक अन्नवस्त्र, राहण्याला सुंदर घर, आणि उपभोगाचीं इतर सर्व साधनें असलीं तरी तेवढ्यानें मनुष्य केव्हांही पूर्णपणें संतुष्ट रहात नाहीं. शक्तीचा हव्यास ऊर्फ बलोपासना त्यास सोडीत नाहीं. बलोपासना हेंच प्रगतीचें आद्य कारण आहे. शक्तीच्या हव्यासामुळेंच जगांतील कुचक्या व दुष्ट गोष्टींचा नाश होतो. जगांत जें मरण्याला योग्य झालेलें आहे तें शक्तीच्या हव्यासामुळेंच मारलें जातें. **शक्तीचा हव्यास हाच जगाचा शास्ता आहे. यामुळेंच जग चालतें; जगांतील वाईट गोष्टी नष्ट होतात, व चांगल्या गोष्टी भरभराट पावतात.**

बलवान होण्याची लालसा ज्या मानानें वृद्धिंगत झालेली असेल त्या मानानें आपण सत्याजवळ पोहोंचलों असें ह्मणतां येईल. या लालसेची आत्यंतिक वृद्धि ह्मणजेच सत्यप्राप्ति होय. पण स्पेन्सरच्या प्रतिपादनावरून संकोच अथवा दुबळेपणा हीच सत्याची कसोटी असें दिसतें असें नीत्शे ह्मणतो. एखादा सिद्धांत सत्य आहे असें केव्हां समजावयाचें? त्या सिद्धांताचा अभाव कल्पनागम्य नसेल तर तो सिद्धांत सत्य समजावा असें स्पेन्सरचें ह्मणणें. अभावाची कसोटी घेऊन सत्य प्रस्थापित करूं पाहणारा स्पेन्सरचा युक्तिवाद नीत्शेला पसंत नाहीं. या कसोटीनें आपण दुबळेपणा व संकोच हीच सत्याची कसोटी होय असें पर्यायानें ह्मणतों असें नीत्शेला वाटतें. विरुद्ध सिद्धांत शक्य नसेल तर मूळ सिद्धांत खरा असें मानण्यांत विरुद्ध सिद्धांताच्या कमकुवतपणावर आपण जोर देतों. परंतु सिद्धांताचा खरेपणा पारखण्याची ही दृष्टि बरोबर नव्हे. सिद्धांत जर खरा असेल तर तो सिद्धांतांतील तत्त्वाच्या जोरावर

प्रस्थापित करतां आला पाहिजे. तद्विरुद्ध सिद्धांत टाकाऊ व कुचकामाचा आहे, या सबबीवर मूळ सिद्धांत खरा असें ठरूं शकत नाहीं. मूळ सिद्धांतांत जें तत्त्व ग्रथित झालेलें आहे तें इतकें जोरदार व अक्षय टिकणारें पाहिजे कीं त्यावरच मूळ सिद्धांताचा खरेपणा सिद्ध झाला पाहिजे. सिद्धांत हे तद्विरुद्ध सिद्धांताच्या दुबळेपणावर स्वतःची शाश्वती शाबीत करणारे नसावेत.

सिद्धांत केवळ साधनें आहेत, साध्य नव्हत. सिद्धांताच्या अंमलबजावणी करण्याच्या ताकदीवर सिद्धांताची किंमत आहे. या सिद्धांतांनीं नवीन नवीन सत्यें आपणांस मिळवून दिलीं पाहिजेत. आपल्या ज्ञानांत भर टाकली पाहिजे. तदनुसार आपलें वर्तन सुधारलें पाहिजे. जीविताचें ध्येय स्पष्ट केलें पाहिजे. हें ध्येय साध्य करून देणारे तेच खरे सिद्धांत होत. जे सिद्धांत चांगले, मूल्यवान, उपयोगी, असतात ते आपल्याला आयुष्याच्या ध्येयसिद्धीजवळ नेतात. असे सिद्धांत ह्मणजेच सत्य होय. सत्य ह्मणजे काय ? ज्यामुळें विचारांत आपली प्रगति होते, ज्यामुळें आपणाला अनेक अनुभव प्राप्त होतात, ज्यामुळें आपणाला सन्मार्ग दिसतो, जें आपल्या जीविताच्या सर्वस्वी उपयोगी पडतें, व सर्व अनुभवांशीं ज्याचें पटतें, तेंच सत्य होय.

प्रत्येक प्राण्याला उपजत बुद्धि असते. या बुद्धीच्या पाठीमागें प्रेरणा असते. ही प्रेरणा दुसरें तिसरें कांहीं नसून बलाची लालसा होय. बलाच्या लालसेनें युक्त अशी ही प्रेरणा आपल्यांतील इतर इच्छांवर स्वामित्व गाजविते. **खुद्द आपल्या शरीरांत बलवान होण्याच्या इच्छेमुळें युद्ध सुरू असतें.** शरीरांतील दुबळे व ताकदवान

यांच्या मधील लढाईत स्वाभाविकच बलवानांचा विजय होऊन कमताकदांची संख्या कमी होत असते. जसें आपल्या शरीरांत बलवान होण्याचें युद्ध चालू आहे तसेंच पृथ्वीवर व पृथ्वीबाहेर जगांतही अखंड युद्ध चालू आहे. तात्पर्य बलिष्ठ होण्याची प्रबळ इच्छा प्रत्येकानें बाळगली पाहिजे आणि वाढविली पाहिजे. **जगांत आपणास टिकावयाचें असेल तर बलोपासनेशिवाय दुसरा मार्ग नाहीं.** बलोपासना हेंच जगाच्या विकासाचें कारण आहे.

मनुष्य सुखाच्या पाठीस लागलेला आहे असें ह्मणतात. परंतु खरें पाहूं गेलें तर मनुष्य सुखाचा शोध लावण्यासाठीं तळमळत नाहीं व दुःख टाळण्यासाठीं धडपडतही नाहीं. सुख आणि दुःख ह्या कोणी स्वतंत्र वस्तु नाहींत. वस्तुसंनिकर्षामुळें आपणाला जेव्हां अनुकूल संवेदना होतात तेव्हां आपणास सुख होतें; आणि प्रतिकूल संवेदना झाल्यामुळें आपणांस दुःख होतें. ह्मणजे सुख दुःख हीं संनिकर्षामुळें उत्पन्न होणारीं कार्यें होत. प्रत्येक मनुष्य व त्यांतील प्रत्येक सजीव अणुपरमाणु बलवर्धनासाठीं धडपडत असतात. या धडपडीमध्यें सुख आणि दुःख मनुष्यावर येऊन आदळतात. सजीव सृष्टीची बलवर्धनाची जी अखंड खटपट सुरू आहे त्या खटपटींत सुख आणि दुःख यांच्या संवेदना होणें अपरिहार्य आहे. मनुष्य दुःख टाळीत नाहीं. उलट स्वतःच्या प्रगतीसाठीं मनुष्याला दुःखाची आवश्यकता असते. प्रत्येक विजय, सुखाची प्रत्येक कल्पना, व प्रत्येक धडामोड, ह्मणजे दुसरें तिसरें कांहीं नसून आपण जे अडथळे

ओलांडतो अथवा दुःखाच्या डोंगरावर पाय देऊन त्याला तुडवीत आपण जे पलीकडे निघून जातो, त्यामुळें उत्पन्न होणारी स्थिति होय. **संकटाला आपण गिळून टाकलें ह्मणजे आपणास आनंद होतो. आनंद व दुःख ही जोडी अशा रीतीनें परस्परावलंबी आहे.**

**धनी व गुलामः**—आज पर्यंत अनेक तऱ्हेचीं नीतितत्त्वें जगांत निर्माण होऊन गेलीं. आजही कांहीं प्रचलित आहेत. यांत कांहीं ओबडधोबड व कांहीं सुसंस्कृत आहेत. त्या सर्वांत एकमेकांशीं संबद्ध व पुनः पुनः उद्भवणारीं अशीं कांहीं सामान्य तत्त्वेंही आहेत. त्यांचा बारकाईनें अभ्यास केल्यास आपणाला भेद स्पष्ट दिसूं लागतो; व एकंदरींत या नीतितत्त्वांत दोन तऱ्हा आहेत असें दिसतें. या दोन तऱ्हा परस्परांपासून अगदीं वेगवेगळ्या असून त्यांच्यांत मुळांतच भेद आहे. या दोन तऱ्हा ह्मणजे गुलामी नीतिमत्ता व धनी नीतिमत्ता होत. या दोन तऱ्हांचा समेट करून त्यांचें एकीकरण करण्याचा प्रयत्न अधिक उच्च व मिश्र संस्कृतींत करण्यांत आलेला असतो. तथापि अशा दोन तऱ्हेच्या भिन्न नीतिमत्ता आहेत यांत कांहीं संशय नाहीं असें नीत्शे ह्मणतो.

धनी नीतिमत्ता आणि गुलामी नीतिमत्ता यांतील भेद अशा तऱ्हेनें कल्पून नीत्शेनें चांगलें व वाईट या कल्पनांची उपपत्ति पुढील प्रमाणें दिलेली आहे. नैतिक तत्त्वाचा उगम एकतर धनीवृत्तीच्या लोकांत अथवा गुलामीवृत्तीच्या लोकांत होतो. धनीवृत्तीचे लोक ह्मणजे सत्ताधारी अथवा राज्यकर्ते. आणि

गुलामी वृत्तीचे लोक म्हणजे प्रजाजन, गुलाम अथवा परावलंबी लोक. धनीवृत्तीचे लोक आपणाला उच्च समजून गुलामीवृत्तीच्या लोकांपासून अर्थातच अलग राहण्याचा प्रयत्न करतात. आपण निराळे आहोंत, अधिक उच्च आहोंत, असें दाखविण्याचा व हा वेगळेपणा कायम राखण्याचा प्रयत्न करतात. या दोन तऱ्हांचे मानवांत चांगलें व वाईट या विषयींच्या कल्पनाहि वेगवेगळ्या असतात. धनीवृत्तीच्या लोकांत उच्च तेंच चांगलें व तिरस्करणीय तेंच वाईट असें समजतात; उलटपक्षीं गुलामीवृत्तीच्या लोकांत उपयोगी तें चांगलें व उपद्रव करणारें तें वाईट असें मानण्यांत येतें. ह्या दोन्ही वृत्तींच्या लोकांचे परिस्थिति भेदानुसार, बऱ्या वाईटाच्या त्यांच्या कल्पना अशा भिन्न दिसतात. गुलामी मनोवृत्ति विशेषतः उपयुक्ततेकडे पाहते. मनुष्य प्राण्यांचें निरीक्षण करून दोन प्रकारचे मनुष्यप्राणी दुनियेंत असतात असा शोध नीत्शेनें लाविला. ह्या दोन तऱ्हा म्हणजे गुलाम आणि धनी ह्या होत. या दोन तऱ्हेच्या लोकांत मनोवृत्तींतच भेद असतो. गुलाम हे पीडलेले, गांजलेले आणि जगांमध्यें सर्वांकडून तुडविले गेलेले असतात. त्यानां जगांत कसेंबसें आयुष्य कंठण्याचाच प्रश्न असतो. त्यामुळें त्यांच्या उपयोगीं पडेल तो चांगला आणि त्यांना इजा करील तो वाईट असें ते समजतात. उलट, धनी लोक ऐश्वर्यसंपन्न व सत्ताधारी असल्यामुळें त्यांना सुखोपभोगाचीं साधनें कमी नसतात. आपण उच्च आहोंत; गुलामीवृत्तीच्या लोकांपासून आपण भिन्न आहोंत अशी स्वाभिमानी जाणीव त्यांस असते. त्यामुळें उच्च अथवा खानदानी तें चांगलें आणि नीच अथवा गुलामीवृत्तीचें तें वाईट असें तें समजतात.

फायद्याकडे लक्ष ठेवावयाचें ही गुलामी मनोवृत्ति. आपलीं सर्व कृत्यें फायद्याकडे नजर ठेवून करावयाचीं हाच काय तो शहाणपणा असें गुलामवृत्ति समजते. या दृष्टीला धनीदृष्टि हलकट समजते. पण याहून उच्च दृष्टींतील स्वारस्य जाणण्याची गुलामीवृत्तीला ताकद नसते. गुलामी वृत्तीच्या लोकांवर धनी वृत्तींच्या लोकांचा जुलूम सारखा सुरू असतो. जित आणि जेते यांचें ज्याप्रमाणें वैमनस्य असतें त्याप्रमाणें मेंढरें व गिधाडें यांचें स्वाभाविकच वैर असतें. गिधाडें फार दुष्ट आहेत असें मेंढरें ह्मणत असतील; आणि गिधाडांच्या वृत्तीचे हुबेहुब विरुद्ध ज्यांची वृत्ति आहे अशांस ह्मणजे मेंढरांस तें चांगले ह्मणत असतील. ह्मणजे निरुपद्रवी असणें हें चांगुलपणाचें लक्षण असें मेंढरें मानतील. उलटपक्षीं मेंढरांची ही असली निरुपद्रवी मनोवृत्ति गिधडांस पटणार नाहीं. ते ही वृत्ति तुच्छ मानीत असतील. हा जो गिधाडांच्या व मेंढराच्या मनोवृत्तींत फरक आहे तोच फरक धनी व गुलाम या वृत्तीच्या लोकांत असतो. वस्तुत: मेंढरें अथवा गिधाडें यांच्या मनोवृत्तींत कोणतीच नीच अथवा उच्च भावना नाहीं. परिस्थिति प्रमाणें त्यांची जी मनोवृत्ति बनते तींतही दोषार्ह असें कांहीं नाहीं. गिधाडांनीं मेंढरास खावें अथवा पीडावें अशीच परिस्थिति विधात्यानें त्यांस निर्माण करून दिलेली आहे. इकडे मेंढरांवर ताव मारीत असतांना सुद्धां गिधाडें कदाचित असें ह्मणत असतील, "खरोखर या मेंढरांशीं आमचें वैर नाहीं. गरीब सालस बिचारीं तीं! आमचें त्याच्यांशीं वैर नाहीं एवढेंच नाहीं उलट आमचें त्यांच्यावर मनापासून प्रेम आहे! आह्मांला तीं आवडतात. कोंवळ्या कोंकरासारखें रुचकर दुसरें काय आहे? आह्मी त्यांचा द्वेष कसा करूं?"

मनुष्यप्राणी एकाच तऱ्हेचे नसून त्यांत धनी व गुलाम अशा दोन तऱ्हा आहेत असें सिद्ध केल्यावर नीत्शे ह्मणतो, ज्याअर्थी मनुष्याप्राणी एक तऱ्हेचे असणें शक्य नाहीं त्याअर्थी धनी व गुलाम असे दोन वर्ग असलेच पाहिजेत. असे दोन वर्ग असतील तरच जगाची प्रगति होईल. मजूर वर्ग व सुखांत काळ कंठतां येण्याजोगा सुखी वर्ग असे दोन भिन्न वर्ग असतील तरच अधिक अधिक उच्च संस्कृतीला आपण जाऊं. गुलामगिरीचें अस्तित्व संस्कृतीला व संस्कृतीच्या वाढीला आवश्यक आहे. अलीकडे समानतेचें जें खूळ निघालें आहे त्यावर नीत्शेचे लेख ही उत्तम दवाई आहे. **समानतेच्या बाता सब झूट आहेत** असें नीत्शे ह्मणतो. **गुलाम व धनी हे दोन वर्ग जगांत असावयाचेच व ते तसे असले तरच जगाची प्रगति होईल** असें त्याचें मत आहे. प्रथम आपण स्वत:वर प्रेम केलें पाहिजे. त्या ऐवजीं इतरांवर प्रेम करण्याचा टेंभा मिरविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. नीत्शे ह्मणतो आपल्याला नवीन तऱ्हेची कुलीन पिढी निर्माण करावयाची आहे. कुलीनपणाची अथवा उच्चतेची जुनी व्याख्या बदलून आपण नवीन व्याख्या बनविली पाहिजे. खरी उच्च संस्कृति कोणची? तर आज्ञा करण्याचें सामर्थ्य व आज्ञा पाळण्याची तयारी हीच होय. यांतच खऱ्या उच्च संस्कृतीचें बीज आहे. असल्या संस्कृतीचीं पाळेंमुळें **अराजकते**मुळें नष्ट होतात ह्मणून अराजकांचा नीत्शे निषेध करतो.

धनी वृत्तीच्या लोकांत जुन्याला मान असतो. परिस्थितीनें आपल्याला जें उच्च पद दिलेलें आहे तें तसेंच कायम रहावें अशी

यांत इच्छा असते. आपण लादलेलें उपकाराचें ओझें तसेंच चालू रहावें अशी यांची इच्छा असते. आपलीं ह्मणजे धनीवर्गाचीं कर्तव्यें व इतरांचीं ह्मणजे गुलामवर्गाचीं कर्तव्यें वेगवेगळीं असावींत असें धनी लोकांना वाटतें. आपलीं कर्तव्यें अधिक उच्च व गुलामांचीं कर्तव्यें अधिक नीच रहावींत, आपल्या हातांतली कोणतीही गोष्ट आपण सोडूं नये, आपल्या सत्तेचा हिस्सा इतरांस मिळूं नये, आपले जन्मसिद्ध हक्क कायम रहावे, व ते तसेंच पुढें चालवावे, अशी इच्छा असणें धनी वृत्तीचीं लक्षणें होत.

धनी व गुलामी मनोवृत्ति हे नीत्शेनें जे भेद पाडलेले आहेत ते सिद्ध करण्यासाठीं नीत्शेनें शब्दांच्या मूळ रूपांकडे धांव घेऊन भाषापंडिताला साजेल अशी रीत अवलंबिली आहे. '**नीतितत्त्वांची पूर्वपीठिका**' या त्याच्या ग्रंथांतील पहिलें प्रकरण 'चांगलें आणि दुष्ट व चांगलें आणि वाईट' अशा अर्थाचें आहे. या प्रकरणांत शब्दांच्या उपपत्तीच्या दृष्टीनेंच आपण पाडलेले भेद सिद्ध करण्याचा नीत्शेनें प्रयत्न केला आहे. नीत्शे ह्मणतो प्रथम नीतीची कसोटी माणसासच सरळ लावीत; नंतर कृतीस ती लावण्यांत येऊं लागली. निरनिराळ्या भाषांत चांगलें या कल्पनेचे द्योतक जे शब्द आहेत त्यांच्या उपपत्तीवरून एकच गोष्ट सिद्ध होते. ती ही कीं, उच्च अथवा सत्ताधारी यांस चांगलें समजण्यांत येई. ग्रीक, लॅटिन, गेलीक, जर्मन व इतर पाश्चात्य भाषा यांच्या आधारानें चांगलें व वाईट यांचे द्योतक शब्द आपण काढलेला भेद कसा सिद्ध करतात हे नीत्शेनें दाखविलें आहे. जेथें धनी वृत्तीचा जोर असतो तेथें धनी लोकांच्या अंगांतील जे गुण त्यास

चांगलें अशी संज्ञा प्राप्त होते. आणि गुलामी वृत्तीचा जेथें अधिक जोर चालतो, तेथें गुलामी वृत्तीच्या लोकांचे अंगातील गुणांस सद्गुण समजतात.

**भावी नीतिः**—भावी नीति कशी असेल या विषयीं नीत्शेचा अंदाज असा आहे:—

हल्लींच्या दृष्टीनें भावी नीति अधिक कठोर भासेल. सरळपणा चांगल्या प्रमाणें वाईट गोष्टींतहि वाटेल. हल्लीं आपण आपणाला पुढें चांगलें फळ मिळेल ह्मणून सत्कर्म करितों. पुढील पिढी फळाच्या अपेक्षेनें सत्कर्म करणार नाहीं; निष्काम बुद्धीनें सत्कर्म करील. आपलें कृत्य लपविण्याची खटपट पुढील पिढी करणार नाहीं. दुर्गुणांवर पांघरूण घालण्याची हल्लींच्या पिढीची धडपड पुढील पिढीला हास्यास्पद वाटेल. स्वतःचे गुणावगुण बारकाईनें पहाण्याचें धाडस पुढील पिढीच्या अंगीं येईल. पश्चात्तापाची कल्पना भावी पिढीला हास्यास्पद वाटेल. पश्चात्तापानें दुष्कृत्यांचा मळ धुऊन साफ निघतो ही हल्लींची मूर्खपणाची कल्पना पुढील पिढीस पटणार नाहीं. दुष्कृत्य करून पश्चात्ताप करीत बसणें वेडेपणाचें आहे, असें पुढील पिढी मानील.

आतां पर्यंत ज्या प्रमाणें नीतीची वाढ दुष्कृत्यांमुळेंच मुख्यतः झालेली आहे त्याचप्रमाणें पुढेंही **नीतिची वाढ होण्यास हिंसात्मक क्रांतीची जरूरी आहे.** अति उच्च ध्येय गांठण्यासाठीं मनुष्याला गुन्हा करणें प्राप्त आहे. जुनीं नीतितत्त्वें टाकाऊ ठरवून त्यास लाथाडणाऱ्या प्रत्येक माणसाला अति दुष्ट समजण्यांत येतें. परंतु या दुष्टपणाच्या जोरावर त्यानें जुनी

नीतिबंधनें तोडलीं व तोडलेल्या बंधनांची घडी नीट बसत नाहीं अशी जनतेची खात्री झाली ह्मणजे या अतिदुष्ट माणसाविषयीं लोकांची दृष्टि हळूहळू निवळूं लागते. कांहीं कालानंतर याच दुष्ट माणसाला, याच गुन्हेगाराला, भला मनुष्य अशी संज्ञा जनता देते. **प्रस्थापित सत्ता अथवा सर्वमान्य नीतिनियम उलथून पाडूं पहाणारे लोक प्रथम गुन्हेगार अथवा दुष्ट समजले जातात.** आजपर्यंत झालेल्या राज्यक्रांत्या व समाजक्रांत्या यांचा इतिहास अशीच साक्ष देईल. राजसत्ता उलथून पाडणाऱ्यांचा यत्न अपेशी ठरल्यास 'बंड' व यशस्वी झाल्यास 'स्वातंत्र्य युद्ध' असें ह्मणतात हें आपण पहातोंच. एकंदरींत बऱ्यावाईटाचा शिक्का यशापयशावर अवलंबून असतो. नीतितत्त्वांच्या घडामोडींचीहि गोष्ट अशीच आहे. कोणताहि सुधारक सुधारणेची भाषा बोलूं लागला ह्मणजे त्याला दुष्ट, नैतिक गुन्हेगार, समाजक्रांतिकारक, अशा अपशब्दांचा अहेर होतो. प्रचलित नीतिबंधनाच्या विरुद्ध हल्ला करणारा हा नैतिक गुन्हेगार यशस्वी झाला तर त्याला सत्पुरुष असें लोक समजूं लागतात. हल्लीं चांगली दिसणारी प्रत्येक गोष्ट पूर्वकाळीं केव्हां तरी वाईट समजली जात असे. पूर्वी ज्याला ज्याला दुष्कृत्य समजण्यांत येई त्यांतूनच हल्लींचीं सत्कृत्यें उगम पावलेलीं आहेत. उदाहारणार्थ, लग्नाचीच गोष्ट घ्या. स्त्री व पुरुष यांनीं विवाह करून एकत्र राहणें हें हल्लीं आपण सत्कृत्य समजतों. परंतु फार प्राचीनकाळीं हा सामाजिक गुन्हा मानण्यांत येई. असें सांगितलें तर तें कोणाला खरेंसुद्धां वाटणार नाहीं. पण अति प्राचीन कालीं लग्न करणें हा खरोखरीच मोठा सामाजिक गुन्हा

गणला जात असें. सर्व स्त्रिया सर्व समाजाच्या उपयोगी वस्तु आहेत असें तेव्हां समजण्यांत येई. सबब सर्व समाजाच्या उपयोगी पडणारी चीज एकट्याच माणसानें केवळ आपल्यापुरती बळकावून बसणें ह्मणजे इतरांच्या हक्कांची चोरी करण्यासारखें मानीत. या सामाजिक गुन्ह्याबद्दल लग्न करणारास दंड द्यावा लागे! ही पूर्वींची कल्पना व आपली आजची विवाहाची कल्पना यांत जमीनअस्मानाचा फरक झालेला आहे. त्याकाळीं जें निंद्य होतें तें आज वंद्य झालें असून त्याकाळीं जें वंद्य होतें तें आज निंद्य झालें आहे. निरनिराळ्या काळीं बऱ्या-वाइटाच्या मोजमापांत एवढें भयंकर अंतर पडूं शकतें.

**युद्धः**—नीत्शेच्या मतें प्रचलित पिढीचा भेकाडपणा जाऊन पुढील पिढी मनस्वी धीट होईल. सत्यासाठीं निर्भयपणें युद्ध करणारे वीर पुढील पिढींत निर्माण होतील. **सत्यप्रिय मनुष्य अर्थातच युद्धप्रिय असतो.** सत्यासाठीं झगडण्याची—युद्ध करण्याची—मनुष्याशीं, सृष्टीशीं अथवा प्रत्यक्ष परमेश्वराशीं झुंज करण्याची तयारी, असल्याशिवाय कोणताहि मनुष्य पूर्णपणें सत्यप्रिय आहे असें म्हणतां येणार नाहीं. सत्यप्रियता म्हणजेच युद्धप्रियता होय. नीत्शे म्हणतो, "लोक हो! ज्ञानी होणें सर्वांनां शक्य नाहीं. पण निदान सत्यासाठीं युध्द करणें तुमच्या हातीं आहे. तुम्ही सत्यनिष्ठ व युध्दप्रिय कर्मवीर व्हा! दानाच्या बुध्दीपेक्षां युध्द व शौर्य यांनींच आजवर जगाचें कल्याण अधिक झालेलें आहे. शूर होणें यांतच चांगुलपणा आहे. आज्ञाधारकपणा व युध्द यांत आपलें आयुष्य वेंचा. अत्युच्च ध्येयावर प्राणापलीकडे प्रेम करण्यांत जीविताची इतिकर्तव्यता

माना. ग्रीक लोक युध्दप्रिय होते यांतच त्यांचें वैशिष्टय आहे. आपल्याप्रमाणें असूया ते दुर्गुण मानीत नसत. उलट त्याला ते सद्‌गुण समजत. ईश्वरी देणगीचा खरा विकास युध्दानेंच होतो. **युद्धामुळें तात्पुरता अंधार पसरत असला तरी त्यामुळेंच सत्याचा उपःकाल होतो.** युध्दामुळेंच मलिनपणा जाऊन राष्ट्र पुनीत होतें. जीं राष्ट्रें दुबळीं होऊन अवनतीला जात असतात त्यांनां बरें करण्यास युध्द हा एकच उपाय आहे. **दुबळेपणाचा रोग युध्दामुळें नष्ट होतो.** अधोगतीस चाललेल्या दुबळ्या राष्ट्रांस जगण्याची इच्छा असेल तर त्यांनीं युध्दच केलें पाहिजे. **जगण्याच्या अतोनात इच्छेबरोबर मरण्याचीहि तयारी पाहिजे.** नुसती जगण्याची इच्छा पण मरण्याची मात्र तयारी नाहीं असें उपयोगी नाहीं. एकाद्या सुखमय भावनेसाठीं जीवाची आहुति देणें हेंच खरें जीवन आहे. अशी आहुति देण्याची सदैव तयारी पाहिजे."

नीत्शेचे युद्धविषयक विचार वाचून वाचकांस नवल वाटेल. हे विचार प्रतिगामी आहेत असें कित्येकांना वाटेल. वेळीं अवेळीं शांतीचा जप करणारांस तर असल्या विचारांनीं धक्का बसेल. परंतु वर्धिष्णु राष्ट्रांची हल्लींची विचारपरंपराही अशीच आहे हें विसरून चालणार नाहीं. जगांतील प्रचलित बलिष्ठ राष्ट्रें युद्धाची जी प्रचंड तयारी करीत असतात ती कित्येकांस वेडेपणाची वाटते. पण त्याचें इंगित वरील विचारपरंपरेंत आहे. युद्धाची इतकी प्रचंड तयारी असल्यावर प्रत्यक्ष युद्धाची जरूर पडत नाहीं, असें नीत्शे ह्मणतो.

युद्धाचें जें हें वेड आहे तें नीत्शेला सद्‌गुणासारखें वाटतें.

आपणास हें वेड रोगासारखे वाटतें. तें कसेंही असो; पण याचीं कारणें समजून घेण्याची इच्छा असल्यास वाचकांनीं सुप्रसिद्ध जर्मन सेनानी **बर्नहार्डी** यांनीं 'जर्मनी व भावी युद्ध' या नांवाचें जें पुस्तक लिहिलें आहे तें वाचावें. 'शेजाऱ्यावर प्रेम करावें या मंत्रापेक्षां युद्ध व शौर्य यांनींच जगाचें हित अधिक केलेलें आहे.' असें नीत्शेचें वाक्य ब्रीदवाक्य ह्मणून या पुस्तकावर लिहिलें आहे. यांत युद्धाची आवश्यकता प्रतिपादिली आहे. **युद्ध नसेल तर हलक्या व अवनत जातीची वाढ जगांत बेसुमार होऊन चांगल्या जातींच्या प्रगतीस अडथळा होईल व त्यामुळें जग अधोगतीस जाईल** असें मत प्रस्थापित केलेलें आहे. आपल्या शरीराचा एकादा भाग रोगट झाल्यास व त्यामुळें सर्व शरीरास धक्का बसण्याचा संभव असल्यास रोगट भाग कापून काढणें ज्याप्रमाणें आवश्यक आहे त्याप्रमाणें जगांतील सडकीं व कुजकीं द्रव्यें युद्ध करून नष्ट करणें कल्याणप्रद आहे. युद्ध करण्याचा मनुष्यमात्रास जन्मसिद्ध हक्क आहे, एवढेंच नव्हे तर प्रसंगीं युद्ध घडवून आणणें हें मुत्सद्याचें राजकीय व नैतिक कर्तव्य आहे, असें बर्नहार्डीनें प्रतिपादिलें आहे. हें पुस्तक प्रसिद्ध होतांच त्यावर वाचकांच्या उड्या पडल्या व त्याच्या आवृत्त्यांवर आवृत्त्या काढाव्या लागल्या. राष्ट्राचें लोकमत सुशिक्षित झालें व आर्थिक हितसंबंध आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे झाले ह्मणजे, युद्धास आळा बसेल अशी नॉर्मन ॲंगेल या ग्रंथकारानें **दी ग्रेट इल्यूजन** या पुस्तकांत आशा प्रदर्शित केली आहे. नीत्शे व बर्नहार्डी यांचे विचार वाचले ह्मणजे ही आशा नष्ट होते.

नीत्शे ह्मणतो, " प्रचलित आंतरराष्ट्रीय चळवळी, व मताधिकार सार्वत्रिक करण्याची खटपट, यांचे मुळाशीं युद्धाची भीति हा प्रमुख हेतु आहे. धनिकानांच युद्धाची भीति फार वाटते. कारण युद्धामुळें सर्वांत अधिक नुकसान धनिकांचें होतें. या युद्धविरोधी चळवळीच्या पाठीमागें दडलेले धनिक मला स्पष्ट दिसत आहेत. खरोखरच बिचारे आंतरराष्ट्रीय! या धनिकांना घर कोणचें? स्वदेश असा त्यांनां नाहींच. सर्व जग हेंच त्यांचें घर! लोकांचीं घरें बुडवावीं व स्वतःचें घर भरावें हाच यांचा धंदा! ह्याच द्रव्यलोलुपांचा युद्धाच्या कल्पनेनें थरकांप होतो. स्वतःच्या तुंबड्या भरण्याचा अहर्निश हव्यास करणारे हे स्वार्थी धनिक, ह्यांनां राष्ट्रीय ध्येय असणेंच शक्य नाहीं. आर्थिक घडामोड करण्याचें साधन ह्मणून हे राजकारणाचा उपयोग करण्यास मात्र शिकले आहेत. राज्य व समाज यांचा फायदा घेऊन हे स्वतःचे खिसे मात्र गरम करीत असतात. याचा परिणाम असा होईल कीं, राष्ट्रीय ध्येय नष्ट होऊन त्याचे जागीं द्रव्यलोलुपतेचें हलकट ध्येय प्रस्थापित होईल. हें संकट निवारण्यास एकच उपाय आहे. तो कोणता? तर युद्ध. युद्ध हाच तो उपाय. अहंमन्य व्यक्तींचें स्तोम माजविण्यासाठीं युद्धाचे बागुलबोवाच्या भीतिवर राज्याची उभारणी झालेली नसते ही गोष्ट जनमनावर पटविण्याचा उत्तम उपाय ह्मणजे युद्ध! युद्धामुळें देशभक्ति व राजनिष्ठा वाढून मनुष्याचें ध्येय अधिक उच्च व उज्ज्वल होतें. संकुचित स्वार्थी वृत्ति अस्तप्राय होऊन मनुष्य परमार्थाच्या उदार वातावरणांत संचार करूं लागतो. तात्पर्य, दुसऱ्याला लुबाडून गबर झालेल्या स्वार्थलंपटांनीं स्वतः सुरक्षित

रहावें ह्मणून युद्धाविरुद्ध मोहीम चालविलेली आहे. त्या मोहीमेस बळी पडून युद्ध हें वाईट आहे अशी कोणी समजूत करून घेऊं नये. वस्तुस्थिति याच्या अगदीं उलट आहे. युद्ध वाईट तर नाहींच, उलट तें आवश्यक आहे. त्यानें जग सुधारतें, मानवाचें ध्येय उच्च होतें; आणि एकंदरींत जगाच्या प्रगतीला फार चालन मिळतें " असें नीत्शेचें मत दिसतें.

# प्रकरण दुसरें.

## ख्रिस्ती धर्माचें थोथांड

### अथवा

## दी अँटी ख्राईस्ट.

तत्वें:—हेराक्लिटस व एम्पीडॉकल्स यांच्या सारख्या प्राचीन ग्रीक तत्त्ववेत्त्यांनीं आपल्या ग्रंथांतून ज्या कल्पना लिहिल्या आहेत त्यांशीं कधीं कधीं अर्वाचीन कल्पना पुष्कळ अंशानें जुळतात. विकासवाद व निसर्गाची निवडणूक या विषयींचीं मतें डार्विन वगैरे अर्वाचीन पंडितांनीं शोधिलीं असें समजतात. परंतु ह्यांच मतासारखीं मतें प्राचीन तत्त्ववेत्त्यांच्या ग्रंथांतही आढळतात. उदाहरणार्थ, हेराक्लिटसच्या ग्रंथांत विकासवाद आढळून येतो; व निसर्गाच्या निवडणुकीचें तत्व हें एंपीडॉकल्स यानें मांडलेल्या कल्पनेची सुधारून वाढविलेली आवृत्ति आहे. वाईटाचा संहार व चांगल्याची जोपासना हीं कामें निसर्ग करीत असतो, अशी नैसर्गिक निवडणुकीची मूलभूत कल्पना आहे. या कल्पनेंतील वाईटाच्या संहाराचा जो शोध त्यावरच या सिद्धांताची योग्यता अवलंबून आहे असें नीत्शेचें मत होतें.

मनुष्याखेरीज इतर प्राणी व वस्तु यांमध्यें वाईटाचा संहार करण्याचें काम निसर्गाकडून अप्रतिहतपणें होत असतें. माणसाच्या बाबतींत मात्र संहाराच्या कामीं माणसानेंच मोठाले अडथळे निर्माण करून ठेविले आहेत. त्यामुळें हें काम व्हावें तसें होत नाहीं, असें स्पेन्सरप्रमाणेंच नीत्शेचेंही मत होतें. वाईटाच्या संहाराच्या कामीं सर्वांत मोठा व अत्यंत वाईट असा कोणता अडथळा असेल तर तो ख्रिस्तीधर्म होय. दुबळे व नालायक यांचें ख्रिस्तीधर्म संरक्षण करतो. ह्याच्या खालोखाल दुसरा मोठा अडथळा ह्मणजे दयेच्या कल्पना होत. दयेच्या अदूरदर्शी कल्पनांमुळें कल्याणापेक्षां एकंदरींत जगाचें नुकसानच अधिक होतें. दयेमुळें तात्पुरतें दुःखनिवारण होत असलें तरी संहाराला योग्य अशा इसमांची वाढ होऊन जगाच्या प्रगतीस अडथळा होतो. या बाबतींत स्पेन्सर व नीत्शे यांचें एकमत आहे.

**ख्रिस्ती धर्म विरुद्ध निसर्गाची निवडः**—नीत्शे ह्मणतो, ख्रिस्ती धर्मावर आतांपर्यंत जे हल्ले करण्यांत आले त्यांत तत्त्वांनां हात घालून निधड्या छातीनें हल्ला करण्याचें धाष्टर्य कोणीं केलें नाहीं. त्यांतील किरकोळ दोष दाखवून ते सुधारण्याचा प्रयत्न करणें हें भ्याडपणाचें लक्षण होय. असे चोरटे व भ्याडपणाचे हल्ले जोंपर्यंत चालले आहेत तोंपर्यंत ख्रिस्ती धर्म सत्य आहे कीं नाहीं, त्यांत सांगितलेलीं ईश्वराची उपपत्ति व अस्तित्व खरीं आहेत कीं नाहींत, त्यांतील ज्योतिःशास्त्र वगैरे संबंधीं किती चुका आहेत, इत्यादि प्रश्न गौण आहेत. नैतिक दृष्ट्या ख्रिस्ती धर्माचीं तत्वें काय किंमतीचीं आहेत हें पाहिलें पाहिजे.

साधुत्वाचा बुरखा चढविला असला तरी ह्या दिखाऊ बुरख्याला बळी पडतां कामा नये. ख्रिस्ती नीतितत्त्वें एका कवडीच्या किंमतीचीं आहेत, कीं अति दुष्ट, भ्रष्ट व खऱ्या नीतिवर केवळ अत्याचार करणारीं आहेत याची छाननी झाली पाहिजे. धर्म खरा आहे कीं नाहीं ह्या प्रश्नाला धर्माभिमान्यांकडून पुष्कळ लपंडावाचीं उत्तरें मिळूं शकतील आणि असले गौण प्रश्न काढून ख्रिस्ती धर्मावर हल्ला करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण असले वाद अखेरीस ' नेति ' ' नेति ' पर्यंत पोहोंचतात व उभयपक्षांस हात टेंकावे लागून वाद मात्र अपुरा राहतो. असल्या हल्लयांचा परिणाम फारसा होत नाहीं. ख्रिस्ती धर्माची नीतिदृष्ट्या योग्यायोग्यता ठरविणें हेंच खरें कर्तव्य आहे. हीं नीतितत्त्वें मानवी जीविताला पोषक नाहींत एवढेंच नव्हे तर तीं अत्यंत घातुक आहेत. **मानवी प्रगतीविरुद्ध जर कोणता अत्यंत मोठा गुन्हा असेल तर ख्रिस्तीधर्मानें प्रतिपादिलेलीं खोडसाळ व घातुक नीतितत्त्वें होत.** ख्रिस्ती धर्म हा मोठा गुन्हेगार आहे. त्यानें मानवी जीविताविरुद्ध अत्यंत मोठा गुन्हा केलेला आहे. ही गोष्ट जनतेस पटविली पाहिजे. **नैसर्गिक निवडणुकीचें** तत्त्व ख्रिस्ती धर्म पायदळीं तुडवितो. असा भ्रष्ट धर्म आणि इतर धडधाकट व चांगले धर्म यांची किंमत एक असतां कामा नये. यामुळें चांगल्याची जोपासना व वाईटाचा संहार हें जें विकासवादाचें नैसर्गिक कार्य आहे तें नष्ट होतें; आणि अनैसर्गिक हाच कायदा होऊं पहातो. शारीरशास्त्रदृष्ट्या दुबळे, अवनत व रुग्ण यांचा संहार होणें विकासवादाच्या दृष्टीनें आवश्यक आहे. ख्रिस्तीधर्म

अशा लोकांचें संरक्षण करतो एवढेंच नव्हे तर त्यांना संरक्षकच मानतो. एकमेकांचें संरक्षण, पोषण व सहकार्य करणें ही दुबळ्या जीवांची इच्छा असणें स्वाभाविकच आहे, व याच इच्छेला खिस्ती धर्म दुजोरा देतो. **खिस्ती धर्मांतील परोपकाराच्या बाता ह्मणजे आत्मसंरक्षणाची दुबळ्या जीवांची जी इच्छा असते तिचा मूर्तिमंत अवतार होय!** वास्तविक अशी इच्छा नीतिदृष्ट्या अयोग्य आहे; जीवनाच्या विरुद्ध गुन्हा करणारी आहे; विकासाच्या मार्गांत अडथळे आणणारी आहे. परंतु खिस्ती धर्म स्वतःच दुबळा आणि रोगट असल्यामुळें दुबळ्यांच्या अनीतिमान इच्छांचा पुरस्कार करतो. स्वजातीच्या कल्याणाकरितां आत्मयज्ञ करणें हें कर्तव्य आहे; व मानवी प्राण्यावर खरें प्रेम असेल तर तर हें कर्तव्य-निष्ठुर आत्मसंयमनाचें व्रत स्वार्थत्यागपूर्वक पार पाडिलें पाहिजे. खिस्ती धर्म हें करीत नाहीं. निष्ठुर कर्तव्य टाळून दुबळ्यांचा बचाव करण्याची तो खटपट करतो; आणि ह्मणून अखिल मानवजातीविरुद्ध अति मोठा गुन्हेगार कोणी असेल तर खिस्ती धर्म होय! समाजांतील हलक्या जातींच्या बचावासाठीं व फायद्यासाठीं जाणतां किंवा अजाणतां निघालेली युक्ति ह्मणजे खिस्ती धर्म! **मुक्तिफौजेच्या** चळवळीचें एक प्रकारचें पुराणें रूपच ह्मणाना! आजवर खिस्तीधर्मानें मनुष्य जातीच्या कल्याणाविरुद्ध मोहीम चालविली आहे. मनुष्यापेक्षां श्रेष्ठ अशा अतिमानुषतेचा उदय होऊं नये ह्मणून खिस्ती धर्मानें घातुक खटपट केली आहे. अतिमानुष होण्याच्या मानवाच्या नैसर्गिक वृत्तीवर खिस्ती धर्मानें विरजण घातलें आहे. दुधावर विरजण

घातल्यानें ज्याप्रमाणें अगदींच निराळा असा पदार्थ ह्मणजे दही निर्माण होतें त्याप्रमाणें दैवीवृत्तीवर विरजण घालून ख्रिस्ती धर्मानें मूर्तिमंत सैतान निर्माण केला आहे. **दुबळे, रोगी व हलकट अशांचा पुरस्कार करून ख्रिस्ती धर्मानें मानवी प्रगतीवर दुबळ्यांचीं बांडगुळें वाढवून अडथळे निर्माण केले आहेत.** बुद्धिमत्तेच्या परम उत्कर्षाला पोहोचलेलीं तत्त्वें, पापी, वाईट मार्गास लावणारीं व मोहाला वळी पडण्याजोगीं दुबळी असतात अशी शिकवण करून मोठमोठ्या बुद्धिमंताचीही ख्रिस्ती धर्मानें आज सतत अठरा शतकें दिशाभूल केली आहे असें नीत्शे ह्मणतो.

सर्व धर्म सद्धेतुप्रेरित पण खोडसाळ आहेत असें नीत्शेचें मत होतें. "सत्य व असत्य" या विषयावर नीत्शेनें एक उत्कृष्ट निबंध लिहिला आहे. तेथें त्यानें असें शाबीत केलें आहे कीं, मानवांच्या हल्लींच्या परिस्थितींत सत्यापेक्षां असत्य व भ्रम यांनींच मानवांचें अधिक संरक्षण होत आलें आहे. परंतु बायबलमधील असत्यें व मनुस्मृतींतील असत्यें यांत नीत्शेनें भेद केला आहे. जुन्या काळापासून चालत आलेलीं प्रयोगावस्थेंतील नीतितत्त्वें व जुना अनुभव यांचा तारतम्य दृष्टीनें विचार करून मनुस्मृतीनें त्यांचा सुंदर मिलाफ घातला आहे असें नीत्शे ह्मणतो. त्यामुळें मनुस्मृतींतील असत्यें नीत्शेला क्षम्य वाटतात. वरील सर्व गोष्टी–**ज्यांचा मनूनें मानवी कल्याणासाठीं मिलाफ केला त्या सर्व गोष्टी–ख्रिस्ती धर्मानें तुच्छ लेखिल्या. त्यांचा मुळींच विचार केला नाहीं. आणि स्त्रिया, विवाह व संततीची उत्पत्ति या गलिच्छ**

३८९३
8.20 पञी

आणि घाणेरड्या गोष्टींचा मात्र मोठ्या गंभीरपणानें, आदरानें व प्रेमानें विचार केला. जुन्या अनुभवांची व नीतितत्त्वांची मानवी कल्याणासाठीं संगति लावणारा मनु कोणीकडे, आणि विषयसुखाच्या घाणेरड्या डबक्यांत बुड्या मारणारा ख्रिस्ती धर्म कोणीकडे ? मनुस्मृतींत भ्रामक असत्यें असलीं तरी, ब्राह्मण व क्षत्रिय हे उच्च वर्ग इतर जातींना मार्गदर्शक व संरक्षक व्हावे अशी योजना मनूनें केली आहे. मानवी जीविताला पोषक असे उच्च विचार बायबलमध्यें अजीबात नाहींत. ह्मणून, बायबल व मनुस्मृति ह्या दोहोंतही भ्रामक गोष्टी असल्या तरी मनुस्मृतींतील भ्रामक गोष्टी त्याच्या मतें क्षम्य व बायबलमधील भ्रामक गोष्टी अक्षम्य ठरतात. बायबलमधील भ्रामक गोष्टी विषारी आहेत, जीविताला घातुक आहेत, शरीराला तुच्छ लेखणाऱ्या आहेत, व पापाच्या खोट्या भावनेनें मानवाला भ्रष्ट करून अवनतीस पोहोंचविणाऱ्या आहेत. बायबल व मनुस्मृति ह्या दोन्हींतही असत्यें असलीं तरी ह्या दोन्ही असत्यांच्या पाठीमागें असलेले हेतु अत्यंत भिन्न आहेत. दोन्ही ठिकाणीं असत्यें असतील तर त्यांच्या पाठीमागें कोणता हेतु आहे हा प्रश्न अत्यंत महत्वाचा होतो. मनुस्मृतींतील असत्यांच्या मागें मानवी जीविताचें पोषण हा हेतु आहे आणि ह्मणून तें असत्य क्षम्य आहे. बायबलमधील असत्यें मानवी जीविताला घातुक आहेत आणि ह्मणून तीं असत्यें अक्षम्य आहेत. एकंदरींत अराजकता व ख्रिस्तीधर्म हीं भावंडेंच आहेत असें नीत्शेनें ठरविलें आहे. दोहोंचाही हेतु व उपजत बुद्धि विघातक कामगिरी करण्याकडेच आहेत.

**ख्रिस्ती धर्माचें मूळ:**—कोणताही धर्म घेतला तरी त्याचा उगम भीति व गरज ह्यांपासून झालेला असतो. त्यांतल्या त्यांत ख्रिस्ती धर्माचा उगम गुलामवर्गापासून झालेला आहे. गुलामांना आपल्या धन्यांपासून भय होतें गुलामांना सत्ताही हवी होती. अशा स्थितींत गुलामांचें संख्याबल वाढलें व त्यांनीं धन्यांवर मात केली. शारीरशास्त्रदृष्ट्या कनिष्ठ दर्जाच्या लोकांनीं जें बंड केलें त्यापासून ख्रिस्ती धर्माचा उगम झाला. **शारीरिक अवनति, नैतिक अधःपात व मनोदौर्बल्य ह्या त्रयींचें ख्रिस्ती धर्म हें अर्भक आहे.** जनता गांजली, दिङ्मूढ झाली, व उच्च ध्येय नष्ट झालें, ह्मणजे अशा धर्माचा उदय होतो. आर्यसंस्कृति नष्ट करून चांडालसंस्कृति ख्रिस्ती धर्मानें स्थापिली. तात्पर्य, दलित गुलामांनीं जें बंड उच्च वर्गाविरुद्ध केलें त्याचा परिणाम ह्मणजे ख्रिस्ती धर्म होय. एकादी गोष्ट वस्तुतः सत्य आहे कीं असत्य आहे ह्याची ख्रिस्ती धर्म पर्वा करीत नाहीं. लोकांची समजूत ती सत्य आहे एवढी पटली ह्मणजे पुरे; मग ती खरी असो वा खोटी असो. अगदीं हलक्या मनोवृत्तींची अथवा पशुवृत्तींचीही दाद लागावी ह्मणून ख्रिस्ती धर्मानें ईश्वराला तरुण बनविलें आहे. **स्त्रियांचे सौंदर्यलोलुप डोळे निवावे ह्मणून सुस्वरूप साधु आणि पुरुषांचा उत्साह शांत व्हावा ह्मणून व्हर्जिन मेरी यांची योजना प्रामुख्यानें झालेली आहे.** ह्या सर्व कल्पना पौर्वात्य संस्कृतीचा वरपगडा ख्रिस्ती धर्मावर झालेला आहे असें दर्शवितात. ईश्वराचें ज्याच्यावर प्रेम बसतें त्याला तो पुनीत करतो ही कल्पना देखील अशांपैकींच आहे. मनाच्या दुबळेपणाचा ख्रिस्ती धर्म हा

एक मासला आहे. ऐतिहासिक सत्याची तिळभरही ख्रिस्ती धर्मानें चाड बाळगलेली दिसून येत नाहीं.

**जीवाचें अमरत्वः**—जीवाच्या अमरत्वाविषयीं ख्रिस्ती धर्माच्या कल्पना अत्यंत हास्यास्पद आणि तिरस्करणीय आहेत. प्रत्येकाचा आत्मा अमर आहे अशी कल्पना करून सर्वांचा दर्जा समान आहे असें ख्रिस्ती धर्म मानतो. अनंत जीवांच्या बुजबुजाटांत स्वतःच्या वैयक्तिक मुक्तीचा हक्क दाखविणें व त्याला बेसुमार महत्व देणें किती हास्यास्पद आहे याचा वाचकांनींच विचार करावा. स्वतःकरितां निसर्गानें आपले नियम मोडले पाहिजेत असा हट्ट क्षुद्र माथेफिरूंनीं धरणें ह्मणजे मूर्खपणाची परमावधी होय. स्वतःच्या व्यक्तित्वाचें स्तोम माजविणें व तें शाश्वत आणि अनंत येथपर्यंत नेऊन भिडविणें हा मनुष्य प्राण्याचा केवढा उर्मटपणा आहे? स्वार्थाची किती कमाल आहे? असल्या क्षुद्र बुद्धीचा धिःकार करावा तितका थोडाच आहे. व्यक्तीचें महात्म्य इतकें वाढवून ख्रिस्ती धर्माची स्थापना झाली. ह्या महत्वाच्या आमिषानें ख्रिस्ती धर्माला अनुयायी मिळाले. बंडखोर, नीतिभ्रष्ठ, दलित आणि मनुष्य प्राण्यांतील अगदीं खालच्या थराला गेलेले सर्व प्रकारचे लोक ह्या आमिषाला बळी पडले आणि ख्रिस्ती धर्मांत सामील झाले. आत्म्याच्या मुक्तीची ख्रिस्ती धर्माची कल्पना ह्मणजे खोट्या स्तुतीनें मनुष्याचें मन किती अवनतीला जातें ह्याचें उदाहरण आहे. मी अचल असून सबंध जग माझ्या भोंवतीं फिरत आहे असें एकाद्या व्यक्तीनें ह्मटल्यास तें जितकें आत्मश्लाघामूलक व सर्वथैव असत्य होईल तितकीच आत्म्याच्या मुक्तीची ही कल्पना असत्य व हास्यास्पद आहे.

**पाप:**—पाप, शिक्षा, क्षमा, दया आणि मुक्ति या विषयींच्या ख्रिस्ती धर्माच्या कल्पना अत्यंत खोडसाळ आहेत. त्यांत सत्याचा एक अंश सुद्धां नाहीं. कार्यकारणभावाची जी कल्पना प्रचलित होती त्या कल्पनेवर वार करण्यासाठीं ह्या कल्पना निघालेल्या आहेत. खात्री पटल्यामुळें सरळ अंतःकरणानें मनुष्यानें मर्दाप्रमाणें उघड हल्ला करावा त्याप्रमाणें मात्र हा हल्ला नाहीं. भेकाड माणसानें, खुनशीपणानें काळोखांत वार करावा त्यासारखा हा चोरटा हल्ला आहे. स्वतःला धर्मरक्षक समजणाऱ्या ख्रिस्ती भिक्षुकांचा हा हल्ला! समाजावर बांडगुळाप्रमाणें वाढणाऱ्या ख्रिस्ती भटजींचा हा हल्ला! हलकट परान्नपुष्टांच्या भूतांचा हा भेकड हल्ला! ह्या हल्ल्यांत मर्दानीपणा कोठून असणार? तत्वज्ञानाची कसोटी लावून सिद्धांत सप्रमाण खोडून काढण्याचें धैर्य ह्यांच्या अंगीं कसें येणार? ह्यांच्या मतें कारण घडल्यावर जें कार्य होतें तें स्वाभाविक नव्हे! कार्यकारणभावाला तिलांजली देऊन अंधश्रद्धा, ईश्वर, भूतें आणि आत्मे वगैरे अदृश्य आणि काल्पनिक प्राण्यांवर कार्याची जबाबदारी हे लोक टाकूं पाहतात. हेच अदृश्य प्राणी मनुष्यजातीवर बक्षिसें, शिक्षा व सूचना यांचा वर्षाव करीत असतात आणि मनुष्य जातीला ज्ञान देत असतात, अशी ह्यांची कल्पना! या कल्पनेमुळें ज्ञानाचा सबंध पायाच उखडला गेला. अशी खुळचट कल्पना पसरविणें ह्मणजे मनुष्य जातीविरुद्ध अक्षम्य गुन्हा करण्यासारखें आहे; आणि हा गुन्हा ख्रिस्तीधर्मानें केला आहे. ख्रिस्ती धर्मातील पापाची कल्पना पाद्र्यांना मनुष्यावर सत्ता चालवितां यावी ह्मणून उत्पन्न झाली. शास्त्र, संस्कृति, उन्नति,

व मनुष्य प्राण्यांतील इतर उदार सद्गुण केवळ नष्टच नव्हे तर अशक्यप्राय व्हावे असें पाप या पापाच्या कल्पनेच्या पोटांत आहे !

**ख्रिस्ती धर्माचा इतिहासावर परिणामः**—ख्रिस्ती धर्म उत्पन्न होण्यापूर्वी जग चांगल्या रस्त्यावर सुरळीत चाललें होतें. उच्च संस्कृतीचीं साधनें उपलब्ध होतीं. शास्त्रीय शोधाच्या उत्तम रीति मानवांनीं हस्तगत केल्या होत्या. वस्तुस्थितीची चाड व सत्य जाणण्याची तीव्र इच्छा ह्या अत्यंत अमूल्य गोष्टींची किंमत मानवांस शेंकडों वर्षांपूर्वी कळून चुकली होती. गणितशास्त्र, मेकॅनिक्स व नॅचरल सायन्स ह्यांची प्रगति उत्तम चालली होती. मानवाला उन्नति शिखरावर जाण्याचे मार्ग बहुतेक सांपडलेले होते. जुनाट रूढी व आळस ह्या शत्रूंशीं अखंड झुंज करून प्रगतीला आवश्यक अशा सर्व शास्त्रांनीं आपलीं डोकीं वर काढलीं होतीं. अतुल आत्मसंयमन, सत्यशोधनासाठीं आतुर असणारी निःपक्षपाती दृष्टि, ज्ञानार्जनाचे बाबतींत सर्वस्वी निर्भीड व पूर्ण सरळ वृत्ति, आणि तपशिलाचे बारीक सारीक भेद व श्लेष पहाण्यासाठीं लागणारी सावधगिरी, चिकाटी व गंभीरपणा, या सद्गुणांचे जोरावर आम्ही आज ज्या गोष्टी हस्तगत केल्या आहेत त्या सर्व दोन हजार वर्षांपूर्वी अस्तित्वांत होत्या. ग्रीक लोकांची ती संस्कृति ! रोमन लोकांचें तें वैभव ! जन्मसिद्ध उदारबुद्धि, उच्च विचार, सशास्त्र संशोधन, घटना तयार करण्याची व कारभार चालविण्याची कुवत, श्रद्धा, मानवाचा भविष्यकाळ उज्ज्वल करण्याची आकांक्षा, ह्या सर्व गोष्टी रोमन राज्यांत कल्पनासृष्टींत नव्हे तर प्रत्यक्ष मूर्तिमंत नांदत होत्या !

यक्षिणीची कांडी फिरवून सुंदर नगराच्या ठिकाणीं नरक उत्पन्न व्हावा त्याच प्रमाणें अकस्मात या सर्व गोष्टी नष्ट झाल्या. स्वाभाविक रीतीनें अथवा दैवी आपत्तीमुळें त्या नष्ट झाल्या असत्या तर इतकें वाईट वाटलें नसतें. पण तसें घडलें नाहीं. या सर्व उच्च संस्कृतीचा नाश माणसांनीं, नरपशूंनीं केला! समाजाचें रक्तशोषण करून त्याला निस्त्राण करणाऱ्या जळवांनीं हा घात केला. प्राचीन महर्षीनीं भगीरथ प्रयत्नांनीं, प्रयासानें बांधिलेली उन्नतीची इमारत एका रात्रींत उध्वस्त करणाऱ्या हलकट बांडगुळांनां शिव्या देण्यास पुरेसे शब्द मजजवळ नाहींत. ह्या लोकांची कोणत्या शब्दांनीं निंदा करावी हेंच मला कळत नाहीं. हा अत्याचार इतका घोर आहे. ह्या चळवळी मध्यें जगांतील सर्व दुष्ट, नष्ट, कुजकट वृत्तींनीं जगांतील सर्व चांगल्या आणि उदार गोष्टी नष्ट केल्या. समाजांतील घाणेरडे, तळाला बसलेले लोक, ह्या खळबळीनें वर आले आणि समाजाच्या डोक्यावर मिरवूं लागले. सेंट ऑगस्टाईन सारख्या ख्रिस्ती चळवळ्यांचे लेख वाचावे म्हणजे या लोकांचे विचारांत किती घाण भरली आहे त्याची कल्पना येईल. असले घाणेरडे लोक जनतेचे पुढारी झाले. प्राचीन आर्य संस्कृतींचीं मधुर फळें आम्हांस चाखावयास मिळालीं असतीं परंतु मध्येंच **ही ख्रिस्ती धर्माची घोरपड उपस्थित झाली; आणि तिनें प्राचीन संस्कृतीचा जीव घेतला.** इस्लामी संस्कृति देखील जगाला उपकारक झाली असती. परंतु ही संस्कृति जन्मास येण्यापूर्वींच ख्रिस्ती धर्माची राक्षसी प्रबल होऊन बसली होती **ह्या राक्षसीनें इस्लामी संस्कृतीच्या नरडीलाही**

**नख लाविलें.** ख्रिस्तानुयायांनीं कितीतरी धर्मयुद्धें केलीं. तीं धर्मयुद्धें कसलीं ? धर्माच्या नांवाखालीं त्यांनीं वाटतील ते आत्याचार केले. कसलें आलें आहे धर्मयुद्ध ! सारा चोरांचा बाजार !

**सेंटपॉलः**—नीत्शेच्या मतें ख्रिस्ती धर्माचा खरा संस्थापक सेंटपॉल होय. येशुख्रिस्त हा खरा संस्थापक नव्हे. त्यानें ज्यू लोकांची लहानशी जमात बनविली. नीत्शेच्या मतें येशू ख्रिस्त गौण असल्यामुळें नीत्शे त्याच्यावर फारसा भडिमार करीत नाहीं. नीत्शेच्या खरा राग सेंटपॉलवर आहे. त्याच्या मतें ह्याच सेंटपॉलमुळें ख्रिस्ती धर्माला हल्लींचें घाणेरडें स्वरूप आलें व तो धर्म विषारी झाला. सेंटपॉल देवभोळा, पण अत्यंत धूर्त असून महत्वाकांक्षी व हटवादी होता असें नीत्शे म्हणतो. ज्यू संस्कृतीचें वर्चस्व मूळ येशू ख्रिस्ताच्या उपदेशांत होतें. परंतु सेंटपॉलनें त्या संस्कृतींतलि चांगला भाग टाकून दिला आणि ख्रिस्ती धर्माला रानटी स्वरूप दिलें. सेंट पॉलच्या चरित्राचें अवलोकन केलें तर तो गुलामी मनोवृत्तीचा होता असें दिसून येईल. ह्या गुलामी मनोवृत्तीला दाबांत ठेवून वळण लावणाऱ्या तत्कालीन संस्कृतीविरुद्ध सेंटपॉलनें बंड केलें. **ह्या बंडखोराच्या मनांत द्वेष, खून, हातचलाखी, मूर्तिपूजा, दारुडेपणा, बदफैलीपणा, विषयसुखाची अनिवार इच्छा, वगैरे घाणेरड्या गोष्टींनीं नुसता बुजबुजाट केला होता** असें नीत्शे म्हणतो. पूर्वींच्याच संस्कृतीचा तत्कालीन कायदा पाळावा असें त्याला वाटे. कारण हा कायदा पाळून आपल्या मनाची शांति होईल व आपली अधिकाराची तृष्णा भागेल असें त्याला वाटत असे. परंतु हें सर्व

व्यर्थ आहे, असा त्याला अनुभव आला. त्याच्या महत्त्वाकांक्षी मनाला सत्ता गाजविण्याची अनिवार इच्छा होती. तत्कालीन संस्कृतीचें जूं शिरावर सांभाळून ही महत्त्वाकांक्षा पुरी होण्याचें चिन्ह दिसेना. तेव्हां हें जूं झुगारून देण्याचें त्यानें ठरविलें; आणि खिस्ताची मूर्ति त्याच्या डोळ्यांसमोर दिसूं लागली. नवीन मत प्रस्थापित करून खिस्तानें जसा मोठेपणा मिळविला तसा आपणहि कां मिळवूं नये असें त्याला वाटूं लागलें. तत्कालीन संस्कृतीविरुद्ध बंड करणाऱ्या खिस्ताचा तो अनुयायी झाला. ज्या बंधनांनीं त्याचें महत्त्वाकांक्षी मन जखडलें गेलें होतें तीं तोडून महत्त्वाकांक्षेला वाव देणारा खिस्ती धर्म हाच काय तो त्राता आहे, असें त्याला वाटूं लागलें. खिस्ती धर्माचा अनुयायी झाल्यामुळें बंधनांतून आपली सुटका होईल व ज्या बंधनांनीं आपणास जखडलें होतें त्या बंधनांवरही सूड घेतां येईल, अशा भावनेनें सेंटपॉलनें खिस्ती धर्माचा अंगिकार केला. याच्यापुढें तत्कालीन संस्कृतीचा उच्छेद करण्याचेंच काम त्यानें केलें. ज्यू लोकांच्या लहानशा जमातीचें परिवर्तन झालें. सेंटपॉलमुळें खिस्तीधर्म 'धर्म' म्हणून प्रस्थापित झाला. हा खिस्ताचा पहिला चेला. ह्यानेंच खिस्तीधर्माचा शोध लाविला; आणि त्याला धर्म अशी संज्ञा प्राप्त करून दिली! खिस्तानें स्वतःच्या आचरणानें जो धडा घालून दिला तो खिस्ता-बरोबरच खिस्तवासी झाला! खिस्ताचा धडा या लोकांनीं गिरवला नाहीं. खिस्ताच्या अनुयायांचें आचरण खिस्ताच्या उपदेशाच्या तंतोतंत विरुद्ध होऊं लागलें. **शुभवार्तेऐवजीं अशुभवार्तेचे मात्र खिस्तानुयायी प्रवर्तक झाले. खिस्ताच्या शुभ वर्तमानाची अशी गत झाली.**

ख्रिस्ती धर्माचें खरें वैशिष्टय कशांत आहे याचा विचार करूं या. नुसती ख्रिस्ती धर्मावर श्रद्धा असली म्हणजे मनुष्य ख्रिस्ती होत नाहीं. बायबलमध्यें सांगितलेली मुक्ति ख्रिस्ती धर्मामार्फत मिळेल अशी श्रद्धा ठेवल्यानें मनुष्य ख्रिस्ती होत नाहीं. नुसती श्रद्धा हा ख्रिस्ती धर्माचा मुळीं पायाच नाहीं. ख्रिस्तानें जें चरित्र आचरिलें तसें आचरण करील तोच खरा ख्रिस्ती! भगवान बुद्धानें जी शांति मिळविण्याचा प्रयत्न केला तसाच ख्रिस्ताचा प्रयत्न होता. शांति मिळविण्यासाठीं जो कर्मयोग करावा लागतो, किंवा खरें पाहूं लागलें तर जो निष्कामकर्मयोग करावा लागतो, तो करण्याकडे ख्रिस्ताचा कल होता. हा विरक्तपणा आचरणें हेंच खऱ्या ख्रिस्तानुयायाचें कर्तव्य आहे. मनुष्याला खरा ख्रिस्ती व्हावयाचें असेल तर ख्रिस्तीधर्मावर नुसती श्रद्धा आहे म्हणून उपयोगी नाहीं; **ख्रिस्ताप्रमाणें विरक्तपणाचें आचरण हातून घडलें पाहिजे.** ख्रिस्ती धर्म श्रद्धामूलक नसून आचरणमूलक आहे. दुसऱ्याच्या वाटेस न जातां, दुसऱ्याची जिंदगी न बळकावतां, या पृथ्वीवर शांतिसुखाचा अनुभव घेत राहणें हें ख्रिस्ती धर्माच्या शिकवणीचें सार आहे. परंतु मोठ्या दुर्दैवाची गोष्ट आहे कीं, **ख्रिस्ताची ही शिकवण ख्रिस्ताबरोबरच फांशी गेली!** ख्रिस्तासारखें आचरण व्यवहारांत करणें हेंच ख्रिस्ताच्या शिकवणीचें वैशिष्टय होय. सत्यासाठीं, तत्त्वासाठीं, मरणालासुद्धां तयार होणें आवश्यक आहे हेंच ख्रिस्तानें प्रत्यक्ष दाखविलें. येशू ख्रिस्त शत्रूच्या हातांत सांपडला व त्याला लांकडाच्या चौपटीवर बांधून त्याच्या शरीरांत ठिकठिकाणीं खिळे

ठोकून अत्यंत अमानुषपणें त्याचा शत्रूंनीं वध केला. तथापि तो सत्यभ्रष्ट झाला नाहीं व त्याची शांति ढळली नाहीं. अशा तऱ्हेचें आयुष्य प्रत्यक्ष आचरणें आजही शक्य आहे. ह्याला मनुष्य ख्रिस्तीच असावा लागतो असें नाहीं अथवा ख्रिस्तामार्फत मुक्ति मिळते अशा तऱ्हेची मूर्खपणाची कल्पना अगर श्रद्धा असण्याचीही जरुरी नाहीं. बुद्धानें शांति मिळविण्यासाठीं जी चळवळ पुढील आयुष्यांत केली तशीच शांति—ह्मणजे पारलौकिक शांति नव्हे तर प्रत्यक्ष ह्याच देहीं ह्याच डोळां अनुभवास येणारी शांति—प्राप्त करून घेण्याचा येशू ख्रिस्तानें प्रयत्न केला. येशू ख्रिस्तानें शांतीचा हा जो अत्यंत अभिनव मार्ग काढण्याचा प्रयत्न केला त्यावरून त्याची तीव्र बुद्धिमत्ता व सद्धेतू दिसून येतात. परंतु पुढें सेंटपॉलच्या हातीं सूत्रें आल्यावर त्यानें ख्रिस्ताचें चरित्र, त्याचीं मतें व प्रत्यक्ष त्याचा मृत्यु यांतील खरीं रहस्यें दडपून टाकिलीं आणि त्यांऐवजीं अत्यंत खोडसाळ गोष्टींनीं भरलेल्या नवलकथा निर्माण केल्या! सत्तेची तृष्णा आणि पापी मन या दुर्गुणांनीं त्याचें अंतःकरण व्यापलेलें होतें. त्यानें इस्राइलचा खोटा इतिहास तयार केला; आणि आपल्या कार्याची पूर्वतयारी करण्यासाठींच इस्राइलचा जन्म होता असा भास निर्माण केला. जाणूनबुजून सेंटपॉलनें असल्या बनावट कथा कल्पिल्या! अर्थात या काल्पनिक कथांवर सेंटपॉलची श्रद्धा कधींच नव्हती हें सांगावयास नकोच. परंतु असल्या खोडसाळ गोष्टींवर श्रद्धा ठेवणारे दुधखुळे लोक त्याला मिळाले. **ह्या बुद्धिमंदांनीं त्याचीं मतें—ख्रिस्ताचीं नव्हे, सेंटपॉलची मतें-अंधश्रद्धेनें ग्रहण केलीं.** ज्यांना राज्यकर्ते लोक व यहुदी धर्म

यांचा तिटकारा आला होता अशा खिस्ताच्या अनुयायांना व चेल्यांना लांचलुचपतीनें सेंटपॉलने आपले अनुयायी बनविलें. ही लांचलुचपत कोणती तर त्यांना सेंटपॉलनें ज्या खोट्या आशा दाखविल्या ती होय. आमचा ईश्वर, एकच ईश्वर, ईश्वराचा एकच पुत्र, वैयक्तिक अमरत्व, वगैरे मूर्खपणाचीं आणि उद्दामपणाचीं वचनें त्यानें लोकांपुढें ठेवलीं. ह्या मोहक परंतु कल्पांतीही प्रत्ययास न येणाऱ्या आशांच्या आमिषांना दुबळे लोक बळी पडले यांत नवल नाहीं. यहुदी धर्म व सत्ता यांनीं गांजलेल्या लोकांनीं जें बौद्धिक बंड केलें त्याचा परिणाम ह्मणजे खिस्ती धर्माची स्थापना होय. "जगांत उच्च लोक फारसे नसतातच. ईश्वरानें मूर्ख व हलक्या वस्तु मुद्दाम शोधून त्यांनां जगांत मिसळून दिलें आहे. कशासाठीं? तर शहाण्या लोकांची दिशाभूल करण्यासाठीं!" अशा तऱ्हेच्या वचनांनीं चांडालवृत्तीच्या हलक्या लोकांनां खूष करण्याचा त्यानें प्रयत्न केला आहे. **ख्रिस्ती धर्म ह्मणून ज्याला हल्लीं समजतात त्या धर्माची उभारणी असल्या खोडसाळ व खुळचट गोष्टींवर झालेली आहे. आणि सेंटपॉल सारख्या अट्टल ढोंगी माणसानें लोकांच्या भोळसरपणाचा व अज्ञानाचा फायदा घेऊन स्वतःचीं खोटीं व बनावट मतें ख्रिस्ती धर्माचीं ह्मणून पसरवून दिलीं आहेत.**

**ख्रिस्ती धर्म व मानवी प्रेमः—**

एरॉस व ॲफ्रोडाइट ह्या विषयींच्या उदात्त कल्पनांना खिस्ती धर्मानें ग्राम्य स्वरूप दिलें. श्रद्धाळू लोकांच्या अंतःकरणांत

विषयसुखाची वासना उत्पन्न करून त्यानें भाविकांच्या मनास यातना दिल्या. उदात्त कल्पनांचा चुराडा करून त्यांच्या ऐवजीं हलकट कल्पनांचा प्रसार ख्रिस्ती धर्मानें केला; व त्यापासून काय मिळवलें ? ख्रिस्ती धर्मांतले सगळे देवदूत व साधु ह्यांचा अर्क काढून जनतेस पाजला तरी त्यांनीं जनतेचें समाधान होत नाहीं. एरॉस ह्या राक्षसाच्या कथाच मानवांना अधिक आवडतात. हल्लीं सर्व तऱ्हेच्या लोकांस प्रेमकथांनीं वेड लाविलें आहे. या अनर्थाला कारण जर कोणी असेल तर ख्रिस्ती धर्माचे प्रचारक होत. **ह्या लोकांनीं प्रेमकथांच्या अतिशयोक्तीची कमाल केली**. प्राचीन प्रेमकथांत अतिशयोक्ति आहे. पण पाद्र्यांनीं पसरविलेल्या प्रेमकथांतील अतिशयोक्तीच्या मानानें ती कांहींच नाहीं. ही अतिशयोक्ति पाहून पाद्र्यांच्या कल्पनांकडे भावी पिढी तुच्छतेनें बोटें दाखवील.

**ख्रिस्ती धर्म व कलाः**—' बर्थ ऑफ ट्रॅजेडी ' मध्यें ' मनोहर चमत्कार ' ह्मणून विश्वाची उपपत्ति नीत्शेनें लाविली आहे. या उपपत्तीच्या तंतोतंत विरुद्ध ख्रिस्ती धर्माचें मत आहे. नीतिनियमानीं विश्व बांधलें आहे; व हे नीतिनियम स्वयंभू, स्थिर, व अविनाशी, आहेत असें ख्रिस्ती धर्माचें मत आहे. या धर्माच्या मतें कला, कोणतीही कला निंद्य आहे. कारण कला ह्मणजे कृत्रिमपणा, अस्वाभाविकपणा, अर्थात खोटेपणा आहे. अशा रीतीनें **ख्रिस्ती धर्माचें मत कलेला अत्यंत विरोधी आहे. हें मत नीत्शेला पसंत नाहीं.** एवढेंच नव्हे तर कोणत्याही नवीनपणाला शत्रूप्रमाणें लेखणारें कलाविरोधी ख्रिस्ती धर्माचें मत घातुक आहे

असें नीत्शे ह्मणतो. मनुष्याच्या आयुष्यांतील शेवटची घटकाच सर्वांत महत्वाची मानणारा व विश्वाच्या दु:खपर्यवसायी नाटकांत शेवटच्या अंकापर्यंत सर्वांना तिष्ठत ठेवणारा हा ख्रिस्तीधर्म नवीन कल्पना, धाडशी प्रयत्न व स्वातंत्र्याच्या इच्छा, मारून टाकणारा शत्रू आहे असें नीत्शेचें मत आहे. श्रद्धेचा काय उपयोग ? श्रध्दा म्हणजे वेड्यांचा बाजार ! वेड्यांच्या इस्पितळांत जर आपण फिरून आलों तर तेथें नसत्या कल्पना श्रद्धेनें उराशीं बाळगून निदिध्यास करणारे प्राणी पुष्कळ सांपडतील. त्यांच्यांत आणि इतर श्रध्दाळू माणसांत फरक येवढाच कीं, त्यांची श्रध्दा परमावधीला पोहोंचलेली असते; आणि जगांत शहाणे म्हणून मिरविणाऱ्या इतरेजनांची श्रध्दा जरा कमी प्रतीची असते. आत्यंतिक श्रद्धावाले वेड्यांच्या इस्पितळांत आढळतात; आणि कमी श्रद्धावाले जगांत उपद्रव करीत मोकाट फिरत असतात ! श्रध्देच्या परिमाणाचाच दोघांत काय तो फरक. श्रध्देमुळें धर्म शाबीत होत नाहीं; व उज्वलही होत नाहीं. धर्मवीर म्हणून ज्यांना म्हटलें जातें त्यांचीही गोष्ट अशीच आहे. एरव्हीं ज्याचें नांव पूर्णपणें अज्ञात राहिलें असतें त्याचा जर छळ झाला तर त्याचें नांव धर्मवीर म्हणून सुप्रसिध्द होतें. **छळ होण्याचा अपघातानें योग आल्यामुळें प्रसिद्ध होणारा धर्मवीर कांहीं उपयोगाचा नाहीं.** ख्रिस्ती धर्माचें हल्लींचें स्वरूप नरम नीतिमत्तेच्या रूपाचें आहे. **बुद्धीच्या तीव्र दृष्टीपुढें ख्रिस्ती धर्माचा निभाव लागूं शकत नाहीं. एवढेंच नव्हे तर सदभिरुचीच्या दृष्टीनेंही ख्रिस्तीधर्म त्याज्य होय !**

**ईश्वर:**—ख्रिस्ती धर्माची नीत्शेनें फार निर्भत्सना केली आहे. ईश्वरविषयक कल्पनेवरही त्यानें अत्यंत जोरदार टीका केली आहे. त्यांतल्या त्यांत ख्रिस्ती लोकांच्या ईश्वरविषयक कल्पनेवर नीत्शेनें फार झोड उठविली आहे. **उमर खयाम** ह्या सुप्रसिद्ध कवीनें कुंभाराची एक सुंदर कविता रचिली आहे. कुंभारानें तयार केलेलीं मडकीं आपल्या भवितव्याविषयीं चिंतन करीत असतांना, ज्यानें मातींतून उठवून मोठ्या परिश्रमानें आपणाला सुंदर आकार दिला तो आपला नाश करून आपणास पुन्हा मातींत मिळवणार नाहीं अशी आशा करीत असतात; अशी कल्पना करून कविता रंगविली आहे. आपण घडविलेलीं मडकीं, वाईट झालीं किंवा मनासारखीं न झालीं, म्हणून आपल्या चुकीचा राग मडक्यांवर काढून त्यानां मातींत मिळविणाऱ्या कुंभाराविषयीं आपण काय म्हणूं ? ईश्वर जर असेंच करीत असेल तर सदर कुंभाराप्रमाणेंच त्यालाही सदभिरुची नाहीं असें ह्मणावें लागेल. ख्रिस्ती धर्मांत कल्पिलेला ईश्वर मूर्ख कुंभाराप्रमाणेंच आपण घडविलेलीं मडकीं आपणच फोडतो आणि स्वतःच्या दोषाचा राग माणसांवर उगवूं पाहतो. ईश्वर गुप्त रहातो. प्रगट होत नाहीं. आपल्या पुत्राची भेटसुद्धां तो गुप्तपणानें घेतो. काय ही ईश्वराची कल्पना ! ईश्वराला एवढा बुरखा कशासाठीं ? पुत्राच्या भेटी चोरून घेण्याचें त्याला प्रयोजन काय ? ख्रिस्ती धर्मांतला ईश्वर नुसता मूर्खच नाहीं तर चोरटाहि आहे ! ख्रिस्ती धर्मांतील श्रद्धेची कल्पना तरी चांगली असायची होती. पण ती तरी चांगली कोठून असणार ? उलट श्रद्धेची कल्पना अगदींच ओंगळ आहे. **ईश्वरानें श्रद्धेचें जें मंदीर कल्पिलें**

**आहे त्याच्या उंबरठ्यावर बदफैलीपणाचें पहिलें दर्शन होतें. किती हिडीस देखावा हा!** तरूणपणीं ईश्वरानें काय कामगिरी केली? आपल्यावर श्रद्धा न ठेवणाऱ्या लोकांकरितां त्यानें नरक तयार केला. हा नरक कशासाठीं? तर आपले भक्त खुष व्हावे ह्मणून! **असला दुष्ट आणि खुनशी ईश्वर ह्मातारपणीं जरा नरमला आणि 'अंगं गलितं पलितं मुंडं' अशा स्थितींत दयेची जपमाळ घेऊन बसला!** ह्या स्थितींतलें त्याचें वर्णन वाचलें तर तो बाप आहे असें न वाटतांना आजोबा आहे अथवा हातपाय कांपणारी एखादी वृद्ध आजीबाई आहे, असें वाटतें. अशा स्थितींत अखेरीस दयेच्या स्तोमानें तो गुदमरून मेला! **ईश्वर सर्वशक्तिमान व सर्वज्ञ आहे असें सर्वांचें ह्मणणें; परंतु त्याचें वर्तन मात्र ह्या सद्गुणास शोभेसें नाहीं.** ह्यानें जग निर्माण केलें पण आपले काय हेतु आहेत ते कोणासही स्पष्ट समजावून न देतां तो जगाची नुसती मजाच पहात राहिला. हा ईश्वराचा चांगूलपणा आहे असें कोणीही ह्मणणार नाहीं. जगावर शंकाकुशंकांचें रण माजत असतांना हजारों वर्षे हें रण तसेंच माजूं देणारा ईश्वर कठोर मनाचा आहे यांत संशय नाहीं. मनुष्य प्राण्याच्या मुक्तीच्या मार्गांत अडथळा करणाऱ्या शंकाकुशंकांस वाढूं देणारा ईश्वर दयाळू आहे असें कोण ह्मणेल? आपले हेतु कळूं द्यावयाचे नाहींत, कुशंकांचे जाळें वाढूं द्यावयाचें, आणि विचारा निर्बुद्ध मनुष्यप्राणी ह्या जाळ्यांत फसला तर त्याला नरकाच्या यातनांचा बागुलबोवा दाखवावयाचा हें ईश्वराचें वर्तन पाहून **त्याचें अंतःकरण पत्थराचें आहे** असा भास होतो. ईश्व

सर्वज्ञ आहे. अर्थात सत्याचा शोध त्याला लागलेला आहे. असें असून मनुष्य प्राण्याला सरळ सत्याचा पत्ता तो लागूं देत नाहीं. सत्य शोधण्यासाठीं मनुष्यप्राण्याला शारीरिक व मानसिक यातना भोगावयास तो लावतो. **असा ईश्वर महादुष्ट असला पाहिजे. ख्रिस्ती धर्माची ईश्वराची कल्पना अत्यंत हलकी आहे.** कोणत्याही धर्मांतील ईश्वराची कल्पना थोड्या फार अंशानें दूषणीय असते. पण त्यांतल्या त्यांत ख्रिस्ती धर्मांतील कल्पना अतीशयच खालच्या दर्जाची आहे. जीविताचें अत्यंत उच्च ध्येय ठरवून सर्व अप्रतिम गुणांचें सार घेऊन त्यावर ईश्वराची कल्पना वसविली पाहिजे. परंतु ख्रिस्ती धर्माची ईश्वरविषयक कल्पना परमावधीच्या अधोगतीस पोहोंचलेली असल्यामुळें त्यांचा ईश्वर जीवितविरोधी स्वरूपाचा झाला आहे; जीविताला घातुक बनला आहे !

**नीत्शेचा निर्णयः**—ख्रिस्ती धर्मांत सांगितलेले निरनिराळे चमत्कार घेऊन त्यांचें परीक्षण, अर्थात सप्रमाण खंडन, नीत्शेनें केलें आहे. या बाबतींतील त्याच्या टीकेचा गोषवारा देऊं ह्मटलें तरी ग्रंथविस्तार फार होईल ह्मणून तसा प्रयत्न करणें शक्य नाहीं.

धर्मामुळें सर्वस्वी नुकसान होतें असें नीत्शेचें मत नाहीं. धर्मापासून जे फायदे होतात ते त्याला मान्य आहेत. सत्तेचा उपयोग करतांना जे अडथळे होतात ते दूर करण्याचें साधन ह्मणून सत्ताधारी लोकांस धर्माचें हत्यार कामीं येतें. सामाजिक उपयुक्तता व सेवा या साठींच बहुतेक लोकांचें अस्तित्व असतें.

अशा लोकांना मनाची शांति मिळण्यास व आज्ञाधारकपणाची महती पटण्यास धर्म कारणीभूत होतो. **बहुजन समाजाच्या नशिबीं सेवादिकरून जीं हलकीं कामें येतात त्यामध्यें मोठेपण आहे असा ह्या लोकांत भास उत्पन्न करण्यास धर्माची फार मदत होते.** थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे सामाजिक घडी विस्कळूं न देतां जग चालविण्यास धर्म मदत करतो. परंतु सर्व प्रकारच्या बंधनांबरोबरच धर्माचीं बंधनेंही तोडून मनुष्याला अधिक उच्च स्थितींत म्हणजे अतिमानुषतेच्या कोटींत नेऊं पाहणाऱ्या नीत्शेला धर्माचें थोतांड साफ नापसंत आहे. आणि सर्व धर्मांत ख्रिस्तीधर्म त्यानें अधिक वाईट ठरविला आहे. '**गुलामी वृत्तीच्या लोकांपासून ख्रिस्ती धर्माचा जन्म झाला. समाजसत्तावाद व अराजकता हीं ख्रिस्ती धर्माचींच अपत्यें होत.** ख्रिस्ती धर्मांतील तत्त्वज्ञान तर सदोष आहेच. पण त्यापेक्षां ख्रिस्ती लोकांचें आचरण अत्यंत निंद्य आहे,' असें नीत्शे ह्मणतो. जगांतील इतर लोक ज्या प्रमाणें वागतात त्याच प्रमाणें ख्रिस्ती माणसाचेंही प्रत्यक्ष वर्तन असतें; परंतु इतरांपेक्षां आपण ख्रिस्तानुयायी असल्यामुळें वेगळे आहोंत असा वृथा गर्व ते करतात. यांचे आचार व मन अत्यंत ओंगळ असतात. नीत्शे ह्मणतो, 'त्यांचा श्वास माझ्या अंगावरून गेला तर प्राणघातक वायूंनीं जसें गुदमरून जावें तसें मला होतें ! ख्रिस्ती धर्मावर श्रद्धा ठेवणाऱ्या पूर्वकालीन लोकांचा मला इतका राग येत नाहीं. मनुष्यप्राण्याच्या बाल्यावस्थेंत दुबळेपणामुळें व अज्ञानामुळें त्यांच्या ज्या चुकीच्या कल्पना झाल्या त्याचें फळ ख्रिस्ती धर्म आहे. परंतु या चुकीच्या कल्पनेबद्दल तत्कालीन मनुष्यप्राण्यास

फारसा दोष देतां येत नाहीं. सदर दोष मुख्यतः परिस्थितीचा आहे. परंतु '**हल्लींच्या युगांत, या आपल्या सुधारणेच्या युगांत, ख्रिस्ती धर्मावर श्रद्धा ठेवणारा मनुष्य पाहिला म्हणजे माझ्या अंगाची आग होते.** अशा माणसांना क्षमा करावी असें मला वाटत नाहीं. हल्लींच्या युगांत ख्रिस्ती धर्माला कवटाळून बसणें असभ्यपणाचें लक्षण आहे. ख्रिस्ती धर्माचा कट्टा शत्रू म्हणवून घेण्यांत मला स्वतःला फार भूषण वाटतें. ख्रिस्ती धर्माचा मी अत्यंत तीव्र निषेध करतों. **हा धर्म अत्यंत भ्रष्ट आहे. मनुष्य जातीचा ख्रिस्ती धर्म शत्रू आहे; सडका मेंदू आणि घाणेरडें अंतःकरण यांचा मूर्तिमंत अवतार आहे; सूडाच्या आसुरी भावनेनें प्रेरित झालेला हा घाणेरडा आणि ओंगळ धर्म आहे. हा धर्म म्हणजे मनुष्य जातीवरचा कधींही धुवून न निघणारा कलंक आहे.** या धर्मावर वाटेल तेवढी विषारी टीका केली तरी ती सौम्यच होईल. भल्या बुऱ्या कोणत्याही साधनांनीं या धर्मावर हल्ला चढविण्यास मला दिक्कत वाटत नाहीं. हा धर्मच इतका वाईट आहे. कोणत्याही उपायांनीं ह्या धर्माला हाणून पाडतां आलें तर जगावर उपकारच होतील!' असें म्हणून नीत्शेनें ख्रिस्ती धर्मावरील आपला हल्ला पुरा केला आहे.

# भाग दुसरा.

## प्रकरण तिसरें.

### माणुसकीच्या पलीकडे.
### अथवा
### सुपरमॅन्.

तत्वें:—नीत्शे बॅले युनिव्हर्सिटींत असतांना लुडविश रुतिमेअर याच्याशीं त्याचा परिचय झाला. तो तेथें झुऑलजी व कंपॅरेटिव्ह अनॉटमीचा प्रोफेसर होता. माकड व मनुष्य यांची उत्पत्ति मूळ एकाच बीजा पासून झालेली असून हजारों वर्षांच्या विकासानें हल्लीं या दोन्ही जातींत इतकी तफावत दिसत आहे, असें त्याचें मत होतें. एकाच झाडाच्या दोन फांद्या असाव्या त्याचप्रमाणें मनुष्य व माकड ह्या एकाच वंशाच्या दोन शाखा आहेत, असें ह्या लोकांचें मत होतें. या मताचा नीत्शेवर बराच परिणाम झाला. मनुष्य व माकड यांचा मूळ वंश एकच आहे ही गोष्ट सिद्ध करण्यास फार मोठ्या प्रमाणावर व हजारों वर्षें प्रयत्न केले पाहिजेत असें नीत्शेनें एका ठिकाणीं ह्मटलें आहे. गुण आनुवंशिक असतात व एखाद्यानें नवीन गुण मिळविला तर तो

गुण त्याच्या पुढील पिढ्यांत आनुवंशिक रीतीनें उतरतो असें सर्व प्राणिशास्त्रवेत्त्यांचें मत होतें. हें मत रुतिमेअरला मान्य नव्हतें; तथापि नीत्शेला हें मत मान्य होतें. गुण अथवा स्वभावधर्म आनुवंशिक असले तरी वस्तुतः ह्या आनुवंशिकतेचें क्षेत्र संकुचित आहे व गति अत्यंत मद आहे. परंतु प्रत्यक्ष जगांत ही मंदगति व संकुचित क्षेत्र अनुभवास येत असूनही नीत्शेनें ह्या दोन्ही गोष्टींकडे दुर्लक्ष केलेलें दिसतें. तो आनुवंशिकतेचें क्षेत्र बरेंच विस्तृत व गति अधिक जलद आहे असें मानतो. सृष्टीची नैसर्गिक निवड सदैव चालू आहे, तथापि मनुष्यानें आधुनिक सुधारणांचें थोतांड निर्माण करून सृष्टीच्या ह्या कार्यास मोठा घातुक पायबंद घातला आहे. अशा परिस्थितींत मनुष्यानें स्वतःपुरती हेतुपुरस्सर व कृत्रिम निवड केल्यानें नैसर्गिक निवडणुकीच्या कार्यास मदत होते; आणि ह्मणून प्रत्येक मनुष्यानें स्वतःच्या उन्नतीचा बुद्धिपूर्वक प्रयत्न करून निसर्गाच्या कार्यास हातभार लाविला पाहिजे. **मनुष्य प्रयत्न करील तर त्याला वाटेल ती पदवी प्राप्त करून घेतां येईल,** अशी नीत्शेची विचार सरणी होती. नर ‘ करनी करे तो नरका नारायण हो जाय ’ अशी आपल्यांत जी ह्मण आहे त्यांतील तात्पर्याशीं नीत्शेचें मत जुळतें. सुधारणांच्या खोट्या मुलावणींस बळी पडून आह्मीं मानवी प्रगतीचा केवळ चिवडा करून टाकिला आहे. मूर्खपणाच्या कल्पनांनीं आपण अशा अडचणींच्या व घोंटाळ्याच्या परिस्थितींत येऊन पोहोंचलेलों आहोंत कीं त्यांतून आपली सुटका होणें मुष्किलीचें झालें आहे. ‘ ह्या अडचणींतून बाहेर पडण्यासाठीं **माणसानें स्वतःच्या उन्नतीचा बुद्धिपुरस्सर**

**प्रयत्न केला पाहिजे आणि आपल्या प्रयत्नानें नराचा नारायण बनलें पाहिजे.** ' अशा उत्तेजक शब्दांनीं समाजाला प्रवृत्ति मार्गावर आणण्याचा प्रयत्न नीत्शेनें केला आहे.

सुप्रजाजननशास्त्राचे विधायक आणि विघातक असे दोन भाग आहेत. या शास्त्रांतील विघातक बाजूवर नीत्शेनें जे विचार प्रदर्शित केले आहेत ते मननीय आहेत. गुन्हेगार व गर्मीउपदंशादिक रोगांनीं पछाडलेल्या लोकांस प्रजोत्पादनाची मनाई असावी, असें नीत्शेचें मत आहे. अमेरिकेंतील कांहीं संस्थानांनीं प्रत्यक्ष कायदे करून सदरील दोन्ही तऱ्हेच्या लोकांस प्रजोत्पादनाची बंदी केली आहे ही गोष्ट वाचकांस माहित असेलच. सुप्रजाजननशास्त्राची जी विधायक बाजू आहे तींत नीत्शेला फारशी कामगिरी करतां येणें शक्य नव्हतें. तथापि आपली विवाहाची पद्धत कशी सुधारली पाहिजे या विषयीं त्यानें प्रदर्शित केलेले विचार लक्षांत घेण्यासारखे आहेत. शास्त्रीय दृष्ट्या सुप्रजाजननशास्त्राची विधायक बाजूची प्रगति नीत्शेला फार करतां आली नाहीं. तथापि त्यानें अतिमानुषतेची जी कल्पना पुढें ठेविली ती अत्यंत महत्वाची आहे व ही कल्पना विधायक बाजूस समाविष्ट करतां येईल. जननशास्त्राचें द्वारें मनुष्यानें **आपल्यापेक्षां अधिक श्रेष्ठ व उन्नत जात तयार केली पाहिजे व अतिमानुषतेचा पल्ला गांठला पाहिजे असें ध्येय नीत्शेनें पुढें ठेविलें आहे.** कोणत्या गुणांची जोपासना करावयाची व जननशास्त्राच्या दृष्टीनें ती कशी साध्य करावयाची याचा तपशील नीत्शेनें दिलेला नसल्यामुळें अतिमानुषतेची त्याची कल्पना शास्त्रीयदृष्ट्या फारशी महत्वाची

नाहीं. तथापि मनुष्याला प्रवृत्ति मार्गावर राहून प्रगति करण्यास ह्या कल्पनेचा अतिशय उपयोग होईल ही गोष्ट कोणासही नाकबूल करतां येणार नाहीं. मनुष्याच्या वरच्या दर्जाचा अतिमानुष ह्या अर्थाचा 'युबेरमेन्श' हा जर्मन शब्द १६८८ सालीं प्रसिद्ध झालेल्या एका काव्यांत आहे. आपल्याकडे मनुष्यापेक्षां श्रेष्ठ जात असल्याची कल्पना बरीच जुनी आहे. ऋग्वेदांत **"यत्रा नरो देवयन्तो युगानि वितन्वते प्रतिभद्राय भद्रम्"** असें वाक्य आहे. व मनुष्याच्या वर साधु, जीवन्मुक्त वगैरे कोटि कल्पिलेल्या आहेत. सुप्रसिद्ध जर्मन कवि गटे याच्या काव्यांतही श्रेष्ठ मनुष्य जातीची कल्पना आहे. गटेच्या कल्पनेवरूनच नीत्शेला अतिमानुषतेची कल्पना सुचली असावी असें कित्येकांचें मत आहे. सुप्रसिद्ध तत्ववेत्ता ई. जी. ड्युहरिंग ह्यानें सन १८६५ मध्यें 'दी व्हॅल्यू ऑफ लॉईफ' या नांवाचें पुस्तक लिहिलें आहे. त्यांत मनुष्यप्राण्याच्या विकासाचा विचार करून त्यानें असा निष्कर्ष काढला कीं, मनुष्यजातीची उन्नति होत होत सदर जातीचें पर्यवसान मनुष्य जातीहून श्रेष्ठ जात निर्माण होण्यांत होणार आहे. ड्युहरिंगच्या ह्या कल्पनेचा परिणाम नीत्शेच्या मनावर झाला असण्याचा संभव आहे. अत्यंत बुद्धिमान व्यक्ति किंवा विभूति सृष्टींतील गुणावगुणांच्या चमत्कारिक संयोगानें कधीं कधीं प्रादुर्भूत होते. तथापि मनुष्य जातीची सामान्यत: सावकाश सदैव प्रगति होत असते असे नीत्शेचें मत होतें. त्याच्या सुपरमॅन ह्या ग्रंथांत चमत्कारामुळें विभूति अवतार घेते अशी कल्पना मधून मधून डोकावत असलेली दिसून येते. तथापि

एकाद्याच व्यक्तीला लागू पडणारी ही कल्पना सोडून दिली तर सबंध मनुष्य जातीचा विचार करतांना सदैव मंद प्रगति हाच नियम नीत्शेला मान्य आहे. **मनुष्य जातीची प्रगति होतां होतां हजारों वर्षांनीं ह्या जातीचें पर्यवसान अतिमानुष अशा मनुष्य जातीहून श्रेष्ठ व नवीन जातींत होईल,** असा सिद्धांत नीत्शेनें प्रतिपादिला. मानुष जातींतून अतिमानुष जातींत संक्रमण होत असतांना हजारों वर्षांचा कालावधि लागणार असल्यामुळें ह्या संक्रमणावस्थेंत अनेक टप्पे नीत्शेनें काल्पिले. हल्लींच्या मानवांतून शरीरानें व मनानें वळकट असलेल्यांची एक नवीन सत्ताप्रिय जात निर्माण होईल. अशी जात हल्लींच निर्माण होऊं लागली आहे असें नीत्शे ह्मणतो. ही जात निर्माण झाल्यावर ती युरोपखंड पादाक्रांत करील. ह्या नवीन जाती पासून शुद्ध युरोपिअन बीजाची नवी जात पुढें निर्माण होईल. हे लोक ह्मणजे नीत्शेनें ज्यांनां उच्च मानव अशी संज्ञा दिली आहे ते लोक होत. ह्या उच्च मानव जातीची आणखी प्रगति होऊन त्यांतून मानवापेक्षां भिन्न अशी अतिमानुष जात निर्माण होईल. ह्मणजे **हल्लींच्या मानवापासून अतिमानुषांत आपलें संक्रमण होत असतांना नीत्शेनें बलिष्ठ मानव व उच्च मानव असे दोन टप्पे कल्पिले आहेत.** मानवांतून अतिमानुषांत संक्रमण होत असतांना आपली सदैव प्रगति होत जाणार असें नीत्शेचें ह्मणणें होतें.

मानवी विकासा विषयीं विद्वान लोकांमध्यें जे तर्क जाहेत त्यांत थोडा थोडा मतभेद आहे. मानवांची दिवसेंदिवस प्रगति

होत आहे कीं पीछेहाट होत आहे ह्या संबंधींही पंडितांत दुमत आहे. कांहीं लोकांचें ह्मणणें देवानें जग निर्माण केलें तेव्हां दैवी गुणांच्या योगानें मनुष्य प्राणी अधिक युक्त होता; व तेव्हांपासून सदर गुणापासून च्युत होत मनुष्यप्राणी सदैव अधोगतीस जात आहे व तो तसाच पुढेंही जात राहणार. ह्या मताचे लोक दिवसेंदिवस कमी होत आहेत; आणि एकंदरींत मनुष्य प्राण्याची उन्नति होत आहे असें मत बहुतेकांस मान्य होत आलेलें आहे. कांहीं विद्वानांचें मत सदर प्रगति रहाटगाडग्याप्रमाणें होत आहे असें आहे. ह्मणजे या लोकांच्या मतें आज खालीं असलेला मनुष्य प्राण्यांचा भाग उद्यां वरती जाणार व वर जातां जातां परमावधीच्या उच्च टोंकावर गेल्यानंतर रहाटाचे लोट्याप्रमाणें पुन्हा तेथून घसरत विहिरीच्या बुडाशीं येणार. ह्या लोकांच्या मतें सूर्यचंद्रादिकांचीं भ्रमणावलयें जशीं अंतरिक्षांत ठरलेलीं आहेत तद्वतच मानवी प्रगतीची भ्रमणरेषा वर्तुलाकार अथवा लंबवर्तुलाकार आहे. ह्यालाच चक्रनेमिक्रम अशी संज्ञा आहे. दुसऱ्या कित्येक पंडितांच्या मतें मानवी प्रगति चक्रनेमिक्रमानें होत नसून ती समुद्रवीचिन्यायानें होते. भरतीचे वेळीं समुद्राच्या लाटा जशा पुढें मागें जात येत असतात परंतु एकंदरींत भरतीचें पाऊल पुढें पडत असतें, त्या प्रमाणें मनुष्याची प्रगति होत असते असें या लोकांचें ह्मणणें आहे. समुद्राच्या लाटांप्रमाणें पुढें मागें होण्याची मानवी प्रगतीची प्रवृत्ति नसून नेहमीं मानवी प्रगति पुढें पुढेंच जात असते असें कांहीं विद्वानांचें ह्मणणें आहे.

सुपरमॅनमध्यें नीत्शेनें जें मत प्रतिपादिलें आहे तें या शेवटच्या मताशीं जमतें.

निसर्गनियमाप्रमाणें मानवांची प्रगति होत आहे परंतु ती अर्थातच मंद गतीची आहे. अद्यापि अर्वाचीन मनुष्य प्राचीन मानवाचें पुढें फारसा गेलेला नाहीं. सामान्य मनुष्य अजूनही अदूरदृष्टी, हेकट व स्वार्थबुद्धि असतो; त्याला पारमार्थिक दृष्टि नसते. त्यामुळें आपल्या पुरतेंच पाहण्याची त्याची वृत्ति असते. आपण कोठून आलों, कोठें चाललों, तसेंच ज्या मानववंशांत आपण जन्म घेतला त्या वंशासाठीं आपण काय केलें पाहिजे, अशा प्रकारचा विस्तृत दृष्टीचा विचार सामान्य मनुष्य करीत नाहीं. आपल्याच आयुष्यापुरतें पाहण्याची संकुचित दृष्टि ठेवल्यानें आपल्या आयुष्यापलीकडे टिकण्याजोग्या मोठमोठ्या संस्था अथवा विचारपरंपरा निर्माण करण्याकडे सामान्य मनुष्याचें लक्ष नसतें. साठाव्या वर्षी आक्रोडाचीं झाडें लावणाऱ्या मनुष्याची कृति अशा लोकांस वेडेपणाची वाटते. आपण लावलेल्या झाडांचीं फळें आपल्याच हयातींत आपल्याच हातीं आलीं पाहिजेत अशा संकुचित विचारांचे हे लोक असतात. यामुळें हजारों वर्षें काळजीपूर्वक संगोपन केल्यानंतर ज्या संस्था फलदायी होणार अशा संस्था स्थापन करण्याकडे त्यांचें लक्ष नसतें. संकुचित विचाराचा अर्वाचीन मनुष्य हा बौद्धिक दृष्ट्या एकाद्या खुळ्या माणसाप्रमाणें हास्यास्पद ठरतो. सुखाची जी खुळचट कल्पना अशा माणसांत असते तीच ह्या बौद्धिक खुजटपणास जबाबदार असते. सरळ व निरुपद्रवी राहून आपल्या

पुरता, व तेवढ्याच संकुचित दृष्टीनें आपल्या आसपासच्या लोकांपुरता, विचार करणारे सामान्य लोक असतात. असल्या सामान्य वृत्तीच्या लोकांचें ध्येय अथवा साध्य फारसें उच्च नसतें. नदीच्या प्रवाहा बरोबर जसे लहान लहान गोटे वहात असतात तसेच हे लोक कालाच्या प्रवाहाबरोबर वहात जातात. मानवी प्रगतीला बुद्धिपुरस्सर हात भार लावण्याचें काम यांचे हातून होत नाहीं. कालाच्या निसर्गसिद्ध प्रवाहाला जबरदस्तीनें इष्ट वळण लावण्याचा जोम ज्यांच्या अंगीं आहे असे पुरुष क्वचित निर्माण होतात. सामान्य मनुष्य कालचक्रापुढें मान वांकवून शरण जातो. कालचक्रापुढें मान न वांकवितां त्याच्या गतीला विरोध करणारे व मानवी प्रगतीच्या दृष्टीनें इष्ट वळण लावणारे लोक असंख्य निर्माण झाले पाहिजेत. आजकालची शास्त्रीय प्रगति पाहिली तरी त्यावरून सुद्धां मानवी दृष्टी अद्याप फारच संकुचित आहे हेंच सिद्ध होतें. मानस शास्त्र, तत्त्वज्ञान, वेदांत, इत्यादि शास्त्रें अद्यापि बाल्यावस्थेंत आहेत. उलटपक्षीं ज्ञानेंद्रियांच्या पुराव्यानें जीं शास्त्रें सिद्ध करतां येतात त्यांची बरीच प्रगति झालेली आहे. अर्वाचीन मनुष्याची दृष्टि फारशी पारमार्थिक नसून बहुधा केवळ आधिभौतिक असते. ह्यामुळेंच असें होतें. मानसशास्त्र, वेदांत, वगैरे विषयांत प्रत्यक्ष प्रमाण शक्य नसल्यामुळें असल्या गहन विषयांच्या विचारांत मनुष्य फारसा गुंतून रहातच नाहीं. प्रत्यक्ष प्रमाणांनीं सिद्ध होणाऱ्या शास्त्रांची प्रगति बरीच झालेली आहे. विशेषतः प्राणिशास्त्रानें बरीच अघाडी मारिली आहे. कोणतीही गोष्ट पचन होण्यापूर्वी लाळ वगैरेचा मारा करून आपल्या सारखी करून घ्यावयाची व नंतर

पचवावयाची असा शरीरशास्त्राचा नियम आहे. तत्त्वज्ञान व युक्तिवाद हीं तरी काय आहेत ? कोणतीहि बुद्धिग्राह्य गोष्ट बुद्धीला **पचविण्या योग्य करून** देण्याची कामगिरी युक्तिवाद व तत्वज्ञान करतात.

शारीरशास्त्रावर नीत्शेची फार मदार असे. अगम्य आणि अज्ञेय अशा ईश्वराविषयीं शोध लावण्यासाठीं नसत्या उठाठेवी करीत बसण्यापेक्षां शारीरशास्त्र नीत्शेला अधिक महत्वाचें वाटलें. ईश्वराचा शोध लावण्यावर मनुष्याचा मोक्ष अवलंबून नाहीं; तर मनुष्य जातीला पोषक अशा गोष्टींचा शोध लावण्यावरच मनुष्य जातीचा मोक्ष अवलंबून आहे; असें नीत्शेचें मत होतें.

मनुष्य ह्मणजे त्याचें शरीर; त्याच्या पलीकडे कांहीं नाहीं. ह्या शरीरांतच असणाऱ्या एका गोष्टीस आत्मा ह्मणतात. आपले विचार व संवेदना यांच्या पाठीमागें अज्ञात पण बलवान असें जें कांहीं आहे तो आत्मा मनुष्याच्या शरीरांतच असतो ह्मणूनच 'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्' हेंच अखेरीस खरें ठरतें. **मनुष्यानें आत्माच्या वसतिगृहाची ह्मणजे शरीराची अत्यंत काळजी घेतली पाहिजे.** हें गृह टिकाऊ व मजबूत करण्याची खटपट केली पाहिजे. ही गोष्टच अतीशय महत्वाची आहे. या खेरीज इतर वरकड गोष्टी त्या मानानें किमान दर्जाच्या आहेत. **व्यक्तीनें स्वशरीराची जशी काळजी घ्यावयाची त्याचप्रमाणें अखिल मानववंश हा एक विराट पुरुषाचें शरीर असल्यामुळें तेंही मजबूत व टिकाऊ**

**कमें करावयाचें याचा विचार करतांना नीत्शेला अतिमानुषतेची कल्पना सुचली.** या प्रमाणें अतिमानुषतेच्या कल्पनेपर्यंत पोहोंचल्यावर नीत्शे ह्मणतो, अतिमानुष ह्मणजे काय हें मी आतां तुह्माला शिकवितों. हल्लींचा जो मानवप्राणी आहे त्याच्या पलीकडे संक्रमण करून मनुष्याच्या पलीकडच्या कोटींत आपल्याला जावयाचें आहे. मानवी विकासाचें ध्येय अतिमानुष होणें हें आहे. या पलीकडच्या पायरीवर जाण्याकरितां तुह्मी आजपर्यंत काय केलें ? प्राणीशास्त्राचा अभ्यास केला तर असें दिसून येईल कीं मनुष्यतेवर प्राण्यांनीं आपल्या पलीकडची पायरी गांठण्याचा आटोकाट प्रयत्न केला आहे. सर्व प्राण्यांत शहाणा व उन्नत असें स्वतःस समजणाऱ्या मनुष्यानें मात्र बुद्धिपुरस्सर असें अजून या बाबतींत कांहींच केलेलें नाहीं. अतिमानुष होण्यासाठीं दैवी गुण वाढविण्याचें सोडून आपण पशुवृत्तीच वाढवीत आहोंत. पशूंतूनच प्रगति होऊन आपण मनुष्य या पदवीस पोहोचलों. आतां पशुवृत्ति वाढवून आपणास पुन्हा पशूंत जावयाचें आहे कीं काय, याचा माणसानें विचार केला पाहिजे. या पीछेहाटींचा परिणाम काय होईल याचा विचार करा. माकडापासूनच मनुष्य उत्पन्न झाला पण मनुष्य आणि माकड ह्यांत आज केवढें अंतर आहे ? मनुष्याचे दृष्टीनें माकड हास्यस्पद नाहीं काय ? आपण अतिमानुष होणार असें ह्मणतों आणि कृति तर पिछेहाटीची दिसते. अतिमानुष ह्मणजे माणसाहून अधिक उन्नत कोटि असा अर्थ असतांना आपलें वर्तन जर पशुवृत्ति वाढविणारें राहिलें तर अतिमानुष ह्मणजे हास्यास्पद व लज्जास्पद अशी माकडाप्रमाणेंच एक कोटि तयार होईल ! ह्या

दृष्टीनें मनुष्याचें आजचें वर्तन शरम वाटण्यासारखें आहे. खरोखरीच अतिमानुष व्हावयाचें असेल तर असलें निंद्य वर्तन तावडतोब सोडून दिलें पाहिजे. **मनुष्यानें पशुवृत्ति कमी करून दैवी गुणांची वाढ करण्याचा बुद्धिपुरस्सर प्रयत्न केला पाहिजे.** पृथ्वीवरील आपलें ध्येय अतिमानुष होणें हेंच आहे. मी अतिमानुष होईन असा आजपासून निश्चय करा. भूमातेशीं निमकहराम होऊं नका. **पृथ्वीपलीकडील आशांच्या मृगजळाला भुलूं नका.** पृथ्वीच्या पलीकडील गोष्टींची काल्पनिक चित्रें दाखवून जनतेची दिशाभूल करणारे लोक थापाडे आहेत. असल्या गोष्टींवर त्यांचा स्वतःचा कदाचित विश्वास असेल. ते बुद्धिपुरस्पर लोकांना फसवितात असें माझें ह्मणणें नाहीं; पण ते ज्या गोष्टी सांगतात. तें मृगजळ आहे. त्यांची शिकवण विषारी आहे. विशेषतः ह्या **पारलौकिक मृगजळाच्या मागें लागून पृथ्वीवरील ध्येयाकडे दुर्लक्ष करणें अत्यंत अनिष्ट आहे. आकाशाकडे डोळे लावून पृथ्वीवर चालणारा मनुष्य ठेंचाळल्याशिवाय रहाणार नाहीं.** पृथ्वीवर जों पर्यंत रहावयाचें आहे तों पर्यंत पृथ्वीवरील ध्येयाकडे कोणीही दुर्लक्ष करतां कामा नये, " अशा तऱ्हेचा उत्तेजक उपदेश करून नीत्शे ह्मणतो, " बंधूनो ! मी सांगतों तें ऐका. अतिमानुष्य व्हा. पशुवृत्ति सोडून द्या. दैवी गुणांची जोपासना करा. भूमातेशीं इमान राखा; आणि मनुष्याच्या पलीकडील पायरी लवकर गांठा. **पशु व अतिमानुष ह्या दोन कोटींतील मनुष्य हा एक दुवा आहे.** मनुष्य व पशु ह्या दोन टेंकड्या असून त्यांच्यामध्यें भयंकर खोल अशी एक दरी आहे. मनुष्य ह्या दरीला

बांधलेल्या दोरीप्रमाणें आहे. ह्या दोरीशीं तुह्मी अधिक वेळ खेळत बसाल तर नाश पावाल. थांबूं नका ! चळूं नका ! इकडे तिकडे पाहूं नका ! मध्यें खोल भयंकर दरी आहे ! जरा थांबाल तर एकदम खोल दरींत पडून नामशेष व्हाल. ह्मणून दोरीशीं खेळत न बसतां एकदम पुढचा मार्ग आक्रमण्यास लागा. अतिमानुषतेचें शिखर गांठा. ज्ञान मिळविण्यासाठीं आयुष्य वेंचणारा व आपल्या ज्ञानार्जनाचा उपयोग पुढें येणाऱ्या अतिमानुष पिढीचे अस्तित्वासाठीं करणारा मनुष्य मला प्रिय वाटतो. अतिमानुष पिढीचें आगमन सुकर व्हावें ह्मणून पुढील मार्ग हल्लींच्या माणसांनीं चोखाळून ठेवणें अवश्य आहे. पृथ्वीवर अमृतवर्षाव करणाऱ्या मेघांनीं आकाश भरून गेल्यावर त्यांतून ज्याप्रमाणें पहिला मोठा टपोरा थेंब जमिनीवर पडतो आणि नंतर वीज चमकूं लागते त्याच प्रमाणें अतिमानुषतेचें आगमन सुचविण्यासाठीं मी प्रथम पुढें आलों आहें. अतिमानुषतेची वीज मागाहून येत आहे. तिच्या स्वागतासाठीं तयार रहाण्याचा संदेश जनतेला सांगण्याचें काम माझें आहे. "

**जीवित ह्मणजे काय ?:**—नीत्शेचें अतिमानुषतेचें स्वप्न नीट रीतीनें कळण्यासाठीं जीविताविषयीं त्याच्या ज्या कल्पना आहेत त्या समजणें इष्ट आहे. त्याच्या मतें जीवित ह्मणजे सामान्य पोषक पद्धतीनें एकत्रित केलेल्या अनेक शक्तींचा समूह. जीवांत अनेक परस्परविरोधी शक्ती झगडत असतात व त्यांची असमान वाढ होत असते; व या सर्व धडपडींतून शक्तीचें वर्चस्व प्रादुर्भूत होत असतें. बाहेरच्या परिस्थितीच्या मानानें आंतली परिस्थिति

कमी जास्त करून बाहेरच्या परिस्थितीशीं समरस करण्याचा कारखाना ह्मणजे जीवित होय असें कित्येक शास्त्रज्ञांचें मत आहे. तें नीत्शेला कबूल नाहीं. त्याच्या मतें **बलोपासना अथवा प्रभुत्वाची इच्छा हेंच जीविताचें सार होय. प्रभुत्वाच्या अंतर्गत इच्छेनें मनुष्य बाहेरच्या परिस्थितीवर कबजा करूं पाहतो.** बाहेरच्या परिस्थितीशीं अंतर्गत शक्तींचा व्यापार मिळता करून घेण्याऐवजीं प्रभुत्वाच्या इच्छेनें जीव बाहेरच्या परिस्थितीवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करीत असतो. अर्थातच बाहेरच्या परिस्थितीवर जीवाला वारंवार ठोसे लगावावे लागतात; इजा करावी लागते; आपल्याशीं विसदृश असणाऱ्याशीं धडपड करावी लागते. दुबळ्यांना जिंकावें लागतें. दडपशाही व क्रूरपणा करावा लागतो. ज्याप्रमाणें कुंभारली किडे पकडून आपल्या बिळांत आणते व त्यांना टोंचून टोंचून कुंभारली बनवते, त्याप्रमाणें इतरांस दडपून त्यांच्यावर शारीरिक व मानसिक दाब ठेवून त्यांस आत्मसात् करण्याकडे जीवाची प्रवृत्ति असते. 'जीवो जीवस्य जीवनम्' हें तत्त्व सृष्टींत अहर्निश चालू आहे. त्यामुळें दडपशाही, रक्तशोषण, इत्यादि गुण जीवाचे स्वभाव-धर्म होत. जीवाची बरोबर व्याख्या करण्याजोगी मानवी ज्ञानाची अद्यापही प्रगति झालेली नाहीं. अर्थात् नीत्शेनें जी व्याख्या केलेली आहे तींतही दोष दाखवितां येतील, नाहीं असें नाहीं. तथापि त्याच्या व्याख्येंत सत्यांशही बराच आहे, ही गोष्ट सर्वांला कबूल करावी लागेल.

**चक्रनेमिक्रम**:--अतिमानुषता व सुप्रजाजननशास्त्र या विषयींचीं नीत्शेचीं मतें तपशीलवार कळण्यापूर्वी मानवी प्रगति चक्रनेमिक्रम-

न्यायानें होते असें नीत्शेचें जें मत होतें तेंही विसरून उपयोगी नाहीं. अतिमानुषतेची कल्पना व चक्रनेमिक्रमाची कल्पना ह्या अत्यंत परस्परविरोधी कल्पना आहेत. नीत्शेच्या मतें **विश्व हें शक्तीचें अनादि व अनंत असें विराट् स्वरूप आहे परंतु तें अपरिमेय नाहीं**. मानवी बुद्धीला विश्वाची लांबी, रुंदी व त्यांत सांठविलेली शक्ति प्रत्यक्ष मोजतां न आली तरी **ठराविक जागेंत विश्व पसरलेलें आहे व त्यांतील शक्तीही ठराविक आहे**. समुद्राच्या लाटांप्रमाणें विश्वांतील एक अथवा एकसमयावच्छेदेंकरून अनेक शक्तींचा किंवा शक्तींच्या लाटांचा खेळ अहर्निश चालू आहे. समुद्राला ज्या प्रमाणें भरती व ओहटी असते त्याचप्रमाणें या शक्तींच्या लाटांनाही भरतीओहटी असते. समुद्राच्या भरती ओहटीची कालगणना करतां येते. विश्वांतील शक्तींच्या लाटांची कालगणना अजून करितां येत नाहीं. विश्वासंबंधीचें मानवी ज्ञान प्रगल्भ दशेला अद्यापि आलेलें नाहीं. तरी **भरती ओहटीचा काल निश्चित आहे.** यांत संशय नाहीं. हुबेहूब समुद्राच्या प्रमाणेंच विश्वाचीही भरतीओहटी असते. हेराक्लिटसच्या मतांची छाप नीत्शेवर पडलेली होती व त्यामुळें विश्वाची गति चक्रनेमिक्रमाची आहे असें नीत्शेचें मत बनलें.

चक्रनेमिक्रमाची कल्पना सुचल्यावर आपल्याला हा अजब नवा शोध लागला असें नीत्शेला झालें. वास्तविक चक्रनेमिक्रमाची कल्पना अतिशय जुनी आहे. प्राचीन आर्य, बाबीलोनियन, इजिप्शियन वगैरे तत्ववेत्त्यांस ही कल्पना होतीच.

नीत्शेच्या मतें **विश्वांत सांठवलेली शक्ति ठराविक आहे;**

**एवढेंच नव्हे तर त्या शक्तींचीं केंद्रें सुद्धां ठराविक आहेत.** विश्वाविषयींच्या इतर कल्पना अशा नक्की नसल्यामुळें नीत्शेच्या मतें त्या टाकाऊ आहेत. **शक्तीचें परिमाण ठराविक व शक्तींचीं केंद्रेंही ठराविक** असल्यामुळें निरनिराळ्या शक्तींचे यदृच्छया जे संयोग होणार त्यांची संख्याही गणितदृष्टया अर्थातच ठराविक असणार आणि **या सर्व संयोगाच्या मिश्रणांतून संक्रमण करणें विश्वाला प्राप्त आहे. अर्थात् प्रत्येक संयोगांची अनंत कालानें कां होईना पण पुनरावृत्ति होणारच.** ही पुनरावृत्ति एकदांच नव्हे तर अनेकदां किंबहुना अनंत वेळां झाली पाहिजे. एक संयोग झाल्यानंतर पुनः त्याची हुबेहूब पुनरावृत्ति होण्याच्या दरम्यानच्या कालांत जे जे अनेक संयोग घडले त्यांचीही पुनरावृत्ति होणार असल्यानें ह्या क्रमाला अर्थातच रहाटगाडग्याप्रमाणें वर्तुलाकार कक्षेचें स्वरूप येतें. आज जी गोष्ट घडली तीच गोष्ट पूर्वीं अनेकदां हुबेहूब घडली असली पाहिजे. हीच चक्रनेमिक्रमाची मूलभूत कल्पना होय. नीत्शेची कल्पना पिथॅगोरास वगैरे जडवादी तत्ववेत्त्यांहून भिन्न आहे. पिथॅगोरासच्या मतें विश्वाला ध्येय आहे व त्या ध्येयाला पोहोंचल्यावर सर्वत्र समता होईल. अर्थात् विश्व शून्यांत विलीन होईल. नीत्शेच्या मतें विश्व शून्यांत विलीन होणें शक्य नाहीं. तसें जर असतें तर विश्व निर्माण होऊन अनंत काल लोटलेला असल्यामुळें विश्वानें ह्या पूर्वींच ध्येय गांठलें पाहिजे होतें. परंतु विश्व अजूनही शून्यांत केव्हांही विलीन झालेलें नसल्यामुळें जडवादाच्या मताला आधार रहात नाहीं. नीत्शे ह्मणतो " विश्व ध्येयाला पोहोंचून सर्वत्र समता होणें शक्य नाहीं. निरनिराळ्या

शक्तींचा झगडा सुरू राहून विश्वाची गात वतुळाकार कक्षेनें चक्रनेमिक्रमानें अखंड फिरत रहाणार. ह्या क्रमाला अंत नाहीं."

चक्रनेमिक्रमाच्या रहाटगाडग्याला अतिमानुपतेची कल्पना विरोधी आहे. काल अनंत आहे व शक्तींचीं केंद्रेंहीं असंख्य आहेत असें मानलें तर चक्रनेमिक्रम अशक्य ठरतो. नीत्शेच्या मताप्रमाणें काल अनंत मानून शक्तींचीं केंद्रें मात्र ठराविक मानलीं तरी चक्रनेमिक्रम अगदीं अशक्य नसला तरी अशक्यप्राय आहे असें कोणीही गणिती सांगू शकेल. कारण शक्तींचीं केंद्रें ठराविक असलीं तरी तीं कोट्यवधि किंबहुना आपल्या कल्पनाशक्तीला परमावधीचा ताण देऊन जी सर्वांत मोठी संख्या कल्पितां येईल तितकीं ह्मणजे जवळ जवळ असंख्यअसणार व काळ अनंत असल्यामुळें ह्या जवळ जवळ अनंत केंद्रांचे वेगवेगळे संयोग होत असतां असतां आज झालेली गोष्ट हुबेहूब पुनः तशीच घडणें हें प्रायः अशक्य होईल. केंद्रें परिमित व काल अनंत मानिल्यानें जर चक्रनेमिक्रम अशक्य प्राय ठरतो तर काल व केंद्रें दोन्हीही अपरिमित मानल्यास चक्रनेमिक्रम निःसंशय अशक्य होतो. मानवी विकासाविपयीं संस्कृतीच्या बाल्यावस्थेंत प्राचीन लोकांनीं जे तर्क बसविले त्यांच्यापेक्षां अर्वाचीन लोकांनीं विचारांत प्रगति केलेली आहे असा अर्वाचीन लोकांचा जरी अभिमान असला, तरी प्रत्यक्ष शक्याशक्यतेच्या दृष्टीनें विचार केल्यास प्राचीनांचे व अर्वाचीनांचे दोघांचेही तर्क सारख्याच किंमतींचे ह्मणजे तात्विक दृष्ट्या दोन्हीही सदोप व अव्यवहारिक ठरतात. **फ्रेड्रिक सॉडी** नांवाच्या गृहस्थानें सन

१९०९ सालामध्यें 'धी इंटरप्रिटेशन ऑफ रेडियम' या नांवाचें पुस्तक लिहिलें आहे. त्यांतही अशाच अर्थाचे उद्गार त्यानें काढले आहेत.

चक्रनेमिक्रमाच्या अवजड रहाटगाडग्यांत अडकलेल्या मनुष्यानें मानवी विकासाचे प्रवाहाबरोबर वाहत जाणें अपरिहार्य आहे असें नीत्शेचें मत होतें. मनुष्य ह्या रहाटगाडग्यावर आरूढ झालेला असल्यामुळें ह्या रहाटगाडग्याचे प्रवासांत त्याच्या वांट्याला जें जें सुखदुःख येईल तें तें त्यानें आनंदानें कर्तव्यदृष्टीनें भोगलें पाहिजे. ती आपत्ति भोगल्यानें मानवी विकासाच्या गतीला मदत होते अशी भावना ठेवून निधड्या छातीनें आपत्तींचा अंगिकार केला पाहिजे. चक्रनेमिक्रमाच्या न्यायानें पुनः पुनः त्याच गोष्टी घडल्यानें श्रेष्ठ मनुष्यांचें धैर्य कसोटीस लागते; व त्यांना योग्य वळण लागतें. निराशावाद्यांप्रमाणें **जगाला टाळून रानांत दडून बसणें पळपुटेपणाचें लक्षण आहे. मानवी विकासाची चाड बाळगणाऱ्या भावी पिढ्यांनीं असला पळपुटेपणा सोडून दिला पाहिजे. निवृत्तिमार्ग मानवी विकासाला विरोधी आहे.** स्वतः वैयक्तिक मोक्ष मिळवून जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटूं पहाणें मानवी विकासाच्या दृष्टीनें इष्ट नाहीं. मानवी विकासाच्या गाड्याला आपल्या हातून मदत होण्यासाठीं मनुष्यानें सुखाबरोबरच दुःखेंही आनंदानें भोगिलीं पाहिजेत. एवढेंच नव्हे तर वारंवार जन्ममरणाचा फेरा पत्करिला पाहिजे. साधुश्रेष्ठ तुकाराम महाराजांनीं 'तुका ह्मणे गर्भवासीं सुखें घालावीं आह्मासीं' अशी ईश्वराची करुणा भाकिली

आहे त्याची आठवण नीत्शेचे हे विचार वाचतांना वाचकांस स्वाभाविकच होईल.

नीत्शेनें जीविताची जी व्याख्या केली आहे ती फार तेजस्वी व उद्बोधक आहे. सुप्रजाजननशास्त्रवाद्यांचें अतिमानुषतेविषयीं जें सुखस्वप्न आहे त्याला ही व्याख्या चालना देणारी आहे. **विसदृश व दुबळे यांना जिंकणें, दडपशाही करणें, प्रभुत्वाची इच्छा करणें, व हट्टी आणि लहरी निसर्गावर जय मिळवून जीविताला विघातक असणाऱ्या सर्वांस निर्मूल करणें हेंच जीविताचें** सार होय. असें नीत्शेचें मत आहे. विश्वाला ध्येय नाहीं असें नीत्शेचें मत असल्यामुळें अतिमानुषतेच्या त्याच्या कल्पनेस गालबोट लागतें असा नीत्शेवर कित्येकांचा आक्षेप आहे. वास्तविक, विश्वाला ध्येय नाहीं असें ह्मटलें तरी नीत्शेच्या अतिमानुषतेच्या कल्पनेला कमीपणा येण्याचें कांहीं एक कारण नाहीं. विश्व हा एक नयनमनोहर चमत्कार आहे असा नीत्शेचा जो सिद्धांत होता तोच त्या आक्षेपास परभारें खोडून काढूं शकतो. विश्वाला आदिअंत नसला तरी त्यामुळें अतिमानुषतेची कल्पना कमी किंमतीची कां व्हावी हें कळत नाहीं. विकासाचे चक्रावर सर्व विश्व भ्रमण करणारें असल्यामुळें उत्तरोत्तर स्वतःच्या जातीची उन्नति करून स्वजातीच्याहून श्रेष्ठ कोटींत प्रवेश करणें ह्मणजे मानवी विकासाला मदत करण्यासारखें आहे. मनुष्यप्राणि हा स्वतःला सर्वांत विकासाच्या दृष्टीनें पुढारलेला ह्मणवितो. तथापि आपण सर्वांच्या पुढें गेल्यानें समाधान मानून माणसानें तेथेंच मुक्काम करतां कामा नये. मनुष्यपणाच्या पुढें

जाण्याची खटपट केली पाहिजे. अर्थात अतिमानुष झालें पाहिजे. मनुष्य व अतिमानुष ह्या दोन कोटींमध्यें नीत्शेनें जरी दोन पायऱ्या ठरविलेल्या असल्या तरी त्या तितक्याच असल्या पाहिजेत असें नाहीं. दोन गांवांमधील अंतर एकादा कोसाच्या मापानें सांगेल,तर एकादा किती कदम आहे हें सांगेल. अर्थात् कदमांनीं मोजा कीं कोसांनीं मोजा, ती मोजणाराच्या खुषीची गोष्ट आहे. नीत्शनें दोन पायऱ्या कल्पिल्या, दुसरा एकादा एवढ्या मोठ्या पायऱ्या न कल्पितां शंभर अथवा हजार पायऱ्या कल्पील. तथापि मनुष्यपणाच्या पलीकडचा पल्ला गांठावयाचा हें जें मानवी विकासाचें ध्येय नीत्शेनें पुढें ठेविलें तें अत्यंत उच्च व स्फूर्तिदायक आहे यांत संशय नाहीं. विश्वाला ध्येय नाहीं ह्या कल्पनेनें अतिमानुषतेच्या त्याच्या कल्पनेला बाध येत नाहीं व चक्रनेमिक्रमाची कल्पना हा नीत्शेचा शोध नसून ती कल्पना फार प्राचीन काळा पासून चालत आलेली आहे हें पूर्वींच दाखविलें आहे. चक्रनेमिक्रमाची कल्पना हीच नीत्शेची प्रमुख कल्पना आहे असें कांहीं लेखकांचें मत आहे. हें मत चुकीचें आहे. अतिमानुषतेची कल्पना हीच नीत्शेची सर्वांत महत्त्वाची कल्पना होय. ह्या कल्पनेकडे दुर्लक्ष झाल्यामुळें चक्रनेमिक्रमाची त्याची कल्पना कांहीं लोकांस महत्त्वाची वाटते.

**ध्येयाची आवश्यकता**:—मध्ययुगीन कालीं खिस्ती धर्म जोरांत होता. त्यावेळीं चर्चच्या वजनामुळें परस्परविरोधी शक्तींची एकजूट बांधली गेली होती. आतां हीं धर्मबंधनें शिथिल झालीं आहेत; ह्मणून एकत्रित झालेल्या विरोधी शक्ती मोकाट सुटल्या असून त्यांचा आपसांतच निकराचा झगडा चालला आहे.

ह्यामुळें एक प्रकारची गोंधळाची परिस्थिति उत्पन्न झाली आहे. ह्या सांवळ्यागोंधळाचे युगांत आपण हल्लीं सांपडलेले आहोंत, ख्रिस्ती चर्चच्या मतांचा दाब नाहींसा झालेला आहे, त्याचा ऐवजीं विकासवाद उत्पन्न झालेला आहे. ह्या विकासवादाला ठराविक ध्येय नाहीं. सर्वांचा विकास होत आहे ही गोष्ट शास्त्रज्ञ कंठरवानें सांगतात; परंतु आपण सर्व कोणीकडे चाललों आहोंत याचा ते उलगडा करीत नाहींत. विकासाचें चक्र जिकडे आपणास नेईल तिकडे आपण जाणार असा निष्कर्ष विकासवाद्याच्या तत्त्वज्ञानावरून निघतो. मनुष्यानें **स्वतःस विकासचक्राच्या हवालीं करून त्याचे गतीबरोबर वाहत जाणें योग्य नाहीं.** स्वतःचे प्रयत्नानें आपण अमुक एका ठिकाणीं जाणार असें मनुष्यानें ठरविलें पाहिजे. ह्याचाच अर्थ असा कीं, मनुष्यानें आपलें ध्येय ठरविलें पाहिजे.

नदीच्या प्रवाहांत पडलेला लांकडाचा ठोकळा ज्याप्रमाणें प्रवाहाबरोबर वाटेल तिकडे वाहत जातो; तद्वत् विकासचक्राच्या प्रवाहाबरोबर माणसानें वाटेल तिकडे वाहत जातां कामा नये. हा प्रवाह आपल्याला कोठें नेत आहे याचा विचार केला पाहिजे. आपल्याला कोणीकडे जावयाचें हेंहि ठरविलें पाहिजे. **आपलें ध्येय ठरविल्यावर त्या दिशेला जाण्यासाठीं प्रसंगीं विकासचक्रालाही वळण लाविलें पाहिजे.** सर्व मनुष्य प्राणी आपलें जें सामान्य ध्येय ठरवितील त्या ध्येयाला पोषक असा आपला वर्तनक्रमही असणें भाग आहे. ध्येय ठरविल्यावर तें हस्तगत होण्यासाठीं मनुष्य प्राण्यानें आपले मार्ग अर्थात् नीतिनियम

मुक्रर केले पाहिजेत. मनुष्यानें स्वखुषीनें ध्येयसिद्धीसाठीं नीतिबंधनें स्वतःवर लादून घ्यावयाचीं हीच खरी स्वयंप्रेरित नीतिमत्ता होय. मनुष्यापेक्षां श्रेष्ठ अशा अतिमानुष कोटींत जावयाचें हेंच ध्येय तूर्त मनुष्यप्राण्यानें आपल्यापुढें ठेविलें पाहिजे.

**अतिमानुषतेच्या कल्पनेंतील फेरबदलः**— नीत्शेची अतिमानुषतेची कल्पना वारंवार बदलत गेली आहे, असें त्याच्या लेखांवरून दिसून येतें. अतिमानुषतेची त्याची कल्पना प्रथम वैयक्तिक स्वरूपाची होती. आपल्यामध्यें मनुष्याच्या उद्धारासाठीं भगवान अवतार घेतो अशी कल्पना आहे. अशीच कांहीं अंशीं नीत्शेची प्रथम कल्पना होती. नीत्शे सामान्यतः आयुष्यभर विभूतिपूजक होता. त्याच्या लेखांतून नेपोलियनचा जितका उल्लेख आलेला आहे तितका इतर कोणाचाही उल्लेख आलेला नसेल. नेपोलियनसारखा अतिमानुष असा अवतारी पुरुष जगाला मार्ग दाखविण्यासाठीं जन्माला येतो असें नीत्शेचें मत होतें. शोपेनहॉयर व वॅगनेर हेही नीत्शेच्या मतें असेच अवतारी पुरुष होते. जगाचें विशदीकरण करण्यासाठीं शोपेनहॉयरनें व मानवाला शिक्षण देण्यासाठीं वॅगनेरनें जन्म घेतला अशा अर्थाचे उद्गार नीत्शेनें काढलेले आहेत. ‘ हल्लींच्या स्वार्थी व भेकाड युगांत मनुष्याला सन्मार्ग दाखविणाऱ्या विभूति केव्हां निर्माण होणार ? अधोगतीच्या वाटेनें मनुष्य पुनः पशुकोटींत प्रविष्ट होऊं पहात आहे ! ही अधोगती कोण थांबविणार ? ज्यांच्या पावलावर पाऊल टाकीत गेल्यानें मनुष्य प्राणी उन्नतीच्या खऱ्या मार्गाकडे लागेल असे थोर पुढारी केव्हां जन्मास येणार ?’ असा नीत्शेनें टाहो फोडिला आहे. !

नीत्शेच्या मतें अर्वाचीन काळीं फक्त तीन विभूति निर्माण झाल्या. रूसो, गटे, व शॉपेनहायर ह्या त्या तीन विभूति होत. रूसो ह्मणजे तेजाची खाण होय. स्वाभाविकच तेजाकडे सर्वांचें लक्ष जात असल्यामुळें रूसो पुष्कळ लोकांचें चित्त आकर्षण करील. त्या मानानें गटेकडे कमी लोक आकर्षिले जातील. रूसोप्रमाणें गटेचें अस्तित्व बहुजनसमाजाकरितां नाहीं. बहुजनसमाजाला गटेचें स्वारस्य कळणें शक्य नाहीं. कांहीं थोड्या विचारवंतांसाठीं गटेचें अस्तित्व आहे; व त्यांचेंच चित्त गटे आकर्षण करूं शकेल. शॉपेनहॉयरचें कार्यक्षेत्र याहूनही उच्च आहे. बहुजनसमाजाला तें आकलन होणार नाहीं आणि केवळ विचारवंतांच्याही तें उपयोगी नाहीं. प्रत्यक्ष कार्य करणारे जे अगदींच थोडे कर्तबगार लोक दुनियेंत असतात त्यांच्यासाठींच त्याचें अस्तित्व आहे. " अशा प्रकारें निरनिराळ्या कार्यासाठीं वेगवेगळ्या विभूति अवतरत असतात अशा प्रकारची नीत्शेची अतिमानुषतेची कल्पना होती. रूसो, गटे, व शॉपेनहायर हे जे अतिमानुषतेचे मासले ह्मणून नीत्शेनें वर्णिले त्यांत नीत्शेला शॉपेनहॉयर अधिक पसंत होता असें दिसून येतें. कारण दोहोंहूनहि त्याचें कार्यक्षेत्र नीत्शेनें उच्च ठरविलें आहे. 'दस स्पेक झरथुष्ट्र' ह्या पुस्तकांत नत्शेनें रंगविलेली झरथुष्ट्राची भूमिका शॉपेनहॉयरशीं जुळते. "अप्रियस्यच पथ्यस्य वक्ता श्रोताच दुर्लभः ।" असें संस्कृत भाषेंत सुभाषित आहे. नीत्शेच्या मतें **शॉपेन हॉयर सारखे लोक अप्रिय पण पथ्य बोलण्याचें धाडस करतात; व त्या पासून होणाऱ्या वैयक्तिक यातना मानवाच्या उद्धारासाठीं आनंदानें भोगण्यास तयार होतात.**

अतिमानुषतेची नक्की व्याख्या नीत्शेनें कोठेंही केलेली नाहीं. समाजसत्तावादी ज्याप्रमाणें आपल्या ध्येयाची नक्की रूपरेषा देऊं शकत नाहीं, किंवा आपल्या इकडील परिचयाच्या भाषेंत बोलावयाचें ह्मणजे आपण जशी हिंदवी स्वराज्याची नक्की व्याख्या देऊं शकत नाहीं, त्याचप्रमाणें अतिमानुषतेची व्याख्या नीत्शेच्या पुस्तकांत कोठेंही सांपडत नाहीं.

समाजसत्तावादी आपल्या ध्येयांचें वर्णन करूं शकतात. हिंदवी स्वराज्यवादी आपल्या स्वराज्याचें असेंच वर्णन करूं शकतात. नीत्शेनेंही अतिमानुषतेचें वर्णन करून अतिमानुषता ह्मणजे काय तें समजाविण्याचा प्रयत्न केला आहे. तो ह्मणतो, 'अतिमानुष म्हणजे मनुष्य नव्हे; मनुष्यतेच्या पलीकडचें, त्याच्याहून उच्च, असें जें कांहीं तें अतिमानुष !' व्याख्या नसली तरी हें वर्णन अतिमानुषतेची स्थूलमानानें कल्पना येण्यास पुरेसें आहे. अगदींच वेदान्त्यांच्या ' नेति नेति ' सारखें नाहीं !

सर्वांना समान करण्याचें कांहीं लोकांचें ध्येय आहे तें नीत्शेला पसंत नाहीं. चिनी संस्कृती प्रमाणें मानवी आकांक्षांची वाढ खुंटविणारें व आर्थिक दृष्ट्या मनुष्य व मानवजात यांची यंत्राप्रमाणें वासलात लावणारें ध्येय नीत्शेला पसंत नाहीं. डोंगर फोडून त्याच्या मातीनें दर्या भरून काढावयाचा, अशा तऱ्हेची समाजसत्तावाद्यांची क्रांतिकारक चळवळ दुसऱ्या एका विरोधी चळवळीला प्रतियोगाचे नियमानुसार जन्म देते. मानवजातीला भारभूत झालेल्यांस नष्ट करावयाचें अशा तऱ्हेची ही प्रतियोगी चळवळ होय. ह्या दोन्ही परस्परविरोधी प्रवाहांच्या टकरींत मनुष्याहून

श्रेष्ठ अशा कोटीचा उदय होतो. सामान्य मानवापेक्षां ह्या अतिमानुष कोटींतील प्राण्याचा जन्म व चरित्रक्रम भिन्न असतात. तो अधिक बलवान व श्रेष्ठ असतो. नीत्शे ह्मणतो, मी अशा प्रकारच्या माणसाला अतिमानुष ह्मणतों. आपल्या हल्लींच्या कोटींतून अधिक उच्च कोटींत जाण्याचा प्रयत्न माणसानें केला पाहिजे. हल्लीं अशा प्रकारें एकादा अवतारच काय तो अतिमानुष असतो.

अशा वैयाक्तिक अतिमानुषतेच्या कल्पनेपासून पुढें सरकत सरकत, सबंध जात—सबंध मानवजात—अतिमानुष होण्याकडे नीत्शेच्या मतांची प्रगति झाली. कार्लाइल व इमरसन्‌प्रमाणें नीत्शेची अतिमानुषतेची कल्पना प्रथम व्यक्तिगत होती ती बदलत जाऊन अखेर ती सामुदायिक स्वरूपाची झाली. नेपोलियन प्रमाणें एकादी अतिमानुष व्यक्ति मधून मधून निर्माण होते असें मानण्याऐवजीं सबंध मनुष्यजातच अतिमानुष होत आहे व **हल्लीं आपणास ज्या विभूति वाटतात त्या पुढें होणाऱ्या अतिमानुषतेचे केवळ पायिक आहेत अशी नीत्शेची खात्री झाली. तात्पर्य अतिमानुषतेची वैयाक्तिक कल्पना मावळून सामुदायिक अतिमानुषतेच्या कल्पनेचा उदय झाला.**

सबंध विश्वाचा विचार करतांना ज्योतिःशास्त्रदृष्ट्या मनुष्य प्राणी किती क्षुद्र आहे हा विचार नीत्शेच्या मनांत मधून मधून येत असे. असें झालें ह्मणजे अतिमानुषतेच्या कल्पनेला ग्रहण लागे व मनुष्याच्या क्षुद्रतेविषयीं त्याच्या लेखणींतून उद्गार बाहेर पडत.

**अतिमानुषतेच्या कल्पनेचें धार्मिक महत्त्वः**—मनुष्याची भावना उच्च वातावरणांत नेऊन सोडण्याला नीत्शेच्या अतिमानुषतेच्या

कल्पनेचा फार उपयोग होण्यासारखा आहे. मनुष्यानें माणुसकीच्या पलीकडे जावयाचें असें ध्येय नीत्शेनें जनतेपुढें ठेविलें. आपण अधिक उन्नत व्हावयाचें, अधिक सत्ता मिळवावयाची, अशी मनुष्याची प्रवृत्ति करण्यास अतिमानुषतेची कल्पना फार उपयोगी आहे. ह्या कल्पनेमुळें दुबळेपणा टाकिला पाहिजे अशी वृत्ति बनते. शक्ति वाढविली पाहिजे हें ध्येय जसें व्यक्तीला त्याच प्रमाणें समाजाला व राष्ट्रलाही लागू आहे. **शारीरिक व मानसिक दुबळेपणा व्यक्तींत असो वा समाजांत असो, जेथें असेल तेथून तो हद्‌पार झाला पाहिजे. शक्ति वाढविणाऱ्या सर्व गोष्टींचें पोषण केलें पाहिजे. बलोपासनेच्या मार्गावरूनच मनुष्य अतिमानुषतेच्या कोटीला जाईल किंबहुना बलोपासना हीच अतिमानुषतेची गुरुकिल्ली आहे.** कोणत्याही स्थितींत मनुष्यानें हताश होऊं नये व समाधान तर केव्हांच मानूं नये. समाधान वृत्तीनें त्याची प्रगति थांबते. मनांत आणलेली एकादी गोष्ट साध्य झाल्यावर आपण कृतकार्य झालों असें मानून स्वस्थ बसणें प्रगतिदृष्टया हानिकारक आहे. सदैव पुढें जाण्याची खटपट केली पाहिजे. जितकें मिळविलें त्यापेक्षां अधिक मिळविण्याची कोशीस केली पाहिजे. **हताश होऊन शांतिपाठाचा जप करण्यापेक्षां बलसंवर्धक युद्ध फारच उत्तम. नादान शांतीपेक्षां लढाई पुरवली.** लढाई ह्मणजे कसायांनीं चालविलेली नरहत्या असा अर्थ मात्र नव्हे. हल्लींचीं युद्धें बहुधा मतलबी मुत्सद्यांनीं चालविलेल्या अमानुष नरयज्ञाच्या स्वरूपाचीं असतात. शांतीमुळें राष्ट्राचा अधःपात होत असेल तर मात्र शांती सोडून युद्ध

करणें हेंच कर्तव्य होय. अग्नींत सोनें टाकल्यावर त्यांतील अशुद्ध भाग जसा जळून खाक होतो व सोन्याचा कस चढतो त्याच प्रमाणें युद्धामुळें राष्ट्रांतील घाणेरडा व दुबळा भाग नष्ट होतो व राष्ट्राचा बलरूपी कस वाढतो. ह्मणून युद्ध हें नेहमीच निंद्य मानून टाळण्याची वृत्ति कधीं कधीं राष्ट्रहितविघातक असते.

अतिमानुषतेचें स्वरूप जरी अंधुक व अस्पष्ट असलें तरी ह्या उच्च ध्येयाकडे दृष्टि ठेवल्यानें मनुष्य उन्नत होण्यास मदत होईल यांत शंका नाहीं. हल्लींच्या जडवाद्यांच्या मतें जीव व कृति ह्याच सर्वांत महत्त्वाच्या गोष्टी आहेत. युकेननें प्रतिपादिलेल्या ॲक्टिव्हिझमच्या किंवा कर्मयोगाच्या मतें विश्वाशीं समरस होण्याकरितां मनुष्यानें आपलें ध्येय अत्यंत उच्च केलें पाहिजे. असें जर आहे तर नीत्शेचें अतिमानुषतेचें ध्येय मानवी उन्नतीला पराकाष्ठेचा हातभार लावील हें उघड आहे. आपलें जीवित भावी पिढीच्या सुखासाठीं आहे, हें माणसानें सदैव मनांत ठेविलें पाहिजे. आपल्यापेक्षां सर्वतोपरी उच्च अशी जी अतिमानुषतेची पिढी येत आहे तिचा मार्ग सुकर करणें हें आपलें कर्तव्य आहे. **भावी पिढीची सोय लावणें हेंच आपलें ध्येय** असलें पाहिजे; व तें साधण्यासाठीं आपण वाटेल तेवढा स्वार्थत्याग करण्यास तयार असलें पाहिजे. भावी पिढी सुखी रहावी ह्मणून आपण स्वतः प्रसंगीं **आत्मयज्ञ** करण्यास मागें पुढें पहातां कामा नये. पूर्ण निस्वार्थी व निष्काम बुद्धीनें भावी अतिमानुष पिढीच्या सुखसोयींसाठीं तरतूद करणें हेंच आपलें कर्तव्य आहे. हाच खरा निष्काम कर्मयोग होय. आपल्या कृतींना उत्तम वळण लावण्याची

नीत्शेनें ही जी रीत शिकविली त्याहून कोणती चांगली रीत असूं शकणार ? नीत्शेचें ध्येय स्वीकारल्यास मनुष्याच्या स्वार्थीवृत्तीला पायबंद बसतो. आपल्या हयातींत ज्या गोष्टी होणार नाहींत त्या गोष्टी साधण्यासाठीं आपणाला स्वार्थत्याग करण्याची आवश्यकता भासूं लागते. सर्वंध मनुष्य जात हा एक प्रचंड वृक्ष मानून ह्या वृक्षाच्या कल्याणासाठीं त्या वरील निरनिराळ्या पानाफुलांनीं ह्मणजे आपण स्वार्थत्यागपूर्वक प्रयत्न केला पाहिजे, हें उच्च ध्येय नीत्शेनें मानवजातीपुढें ठेविलें. आपलें जीवित केवळ आपणासाठीं नाहीं याची जाणीव प्रत्येक माणसास झाली पाहिजे. सर्वंध मानव जाती करतां आपलें अस्तित्व आहे व आजच्याच मानव जातीसाठीं नव्हे तर, भविष्यकालीन मानव जातीच्या कल्याणासाठीं, आपण निस्वार्थ बुद्धीनें प्रयत्न करीत आपलें जीवित घालविलें पाहिजे. हें मनुष्यानें केव्हांही विसरतां कामा नये.

संस्कृतीच्या नांवाखालीं जुनाटपणाला कवटाळणारें फिलिस्टाइन तत्त्वज्ञान व गुलामी मनोवृत्तीमधून जन्मास आलेला ख्रिस्ती धर्म टाळून नीत्शेनें अतिमानुषतेचें ध्येय पुढें ठेवण्यांत डारविनच्या विकासवादाला चालना दिली. एवढेंच नव्हे तर परमार्थिक ध्येयाची कल्पना ख्रिस्ती धर्मांतून उचलून त्यानें विकासवादाला जोडून दिली. अतिमानुषतेच्या कल्पनेच्या मुळाशीं जोराची धार्मिक भावना होती व त्यामुळेंच असें झालें. सुप्रजाजननशास्त्र राष्ट्रीय धर्म होणें शक्य आहे. आणि हा नवीन मानवधर्म प्रचारांत आणतांना, पूर्वीं कोणताहि धर्म प्रचारांत येत असतांना ज्या प्रमाणें सावधगिरीनें धर्मप्रसार करीत असत त्याच प्रमाणें हा धर्मही

फैलावला पाहिजे असें सर फ्रान्सीस गाल्टनचें ह्मणणें असे. नीत्शेचा झरथुष्ट्र तीस वर्षें उमरीचा झाल्यानंतर आत्मसाक्षात्कारासाठीं वनांत निघून गेला. त्यानें तेथें दहा वर्षें एकांत वासांत राहून तपश्चर्या केली. नंतर जगाला नवीन धर्म सांगण्यासाठीं तो पुन्हा मानवांत आला. अर्थातच तत्कालीन रूढ असलेल्या धर्माशीं त्याचा मतभेद होता. तरी जुन्या धर्माचा पाया उखडून काढण्या साठीं मी आलीं आहें असें झरथुष्ट्र ह्मणत नसे. उलट धर्माचेंच पांघरूण घेऊन त्यानें उपदेशास सुरवात केली. तो ह्मणे, " जुन्या भिक्षुक वर्गाचें रक्त व माझें रक्त एकच आहे. ह्मणूनच माझीं मतें त्यांनीं शांतपणानें ऐकावीं, त्यांवर विचार करावा, व ग्राह्य वाटल्यास घ्यावीं. केवळ भिन्न मतें पुढें मांडतों ह्मणून त्यांची अवहेलना करूं नये. एवढेंच माझें ह्मणणें आहे. आतांपर्यंत तुह्माला तारणारे जे महात्मे झाले त्यांच्यापेक्षां अत्यंत मोठ्या अशा तारणाऱ्या कडून तुह्मास खरा मोक्ष मिळेल. आजपर्यंत कोणीही माणसाच्या पलीकडच्या कोटींतील उत्पन्न झालेला नाहीं. आजपर्यंत झालेले महात्मे किंवा अवतार सामान्य माणसापेक्षां अधिक तेजस्वी, अधिक बुद्धिमान असतील परंतु ते सर्व मनुष्य कोटींतीलच होते. अतिमानुष अथवा देवकोटींतील नव्हते. ह्याच्यापुढें अतिमानुषतेचा काल येत आहे. आपणाला खरा मोक्ष अतिमानुप महात्मेच देऊं शकतील. " ह्या वरून दिसून येईल. कीं, झरथुष्ट्रानें धर्माचें पांघरून घेऊन त्यावरच आपलीं मतें सफाईनें पसरविण्याचें कौशल्य दाखविलें आहे. दुसऱ्या एका प्रसंगीं झरथुष्ट्राच्या तोंडीं नीत्शेनें पुढील उद्गार घातले आहेत. " आज पर्यंत पुष्कळ गोष्टी

निर्माण झाल्या व त्या लयास गेल्या, परंतु झरथुष्ट्राचें भविष्यकालीं जें राज्य निर्माण होणार आहे तें मात्र अविनाशी आहे. हें राज्य येणार यांत शंका नाहीं; आणि तें चिरस्थायी होणार हेंही खास !" आपलीं मतें प्रचारांत आणतांनां धर्माचा बुरखा नीत्शेनें कसा पांघरला होता हें ह्यावरून दिसून येईल. नीत्शे हा सर फ्रान्सीस गाल्टनचा समकालीन होता. त्याने सुप्रजाजननशास्त्राचा ओनामा केला. असें असून सुद्धां त्यानें धर्माचें पांघरूण टाकिलें नाहीं. महात्मे, कवि व द्रष्टे यांची छाप लोकमतांवर जितकी जलद पडते तितकी पंडितांची व तत्त्वज्ञानांची पडत नाहीं. हा व्यावहारिक अनुभव नीत्शेला पटलेला होता त्या मुळेंच आपलीं ध्येयें धर्माच्या पांघरुणाखालीं त्यास घालावीं लागलीं ! धर्माचें आकर्षण लोकांस आपलीं मतें पटविण्यास अत्यंत उपयोगी असल्यामुळें नीत्शेनें असें केलें. नीत्शे हा भिक्षुकाचा मुलगा होता हेंही विसरतां कामा नये. त्यामुळें धार्मिक ध्येयाशीं आपलीं ध्येयें शक्य तितकीं मिळतीं करण्याचा त्यानें प्रयत्न केला. विचारापेक्षां विकाराचा पगडा मनुष्यावर जलद बसतो. हा व्यावहारिक अनुभव ध्यानीं धरून नीत्शेनें पारमार्थिक ध्येय मुद्दामच अतिमानुषतेला जोडून दिलें. मोक्ष मिळविण्यासाठीं धर्माचें आचरण ज्याप्रमाणें आपण भक्तियुक्त अंतःकरणानें बिनतक्रार करतों त्याचप्रमाणें अतिमानुषतेच्या ध्येयास पोहोंचण्यासाठीं मनुष्यानें धार्मिक श्रद्धेनें प्रेरित व्हावें अशी नीत्शेची इच्छा होती. ईश्वरासाठीं आपण ज्या प्रमाणें वाटेल तो स्वार्थत्याग करण्यास तयार असतों, त्याच प्रमाणें पुढें येणाऱ्या श्रेष्ठ अतिमानुष पिढीसाठीं आपण मानवांनीं

वाटेल तेवढा स्वार्थत्याग करण्यास तयार असलें पाहिजे. त्यांची सोय करणें हा आपला धर्म आहे, अशा धार्मिक भावनेनें प्रेरित होऊन, आपलें अस्तित्व भावी पिढीच्या सुखसोयीसाठीं आहे व त्यासाठींच मी प्रयत्न करीन, स्वतःच्या वैयक्तिक सुखाकडे पाहून भावी पिढीचें नुकसान होईल असें वर्तन मी करणार नाहीं, असा निश्चय आपण आपल्या मनाशीं केला पाहिजे.

नीत्शे जरी युद्धप्रिय होता तरी कायदा व सुव्यवस्था असावी असेंच त्याचें मत होतें. नीत्शेच्या मतें आपली उन्नति झाली पाहिजे, आपल्या विकासाला आपण हातभार लाविला पाहिजे; आणि असें करीत असतांना अपरिहार्य असेल तर युद्ध केलें पाहिजे, रक्तपात केला पाहिजे. पण कायदा व सुव्यवस्था यांची अत्यंत जरूरी आहे. **अराजकता अथवा बेबंदशाही ही मानवी प्रगतीला अडथळा करणारी आहे असें नीत्शेचें मत होतें.**

एच्. जी. वेल्स या सुप्रसिद्ध इंग्रज लेखकानें ' अभिनव मॅचीव्हेली ' ह्या नांवाची एक अति उत्कृष्ट इंग्रजी कादंबरी लिहिलेली आहे. त्यांतील नायक सुप्रजाजननशास्त्र व सामाजिक सुधारणा यांच्या द्वारें भावी पिढ्या सुखी करण्याची प्रचंड खटपट करीत आहे असें दर्शविलें आहे. परंतु आत्मसंयमन व कायद्याचीं बंधनें ह्यांस तो मानणारा नसल्यामुळें त्याला यश येऊं शकत नाहीं. ह्या बाबतींत नीत्शेचीं मतें अधिक निर्दोष आहेत. **कोणत्याही कार्यांत शिस्त अवश्य आहे** असें नीत्शे ह्मणतो. कार्यकर्त्या माणसाला व सुधारकाला लोकविरोधाशीं झुंजावें लागतें व त्यासाठीं लढाईची परिस्थिति निर्माण करावी लागते. असें युद्ध

करीत असतांनासुद्धां कार्यकर्त्या माणसानें आत्मसंयमन व शिस्त सदैव पाळिली पाहिजे. समाजांतील वाईट गोष्टी नष्ट करण्यासाठीं युद्ध करीत असतांना सर्वच सवगोलंकार होईल असें वर्तन करतां कामा नये. कर्त्या माणसानें शिस्त व आत्मसंयमन सोडल्यास सवगोलंकार होऊन अनवस्था प्रसंग आल्याशिवाय राहणार नाहीं. **लोकांना सुधारणारा ज्या जोरानें लोकांवर हल्ला करतो त्याहून अधिक जोर त्यानें स्वतःचें आत्मसंयमन करण्यास लाविला पाहिजे.** स्वतःची सहनशक्ति व मनोधैर्य यांची पराकाष्टेची वाढ केली पाहिजे. जो दुसऱ्यावर तावा चालवूं इच्छितो त्यानें स्वतःवर तावा चालविण्यास शिकलें पाहिजे. **जो आत्मसंयमन करूं शकत नाहीं तो गुलामच राहण्याच्या लायकीचा असतो,** असें नीत्शेचें मत होतें.

**सुप्रजाजननशास्त्रः**— सुप्रजाजननशास्त्र असें ज्याला हल्लीं आपण ह्मणतों त्या शास्त्राला इंग्रजींत युजेनिक्स अशी संज्ञा आहे. नीत्शेला युजेनिक्स हा शब्द माहित नव्हता. कारण युजेनिक्स हा शब्द त्या काळीं तितका प्रचारांत आलेला नव्हता. युजेनिक्स अथवा सुप्रजाजननशास्त्र सर फ्रान्सीस गाल्टन्नें निर्माण केलें. सर फ्रान्सीस गाल्टनचे कांहीं लेख नीत्शेनें वाचले होते. 'मनुष्य जात व तिचा विकास' हें गाल्टनचें पुस्तक नीत्शेनें सन १८८४ सालांत वाचलें. नीत्शेच्या लेखांमध्यें कळप व गुलाम यांच्या संबंधींच्या ज्या कल्पना आहेत त्या गाल्टनचे लेखांवरून त्याला सुचलेल्या असाव्या. सदर पुस्तकांत पुढील अर्थाचीं वाक्यें आहेत. "सामान्य जनता व पुढारी यांच्या मनोवृत्तींत एक मुख्य भेद

असतो. सामान्य जनता गुलामी मनोवृत्तीची असते. पुढारी या मनोवृत्तीपासून मुक्त असतात. सामान्य लोक शेळ्या मेंढराप्रमाणें गतानुगतिक असतात. रूढी, सत्ता व संस्कृति यांचें जोखड सामान्य लोक आनंदानें शिरावर घेतात. गुलामी मनोवृत्तीचा हा आनुवंशिक संस्कार नष्ट केला पाहिजे. तरच भावी पिढी स्वतंत्र विचारांची व बुद्धिप्रधान होईल." वरील विचार वाचूनच नीत्शेला गुलामी मनोवृत्तीची कल्पना सुचली असावी. सुप्रजाजननशास्त्राला पोषक असे विचार नीत्शेच्या लेखांतून इतस्ततः परसलेले आहेत. ते सर्व ह्या पुस्तकांत देणें शक्य नाहीं. मासल्यादाखल थोडेसे दिले आहेत. नीत्शे ह्मणतो, " भूतकाल आपल्या हातीं नाहीं. जें झालें तें होऊन गेलें, परंतु भविष्यकाल मात्र आपल्या हातीं आहे. इतिहासावरून धडा घेऊन आपला भविष्यकाल कसा बनवावा हें आपण शिकलें पाहिजे. आपला भविष्यकाल उज्जल करणें आपल्या हातीं आहे; व त्याला इच्छेनुरूप वळण देणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. प्रवाहांत सांपडलेल्या निर्जीव वस्तूप्रमाणें आजवर आपण वाटेल तिकडे वाहत गेलों. स्वतःची बुद्धि चालविली नाहीं. ह्यामुळें मनुष्य जातीचें आजवर फार नुकसान झालेलें आहे. ह्यापुढें आपण ही परिस्थिति बदलली पाहिजे. प्रवाह आपणास कोणीकडे नेत आहे तें आपण पाहिलें पाहिजे. आपणास कोणीकडे जावयाचें तें ठरविलें पाहिजे. आपल्या ध्येयाकडे प्रवाह आपणास नेत नसेल तर प्रवाहाला आपण इष्ट वळण लाविलें पाहिजे. सर्वांत वाईट जर कोणती गोष्ट असेल तर ती अधःपात ही होय. अधिक अधिक उच्च

जातींत प्रवेश करणें हा आपला खरा मार्ग; पण **स्वार्थबुद्धि ही अधःपाताची दूती** असून ती मनुष्यास सन्मार्गावरून भ्रष्ट करतें. ह्या स्वार्थबुद्धीला नष्ट केलें पाहिजे. व्यक्तीच्या हितापेक्षां जनतेचें हित, समुदायाचें हित, अधिक होईल अशा तऱ्हेचे कायदे, कायदे करणारांनीं केले पाहिजेत. **देशहितासाठीं वैयक्तिक हिताचा त्याग केला पाहिजे. हल्लींच्या जनतेच्या कल्याणापेक्षां भावी पिढीच्या कल्याणाकडे अधिक लक्ष ठेवलें पाहिजे.** सत्ताधाऱ्यांनीं दयेचीं क्षुद्र कामें करण्यापेक्षां अधिक चिरस्थायी कामगिऱ्या हातीं घेतल्या पाहिजेत. भावी पिढ्या सुखी होण्याची तरतूद केली पाहिजे. शेजाऱ्यावर दया करा अशी ख्रिस्ती धर्माची आज्ञा आहे. ही वृत्ति नीत्शेला संकुचितपणाची वाटते. नीत्शे ह्मणतो, माझें प्रेम याहून अधिक विस्तृत आहे. शेजाऱ्यावर दया करण्याचें कांहीं एक कारण नाहीं. मानव जातीच्या विकासाचा विचार केला पाहिजे. विकासाच्या जिन्यावरील मनुष्ययोनि ही केवळ एक पायरी आहे. ही पायरी ओलांडून आपण पलीकडे गेलें पाहिजे.

**प्रतिकूल परिस्थिती ही महात्म्यांची जननी आहे** असें एक महावाक्य नीत्शेच्या ग्रंथांत पदोपदीं आढळतें. मनुष्याला मोठेपणा प्राप्त होण्यास प्रतिकूल परिस्थिती आवश्यक आहे. प्रतिकूल परिस्थितीमध्यें माणसाचे सद्गुण वाढीस लागतात व त्यामुळें मनुष्य मोठा होतो. नीत्शेनें ह्या ह्मणण्याच्या समर्थनार्थ व्हेनीसचें उदाहरण दिलें आहे. शेजाऱ्यांशीं सदैव लढत रहावें लागल्यामुळें व्हेनीसला मोठेपणा आला. ह्मणून नीत्शे ह्मणतो, '**आपत्ती सहन करा, कष्ट सोसा व धडधाकट व्हा!**'

**लामार्क**प्रमाणेंच गुण आनुवंशिक असतात असें नीत्शेचें मत होतें. संपत्तीमुळें उच्च जात निर्माण होण्यास मदत होते. श्रीमंत घराण्यांतील तरुणांचे विवाह पैशाच्या जोरावर सुंदर स्त्रियांशीं करतां येतात. मुलांना उत्कृष्ट शिक्षक ठेवून चांगलें शिक्षण देतां येतें. राहणी स्वच्छ ठेवतां येते. व्यायाम घेण्यास फुरसत सांपडते. हलकीं कामें करण्यामुळें येणारी अनिष्ट अशी दीन वृत्ति श्रीमंतांस शिवत नाहीं. अशा रीतीनें पिढ्यानूपिढ्या अनुकूल आर्थिक परिस्थिती राहिल्यास श्रीमान् घराण्यांत दिलदार वृत्तीचे व उच्च संस्कृतीचे थोर पुरूप निर्माण होतात. मनुष्याला आनुवंशिक संस्कारानें जसें सद्गुण मिळतात तसेच स्वतःचे प्रयत्नानेंही त्याला कांहीं सद्गुण प्राप्त करून घेतां येतात. परंतु स्वतःच्या प्रयत्नानें प्राप्त होणारे सद्गुण केवळ प्राथमिक अवस्थेंतील अर्थात् अपुरे असतात. आनुवंशिकतेनें पिढ्यानपिढ्या चालत आलेले जे सद्गुण हेच अधिक मौल्यवान व टिकाऊ असतात. एकादें घराणें अथवा जात सुंदर, चित्ताकर्षक, व पूर्ण होण्यास पुष्कळ कालावधि लागतो. **सोनें ज्या प्रमाणें अनेक वेळां भट्टींतून काढल्यानंतर बावनकशी होतें त्या प्रमाणें एकादा गुण एका पिढीतून दुसऱ्या पिढींत, दुसरींतून तिसरींत, असा पिढ्यानपिढ्या आनुवंशिक संस्कारामुळें उतरत गेला तरच तो पूर्णतेस पोंहचतो.** अर्थात आपल्या प्रयत्नानें मिळविलेल्या गुणांची किंमत पूर्णतेच्या दृष्टीनें आनुवंशिकतेमुळें मिळणाऱ्या पिढीजाद गुणापेक्षां कमी असते. आनुवंशिक गुण एक प्रकारची नैसर्गिक देणगीच होय. निसर्गदत्त सुंदर

आवाजी व प्रयत्नानें कमावलेली शास्त्रोक्त गायनकला यांत जी तफावत दिसून येते तशीच पिढीजाद गुण व मनुष्यानें आपल्यापुरता प्रयत्नानें कमावलेला गुण यांत तफावत दिसून येते. पूर्वजपरंपरा अखंडित अव्वल दर्जाजी असली तरच खरें कुलीन घराणें निपजतें. पूर्वजांमध्यें एकही दुवा खोडकर व वाईट असल्यास पिढीजात घरंदाजपणा बिघडतो. अर्वाचीन शास्त्रीय संशोधक निसर्गदत्त देणगीचा अव्हेर करीत आहेत आणि शास्त्रीय ज्ञानाच्या जोरावर विश्वामित्राप्रमाणें नवीन सृष्टि कृत्रिम उपायांनीं बनविण्याचा अट्टाहास करीत आहेत ! आनुवंशिक गुणांची वाढ करण्याचा प्रयत्न करून निसर्गदत्त देणगीचा विकास करणेंच अधिक उचित आहे. परंतु हा सरळ मार्ग सोडून कलमांचे प्रयोग करणारे शास्त्रज्ञ कांटेरी झाडापासून द्राक्षें उत्पन्न करण्याचा, व करवतीच्या दात्यांतून रेशीम काढण्याचा, हास्यास्पद खटाटोप करीत आहेत ! नीत्शेच्या मतें शिक्षण व संस्कृति यांच्या मदतीनें लोकांची दिशाभूल करण्यापुरेसा गुणांचा कृत्रिम पेहराव चढवितां येईल. परंतु अस्सल कुलीनत्वाशीं हें नकली कुलीनत्व तोंड देऊं शकणार नाहीं. सिंहाचें केवळ कातडें पांघरून कोल्हा खरा सिंह बनूं शकत नाहीं. आईबापांचे गुण मुलांत उतरतात व आईबापांत त्यांच्या पूर्वजांचे गुणावगुण उतरलेले असतात. हा सिद्धांत त्रिकालाबाधित आहे. ह्मणून अर्वाचीन शास्त्रज्ञानें गाढवापासून घोडा निर्माण करण्याचा आकटोविकट व परिणामीं निष्फळ होणारा प्रयत्न सोडून घोड्यापासूनच अधिक उच्च प्रकारचा घोडा निर्माण करण्याचा उपक्रम करावा असा नीत्शेचा अभिप्राय आहे.

डार्विननें जीवनकलहाचें तत्त्व प्रस्थापित केलें. ह्या तत्वावर आक्षेप घेऊन नीत्शेनें बलोपासनेचें तत्त्व पुढें केलें. डॉर्विनच्या मतें सर्व सजीव वस्तु जगण्यासाठीं धडपड करीत असतात. नीत्शेच्या मतें प्राण्यांना जगण्याची धडपड केव्हां केव्हां करावी लागते हें खरें पण असे प्रसंग केवळ अपवादात्मक होत. जीवनार्थ लागणाऱ्या वस्तूंचा नेहमीच एवढा मोठा दुष्काळ पडलेला नसतो कीं, प्राण्यास केवळ जगण्यासाठींच सतत खटपट करावी लागावी. दुनियेंत जीवनाची सामुग्री प्राण्यांना भरपूर मिळालेली आढळते. क्वचित् ही सामुग्री इतकी विपुल आढळते कीं, वाजवीपेक्षां दसपट, वीसपट, शंभरपट, सामुग्री एकाद्याच्या वांट्यास आलेली दिसते; आणि साधारणतः केवळ जगण्यापुरती सामुग्री तर सर्वच प्राण्यांना बहुधा पुरेशी असते. त्यामुळें खरा प्रश्न केवळ डॉर्विनच्या जीवनकलहाच्या उत्तरानें सुटत नाहीं. सर्व प्राणी सदैव खटपट करीत असतात ही गोष्ट निर्विवाद आहे पण ती कशासाठीं? ह्या प्रश्नाचें उत्तर डॉर्विन व नीत्शे वेगवेगळ्या प्रकारें देतात. ही सर्व धडपड जगण्यासाठीं आहे हें डार्विनचें उत्तर आहे. ही धडपड, अधिक सत्ता, अधिक बल, अधिक वैभव, मिळविण्यासाठीं आहे असें नीत्शेचें मत आहे. अशा प्रकारें जीवनकलहाऐवजीं **बलोपासना हेंच जगाच्या धडपडीचें रहस्य आहे** असें नीत्शेनें प्रतिपादिलें आहे.

**विवाहः**—नीत्शे हा स्त्रियांचा द्वेष्टा आहे असा साधारण लोकांचा समज आहे. स्त्रियांविषयीं झरथुष्ट्राच्या तोंडीं नीत्शेनें कांहीं तुच्छतादर्शक वाक्यें घातलेलीं आहेत ही गोष्ट खरी आहे. तथापि विकासाच्या मार्गांत पुरुषापेक्षां स्त्री अधिक

उन्नत आहे असें नीत्शेनें स्पष्ट लिहिलें आहे. आपल्यापेक्षां अधिक उन्नत असलेल्या स्त्रीजातीशीं पुरुषवर्गानें अत्यंत सभ्यपणाचें व लीनतेचें वर्तन केलें पाहिजे असें नीत्शेनें लिहिलें आहे. **प्रचलित विवाहपद्धति नीत्शेच्या मतें अत्यंत दूषणीय आहे.** पूर्वीचे लोक विवाह करतांना कुलशीलाची चौकशी करीत हेंच योग्य होय. कुलीनत्व राखावें व शील परंपरेनें वाढवावें अशी योजना आपल्या पूर्वजांनी मोठ्या शहाणपणानें केलेली होती. परंतु अलीकडे प्रेमविवाहाच्या मृगजळांत तरुण पिढी सांपडलेली असून त्यामुळें कुलशीलाकडे पाहण्याची प्रवृत्ति कमी होत चालली आहे व त्यामुळें उच्च मनुष्य जात निर्माण होण्यास अडथळा होत आहे. **मानवी विकासाच्या मार्गांत प्रेमविवाह ही एक मोठी धोंड आहे.** हल्लीं होणाऱ्या प्रेमविवाहांचा विचार केल्यास असें दिसून येईल कीं एकाद्या तरुणाचें मन प्रथमदर्शनींच एकाद्या स्त्रीवर बसतें. मोहाला बळी पडलेल्या मनाची ही फसवणूक आहे कीं नाहीं ह्याचा खोलवर विचार न करतां हा तरुण प्रथमदर्शनीं जडलेल्या ह्या विकारालाच प्रेम समजूं लागतो. अशा रीतीनें मोहजालांत सांपडलेल्या तरुणतरुणींचें पाऊल स्वाभाविकच वांकडें पडतें आणि ही चूक दुरुस्त करण्यासाठीं विवाहाच्या बंधनांत अडकवून घेणें त्यांस आवश्यक होतें. अशा तऱ्हेनें **हल्लींच्या प्रेमविवाहांचा खरा जनक प्रमाद असून आवश्यकता ही जननी आहे** असेंच विचारांतीं दिसून येईल. यदृच्छेनें भेट होणाऱ्या तरुणतरुणींचे विवाह करून ह्या प्रकाराला प्रेमविवाह, व्यक्तिस्वातंत्र्य अशी गोंडस नांवें देऊन,

आपण भावी पिढीचें नुकसान करीत आहोंत. **उच्च मनुष्यजात निर्माण होण्यास कुलशीलाची परंपरा राखणें व वाढविणें जरूर आहे.** नुसत्या प्रेमाच्या नादीं लागून भावी पिढीचें आपण केवढें नुकसान करीत आहोंत ह्याचा विचार प्रेमविवाहाच्या पुरस्कर्त्यांनीं केला पाहिजे. मानवी विकासाच्या दृष्टीनें विचार न करतां केलेले **हल्लींचे प्रेमविवाह ह्मणजे इंद्रियांचे चवचाल चोजले पुरविण्यासाठीं युवयुवतींनीं विवाहाच्या पवित्र नांवाखालीं समाजाची केलेली फसवणूक होय.** विवाहाच्या बाबतींत प्रेमाचा विचार खरोखर गौण आहे. समाजाच्या हितासाठीं, उच्च मनुष्यजात निर्माण करण्यासाठीं, जे विवाह कुलशीलाच्या दृष्टीनें होतात तेच खरे विवाह होत. शरीरानें व मनानें सुदृढ, कुलशीलवान व पुत्रोत्पादनाची इच्छा करण्यालायक असल्याशिवाय मनुष्यानें विवाहच करतां कामा नये. **आपल्याहून अधिक उच्च पुत्र निर्माण करण्याची धमक असेल तरच विवाह करावा; तसें नसेल तर स्वतःचें मन व शरीर सुधारण्याचा प्रयत्न करावा.** प्रजोत्पादन करून वंशवेल नुसता पुढें वाढविण्यांत अर्थ नाहीं; हा वेल अधिक उच्च प्रकारचा होईल अशी तजवीज केली पाहिजे. अशी तयारी असणाऱ्यानेंच विवाहाच्या उद्यानांत प्रवेश करावा. स्त्रीपुरुषांच्या जोडीनें उभयतांपेक्षां उच्च दर्जाचा मनुष्यप्राणी निर्माण करण्यासाठीं पवित्र इच्छेनें केलेला संयोग तोच खरा विवाह होय. व अशा पवित्र इच्छेनेंच प्रेरित झालेले आहेत असा एकमेकांनीं एकमेकांवर भरंवसा टाकणें हेंच खरें पवित्र प्रेम होय.

मैत्री हा लग्नाचा पाया आहे. आपण मैत्री करण्याच्या लायकीचे आहोंत किंवा नाहीं ह्याचा लग्नेच्छूनें प्रथम विचार केला पाहिजे. तात्कालिक शारीरिक सुखाच्या मोहास बळी पडूं नये. विवाहाचे वेळीं, 'आपणास ह्या स्त्रीच्या संगतींत सबंध जन्म घालवावयाचा आहे व तो आपण चांगल्या रीतीनें घालवूं कीं नाहीं।' हा विचार मुख्य आहे. ह्या विचाराखेरीज बाकीचे प्रश्न कमी महत्वाचे आहेत. तरुणतरुणींची कधीं कधीं तात्पुरती मैत्री जमते. परंतु विवाहरज्जूंनीं बद्ध झाल्यावर सबंध जन्म सुखांत काढण्यापुरता एकोपा त्यांच्यांत रहात नाहीं. प्रेमविवाह लावूनही एकमेकांना असह्य झालेलीं जोडपीं पुष्कळ आहेत. न जमणारी जोडी विवाहानें एकत्र कायमची बांधली गेल्यास तेढ उत्पन्न होते. सबंध जन्म दुःखमय होऊन एकमेकांचा हेवा व दुष्टावा करण्यांत विवाहाच्या पावित्र्याची चेष्टा होते. हल्लीं आपण लग्न लावितों व तें एकदां लाविल्यावर जन्मभर टिकणाऱ्या स्वरूपाचें असतें. ह्यापेक्षां **विवाह विधीचे दोन भाग करावे; एकाला लघुविवाह व एकाला चिरविवाह ह्मणावें.** स्त्रीपुरुषांची एकमेकांशी विवाह करण्याची इच्छा झाल्यास त्यांनीं प्रथम लघुविवाहाचा संस्कार करावा. आणि **ठराविक मुदतीपर्यंत नवराबायकोच्या नात्यानें संसार करावा.** या अवधींत निकट परिचयानें एकमेकांचे गुणदोष एकमेकांस चांगले कळून येतील. ह्या मुदतींत आपण सर्वजन्म एकमेकांच्या संगतींत सुखानें राहूं अशी उभयांतास खात्री वाटल्यास त्यांनीं चिरविवाहाचा संस्कार करून आपणास जन्माचें बांधून घ्यावें.

हल्लींच्या विवाहपद्धतीनें विवाहबंधन आजन्म टिकणारें होतें. आणि कधीं कधीं विवाहाचें उद्दिष्ट समूळ नष्ट झालेलें आढळतें. ह्या पेक्षां विवाहबंधन जरा सैल केलेलें बरें.

आपले मनोविकार प्रबळ होऊन शिरजोर होऊं देऊं नयेत. **मनोविकारांनां आपले गुलाम बनविण्यांतच खरा पुरुषार्थ आहे.** मनुष्याचे षड्रिपु मनुष्याला सन्मार्गावरून वाटेल तिकडे खेंचीत नेतात. आकर्षक तेजानें पतंगांनां मोहून ज्याप्रमाणें अखेरीस दिवा त्यांस होरपळून टाकितो, त्याचप्रमाणें हे षड्रिपु मनुष्याचें मनुष्यत्व जाळून टाकीत असतात. सामान्य मनुष्यानें शक्य तितके मनोविकार ताब्यांत ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. असामान्य विभूतींची निराळी गोष्ट आहे. त्यांनीं मनोविकार सैल सोडले तरी हरकत नाहीं. **जीवन्मुक्त झाल्यावर बंधनाच्या पलीकडे जाणें ह्मणजे पृथ्वीवरील स्वर्गलोकांत प्रवेश करण्यासारखें आहे. परंतु ह्या स्वर्गसुखांत प्रवेश करण्याचा अधिकार फारच थोड्या लोकांचा आहे. सामान्य लोकांस बंधनेंच आवश्यक आहेत.**

हल्लींप्रमाणें विषयसुखाच्या इच्छेनें विवाह न करतां उच्च मानव पिढी निर्माण करण्यासाठीं दोन जीवांचें एकीकरण झालें. पाहिजे. अशा जोडण्यानें विषयसुखाच्या पशुवृत्तीला बळी न पडतां आपल्याहून उच्च अशा प्रकारची संतति निर्माण करण्यासाठींच केवळ विषयोपभोग घेतले पाहिजेत. पति बलवान आहे एवढ्याच सबबीवर पत्नीला मनांत नसतांही त्याच्या कामवासनेस वारंवार बांधावें लागल्यास वर जें ध्येय सांगितलें तें दृष्टिआड होईल. उच्च मनुष्यप्राणी उत्पन्न करण्याच्या इच्छेनें संतति उत्पन्न करणें

हें ध्येय विसरून जाईल व इच्छा नसतां अपघातानें संतति निर्माण होऊं लागेल. अशा प्रकारें अपघातानें उत्पन्न झालेल्या हलक्या दर्जाच्या संततीला उत्कृष्ट शिक्षण देणें अशक्यप्राय होईल. ह्मणून नीत्शेनें भावी पिढीसाठीं जी विवाहाची रूपरेषा आंखिली आहे तींत इंद्रियदमनासाठीं वेश्यांच्या संस्थेची आवश्यकता आहे असें नीत्शे ह्मणतो.

**भावी विवाहांसाठीं नीत्शेनें पुढीलप्रमाणें उपयुक्त सूचना केल्या आहेतः—**

[ १ ] वडिलार्जित मिळकतीवर सपाटून कर बसवावा व अविवाहितांनीं लष्करी शिक्षण घ्यावयाची कालमर्यादा विस्तृत करावी.

[ २ ] लग्नापूर्वी विवाहाला योग्य असल्याचा वैद्यकीय दाखला मागण्यांत यावा. या दाखल्यावर अधिकारी भिक्षुकांचाही शेरा असावा. ह्या शिफारसपत्रांत विवाह करणाऱ्याच्या घराण्यासंबंधानें अनेक प्रश्न व त्यांचीं उत्तरें लिहिलेलीं असावी.

[ ३ ] अधिक पुत्र निर्माण करणाऱ्यास खास सवलती असाव्यात. प्रसंगीं त्याला विशेष मताधिकार देण्यांत यावेत.

[ ४ ] वेश्यागमनाला आळा बसण्यासाठीं ठरावीक मुदतीचीं लग्नें करावींत व अशा लग्नापासून उत्पन्न होणाऱ्या संततीची तरतूद करावी. ह्या योजनेमुळें एक तर वेश्यागमनाला आळा बसेल अथवा अधिक उच्च तऱ्हेची वेश्यांची संस्था निर्माण होईल. असें नीत्शेचें ह्मणणें होतें.

[५] विवाह मंजूर करण्याचा अधिकार गांवांतील पंचास असावा.

[६] नालायक लोकांस संतति निर्माण करण्याचा अधिकार नसावा.

ह्या पैकीं शेवटचा मुद्दा विशेष महत्त्वाचा आहे. सकृद्दर्शनीं तो विचित्र वाटतो. पण बारकाईनें पाहूं गेल्यास नीत्शेच्या ह्मणण्यांत पुष्कळ तथ्य आहे असें दिसून येईल. नीत्शे ह्मणतो, आनुवंशिक रोगांनीं ग्रस्त झालेले व क्षयासारख्या असाध्य रोगांनीं पछाडलेले लोक प्रजोत्पादनास सर्वस्वी अपात्र आहेत. त्यांच्याकडून प्रजोत्पादन होणार नाहीं असें नव्हे तर त्यांची संतति रोगग्रस्त व कमदर्जाची निपजेल. अशा संततीमुळें मानवी विकासास अडथळा उत्पन्न होईल. ह्मणून अशा लोकांस संतति निर्माण करण्याची कायद्यानें बंदी केली पाहिजे. मृत्युपंथास लागलेल्या दुबळ्या जातीची अशी एक खूण आहे कीं, लहानशा मोहालाहीं असे प्राणी बळी पडतात. आत्मसंयमन हें जें जिवंतपणाचें लक्षण त्याचा असल्या मुमूर्षु जातींत अभाव असतो. अशा लोकांसाठीं धर्म अथवा नीतिशास्त्र ह्यांनीं कांहीं विशेष बंधनें घातलेलीं नाहींत. अशा लोकांकडे वैद्यकीय दृष्टया आपण पाहिलें पाहिजे. ह्या बाबतींत समाजानें मन घातलें पाहिजे. समाजाचें हित पहाणें हें समाजाचें कर्तव्य आहे. ही हितबुद्धि हा समाजाच्या हवालीं केलेल्या ठेवाच आहे. ही ठेव सांभाळण्याची पवित्र जबाबदारी समाजावर आहे. **समाजाचें अहित करणारा मनुष्यप्राणी जन्मास न येऊं देण्याची खबरदारी समाजानें घेतली पाहिजे. ज्यांच्यामुळें समाजहितविघातक पिढी निर्माण होईल अशांस प्रजोत्पादनाची बंदी करण्यास कचरतां कामा नये.** मनुष्य मोठा बुद्धिवान अथवा कुलशीलवान असला तरी त्याची संतति जर समाजाला अहितकारक होण्याजोगी असेल

तर त्यास संतति निर्माण करूं देऊं नये. समाजानें केलेले एतद्विषयक नियम मोडणाऱ्यास खुशाल समाजद्रोही समजावें व त्यास कडक शासन करावें. वेळप्रसंगीं घोडेबैल खच्ची करतात त्या प्रमाणें मनुष्याला खच्ची करण्यास हरकत नाहीं. 'तूं खून करूं नकोस' अशी मोझेसची आज्ञा आहे. ही आज्ञा पोरकटपणाची आहे. समाजाला विघातक अशा गोष्टींचा नाश करणें हा खूनच नव्हे. अधोगतीस नेणारी पिढी उत्पन्न करणाऱ्याला तूं संतति निर्माण करूं नको अशी आज्ञा केली पाहिजे. एकाच शरीराचा एक भाग रोगी व एक भाग निरोगी असेल तर रोगट भाग नष्ट करणें व निरोगी भागाची वाढ होऊं देणें हा निसर्गाचा नियम आहे. **रोगट व निरोगी यांच्यामध्यें समान हक्क असणें शक्य नाहीं. बलवान आणि दुबळे समान हक्काचे असावे ही भाषाच हास्यास्पद आहे. दुबळे मेले पाहिजेत; व बलवानांचें बल वाढलें पाहिजे. रोगी नष्ट झाले पाहिजेत.** हा निसर्गाचा कायदा आहे. शेतांत पीक पेरल्यानंतर त्यांत जें रान उगवतें तें वेळेवर उपटून टाकण्यांतच शेतकऱ्याचा शहाणपणा आहे. असें न केलें तर रान माजेल व पीक बुडेल. समाजावरही शहाण्या शेतकऱ्याप्रमाणेंच रोगट व दुबळे काढून टाकून निरोगी व बलवानांचें पीक वाढीस लावण्याची जबाबदारी आहे. अशा लोकांना काढून न टाकतां वाढूं दिलें तर समाजाची हानी होईल. रोगट व व निरोगी, दुबळे व बलवान, यांस एकाच मापानें मोजणें वेडेपणा आहे. त्यानां समान हक्क असावे असें ह्मणणें ही गोष्ट कोणत्याही नीतिशास्त्राला धरून नाहीं. उलटपक्षीं अशा लोकांना समान हक्क

देणें ह्मणजे अनीतीचा कळस आहे. निसर्गाच्या विरुद्ध लढाई करणाऱ्यांना जीवदान देणें ही गोष्ट कोणच्या नीतिशास्त्राला ग्राह्य आहे ? अशा लोकांवर दया दाखविण्यांत समाजाचें कल्याण नाहीं. ह्या लोकांना नीट बंधनांत ठेवून त्यांची वाढ न होईल अशी खबरदारी समाजानें घेतली पाहिजे. नीत्शेचे वरील प्रकारचे विचार त्यावेळीं कित्येकांना विचित्र वाटले; पण महारोगादि परंपरागत रोग्यांस प्रजोत्पादनाची बंदी कॅलीफोर्निया, न्युजर्सी, न्यूयॉर्क वगैरे संस्थानांत हल्लीं प्रत्यक्ष कायद्यानें करण्यांत आलेली आहे; व अशा तऱ्हेच्या प्रजोत्पादनावर नियमन घालण्याचा कायदा असावा असें सुधारलेल्या सर्व राष्ट्रांतील लोकांचें मत बनत चाललें आहे. तसेंच नीत्शेनें विवाहाविषयीं ज्या सूचना केलेल्या आहेत त्यांपैकीं कांहीं विक्षिप्तपणाच्या वाटतील, परंतु सदर सूचना सुप्रजाजननशास्त्राचा जन्म होण्यापूर्वी कित्येक वर्षें अगोदर नीत्शेनें केलेल्या आहेत हें वाचकांनीं अवश्य लक्षांत ठेवावें. ह्या नंतर लवकरच सुप्रजाजनन शास्त्राचा जन्म होईल असें खुद्द नीत्शेलाही वाटलें नव्हतें. हा प्रश्न पुष्कळ कालावधीनें सुटेल असा त्याचा अंदाज होता. ह्मणून ह्या शास्त्राच्या मार्गांतील त्याच्या मतें जे अडथळे होते ते दूर करण्याचा त्यानें पराकाष्ठेचा प्रयत्न केला.

**संयुक्त युरोपः**—अद्यापि सदर शास्त्राचे नियम लागू करण्याजोगी परिस्थिति उत्पन्न झालेली नाहीं. आनुवांशिकतेचा जो चमत्कार आहे तो अजूनही गूढ आहे. त्यांत अद्यापि पुष्कळ शोध लागावयाचे आहेत. हल्लींचें नीतियुग बदलून नीत्शेच्या ह्मणण्याप्रमाणें बुद्धियुग सुरू होईपर्यंत आपणाला सुप्रजाजननशास्त्राचे

नियम रूढ करितां येणार नाहींत. हल्लींचें युग समूळ बदललें पाहिजे. स्त्रीपुरुषांनां पूर्ण आर्थिक स्वातंत्र्य मिळालें पाहिजे. स्वत:चें राष्ट्र प्रबळ करण्याची हल्लींच्या राष्ट्रांची संकुचित राष्ट्रीय वृत्ति व मतलबासाठीं त्यांनीं पसरलेलें खुळचट शब्दावडंबर नष्ट झालें पाहिजे. मतलबासाठीं आप्पलपोटेपणाच्या वृत्तीला बळी पडून एकमेकांशीं व्यर्थ युद्धें करण्याचा राष्ट्रांचा हव्यास नाहींसा झाला पाहिजे. लढाईच्या जय्यत तयारीसाठीं करावा लागणारा प्रचंड खर्च बंद होऊन सदर पैसा जनतेच्या शिक्षणावर खर्च झाला पाहिजे; व जनतेला समाजशास्त्र व सुप्रजाजननशास्त्र यांचें शिक्षण मोठ्या प्रमाणावर दिलें पाहिजे. पण हें सर्व होण्यास पुष्कळ कालावधि आहे. नीत्शेच्या मतें हल्लींच्या जगांत दिसून येणारी राष्ट्रीय वृत्ति ही देखील संकुचित वृत्तीची द्योतक आहे. **आपल्या राष्ट्रापुरेसा विचार न करतां अखिल मानव जातीचा विचार सर्वांनीं केला पाहिजे.** भावी कालांत एक सर्वांत शहाणी मनुष्यजात निर्माण होईल व ती सबंध पृथ्वीवर एकछत्री अंमल गाजवील, अशा अर्थाचे उद्गार नीत्शेनें एक दोन ठिकाणीं काढिलेले आहेत. परंतु सबंध पृथ्वीवरील एकछत्री राज्य पुष्कळ कालावधीनें होण्यासारखें असल्यामुळें नीत्शेनें संयुक्त युरोपाची कल्पना काढली; व तिचा जोरानें पुरस्कार केला. तो ह्मणतो, हल्लींची युरपची स्थिति फार करुणाजनक आहे. युरोपांत कितीतरी राष्ट्रें आहेत. प्रत्येक राष्ट्रानें स्वत:चें अस्तित्व इतरांचे हिताहिताकडे न पाहतां कायम ठेवण्याचा आग्रह धरणें वेडेपणाचें नाहीं काय! हल्लीं आपण उदार होत चाललेले आहोंत

असें स्वत:स समजतों. आपली दृष्टि विस्तृत होत आहे. अशा वेळीं संकुचित आपलपोटेपणाची राष्ट्रीय वृत्ति उराशीं बाळगून बसणें शहाणपणाचें नाहीं. युरोपखंडांतील राष्ट्रें हीं एकाच शरीराचे ह्मणजे युरोपखंडाचे निरनिराळे अवयव आहेत. या निरनिराळ्या अवयवांनीं आपल्यापुरताच संसार पाहण्याची दृष्टी सोडून दिली पाहिजे. सबंध युरोपखंडाचें कल्याण डोळ्यापुढें ठेविलें पाहिजे. **अखिल युरोपखंडाचें संपूर्ण आर्थिक ऐक्य झालें पाहिजे.** युरोप खंडाची एक होण्याची इच्छा आहे; परंतु राष्ट्रीय वृत्तीच्या वेड्या पिरांच्या चिथावणीनें ती दबलेली आहे. अदूरदृष्टी मुत्सद्यांच्या शद्बजालानें जनतेची दिशाभूल झालेली आहे. लोकांच्या राष्ट्रीय वृत्तीचा फायदा घेऊन हे मुत्सदी आपल्या हातीं सत्तेचीं सूत्रें ठेवितात. व राष्ट्रांना अलग ठेवण्यापासून आपण जगाचें केवढें नुकसान करीत आहोंत याचा विचारही करीत नाहींत. ह्यामुळें युरोपच्या एकीकरण्याच्या इच्छेकडे कोणी लक्ष्यच देत नाहीं व कोणी कल्पना काढलीच तर तिचा विपर्यास करतात. नेपोलियन, गटे, शोपेनहॉयर वगैरे विशाल बुद्धीच्या विभूतींचा मंत्र या लोकांस समजत नाहीं. युरोपचें भवितव्य उज्वल व्हावें ह्मणून ज्या महात्मांनीं आजन्म खटपट केली त्या खटपटींचें रहस्य ह्या लोकांस अजून कळत नाहीं. **युरोपचें एकीकरण करून त्याच्या हातून मानवी विकासाचा गाडा झपाट्यानें पुढें ढकलावा** अशासाठीं अवरित मेहनत करण्यांत ह्या विभूतींनीं आपलें जीवितसर्वस्व घालविलें. परंतु त्यांचा उपदेश मुत्सद्यांच्या कारवाईमुळें जनतेला पटूं शकत नाहीं. नीत्शेनें सबंध युरोपाचें

एकीकरण करण्याच्या कल्पनेचा फार जोरानें पुरस्कार केला. तथापि मांजराच्या गळ्यांत घांट कशी बांधावी ह्याच्या तपशीलाचा प्रश्न जसा इसापाच्या उंदिरास सुटला नाहीं तसेंच युरोपचें एकीकरण कसें करावें याचें समाधानकारक दिग्दर्शन नीत्शेला करितां आलें नाहीं. शेजारच्या रशियाची प्रचंड शक्ति व त्यानें धारण केलेली भयानक वृत्ति ह्यांच्यामुळें स्वसंरक्षणार्थ संबंध युरोपखंडाला एकत्रित होण्याची जरूरी पडेल व त्यावेळीं मुत्सद्यांना संकुचितपणाचें नाटक आटोपून एकीकरणाची विशाल वृत्ति धारण करावी लागेल, असें नीत्शेनें भाकीत केलें आहे. नीत्शे ह्मणतो " मी नुसता जर्मन नाहीं. मी युरोपिअन आहें. आपलपोटेपणाची राष्ट्रीय वृत्ति धरून जातीजातींत द्वेष फैलावण्याचें अधम कृत्य मी करणार नाहीं. राष्ट्राराष्ट्रांत तंटे लावून कंडूशमन करण्यांत मला आनंद वाटणार नाहीं. जर्मनी पुरेसा जर्मन असें संकुचित ध्येय ठेवून मी जर्मनांच्या मनांत जहर ओतणार नाहीं. ह्या आसुरी वृत्तीमुळेंच युरोप खंडांतील राष्ट्रें आज तुटकतुटक आहेत. मला असलें संकुचित ध्येय नको. मी जर्मन आहें एवढ्यावरच मी संतुष्ट रहाणार नाहीं. माझी हांव याहून मोठी आहे. **मी युरोपिअन आहें. आह्मी जर्मन लोक युरोपिअन आहोंत. संबंध युरोपाचे आह्मी वारस आहोंत. या युरोपांत संपत्तीचा धूर निघत आहे तो सर्व आमच्या मालकीचा आहे.** संबंध युरोपानें एक झालें पाहिजे. आह्मी एकच गोष्ट जाणतों; एकच शब्द आह्माला माहित आहे; तो ह्मणजे युरोपिअन. मुत्सद्यांनीं कोरलेल्या कोंडवाड्यांत आह्मी रहाणार नाहीं. केवळ जर्मन अशी संकुचित वृत्ति

आह्मी धरणार नाहीं. आह्मी सर्व युरोपाचें एकीकरण करूं. "

**शिक्षणः**–सुप्रजाजननशास्त्राचें राज्य प्रस्थापित होण्यास नीत्शेच्या मतें युरोपखंडाचें एकीकरण हा एक प्रमुख उपाय होय. विचारांनीं व कृतीनें अधिक अधिक उच्च पदावर जाऊन अतिमानुष पिढी निर्माण होण्याची शक्यता पटण्यास युरोपच्या एकीकरणाची जरूरी आहे असें नीत्शेचें मत होतें. अतिमानुषतेला पोहोंचण्यास युरोपाचें एकीकरण हें जसें प्रमुख साधन त्याचप्रमाणें शिक्षण हेंही त्याच्या मतें प्रमुख साधन होय. ' सर्व तरुण पिढीला शिक्षण द्या, लोकमत तयार करा ' हा त्याचा एक महामंत्र होता. नीत्शे हा प्रोफेसर होता. त्यानें वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षीं " आमच्या शिक्षणविषयक संस्थांचें भवितव्य" ह्या विषयावर व्याख्यानें देऊन प्रचलित शिक्षणसंस्था कशा सुधाराव्या ह्या विषयीं बऱ्याच उपयुक्त व विधायक सूचना जनतेपुढें मांडल्या. ह्या निबंधांत नीत्शे ह्मणतो; ' सर्व जनतेला शिक्षण द्यावें असें ध्येय ठेवणें अव्यवहार्य आहे. निवडक लोकांना उच्च शिक्षण देऊन त्यांच्या हातून चिरस्थायी कामगिरी करण्याइतकें कार्यक्षम त्यांस बनविणें हें ध्येय ठेविलें पाहिजे. ' मनुष्य जातींत गुलामी मनोवृत्तीचे व धनी वृत्तीचे असे दोन भेद मानणाऱ्या नीत्शेनें अशा तऱ्हेचें ध्येय ठेवावें यांत कांहीं आश्चर्य नाहीं. शिक्षण पुस्तकी नसावें; भाषाशास्त्राचा कीस काढण्यांत विद्यार्थ्यांचा मेंदु शिणवूं नये, असें त्याचें मत होतें. निव्वळ भाषाशास्त्राचे पढिक पंडित करण्यानें विद्यार्थ्यांच्या आकांक्षा बेबंद होतात. कोठल्याही गोष्टींत खोल मन घालण्याची बुद्धि त्यांस होत

नाहीं. त्यांचें ज्ञान उथळ असतें. वाचनाची व लेखनाची त्यांस फाजील हौस असते; व आपण मोठे सुसंस्कृत आहोंत अशी ह्या पुस्तकांतील कीटकांस घमेंड असते. ह्मणून प्रत्यक्ष शास्त्रें व खरी कला एवढेंच विद्यार्थ्यांना शिक्षण द्यावें, असें नीत्शेचें म्हणणें होतें.

**उच्च मनुष्यः**—युरोपचें एकीकरण व उच्च दर्जाचें शिक्षण हीं अतिमानुपतेला पोंहोंचण्याचीं मुख्य साधनें खरीं. ह्या साधनांनीं मनुष्य अतिमानुप कोटींत जाण्यासारखी परिस्थिति निर्माण होईल पण साधनें म्हणजे कांहीं साध्यें नव्हत. साधनें हीं नारळाच्या कवचीप्रमाणें आहेत. आंतील गर किंवा खोबरें मनुष्यप्राणी होय. मानवाची जोपासना करून त्यास अतिमानुषतेच्या कोटींत कसें जावयास लावावयाचें हा नीत्शेच्या पुढें मुख्य प्रश्न होता. अतिमानुपतेची व्याख्या जरी करतां न आली तरी तें एक सुंदर ध्येय होतें यांत शंका नाहीं. नीत्शेनें अतिमानुषतेला पोंहोंण्यासाठीं उच्च मनुष्यप्राणी कसे निर्माण करावयाचे ह्या विषयीं ज्या विधायक सूचना केलेल्या आहेत त्या मननीय व मार्गदर्शक आहेत. मनुष्यप्राण्यानें व्यक्तिमहात्म्य नष्ट करण्यासाठीं संस्थांची टूम काढून कितीही प्रयत्न केला तरी अखेरीस ध्येयसिद्धीसाठीं मनुष्यांनां मोठे पुढारी, मोठ्या व्यक्ति, यांवरच अखेर अवलंबून रहावें लागेल, असें नीत्शेचें मत होतें. ह्या मोठ्या व्यक्ति, हे मोठे महात्मे, उच्च दर्जाचे हे मनुष्य, भविष्य कालीं मनुष्य जातींत क्रांति घडवून आणतील. नीतिप्रधान मनुष्य नाहींसे करून बुद्धिप्रधान मनुष्यप्राणी हे महात्मे निर्माण करतील. अशा रीतीनें युगांतर घडवून आणलें ह्मणजे ह्या उच्च दर्जाच्या मनुष्यांचें ह्मणजे महात्म्यांचें इतिकर्तव्य झालें. मानवाला

अतिमानुष कोटींत पोहोंचविणारे, महात्मे हे पूल होत. ह्यांच्या विचारांवरून मनुष्य अतिमानुष कोटींत गेला म्हणजे ह्या महात्म्यांचें जीवितसाफल्य झालें.

अशा धुरीणांच्या खटपटीमुळें " उच्च मनुष्य पिढी " निर्माण होईल. ह्या पिढीचे लोक शांतवृत्तीचे, निधड्या छातीचे, व गाजावाजा न करितां समाधानाच्या व निश्चयाच्या जोरावर सतत कार्य करणारे व अतिमानुषतेला पोहोंचण्यासाठीं धीटपणानें खटपट करणारे असे निपजतील. त्यांनां आत्मसंशोधनाची उपजत बुद्धि, आपल्यांतील कोणत्या गोष्टी काढून टाकावयाच्या व कोणत्या वाढवावयाच्या या विषयीं सन्मार्ग दाखवील. थोड्याशा विजयानें फुगून जाण्याची हलकट व उथळवृत्ति त्यांच्या ठायीं दिसून येणार नाहीं. त्यांना ढोंगाचा तिटकारा वाटेल. ते आनंदी, सहनशील, व साधे होतील. समाजाची धुरा आपल्या शिरावर वाहण्याचें अवघड काम ते लीलेनें पार पाडतील. दुसऱ्यावर हुकमत चालविण्याची जशी त्यांची नेहमीं तयारी असेल त्याचप्रमाणें प्रसंग विशेषीं आज्ञापालनासही ते तत्पर राहतील. सारांश पुढारी अथवा अनुयायी होण्याची पात्रता त्यांच्या अंगीं दिसून येईल. **समाजाच्या हितासाठीं आपल्याला जी भूमिका घ्यावी लागेल ती ते आनंदानें व उत्तम प्रकारें पार पाडतील.** अनुयायी होण्याचें आपल्या वांट्यास येवो अथवा पुढारीपणाचें भाग्य लाभो, कोणचीही स्थिति प्राप्त झाली तरी हर्षविशाद न मानतां आनंदानें, जगाच्या कल्याणासाठीं, स्वार्थी अहंकाराचा विटाळ होऊं न देतां, ते आपली कामगिरी कर्तव्य म्हणून उत्कृष्ट रीतीनें पार पाडण्याची

शिकस्त करतील.कुलीन युरोपिअन लोकांस आपले मनोविकार छपवून ठेवण्याची चोरटी बुद्धि रहाणार नाहीं. आपल्या विकारांची त्यांस लाज वाटणार नाही. ते कोणत्याही धर्मावर श्रद्धा ठेवणार नाहींत. नीतीचें कोणतेंही पुस्तक सर्वस्वी मान्य करणार नाहींत. अशा रीतीनें **स्वत: धर्मलंड व नीतिभ्रष्ट असूनहि इतरेजनांचे धर्म व नीतिबंधनें कायम रहावीं याची मात्र ते काळजी घेतील.** ते स्वत: बऱ्यावाइटाच्या बंधनापलीकडे जातील; परंतु सामान्य जनांची गतानुगतिकवृत्ति कायम रहावी अशी ते तजवीज करतील. उच्च मनुष्यपिढी अधिक उदात्त वृत्तीची होईल. धिम्मेपणानें पुढें पावलें टाकीत जाणें हा त्यांचा स्वभावधर्म बनेल. प्रतिकूल परिस्थिति, दारिद्र्य, किंवा अजारीपण, ह्यांतसुद्धां ते आपली शांतवृत्ति सोडणार नाहींत. दारिद्र्य व आजार ह्यांस धिम्मेपणानें तोंड देऊन त्यांस सहन करण्याचें मनोधैर्य त्यांच्याअंगीं आढळून येईल. आजकाल केवळ धंद्यामुळें मनुष्य उच्च अथवा नीच समजला जातो. चहावाले, नाटकवाले लोक, केवळ धंद्यामुळेंच हलक्या प्रतीचे समजण्यांत येतात. उलटपक्षीं कज्जेदलालीचा धंदा करणारे वकील, किंवा इकडून तिकडून गोळा केलेल्या गटार बातम्या छापणारे वर्तमानकार, हे संभावित चोर असले तरी प्रतिष्ठित समजले जातात. पुढें येणारी उच्च मनुष्य जात केवळ पैशामुळेंच कोणाला भारदस्तपणा किंवा हलकटपणा येतो असें मानणारी रहाणार नाहीं. ज्या धंद्यांमुळें शारीरिक व मानसिक अवनति होते ते धंदे केवळ धंदे या दृष्टीनें वाईट नसले तरी परिणामाच्या दृष्टीनें असे धंदे करणें अनिष्ट आहे, अशा

मताचे ते रहातील. ह्मणजे याचा अर्थ असा कीं प्रसंग पडल्यास कोणताहि पेशा पत्करण्याची त्यांची तयारी राहील. ज्या धंद्यामुळें आपली अवनति होते ते धंदे करावे लागल्यास त्यांनां त्यांत कमीपणा वाटणार नाहीं हें खरें. पण शक्य तितक्या लवकर ते अशा धंद्यांतून सुटण्याचा प्रयत्न करतील व आपला अधःपात थांबवतील. ह्या लोकांत सौजन्य विशेष दिसून येईल. ह्या सर्व गुणांच्या जोडीला त्यांच्यांतील आत्मसंयमन विशेष खुलून दिसेल.

आत्मसंयमनावर नीत्शेचा फार भर आहे. ह्याच्याच जोडीला **आज्ञाधारकपणा व निष्ठा** हे दोन सद्गुणही माणसांत अवश्य आले पाहिजेत असेंच नीत्शेचें मत आहे. चोहोंकडून रणधुमाळी माजून हलकल्लोळ उडाला असतांही जो सैनिक आपली जागा सोडीत नाहीं तोच खरा सैनिक होय. **नीत्शेला पळपुटेपणाचा फार तिटकारा होता.** तो ह्मणतो, जो मनुष्य निष्ठावान असतो त्यालाच ह्या जगांत कांहीं तरी किंमत आहे. उच्च मानवामध्यें आज्ञाधारकपणा व स्वामिनिष्ठा हे गुण येणें अत्यंत आवश्यक आहे. परंतु समतावादाचा पुरस्कार करणारे हल्लीचे ढोंगी लोक हे आपल्या खोडसाळ तत्त्वांनीं अतिमानुषतेला पोंहोंचण्याच्या मानवांच्या मार्गांत मोठीच धोंड उत्पन्न करीत आहेत. मानवांनीं प्रगति करण्याचें ठरविल्यावर, कांहीं पुढें, कांहीं मागें, असें स्वाभाविकच होणार. परंतु उच्च ध्येय ग्रहण करण्याची ताकद नसलेले **नादान समतावादी कोणालाही पुढें जाऊं देणार नाहींत;** कारण त्यांचें ध्येय सर्वांनीं समानदर्जाचे रहावें

असें आहे ! पण व्यवहारांत याचा अर्थ सर्वांनीं सारखेच हल्कट रहावें हाच आहे ! **विषमता उत्पन्न होऊं नये ह्मणून पुढें गेलेल्यास मागें खेंचण्याचा मात्र हे समतावादी उपद्व्याप करतील.** कोणास पुढें जाऊं देणार नाहींत. जगाच्या प्रगतीच्या मार्गांत समतावादी हे विषारी सापाप्रमाणें दबा धरून बसलेले आहेत. उच्च ध्येय यांना पटणार नाहीं. उच्च मनुष्य जातीची कल्पना त्यांना सहन होणार नाहीं. **सर्व सारखेच हलकट राहिले पाहिजेत एवढेंच यांचें ध्येय.** यांची बुद्धि, सद्गुण, धोरण, सर्वच खुजट आहेत. त्यांना वाढ कशी ती ठाऊकच नाहीं. त्यांचे विचार, आचार, आकांक्षा हीं सर्व अगदींच खुजट ! उच्चता कशी ती त्यांत नाहींच ! सर्वांचें सुख किंवा बहुजनसमाजाचें हित हीं उच्चताद्वेष्ट्या लोकांच्या डोक्यांतून निघालेलीं खुळें आहेत. समतावाद्यांची संकुचित वृत्ति प्रथम नष्ट झाली पाहिजे. उच्च मानवास ही कामगिरी पार पाडावयाची आहे. त्यांना खुळचट कल्पनांची होळी करावयाची आहे. ढोंगधतुऱ्याची हकालपट्टी करावयाची आहे. ही कामगिरी फार कठीण आहे. आशा व धैर्य या गुणांची ही कामगिरी पार पाडण्यास आवश्यकता आहे. कोणत्याही परिस्थितींत निराश न होतां, धीर खचूं न देतां, धिमेपणानें व धैर्यानें ह्या मताविरुद्ध लढाई करण्याची अवघड कामगिरी उच्च मनुष्यप्राण्यास पार पाडावयाची आहे. **या साठीं उच्च मनुष्यप्राणी धैर्यशाली व अस्सल लढवय्ये निपजले पाहिजेत.** आपण ज्या काळांत रहातों त्या काळाविरुद्ध त्यांस झुंजावें लागणार आहे. आपण हल्लींच्या युगाला सुधारणायुग

मानतों. ज्ञान व शास्त्रीय शोध ह्यांत आपण बरीच आघाडी मारलेली आहे हें खरें. पण असें असून सुद्धां भ्रामक समजुती, खोडसाळ मतें, व सदोष तत्त्वें, यांचा आपल्या भोंवतीं सुळसुळाट झालेला आहे. जग चालविण्यास सत्याचा जितका उपयोग होतो तितकाच किंबहुना अधिक ह्या असत्य व खोडसाळ तत्त्वांचा उपयोग होतो. भ्रम व भ्रामक समजुती ह्यांमुळेंच इतिहासांतील मोटमोठ्या गोष्टींस कित्येकदां अकल्पित असें निराळेंच वळण लागलेलें आहे. जगाची हल्लींची स्थिति विचारांत घेतली तर भ्रामक समजुती जग चालविण्यास अद्यापही आवश्यक आहेत असें दिसून येईल. त्यामुळें एकादी समजूत भ्रामक आहे असा शोध आपणास लागला तरी भ्रमनिरास केल्यानें जगावर काय परिणाम होतील ह्याचा नीट विचार केल्याशिवाय समंजस माणसानें भ्रमाचा भोपळा फोडण्याची घाई करूं नये. **एखाद्या भ्रामक समजुतीनें समाजधारणा होत असेल तर भ्रमाचें बंधन तोडून समाज विस्कळित करण्याची जबाबदारी घेणें शहाणपणाचें होणार नाहीं.** भ्रामक समजुतींचा जगाला अद्याप बराच उपयोग व्हावयाचा आहे. भ्रामक समजुतीपेक्षांही अधिक महत्वाचे सद्गुण म्हटले म्हणजे धैर्य व आशावादीपणा हे होत. मनुष्यानें आशावादीपणा केव्हांही सोडतां कामा नये. **सर्व सद्गुणांचा नायक आशावादीपणा हा आहे.** आशावादीपणा शिवाय माणसाच्या हातून कोणतीही महत्वाची कामगिरी होणार नाही. मनुष्यानें केव्हांही हताश होऊं नये. निराश बनूं नये. हातपाय गाळून स्वस्थ बसूं नये. धैर्य धरावें. आशा सोडूं नये.

आणि सतत प्रयत्न करीत रहावें. **माझा हाच सर्वांना संदेश आहे.** " उठा; धैर्य धरा; पुढें चला. प्रयत्न करा. आशा केव्हांच सोडूं नका. मर्दानी व युद्धप्रिय पिढी पुढें येत आहे. मला त्याचीं चिन्हें स्पष्ट दिसत आहेत. ह्या भावी युगांत शौर्याची किंमत चढती आहे. ही भावी पिढी सुद्धां उन्नत होऊन आणखी वरच्या कोटींत जाणार आहे. त्या पिढीला स्वतःचीं मतें व त्यांचे परिणाम ह्या साठीं घनघोर रणकंदन माजवावयाचें आहे. त्यासाठीं त्यांनां जे गुण आवश्यक आहेत ते निर्माण करण्याची खटपट केली पाहिजे. ही पिढी बलवान व युद्धप्रिय होऊन आपलें शौर्य प्रत्ययास आणील. आपण मनुष्य कोटींतून अतिमानुप कोटींत निःसंशय जाणार. माझें सर्व जगाला असें सांगणें आहे कीं ही उच्च मनुष्यजात मी तुह्माला दाखवून दिलेली आहे. तुमची संतति उच्च मनुष्यजातीपैकीं होणार आहे. उच्च मनुष्यजातीला जन्म देणाऱ्या आईबापांस शोभेल असें तुह्मी आपलें वर्तन ठेवा. भविष्यकाल तुमच्या हातीं आहे. भविष्यकाळाचे तुह्मी जनक आहांत. मात्र ही उच्च मनुष्यजात पैशाच्या जोरानें तुह्माला खरेदी करतां येणार नाहीं. हल्लींचे सरदार सोन्याच्या सांखळीनें मोजतां येतात, विकत घेतां येतात. ही नवीन पिढी तशांतली नाहीं. तुह्मी स्वतः श्रेष्ठ होऊन नवी पिढी निर्माण करण्याचें श्रेय घेतलें पाहिजे. **ही पिढी सोन्यानें जरी खरेदी होऊं शकत नाहीं तरी तपश्चर्येचें मोल दिल्यास ही उच्च मनुष्यजात तुमच्या हातीं लागेल.** आतां ह्या पुढें आपण कोणीकडून आलों याची वाटाघाट करीत बसूं नका,

कोणीकडे जाणार याची फिकीर ठेवा. पूर्वी काय झालें ह्याचा इतिहास धुंडाळण्यांत आपली सर्व शक्ति गमावूं नका. बापदाद्यांची थोरवी व कीर्ति गाण्यांत जीविताची इतिकर्तव्यता मानूं नका, तुह्मीं स्वतः काय करणार तें करून दाखवा. चालून आलेला रस्ता पाठमोरें वळून पुनः पुनः पहात बसण्यांत अर्थ नाहीं. तुम्हीं पुढें किती प्रगति करणार ती करून दाखवा. स्वदेशाच्या संकुचित कल्पना सोडून द्या. सबंध जगाकडे लक्ष द्या. स्वदेशाच्या कोंडवाड्यांतून बाहेर पडून आपल्या मुलांबाळांसाठीं जें सबंध जग पसरलेलें आहे त्यावर प्रेम करण्यास शिका. सबंध जग तुमच्या मुलाबाळांचें आहे त्यावर प्रभुत्व मिळवा. स्वदेशाच्या कोंदट वातावरणांतून बाहेर पडा. उठा, जागे व्हा, आणि कामास लागा. भावी पिढीची सोय पहा; माझें तुह्माला हेंच अखेरचें सांगणें आहे. सर्व जग तुमच्या मालकीचें आहे. बेवारशी अनाथ पोरांसारखे दीनवाणे होऊं नका. लोकांच्या दयेवर जगण्यापेक्षां जगाच्या कल्याणासाठीं मरणास मिठी मारा. कसल्याहि तऱ्हेच्या गुलामगिरींत आनंद मानूं नका. गुलामगिरीचे पाश बेगुमानपणें तोडून टाका. स्वतंत्र व्हा. जगाचे स्वामी व्हा. जग तुमचें आहे. प्रयत्न करा कीं तें हस्तगत झालेंच असें समजा."

REFBK-0003863